म. ग्रं सं ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ६४८
६४८

RFFBK-0001890

निषिद्ध ।

६१८

# आधुनिक कविपंचक.

"Where there is no vision, the People Perish."

—Mazzini

लेखक

गजानन त्र्यंबक माडखोलकर.

REFBK-0001890

मुद्रक-प्रकाशकः—अच्युत चिंतामण भट.
भट आणि मंडळी, बुधवार पेठ.
पुणें शहर.

आश्विन व॥ १, १८४३.

किंमत सव्वा रुपया.

६४८

राजाराम लक्ष्मण पराडकर यांच्या
प्रेममय व प्रियतम स्मृतीस
समर्पण.

नस्ता कवीचा व्यापार।
तरी कैंचा अस्ता जगोद्धार।
म्हणौनि कवि हे आधार।
  सकळ सृष्टीसी ॥

—रामदास.

# प्रस्तावना.

रा. गजानन त्र्यंबक माडखोलकर यांचे प्रस्तुत पुस्तकांतील सहाहि निबंध पूर्वी नवयुग वगैरे मासिक पुस्तकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाले, ते मराठी वाचकांच्या अवलोकनांत आलेच आहेत. हल्लीं तेच लेख पुन्हा सुधारून, एकत्र करून व पुस्तकरूपानें छापून त्यांना स्वतंत्र कायमचें स्वरूप देण्यांत येत आहे. हे लेख अनेक वाचकांना त्यावेळीं पुष्कळ पसंत पडले होते, यामुळें प्रस्तुत पुस्तकहि लोकांना आवडेल याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. रसिक वर्गाची सेवा करितांना त्यांना एकएक पुष्प अर्पण करण्यापेक्षां पुष्पगुच्छ अर्पण करणें हेंच अधिक योग्य होय. प्रस्तुत पुस्तकांत वर्णिलेल्या पांच कवींपैकीं टिळक व गोविंदाग्रज या दोघांच्या कवितासंग्रहांस मीं पूर्वी प्रस्तावना लिहिलेल्या आहेत हें कारण याहि पुस्तकाची प्रस्तावना मीं लिहावी याला पुरेसें नाहीं. तथापि वरील प्रस्तावनांची गोष्ट लक्षांत असल्यामुळेंच प्रायः रा. माडखोलकर यांनीं ही प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला विचारलें असावें; व स्वतः कवि नसलों तरी आधुनिक मराठी कवितेच्या वाचनाला प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें जी जी मदत करितां येईल ती करण्याची संधि साधणें हें मला माझें कर्तव्य वाटत असल्यामुळें मीं ही प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें.

'कविपंचक' हा शब्द उच्चारला कीं कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या संस्कृत कविपंचकाची आठवण कोणासहि झाल्याशिवाय रहात नाहीं. मी स्वतः ज्या वेळीं मराठी वाङ्मयसरोवरांत वाचनरूपी अवगाहनास प्रारंभ केला, त्या वेळीं शास्त्रीबुवांचें हें पुस्तक फारच लोकप्रिय होतें. हल्लीं वाचकांच्या दृष्टीनें तें कांहींसें मागें पडलें आहे. याचें कारण शास्त्रीबुवांची लेखनशैली लोकांना आवडत नाहींशी झाली आहे असें नव्हे, पण कालिदास व भवभुति वगळले असतां इतर तीन संस्कृत कवींच्या ग्रंथांचें अध्ययन पूर्वीइतकें अलीकडे होत नाहीं हेंच होय. विद्यापीठांत अद्यापि संस्कृत भाषेचा अभ्यास हा एक विषय आहे; परंतु मराठी भाषेच्या अभ्यासाकडे ज्या मानानें आधुनिक विद्वानांचें लक्ष्य अधिक लागलें त्या मानानें संस्कृत काव्याचें अध्ययन कमी झालें हें निस्संशय पण स्वाभाविकहि

आहे. तथापि शास्त्रीबुवांच्या कविपंचक-ग्रंथांतील जे आत्मीय गुण ते पूर्वीइत-केच आजहि अबाधित मानले जात असून, आधुनिक मराठी कवींचें वर्णन कर-ण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां रा. माडखोलकर यांनीं शास्त्रीबुवांच्या उपरि-निर्दिष्ट ग्रंथाचें नांवच काय, पण त्यांतील विवेचनशैलीहि आदरपूर्वक अनुस-रली आहे, हें वरील गोष्टीचें एक प्रमाण असेंच मी समजतों. फरक इतकाच कीं, संस्कृत कवींचा ठावठिकाणा, त्यांचें चरित्र, त्यांचा काल वगैरे गोष्टी जुन्या काळच्या व संशयग्रस्त असल्यामुळें या अनेक गोष्टींविषयीं निश्चितार्थाचें प्रतिपादन करणें हा जो 'संस्कृत कविपंचक' ग्रंथांत एक महत्वाचा मुद्दा होऊन बसलेला आढळतो, तो प्रस्तुत ग्रंथांत सहजच उपस्थित होत नाहीं. कारण आधुनिक कविपंचकांतील सगळ्यांत ज्येष्ठ कवि नारायण वामन टिळक यांचा जन्म सन १८६५ सालीं झालेला असून या सर्वांचें कविचरित्र हल्लींच्या वाचकवर्गाच्या डोळ्यापुढें बरेंचसें घडलेलें आहे. तरी पण हे सर्व पांचहि कवि मृत असल्यामुळें व काल हा वाळवीप्रमाणें स्मृति पोखरण्याचें काम अव्याहत करित असल्यामुळें यापुढें पुष्कळ वर्षेपर्यंत लोकांच्या वाचनांत रहाणाऱ्या प्रस्तुत ग्रंथांत त्यांचें अल्प-सें चरित्र रा. माडखोलकर यांनीं देऊन ठेवलें असतें तर अधिक बरें झालें असतें.

कोणत्याहि कवीचें समग्र काव्य वाचावयास सांपडल्याशिवाय त्याच्या योग्य-तेची व गुणदोषांची यथार्थ कल्पना कोणासहि येत नाहीं. किंबहुना एखाद्या चु-टक्यावरून कवीविषयीं मत बनवणें हें चुकीचेंच ठरेल. तथापि एखादा संपूर्ण ग्रंथ पुढें असला तरी त्याचें बारकाईनें खोल अध्ययन केलेला सहानुभूतिपूर्ण टीकाकार जर मार्गदर्शक होण्यास मिळाला तर तेंहि तितकेंच इष्ट आहे. एखादा राजवाडा उभा किंवा उध्वस्त झालेलाहि पहावयाचा असतां तो यदृच्छेनें कोठें तरी एका ठिकाणीं पहाण्यास सुरवात करावी व कोठें तरी एकादे ठिकाणीं तें पहाणें संपवावें यापेक्षां एकंदर राजवाड्याची समग्र कल्पना मनांत असलेला व त्याच्या इति-हासाशीं निकट परिचय असलेला सहृदय चतुर वाटाड्या लाभला तर तें पहाणें यथाशास्त्र होतें; इतकेंच नाहीं तर प्रेक्षणीय वस्तूचें खरें मर्म किंवा रहस्य समज-ण्यासहि पुष्कळ मदत होते. अगदीं सामान्य न्याय घेतला तरी एकच ग्रंथ दहा-वेळां ज्यानें वाचला, त्याला तोच ग्रंथ पहिल्यानेंच वाचणारापेक्षां अधिक मार्मिक ज्ञान असतें यांत मुळींच शंका नाहीं. दुसरें असें कीं, प्रस्तुत कविपंचकांत रहस्य

दृष्टीनें या पांच कवींच्या काव्यसंग्रहांतील नुसतीं हृदयंगम स्थानेंच शोधून काढून दिलेली नसून सर्वसाधारणरीत्या गुणदोषांची मार्मिक चर्चाहि केलेली आहे. यामुळें सदरहू पुस्तक स्वतंत्रपणें वाचनास अगदीं योग्य झालें आहे. किंबहुना हें पुस्तक जो चित्त लावून वाचील त्याला, अखंड आधुनिक मराठी काव्यपटाचे धागे-दोरे समजण्यास, त्याची अतिशय मदत होईल. कारण समकालीन कवींचीं मनें हें एक परस्पर गुंतागुंतीचें मोठें जाळेंच असतें.

प्रस्तुत पुस्तकांतील विवेचनांत ठिकठिकाणीं गोवलेल्या सिद्धांतांवर मत देणें हा या प्रस्तावनेचा हेतु नाहीं. रुचिवैचित्र्याचा प्रभाव काव्यपरामर्शाइतका इतर कोठेंहि दिसून येत नाहीं. यामुळें

तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ।

या भवभूतिवचनाप्रमाणें आवड हीच गोड असें शेवटीं म्हणावें लागतें. तथापि रा. माडखोलकर यांनीं अनुसरलेली विवेचनपद्धति एकांगी किंवा पक्षपाती नसून व्यापक आहे आणि त्यांचें विवेचन न पटणाऱ्या वाचकांपेक्षां पटणारे वाचकच अधिक भेटतील असा मला भरंवसा वाटतो. आधुनिक कवींसंबंधाचें, विशेष परिश्रम घेऊन लिहिलेलें, विवेचनपर असें हें माझ्या समजुतीनें पहिलेंच पुस्तक होय; व या दृष्टीनें रसिक वाचकवर्ग याचा अभिनंदनपूर्वक स्वीकार करितील अशी आशा आहे.

ता. १८, आक्टोबर, १९२१<br>पुणें शहर.

न. चिं. केळकर.

## शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | २ | कार्य, | कार्यः |
| ११ | १५ | आतुर | अमर |
| १२ | ४ | उत्कृष्ट | उत्कट |
| २१ | ८ | हृदयावर | हृदयदलावर |
| २१ | १९ | पाहुन | याहुन |
| २५ | ९ | जीं | गे |
| ४२ | ११ | Donnets | Sonnets |
| ९० | १४ | अबलासुबोध | आबालसुबोध |
| १२० | ६ | समुदाय | समुदय |
| १४८ | १ | सारखा | सारखाच |

# १

# कवि आणि काव्य.

असतात. कवितेच्या प्रदेशांत कल्पनेचेंच प्रभुत्व विशेष, बुद्धीचा वावर थोडा. कल्पना कारण, कविता कार्य, कविहृदयाला लागलेलें कल्पनेचें फूल पुरतें फुलून त्याचा सुगंध विश्वांत दरवळूं लागला ह्मणजे फुलाचें फूलपण त्या सुवासांतच विरून जातें. कल्पनेच्या भराऱ्या अमर्याद होऊन त्यांचें काव्यांत रूपांतर झालें ह्मणजे कल्पना विरून काव्यच बाकी रहाते. कवितेच्या विश्वांत बुद्धीचा वावर फाजील झाला ह्मणजे काव्यसृष्टींत उद्भूत होणाऱ्या कोमल सौंदर्यलहरी नष्ट होऊन दृष्टीला दुःख देणारें व्यवहाराचें वैराग वाळवंट तेथें रखरखूं लागतें. कल्पनेच्या भराऱ्या जितक्या उत्कट तितकें काव्याचें स्वरूप अधिक सुंदर. कल्पनेच्या त्या अमर्याद उड्डाणाला, व्यवहाराला बिलगून बसणाऱ्या बोजड बुद्धीचें, प्रपंचाच्या निर्दयतेची जाणीव उत्पन्न करून देणारें निष्ठुर बंधन अवरोध करूं लागलें ह्मणजे प्रतिभेच्या उन्मेषाला आळा बसतो; आणि ऐहिक उपाधींपासून सुटून वाऱ्याबरोबर भटकणाऱ्या कविहृदयाला खरें जग जवळ होतें. व्यावहारिक जगाच्या जाणिवेचे चटके कविहृदयाला बसूं लागले ह्मणजे कवितेचा उद्भव अर्थातच अशक्य होतो. आकाशावर उठणाऱ्या अभ्रतरंगांप्रमाणें कविहृदयावर ज्या वेळेला कल्पनातरंग उमटूं लागतात त्या वेळीं कोमल वृत्तींना विखरून टाकणाऱ्या बुद्धीच्या वेताल वाऱ्याचा वावर तेथें इष्टच नसतो. असत्याची अणुभरसुद्धां गय न करणारी कर्कश बुद्धि आणि आभासाच्या अशाश्वत आधारावर सत्यसृष्टीची उभारणी करणारें कोमल अंतःकरण या दोन अत्यंत भिन्न प्रकृतींचें प्रभुत्व एकाच प्रदेशावर कसें चालावें ? आणि ह्मणूनच कल्पनासृष्टींत विहरणाऱ्या या अलौकिक विभूतींना व्यावहारिक जग वेड्यांत काढतें. ते हे वेडे काय पहातात ?

> व्यर्थीं अधिकचि अर्थ वसे;
> तो त्यांस दिसे,
> ज्यां ह्मणति पिसे !
>
> —केशवसुत.

अशा तऱ्हेनें जड जगताला जें नसतें होतें त्या नसत्यांतून, त्या व्यर्थातून कल्पनेचें विशाल विश्व उभें करण्याचें सामर्थ्य, हें प्रापंचिक जग ज्यांना वेड्यांत काढतें, त्या दैवी व्यक्तींच्याच वाणींत आहे. जगाच्या मळलेल्या मार्गानें जाणारे प्राकृत जन, जगाला नवीन मार्ग घालून देण्याकारितां-जगाला नवीन ध्येयें

# १ कवि आणि काव्य

राष्ट्राच्या संसारांत कवितेचें स्थान अत्यंत महत्वाचें आहे. विश्वाच्या संसारांत सूर्योदयापूर्वी सृष्टीला उजळणाऱ्या उषेचें जें महत्व तेंच महत्त्व राष्ट्राच्या संसारांत, स्वातंत्र्योदयापूर्वी जनतेस जागृत करणाऱ्या कवितेचें. अपकर्षाचा अतिरेक झाल्यामुळें बधिरलेल्या राष्ट्राच्या अणुरेणूंत नवजीवन निर्माण करून त्याच्या महत्त्वाकांक्षेचा मार्ग मोकळा करण्याचें, त्याच्या मनाचे बंध तोडण्याचें राष्ट्रघटनेमधलें हें अत्यंत महत्वाचें कार्य, प्रबळ मनोवृत्तीच्या राष्ट्रकवींची प्रभावसंपन्न प्रतिभाच करित असते. विकारांची व विचारांची भरती असह्य झाली, निराशायास्तव आवरून धरिलेल्या आशा अनावर झाल्या, ह्मणजे दुर्दैवानें दडपलेल्या गरीब परंतु महत्त्वाकांक्षी मनाच्या भराऱ्यांप्रमाणें अंतःकरण उचल खातें; अंतःकरण असें उतावीळ झालें ह्मणजे आजपर्यंत मुक्या असलेल्या राष्ट्राला वाचा फुटते आणि स्वातंत्र्याकरितां आशेला आलेलीं अंतःकरणें कवींच्या मुखानें बोलूं लागतात. शब्दांच्या साहाय्यानें कल्पनेच्या तरल तरंगांची चिरंतन सृष्टि निर्माण करून, आज असाध्य दिसणारीं उदात्त ध्येयें मानवजातीच्या दृष्टीपुढें ठेवणारे आणि त्या ध्येयांच्या सिद्धीकरितां धडपडणाऱ्या दुबळ्या मानवजातीला निर्जीव शब्दांच्या जिवंत जादूनें सामर्थ्य देणारे ईश्वरी जादूगार हेच शब्दसृष्टीचे ईश्वर! मनुष्याच्या दुबळ्या दृष्टीला दूर दिसणारी तत्वसृष्टि, कल्पनेची सृष्टि ह्मणजेच वागीश्वरांच्या वाग्देवतेनें विश्वसंसाराला सौंदर्य आणण्याकरितां उदात्त करण्याकरितां उत्पन्न केलेली शब्दसृष्टि,—ध्येयसृष्टि— आज अशक्य दिसणारी परंतु उद्यां शक्य होणारी सत्यसृष्टि होय! सूर्याच्या सुवर्णकिरणांनीं आकाशाच्या अक्षय्य चित्रपटावर चितारलेलीं नयनमनोहर दृश्यें, चंचल चंद्रकिरणांच्या रजतरसानें न्हालेल्या क्षुब्धसागराच्या जललहरींचा निसर्गसुंदर नाच, काळ्याकभिन्न मेघांच्या गडगडाटांत सहज लीलेनें नर्तन करणाऱ्या विद्युल्लतेचे विचित्र विलास, आणि सूर्यास्तसमयीं वर्षाऋतूंतल्या वाढत्या विश्वसौंदर्याला प्रभातशोभेचा साज चढविणाऱ्या मोडक्या इंद्रधनुष्याचे क्षणभंगुर खेळ, पहातां पहातां नाहींशीं होणारीं हीं निसर्गाचीं धांवतीं दृश्यें, त्रिविध तापां-

नें त्रस्त झालेल्या मनुष्याच्या मनाला शांतिसमाधान देणारें जगताच्या जादुगाराचें हें अशाश्वत लीलालाघव शब्दांचा पेहराव चढवून महाकवींच्या प्रतिभेनेंच शाश्वत स्वरूपाला आणिलें आहे. कवि जर नसते, सृष्टीच्या संसाराशीं समरस होऊन स्वतःला विसरणारे वेडे पीर जर नसते, तर क्षणोक्षणीं नवनवीन रूप घेऊन अवतरणाऱ्या या क्षणजीवि सौंदर्याला चिरंजीवन कोणीं दिलें असतें ?

आह्मांला वगळा—गतप्रभ झणी होतील तारांगणें !

—केशवसुत.

अशा तऱ्हेचे आत्मविश्वासाचे उद्गार काढणारे कवि ज्या वेळीं राष्ट्रांत उत्पन्न होतात त्याच वेळीं कवडी मोलावर जिणें विकणाऱ्या त्या राष्ट्राचा उद्धार होऊन त्याचें कर्तृत्व यशाला चढत असतें. कवींचें सामर्थ्य, गगनांत विहार करणाऱ्या कवींच्या प्रतिभेचें सामर्थ्य राष्ट्राच्या मनाचे, महत्त्वाकांक्षेचे पाश तोडून त्याला स्वातंत्र्यक्षम करितें. आणि म्हणूनच राष्ट्राच्या संसारांत कवितेचें स्थान अत्यंत महत्वाचें आहे.

राष्ट्राच्या संसाराचा आणि कवितेच्या उत्कर्षाचा अशा तऱ्हेचा जिव्हाळ्याचा संबंध असल्यामुळें राष्ट्राच्या बदलत्या परिस्थितीबरोबर कवितेचें स्वरूपही बदलत असतें. एकोणिसाव्या शतकांत, महाराष्ट्राच्या मावळत्या स्वराज्यसूर्याबरोबर महाराष्ट्रांतील संत-कवींनीं निर्माण केलेल्या शब्दसृष्टीची शोभाही नाहींशी होऊं लागली होती. आणि ह्या विसाव्या शतकाबरोबर महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचीं प्रसादचिन्हें जसजशीं अधिकाधिक प्रकट होऊं लागलीं आहेत, तसतसें महाराष्ट्राच्या आजच्या पुनरुज्जीवित काव्यसृष्टीलाहि परिस्थितीप्रमाणें प्राप्त होणारें नवीन स्वरूप येत चाललें आहे. परंतु महाराष्ट्रांतील प्राचीन अगर अर्वाचीन कवितेचें विवेचन करण्याकरितां हा लेख नसून, 'कवि आणि काव्य' या विषयाचेंच सामान्यतः येथे विवेचन करावयाचें आहे.

काव्याचा उद्भव अंतःकरणापासून असतो. देवदैत्यांनीं समुद्रमंथन केल्यामुळें क्षुब्ध झालेल्या सागर-लहरींपासून सृष्टीला सौंदर्य आणणारें चंद्रबिंब ज्याप्रमाणें निर्माण झालें, त्याचप्रमाणें सुखदुःखांच्या आघातांनीं प्रक्षुब्ध झालेल्या उदात्त अंतःकरणापासून विश्वाला विश्रांति देणारें काव्य निर्माण झालें. अंतःकरण सदैव भिन्नभिन्न भावनांनीं भरलेलें असतें. भिन्न भावनांनीं भरलेल्या या भावना-

विश्वांत जी भावना ज्या वेळेला प्रबळ असेल त्या भावनेला बरोबर घेऊन, त्या भावनेचें अधिष्ठान करून, काव्य मनुष्याच्या अंतःकरणांतून बाहेर पडत असतें. जलभारानें लवलेल्या वर्षाऋतूंतील मेघमालेप्रमाणें अंतःकरण ज्या वेळेला विकारांनीं वांकतें, कांहीं तरी ज्ञात अगर अज्ञात कारणांनीं उद्‌भूत झालेल्या भावनांच्या अतिरेकानें अंतःकरण ज्या वेळेला ओथंबून जातें, अमर्याद झालेल्या विचारलहरींच्या उसळीनें हृदयसागर ज्या वेळेला हेलावून जातो, त्या वेळेला त्या लहरींच्या उसळीनें वर आलेले ते तुषार,—व्याकुल झालेल्या अंतःकरणाचे ते उत्कट विचार—काव्यरूप पावतात. सृष्टीचें निरुपम सौंदर्य पाहून अंतःकरणांत उठलेले विचारतरंग,–दुर्दैवाच्या आघातांनीं हृदय पिळवटून निघाल्यामुळें डोळयांत उभे राहिलेले अश्रू आणि ओंठांत घुटमळणारे उद्गार,–मनःसृष्टींतील हीं विविध विलसितें, मनुष्याच्या अंतःकरणांत जर काव्यबीज असेल तर, काव्यरूप लाधून चिरंजीव होतात. अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या करुणा-कल्लोळांनींच रामायणासारखें अनन्यसुंदर काव्य निर्माण केलें. निर्दय व्याधाचें तें क्रूर कृत्य पाहून वाल्मीकिऋषींचें अंतःकरण भरून आलें. तमसेच्या प्रशांत तीरावर तें क्रौंचमिथुन स्वच्छंद क्रीडा करीत असतां, व्याधानें सोडलेल्या बाणाच्या आघातानें त्या क्रौंच-मिथुनांतील एक पांखरूं कळवळलें आणि वाऱ्याच्या झुळुकेबरोबर झोंके घेणाऱ्या फुलाप्रमाणें वृक्षशाखेवरून गळून पडलें. शराच्या आघातानें झालेल्या क्षतांतून वहाणाऱ्या रक्तानें रंगलेल्या चिमुकल्या जीवाची ती तडफड,—आणि त्या आपल्या दयिताची ती आटपत आलेली तडफड पाहून टाहो फोडणाऱ्या दुसऱ्या पांखराचा तो आक्रोश—हें अत्यंत हृदयविदारक दृश्य पाहून महर्षींचें अंतःकरण दुःखसंतापांनीं व्याकुळ झालें. त्या दुःखाच्या आघातानें त्यांच्या हृदयांत निद्रित असलेली वागीश्वरी जागृत झाली, आणि तपस्विजनांच्या स्वभावधर्माला विरुद्ध अशी शापवाणी तिनें उच्चारली. कांहीं तरी बोलावें असा प्रत्ययाभासच त्यांना झाला, आणि शापवाणीच्या रूपानें वाग्ब्रह्म तेथें अवतरलें. भारतवर्षांतल्या किंबहुना जगांतल्या आद्य-कवीला काव्यस्फूर्ति, तो करुणप्रसंग पाहून झाली आणि रामायणासारखें नितांतमधुर शोककाव्य त्याच्या वागीश्वरीनें गाइलें.

कविता अंतःकरणापासून उद्भवत असते. कल्पनेनें उत्पन्न केलेल्या विचारसृष्टींत वावरणारे वागीश्वर मनाला मोहनी घालणारीं सुंदर काव्यें निर्माण करीत

अर्पण करण्याकरितां धडपडणाऱ्या या विलक्षण व्यक्तींना वेड्यांतच काढणार ! आणि खरोखरीच अंतःसृष्टीशीं तद्रूप होणारे कवीश्वर व

क्षण एक पुरे प्रेमाचा,
वर्षाव पडो मरणांचा,

—गोविंदाग्रज.

अशा निर्धारानें निष्फल आशेवर नजर ठेवून मृगजळामागें धांवणारे आषक किंवा निराशेनें बुद्धि बावरल्यामुळें वहकलेले निर्बुद्ध वेडे, ह्या अतिशय भिन्न वृत्तींच्या उन्मनस्कांमध्यें एक प्रकारचें विलक्षण सादृश्य आढळून येतें. तिघांच्या बाह्यवृत्ति सारख्याच; आणि त्यामुळें अंतर्वृत्तींत असलेला सूक्ष्म फरक सामान्य बुद्धीला सहसा दिसत नाहीं. कवीचें वेड कल्पनेचें, कल्पनेनें उत्पन्न केलेल्या (उज्ज्वल ध्येयाचें असतें.) प्रेमाकरितां तडफडणाऱ्या प्रेमी जनाचें प्रेम त्याच्या प्रेमवस्तूपुरतें असतें; परंतु कवीचें वेड विश्वाला व्यापणाऱ्या विशाल कल्पनेचें अर्थात् सार्वलौकिक असतें. कवीच्या व्यक्तीचें मरण त्याच्या वेडांतच असतें; त्याच्या वेडांत व्यक्तिभावाला वावच रहात नाहीं; त्याचें वेड विश्वभावाला विशाल करितें —उदात्तता आणितें. हा आंतर भेद झाला; परंतु बाह्यवृत्ति मात्र सारख्याच.

दिससी येथें, रमसी तेथें
विसरुनि जासी परि उभयांतें
तुज तुझाच नाहीं थांग !

— टिळक

हे एका उन्मनस्कानें दुसऱ्या उन्मनस्काला पाहून काढिलेले उद्गार ह्या अत्यंत भिन्न व्यक्तींच्या बाह्यवृत्तीला सारखेच लागू पडतात. अंतःसृष्टींत अंतःकरण रंगून गेलें ह्मणजे एक प्रकारची मधुर गुंगी कवीच्या वृत्तीवर पसरत असते. अंतःसृष्टींत उद्भूत होणाऱ्या सौंदर्याच्या लाटा कवीच्या देहावर आदळूं लागल्या ह्मणजे त्या लाटेच्या प्रत्येक स्पर्शाबरोबर त्याचें अंग थरारूं लागतें, त्याच्या वृत्ति विरल होतात आणि त्याच्या आचरणावर एक प्रकारचा मोहक बेभानपणा चढूं लागतो. या बेभानपणालाच कवीचें वेड ह्मणतात !

सुखदुःखांच्या अनुकूल अगर प्रातिकूल संवेदनांनीं अंतःकरण व्याकूळ झालें असतां मनुष्याच्या ठिकाणीं जर काव्यबीज असेल तरच कवितेची उत्पत्ति होत

असते. व्यवहारामध्यें सुखदुःखाच्या कडेलोटाचे प्रसंग प्रत्येक मनुष्यावर आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी येतच असतात. परंतु म्हणून कांहीं प्रत्येक मनुष्य कवि झालेला दिसत नाहीं. हर्षशोकादि भावनांचा कडेलोट होऊन व्याकुळ झालेलें अंतःकरण कल्पनेच्या,-वैयक्तिक भावनेला विश्वरूप देणाऱ्या प्रतिभेच्या अश्वावर आरोहण करून आकाशमंडळांत भराऱ्या मारूं लागलें, म्हणजे विश्वस्वरूप पावलेल्या त्या उदात्त अंतःकरणापासून कविता आविर्भूत होत असते! कवितेची उत्पत्ति इहसंसारांत सदैव गुरफटलेल्या सामान्य अंतःकरणांत होत नाहीं. व्यक्तापासून अव्यक्ताकडे, ज्ञातापासून अज्ञाताकडे, अणूपासून महताकडे आणि व्यष्टीपासून समष्टीकडे धांव घेणाऱ्या तरल कल्पनेच्या वेगवंत अश्वावर आरूढ झालेलें उद्दाम अंतःकरणच उत्तम कवितेला जन्म देत असतें. कल्पनेला काय दिसत नाहीं? कल्पनेला काय कळत नाहीं? मनुष्याच्या कोत्या मनानें आंखून टाकलेल्या ज्ञाताच्या सीमारेषा ओलांडून अज्ञाताच्या अनंत अंतरिक्षाकडे धांव घेणाऱ्या या चिद्धनचपलेला काय अशक्य आहे? दैवाला भेदून पलीकडे पहाणारी प्रतिभेची अंतर्भेदी दृष्टि लाधलेल्या कवीश्वराला काय दिसणार नाहीं?-काय कळणार नाहीं? प्रतिभेचे पंख लाधलेलें कवीचें उच्छृंखल अंतःकरण अंतरालांत उड्डाण करूं लागलें म्हणजे त्याच्या भरारीला हें ब्रह्मांड थिटें पडतें, तोंकड होतें; आणि त्याच्या उड्डाणाच्या वेगानें भयभीत झालेल्या विधात्याला, त्याच्या संचाराकरितां निराळीच सृष्टि निर्माण करावी लागते! वाऱ्यावर वहाणाऱ्या अभ्रखंडाप्रमाणें कल्पनेच्या तरंगावरोवर कवीचें अंतःकरण उड्डाण करूं लागलें म्हणजे दगडाला देवपण चढतें आणि वैराण वाळवंटांत उद्यानें उठून सृष्टीला स्वर्गरूप येतें! प्रतिभेचें सामर्थ्य अद्भुत आहे. आकाशांत पडलेलें इंद्रधनुष्य पाहून उचंबळलेल्या अंतःकरणाचे उत्कट उद्गार, प्रतिभा नसती तर जागच्या जागीं जिरले असते. देशाची दुःस्थिति पाहून तळमळलेल्या अंतःकरणांतून बाहेर पडलेले तुतारीचे स्फूर्तिप्रद पडसाद, प्रतिभा नसती तर वाऱ्यावर विरून नष्ट झाले असते. मांडीवर मलूल झालेलें प्रेमाचें फूल पाहून कळवळलेल्या अंतःकरणांत उठलेले करुणोद्गार, प्रतिभा नसती तर तेथल्या तेथेंच थबकून नाहींसे होते. त्रिविध तापानें पोळलेल्या प्रेमळ अंतःकरणावर मायेची पाखर घालणाऱ्या भक्तवत्सल भगवंताचें, संतकवींच्या श्रद्धाबळानें उभें केलेलें श्यामसुंदर सगुण स्वरूप,

–दुर्बळांचें दुःख पाहून दयेनें द्रवणाऱ्या त्या दगडाचें देवपण, प्रतिभा नसती तर नाहींसें होतें आणि मनाला उद्वेग आणणारा काळा फत्तर मात्र मागें रहाता! प्रतिभेचें सामर्थ्य असें अनिर्वचनीय आहे.

प्रतिभेच्या सामर्थ्यानें शब्दस्वरूप पावलेले क्षुब्ध अंतःकरणाचे उद्गार हें काव्याचें प्राथमिक मूर्तरूप होय. हें रूप अर्थातच बहुधा अशुद्ध असतें. खाणींतून काढलेल्या अशुद्ध सुवर्णरजांना आणि कविहृदयांतून एकाएकीं वेगानें उसळलेल्या काव्योद्गारांना कांहीं तरी संस्कार झाल्याशिवाय विशुद्ध स्वरूप प्राप्त होत नाहीं. त्यांना स्पष्ट, शुद्ध व सुंदर स्वरूप येण्याकरितां कांहींसें कृत्रिम व्हावें लागतें. छंदोबद्ध रचना, घोळघोळून ह्मणतां येण्याजोगी सुरेल शब्दसरणी हें या उद्गारांचें साक्षात् स्वरूप होय. हें स्वरूप जितकें नादमय असेल तितकें मनाला भुलविण्याचें त्याचें सामर्थ्य अधिक. अंतःकरणांत प्रबळ असलेल्या भावनेला घेऊन बाहेर पडलेले काव्योद्गार दुसऱ्या अंतःकरणाला जाऊन भिडले असतां त्या अंतःकरणांतली ती विशिष्ट भावना जागृत व्हावी ह्मणून कवितेच्या ठिकाणीं नादमाधुर्य अवश्य असतें. हें नादमाधुर्य निर्माण करण्याकरितां विशिष्ट अक्षरांची पुनरुक्ति होणें जरूर असतें. पुनःपुन्हा उच्चारल्या जाणाऱ्या त्याच त्या अक्षरांचे नाद एकमेकांवर आदळले ह्मणजे त्यांच्या आघातापासून उत्पन्न होणाऱ्या मंजुळ नादलहरी दुसऱ्या अंतःकरणाला जाऊन भिडल्या असतां त्या अंतःकरणांतली तीच भावना जागृत होते आणि त्या दोन भावना एकरूप होऊन अंतःकरण तल्लीन होतें. अशा तऱ्हेचें नादमाधुर्य ज्या रचनेनें निर्माण होतें त्या रचनेला सामान्यतः यमक म्हणतात. यमकांइतकेंच अनुप्रासांचेंही या दृष्टीनें महत्त्व आहे. संस्कृत काव्यांत प्रासांचा व मराठी काव्यांत यमकांचा विशेष प्रचार आहे. संवेदनात्मक स्फुट गीतें–वीणाकाव्यें, जीं विशेषतः घोळघोळून ह्मणावयाचीं असतात, त्यांना हें नादमाधुर्य अतिशय अवश्य असतें. संस्कृत सारस्वतांत ज्याला 'वीणाकाव्य' ह्मणतां येईल असें कवित्व जयदेवकवीचें आहे. जयदेवाच्या या 'गीतगोविंद' काव्यांतील सर्वच गीतें अतीव मधुर आहेत. इंग्रजी कविमंडळांत मूर, शेले, कीट्स व टेनिसन यांचीं स्फुट गीतें पराकाष्ठेचीं मंजुळ आहेत. यमकरचनेनें नादमधुर असलेलें एकादें गीत घोळघोळून म्हणत असतां त्या गीतांतील मधलेंच यमक जर गळलेलें असलें तर त्या यमकहीन

चरणापाशीं पोंचतांच, आतांपर्यंत नादरसांत विरून गेलेलें अंतःकरण एकाएकी दचकतें, त्याला कांहीं तरी तुटल्यासारखें-कोठें तरी चुकल्यासारखें वाटतें, आणि त्या आनंदाचा एकदम विरस होतो. मनाला तल्लीन करण्याची अशी विलक्षण शक्ति अक्षरांच्या पुनरुक्तींत आहे. ही पुनरुक्ति कवितेला आवश्यक आहे म्हटलें असतां अनुचित होणार नाहीं. नदीचा ओघ अप्रातिहत वेगानें वहात असतां वर उसळणाऱ्या असंख्य लाटांच्या खळखळाटाप्रमाणें, स्फूर्तीचा प्रवाह अनिरुद्ध उचंबळत असतां अक्षरांच्या पुनरुच्चारानें उत्पन्न होणाऱ्या नादलहरी मनाला एक प्रकारचा अनुपम आनंद प्राप्त करून देतात. हा आनंद अक्षरांचा पुनरुच्चार नसला तर नाहींसा होतो; आणि म्हणूनच कवितेमध्यें अक्षरांच्या पुनरुच्चारांची जरूरी भासते. कवितेच्या सहजसुंदर स्वरूपाला यमकाच्या कृत्रिमतेचें हें गालबोट शोभाच देत असतें. कृत्रिमता कोणालाच सुटलेली नाहीं. अरण्यांतून अविरत संचार करणाऱ्या सरित्प्रवाहाला सुद्धां सखल प्रदेशांतूनच मार्ग काढावा लागतो! कृत्रिमतेचें हें बंधन निसर्गनिर्मित आहे. श्लोकाच्या अगर पदाच्या विवक्षित वृत्तांतून विचाराचा ओघ वहाता ठेवणें जोंपर्यंत कृत्रिम वाटत नाहीं, तोंपर्यंत केवळ दुराग्रहानें यमकांचा त्याग करणें हें शुद्ध रभसाचरित आहे.

परंतु यमकांच्या बंधनानें स्फूर्तीच्या सहज प्रवाहाला जर अवरोध होऊं लागला तर मात्र तें बंधन झुगारून देणेंच योग्य होईल. कारण रीति हा कांहीं काव्याचा आत्मा नव्हे. प्रतिभेच्या नाजूक पायांत भूषण म्हणून घातलेलीं हीं नूपुरें वाऱ्यावर नाच नाचणाऱ्या प्रतिभेच्या पायाला जर जड झालीं तर त्यांना झुगारून देणेंच अवश्य आहे; मग त्या नादमाधुर्याला मन मुकलें तरी हरकत नाहीं. शब्दांची योजना सामान्यजनांच्या मनाला मोह घालिते; रसिकांचें अंतःकरण या बाहेरच्या भपक्याला भुलत नाहीं. नादमधुर, अर्थसुंदर अशा सरस कवितेच्या आंतर आस्वादावरच तिचें खरें रससौंदर्य अवलंबून असतें. नाद मधुर असला, अर्थ सुंदर असला म्हणजे आधींच रमणीय असलेल्या काव्याच्या महतीला विशेष मोल चढतें. परंतु नाद काय किंवा अर्थ काय, हीं काव्याचीं थोड्याबहुत प्रमाणांत बहिःस्वरूपें झालीं. कवितेचें खरें सौंदर्य तिच्या आंतर अर्थात,— ज्या उदात्त अंतःकरणापासून कविता आविर्भूत झाली त्या अंतःकरणाचे गूढ संदेश ज्या अर्थांत उमटलेले असतात, त्या आंतर अर्थांत—सामावलेलें असतें.

तें सौंदर्य नादांत असत नाहीं, अर्थात असत नाहीं; तें सौंदर्य त्या आंतर अर्थांतच अंतर्भूत झालेलें असतें. या आंतर अर्थालाच ध्वनि ह्मणतात. नाद, अर्थ आणि ध्वनि हे एकेकांहून अधिक श्रेष्ठ असे कवितेचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. नाद आणि अर्थ यांच्या जुळणीनें काव्यदेह निर्माण होतो; या निर्माण काव्यदेहामध्यें ध्वनि मिसळला, आंतर अर्थाचा आत्मा आविर्भूत झाला ह्मणजे काव्य सचेतन होतें. सुंदर शब्दांच्या सारणींतून आंतर अर्थाचा ओघ वाहूं लागला कीं जीवकलेचा प्रादुर्भाव होऊन कविता बोलूं लागते आणि तिचे ते अत्यंत मधुर बोल ऐकून विश्व डोलूं लागतें! कवीचें गाणें अंतःस्फूर्तीचें,—सहज असतें. करून काव्य होत नाहीं. सहजस्फूर्तीचा कवि हें एक जगताला ईश्वराचें देणें असतें;—

... ... ... आणि शिकवोनी काय कवी होतो?
कदा नोहे; रससिद्ध कवी जो कीं। स्वयंभू तो अवतरत असे लोकीं.
स्वयं काव्यस्फूर्तीस पावणारा। स्वयं नादब्रम्हांत गुंगणारा,
शब्दसृष्टीचा चतुर विधाता तो।·जगन्मोहन या खगापरी गातो.

—चंद्रशेखर.

घटकेघटकेला विश्वाच्या वातावरणांत उद्भुत होणाऱ्या सौंदर्यतरंगांना आतुर करण्याचें अद्भुत कार्य, सहजस्फूर्तीच्या कवीश्वरांचीच वैखरी करीत असते.

व्हाव्या वाधित वस्तु ज्यांत वसतें सौंदर्य अत्युत्कट
इच्छा केवळ कीं न वस्तुसह तें पावो जगीं शेवट.

—Bee.

हा हेतु मनांत धरूनच कवीश्वरांना परमेश्वरानें निर्माण केलें. क्षणभरानें कोमेजणाऱ्या जाईच्या फुलाचा वाऱ्यावर वहाणारा सुगंध, घटकाभरच चमकून जाणाऱ्या चंचल चपलेचें तरल तेज आणि निर्जन वनांत निरंतर नाचणाऱ्या निर्झरिणींचीं निगूढ गीतें, कवीश्वर नसते तर, अमरपदाला कोणीं चढविलीं असतीं? प्रेमळ अंतःकरणांत सदैव नाचणाऱ्या प्रेमाच्या मधुर भावनांना प्रतिभेच्या प्रभावानें शब्दविश्वांत नाचविण्याचें सामर्थ्य कवींच्याच वाणींत वसत असतें. आणि म्हणूनच—

प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा. —गोविंदाग्रज.

आपल्या गीतनादावर विश्वाचें अंतःकरण नाचवीत असतो. कृत्रिम कवितेला, नुसत्या नादमधुर निर्जीव शब्दांना हें कार्य साधणार नाहीं. कविता म्हणजे नाद नव्हे; कविता ह्मणजे रीति नव्हे; कविता ह्मणजे अंतःकरणाच्या उमाळ्याबरोबर उचंबळून आलेले उत्कृष्ट उद्गार! हेच उद्गार अमर होतात आणि ह्याच उद्गारांनीं संसाराला स्वर्गसमक्षता आणिली आहे!

कवितेचा अवतार विश्वाला उदात्तता आणण्याकरितां आहे. कांहीं तरी ज्ञात अगर अज्ञात कारणानें उचंबळलेल्या अंतःकरणाच्या चंचल आवेगांना कल्पनेच्या साहाय्यानें चिरंजीवन देऊन, त्या क्षणिक आवेगांतून शाश्वत सत्य बाहेर काढण्याचें कार्य कवीला करावयाचें असतें. मनुष्याच्या दुबळ्या दृष्टीला जें दिसलें नाहीं; मनुष्याच्या कोत्या कल्पनेला जें कळलें नाहीं; मनुष्याच्या जड जाणिवेनें जें जाणिलें नाहीं; तें सगळें या विश्वांतलें अदृश्य, अतर्क्य आणि अज्ञात सौंदर्य, दुःखानें भरलेल्या या जगांतला तो सगळा अननुभूत आनंद मनुष्याला प्राप्त व्हावा म्हणून हे अमृताचे मेघ जीवसृष्टीवर वोळले आहेत. सृष्टीचा संसार दुःखानें व्यापलेला आहे. या दुःखमय जगांत अविश्रांत प्रवास करणाऱ्या अभागी जीवाला सुखाची सावली देण्याकरितां हे कल्पनेचे कल्पतरु, परमेश्वर या मर्त्य-भूमींत उत्पन्न करीत असतो. प्रपंचमोहांत सांपडून तडफडणाऱ्या मनुष्याच्या मनापुढें व्यक्तिप्रपंचाच्या ध्येयाहून पवित्र असलेलें विश्वप्रेमाचें परमोच्च ध्येय ठेवून त्याच्या जीवाची तळमळ कविता शांत करिते. स्वतःचें सुख, व्यक्तीचें सुख—हें कधींच नकोसें होणार नाहीं; त्याचा व्याप कधींच सुटणार नाहीं. त्या स्वतःच्या सुखापलीकडे, त्या व्यक्तीच्या सुखापलीकडे, वैयक्तिक सुखाहून अधिक श्रेष्ठ असलेल्या समाजाच्या, विश्वाच्या सुखाकडे मनुष्याच्या मूढ मनाला वळवून त्याच्या बावरलेल्या बुद्धीला निःश्रेयसाचा मार्ग कविता दाखविते. संसाराच्या जाळ्यांत गुरफटून व्यक्तिभावांतच जीव रंगून गेला म्हणजे त्याला बाहेरलें जग—स्वतःचा समाज, स्वतःचें राष्ट्र मेल्यासारखें होतें. भूतकालीन पुण्यस्मृतींचीं मधुर पुष्पें आपल्या वाक्सुधेच्या सिंचनानें ताजा राखून त्यांच्या परिमळानें वर्तमानकाळाच्या दगदगीला विटलेल्या मनुष्याचें मन कवि उल्लसित करितात; आणि त्यामुळें मनुष्याच्या हातून थोडेंबहुत तरी सत्कार्य घडतें. स्वतःच्या सुखापलीकडचें हें जनसेवेचें मंगल ध्येय जर मनुष्याच्या दृष्टीपुढें नसतें, तर जीवित जड

होऊन मनुष्य मातीमोल झाला असता! उदात्त ध्येयें दृष्टीपुढें असल्यामुळेंच मनुष्याला हें दुर्बल जिणें जगणें शक्य झालें आहे. मनुष्याकारें प्रगट झालेलीं हीं विवेकनिधीचीं भांडारें जर जगाला न लाभतीं तर जगाची स्थिति फार कठीण झाली असती. कवि हे देवांचे रूपकर्ते आणि स्वर्गाचे निर्माते आहेत! बाल्यावस्थेंतल्या अल्लड जगताला वळण लागावें म्हणून व्यास-वाल्मीकींसारख्या ईश्वरी प्रतिभेच्या वागीश्वरांनीं भारतरामायणासारखीं अलौकिक काव्यें निर्माण करून विश्वाला उदात्तता आणणारीं–मनुष्याला देवपदाला चढविणारीं–दिव्य ध्येयें या अजाण जगतापुढें उभीं केलीं. आद्य कवींच्या कल्पनेच्या असल्या लोकातिग भराऱ्यांना भुलूनच जग आजपर्यंत सन्मार्गाचें आक्रमण करीत आलें आहे. आणि म्हणून जगदीश्वराच्या ब्रह्मांडरचनेहूनही वागीश्वरांची कविप्रबंधरचना जाड आहे असें म्हणावयाचें!

कवितेचा उद्भव आणि हेतु या दोन महत्त्वाच्या मुद्दयांचें आतांपर्यंत जें विवेचन झालें त्याच्या अनुरोधानें प्राचीन महाराष्ट्रसारस्वताचा थोडाबहुत परामर्श घेणें अगत्याचें आहे. महाराष्ट्राच्या अर्वाचीन कवितेचा ओघ कोणत्या दिशेनें वाहिला असतां राष्ट्रघटनेचें महत्कार्य सुकर होईल याचा विचार करण्यापूर्वी प्राचीन कवींच्या स्फूर्तीचा प्रवाह कोणत्या दिशेनें वाहिला होता आणि त्याचा परिणाम तत्कालीन स्थितीवर काय झाला हें अवश्य समजून घेतलें पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकीय स्वातंत्र्याच्या संध्याकालाबरोबरच महाराष्ट्रकाव्याच्या अरुणोदयाला आरंभ झाला! महाराष्ट्राच्या काव्यक्षितिजावरला प्रभाततारा भावी संकटाच्या कृष्ण मेघांची शबल च्छाया स्वराज्यसूर्याला ग्रासीत असतां दिङ्मंडलावर चमकूं लागला. स्वराज्याच्या या अखेरच्या दिवसांत उदयाला आलेले महाराष्ट्राचे आद्य कवि श्रीज्ञानोबाराय आणि स्वराज्यसूर्याच्या पुनरुदयाचीं प्रभातगीतें आळविणारे राष्ट्रकवि श्रीसमर्थ या दोन अलौकिक विभूतींना, महाराष्ट्राच्या आयुष्यांतील जो विशेष धामधुमीचा काळ मध्यंतरीं होऊन गेला त्या काळाचे, अनुक्रमें आदि व अंत कल्पून त्यामधल्या काळांत निर्माण झालेल्या काव्यप्रबंधांचाच विशेषतः विचार करावयाचा आहे.

महाराष्ट्राच्या या मध्यकालीन सारस्वतावर एकाच भावनेचा प्रकाश पडलेला आढळून येतो. महाराष्ट्रसारस्वताच्या या भव्य मंदिराचा पाया ज्या प्रतिभा-

झाली संतकवीनें घातला त्या संतकवीपासून तों त्या मंदिराच्या उभारणीची पूर्तता करून त्यावर कळस ठेवणाऱ्या भगवद्भक्त महापुरुषापर्यंत त्या मंदिराच्या उभारणीला ज्या कारागिरांचें कौशल्य कामीं आलें, त्या सगळ्या कारागिरांच्या अंतःकरणाची घडण ज्या एका पवित्र वृत्तीनें घडली होती त्या वृत्तीची छाया या सारस्वतावर अतोनात पडल्यामुळें या सारस्वताला एक प्रकारचें मनोहर एकांगित्व आलें आहे. महाराष्ट्रसारस्वताच्या मंदिराचा पाया श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं शके १२१२ मध्यें घातला. यापूर्वीच मराठी भाषेंत ग्रंथकर्तृत्वाला सुरुवात झाली होती. मानभावांनीं मराठी भाषेला प्रेमानें हातीं धरलें; मुकुंदराजांनीं प्रबंधरचनेची दिशा दाखविली. या पूर्वी झालेल्या प्रयत्नांचें परिणत फळ ह्मणजेच ज्ञानेश्वरी होय. ज्ञानोबांच्या कालानंतर लवकरच महाराष्ट्रामध्यें मुसलमानांचा अंमल गाजूं लागून महाराष्ट्र देश, धर्म व भाषा यांचा वींमोड होण्याचा रंग दिसूं लागला. महाराष्ट्राच्या या पडत्या काळांत ह्मणजे शके १२०० पासून १६०० पर्यंत जें सारस्वत निर्माण झालें तें संतकवींच्या हातून झालें. अर्थातच भक्तिप्रेमानें ओथंबलेल्या संतकवींच्या विकार–विचारांचें प्रतिबिंब या सारस्वतांत पडलेलें आहे. भगवंताच्या प्रेमसुखाचा आनंद लुटण्यांत ज्यांचें मन गुंग झालें होतें, त्या नितांतवत्सल संतकवींच्या वाग्देवतेनें, प्रभुरायाच्या पायांवर वाहण्याकरितां या शब्दसुमनमाळा गुंफिल्या आहेत. या दिव्य माळांचा आगळा परिमळ सेवून जगांतील रसिक-षट्पद-कुळाला निरंतर नवा आनंद होत राहील यांत शंका नाहीं. निवृत्तिभावानें भरलेलें असें एकांगि सारस्वत या धर्मवीरांनीं उत्पन्न केलें. महाराष्ट्रसारस्वताच्या या उत्तुंग मंदिराचा पाया ज्ञानोबांनीं घातला, त्याच्या उभारणीकरितां नामदेवांनीं आपलें वाग्वैभव वेंचिलें, नाथमहाराजांनीं त्याच्यावर भागवतधर्माचा दिव्य ध्वज उभा केला; आणि

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । बांधियेलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥
जनार्दनीं एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकास ॥

या गोड अभंगांत ह्मटल्याप्रमाणें तुकोबारायांनीं त्या मंदिरावर आपल्या अभंग-

वाणीनें अभंग आणि परमेच अना कळस चढविला. या चिमुकल्या अभंगांत मध्ययुगीन महाराष्ट्रसारस्वताचा सगळा इतिहास आला आहे. महाराष्ट्राच्या मध्य-कालीन सारस्वताच्या उत्कर्षाच्या आणि ऐश्वर्याच्या इतिहासाचा हा अगदीं ओझरता परिचय झाला. मराठ्यांच्या धार्मिक व सामाजिक परिस्थितीवर या सारस्वताचा काय परिणाम झाला हें आतां पहावयाचें.

ज्या काळांत हें सारस्वत निर्माण झालें तो काळ महाराष्ट्राच्या धर्मसुधारणेचा होता. चंद्रभागेच्या तीरावर महाभक्त पुंडरीकानें मोक्षाचें केणें उघडिलें होते; आणि तेथें जाऊन महाराष्ट्राची दुबळी रयत प्रेमसुख लुटीत होती. भक्तांबरोबर प्रेमलीला करावयास निरंतर राजी असलेला प्रेमळ पांडुरंग विटेवर उभा राहून भक्तांची आळ पुरवीत होता. धर्मसुधारणेची लाट त्या वेळीं उचंबळली होती. जात-गोत, मनुष्यामनुष्यांमधले कृत्रिम भेदभाव आणि अनुदार धर्मसमजुती हीं त्या प्रचंड लाटेपुढें वाहून जात होतीं. पंढरपूरचें तें महाद्वार सर्वांना मुक्तद्वार होतें! सर्व महाराष्ट्रभर त्या वेळीं मुसलमानांचा हैदोस चालला होता. मराठ्यांचे मुसल-मान, देवळांचे दर्गे व रावांचे रंक अशा तऱ्हेचें विलक्षण स्थित्यंतर महाराष्ट्रांत प्रत्यहीं घडत होतें. रयतेचें परित्राण करिल असा समर्थ पुरुष त्या वेळीं कोणीही नव्हता. अशा स्थितींत अनाथ रयतेनें कोणाकडे पहावयाचें? संकटाच्या वेळीं हताश झालेल्या असहाय अंतःकरणाला परमेश्वर आठवूं लागतो. ज्या प्रपंचा-पासून सर्व आपत्ति उद्भवतात तो प्रपंचच मुळीं सोडलेला बरा, असें त्या वेळीं लोकांना वाटूं लागलें. निवृत्ति, प्रपंचापासून—संसारांतल्या दगदगीपासून निवृत्ति हें निराश अंतःकरणाचें निर्वाणीचें समाधान. निवृत्तीचें, खऱ्या निवृत्तीचें—वेदां-ताचें रहस्य आकलन करण्याइतकी सूक्ष्म बुद्धि सामान्यांच्या ठिकाणीं क्वचितच असते. आणि सामान्यांच्या तडाक्यांत सांपडलेल्या वेदांताचें, निवृत्तीचें, निष्काम-कर्माचें पर्यवसान नैष्कर्म्यांत, निराशावादांत व पेंगळटपणांत होतें. महाराष्ट्राची स्थिति तशीच झाली. अचानक आलेल्या परचक्रामुळें गांगरून गेलेले मराठे लोक पारलौकिक सुखाच्या मृगजळामागून धांवूं लागले. आल्या स्थितींतून सुटावयाला त्यांना तरणोपाय दिसेना. आणि त्यामुळें त्यांना निवृत्ति आठवली. जें सुख या लोकीं मिळालें नाहीं, तें पुढच्या लोकीं मिळावें अशा हेतूनें ही दुबळ्या अंतःकर-णांची धडपड असते. या सकाम धडपडीलाच सामान्य लोक निवृत्ति समजतात!

असल्या निवृत्तीच्या मागें परतंत्र महाराष्ट्र लागला आणि वेदांताच्या या वृथा कल्पनांना संतांच्या उपदेशानें उत्तेजन मिळून ऊत आला. संतांच्या वेदांताचें रहस्य सामान्य लोकांना कळलें नाहीं, परंतु त्यांच्या बाह्य आचरणाचें अनुकरण मात्र यथास्थित झालें. संतकवींच्या उपदेशानें घडलेली ही धर्मजागृति अर्थातच एकांगी होती. त्यांच्या उपदेशानें महाराष्ट्राचा धार्मिक अपमृत्यु टळला यांत शंका नाहीं. धर्माची दुर्दशा पाहून त्यांचें अंतःकरण कळवळलें, तें तिथेंच थबकलें. त्यांची दृष्टि पुढें गेली नाहीं. राष्ट्राच्या दुर्दशेकडे त्यांचें लक्ष गेलें, परंतु चित्त जाईना; तें धर्मकारणांतच गुंतलें. त्यांचा बोध जनतेला–जिचें जगाशिवाय चालणें शक्य नव्हतें अशा जनतेला–जगापासून निवृत्त करीत होता. लोक त्यांच्यासारखे विरक्त झाले नव्हते, होणें शक्यही नव्हतें. अर्थाला जे अगदीं तिटकारले होते; अर्थमय जगाला, अर्थजीवी समाजाला जे अगदीं विटले होते त्यांच्या हातून समाजाचें, राष्ट्राचें प्रापंचिक कल्याण कितीसें होणार? परमेश्वर जनस्वरूपी आहे हें तत्व त्यांचेंच आहे; 'जनीं जनार्दन' त्यांनींच जाणिला. परंतु विश्वाच्या ठिकाणीं विठ्ठलाला न पाहतां ते विठ्ठलाच्याच ठिकाणीं विश्व पाहूं लागले! त्यांनीं जें केलें तें आत्मोद्धाराकरितां केलें. तो आत्मोद्धार 'ज्यांना आत्मवत परावें तें' दिसूं लागलें होतें अशा महाविभूतींचा होता." आणि म्हणूनच त्यांच्या हातून धर्मकार्य सहज घडलें. परंतु ही सहज घडलेली धर्मजागृति अपुरी पडली. देश आणि धर्म अन्योन्यसंश्रयी आहेत हें संतकवींच्या ध्यानींच आलें नाहीं.

देश आणि धर्म यांची सुस्थिति परस्परावलंबी आहे हें ध्यानांत घेऊन त्या धोरणानें श्रीसमर्थांनीं उपदेश केला. संतकवींनीं केलेली अपुरी जागृति पूर्ण करण्याकरितां समर्थांचा अवतार होता. राष्ट्रघटनेच्या दृष्टीनें विचार करितां संतकवींच्या काव्यकृतींचा उपयोग फार थोडा झाला असें म्हणावें लागतें. केवळ काव्याच्याच दृष्टीनें विचार केला तर हें सारस्वत उत्तमांत गणिलें जाईल अशी खात्री वाटते. भक्त-भगवंतांच्या प्रेमभावनांचा इतका उदात्त उद्रेक जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत क्वचितच आढळेल. परंतु राष्ट्रघटनेच्या दृष्टीनें, समाजाच्या प्रापंचिक धारणेच्या दृष्टीनें पाहूं गेलें तर हें सर्व अनुपयुक्त वाटतें. त्या वेळीं धर्मरक्षणाचें कार्य या सारस्वतानें केलें व पुढेंहि तें करील. परंतु अर्थजीवी आणि प्रवृत्तिमार्गी समाजाच्या धारणेला या सारस्वताचा उपयोग होण्याची आशा नाहीं. निवृ-

त्तिवादानें भरलेल्या या महाराष्ट्रसारस्वताला निराळें वळण लावण्याचा प्रयत्न श्रीसमर्थांनीं केला. सोळाव्या व सतराव्या शतकांत राष्ट्रभावनेची, स्वार्थत्यागाची व संघटनेची जी लाट महाराष्ट्रांत उसळली होती त्या लाटेचें श्रेय समर्थांच्या उपदेशाकडे बरेंचसें जातें. शिवछत्रपतींनीं जी स्वदेशाभिमानाची ज्योत महाराष्ट्रांत उजळिली त्या ज्योतीचें उद्दीपन

वन्हि तो चेतवावा रे। चेतवीतांचि चेततो

असें गरजणाऱ्या समर्थांच्या कर्तृत्वानें घडून आलें;

धीर्धरा धीर्धरा तकवा,

हडबडूं गडबडूं नका।

ही अचेतन अंतःकरणाला जिवंत करणारी वाणी महाराष्ट्राच्या घरादारांतून, खेड्यापाड्यांतून, दऱ्याखोऱ्यांतून घुमूं लागली आणि तिनें राष्ट्रजागृतीचें कार्य सुकर केलें. परंतु समर्थांचें हें नवें वळण त्यांच्या मर्त्य देहाबरोबरच नष्ट झालें; त्यांच्या सांप्रदायानेंहि तें गिरविलें नाहीं. यापुढचें महाराष्ट्राचें सारस्वत राष्ट्रघटनेच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें नाहीं. बहुत ग्रंथांतर पाहून तयासारिखा उतार करणारे कवि यापुढें निपजले. शाहीरांचे लावण्यापोवाडे हें महाराष्ट्राचें आवडतें राष्ट्रीय काव्य आहे; परंतु एकंदर महाराष्ट्रसारस्वताच्या मानानें हें फार थोडें वाटतें.

महाराष्ट्राच्या प्राचीन काव्यसंपदेचें असें दैवी स्वरूप आहे. जन्मापासूनच आह्मां महाराष्ट्रलोकांना देवभक्तीचें वेड आहे. महाराष्ट्राला वाचा फुटतांच त्यानें आपल्या बोबड्या बोलांनीं विठ्ठलनामाचा गजर केला. गरुडटक्क्याच्या निशाणाच्या दर्शनानें महाराष्ट्राच्या चित्तवृत्ति विश्वप्रेमांत विलीन होतात आणि भगवा झेंडा पाहतांच महाराष्ट्राचें क्षात्रतेज आर्तत्राणाच्या अभिलाषानें जागृत होतें. महाराष्ट्राची परंपरा अशी देवधार्मिक आहे. ही पूर्वपरंपरा न सोडितां आजच्या परिस्थितीला अनुरूप असें नवीन वळण महाराष्ट्राच्या कवितेला आधुनिक कवींनीं लाविलें पाहिजे. सगळें हिंदुस्थान दास्यपंकांत बुडालें असतां स्वतंत्रतादेवीनें ज्याचीं कडेपठारें आपल्या पदक्षेपानें पुनीत केलीं त्या सह्याद्रीच्या या पवित्र प्रांगणांत–या महाराष्ट्रभूमींत–पापी महत्त्वाकांक्षांचें बीज कधींहि रुजतां कामा नये. दुबळ्या देशांच्या स्वातंत्र्याचा अपहार करून त्यांची संपत्ति आपल्या घरांत घालणाऱ्या अर्थदास राष्ट्रांनीं आजचें जग गजबजलेलें आहे. असल्या

उन्मार्गगामी राष्ट्रांना बोधाचे शब्द जरबेनें सांगण्याचा अधिकार उद्यांच्या स्वतंत्र महाराष्ट्राचा आहे. सर्व हिंदुस्थानभर दिग्विजयाचे झेंडे नाचविणाऱ्या हर्षवर्धनाला सत्याश्रय पुलकेशीनें नामोहरम केलें; आणि उत्तरहिंदुस्थानांतील दुर्बळ रयतेवर जिझिया कर बसविणाऱ्या अमलगिराचा तेजोभंग शिवछत्रपतींनीं केला. आपल्या या पूर्वपरंपरेला साजेल असें कार्य महाराष्ट्रानें भावी काळांत केलें पाहिजे. देवाचीच अशी इच्छा दिसते कीं, हें आनंदवनभुवन सदोदित उदार धर्माचें आणि उदात्त तत्वांचें अधिष्ठान असावें. देवानें योजिलेलें हें धर्मकार्य करण्याचें सामर्थ्य महाराष्ट्राला लाधावें म्हणून आधुनिक कवींनीं यापुढें वाङ्मयतप आचरिलें पाहिजे. निव्वळ अध्यात्माचा छंद जडल्यामुळें राष्ट्राचा राजकीय अधःपात होतो, आणि निव्वळ ऐहिकाच्या नादीं लागल्यास राष्ट्राची मानसिक अवनति होते. जगांतील सांप्रतच्या उलाढालीचें हें मर्म ध्यानीं आणून, महाराष्ट्राची देवधार्मिक परंपरा लोपूं न देतां, त्याच्या राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याचें महत्कार्य आधुनिक कवींनीं करावयाचें आहे. आज आधुनिक कवींना लोकांत मान नाहीं; परंतु त्यामुळें निरुत्साह न होतां त्यांनीं

गाण्यानें कविच्या, प्रभाव तुमचा, वर्धिष्णुता घेइल
स्फूर्तीचा, तुमच्या पिढ्यांस पुढल्या, साक्षी कवी होइल!

—केशवसुत.

ह्या आपल्या कुलगुरूचा भविष्यवाद सत्य करण्याकरितां आनंदानें झटलें पाहिजे. मग भावी काळाचे धन्यवाद त्यांचेच आहेत.

---

२

# टिळकांची कविता.

# २ टिळकांची कविता.

## (नारायण वामन टिळक.)

१८६५—१९१९.

रानांत पानांवर पडलेल्या दहिंवराच्या मोत्यांची माळ कोणाला लावलेली आहे? दृष्टीला आनंद देणारे ते दंवाचे थेंब सूर्यकिरणांच्या स्पर्शानें निमिषांतच नष्ट होतात. सामान्य मनुष्याच्या मनावर परिस्थितीनें पसरलेली भिन्न भावनांची भुलावणी अशीच क्षणभंगुर असते. अंतःकरणाला आलेला तो भावनांचा बहर काळाच्या दारुण दृष्टिक्षेपानें कोमेजतो, करपून जातो. परंतु पावसाळ्यांत पडलेले स्वातीचे जलबिंदु समुद्रांतील शिंपल्यांच्या आश्रयानें मोत्यांचें मनोहर रूप पावून जसे शाश्वतत्वाला चढतात, तसेच प्रतिभासंपन्न मनुष्याच्या, भावना-तरल कवीच्या हृदयावर दाटलेले भावनांचे दंवबिंदु शब्दांच्या साहाय्यानें आकाराला येऊन अमर होतात! कवीचें हृदय अत्यंत हळुवार; उन्हाच्या तर-ळत्या तिरिपेनें जाईचें फूल जसें मलूल व्हावें तसें कवीचें हृदय अगदीं सामान्य दुःखाच्या आघातानें सुद्धां व्याकुळ होतें. कविहृदयाच्या तसल्या त्या व्याकुळ स्थितींतच रसमधुर कविता निर्माण होते. अशाच अगदीं साध्या अधिक्षेपानें विव्हळ झालेल्या मनःस्थितींत कविहृदयांतून—

पहा! उघडिलें हृदयाला, आंत सुखें घाला भाला!
कोमल, कौशल्यें नटला, कर तुमचा जरि कितिअसला,
तरी तयानें
माझीं कवनें
जरा स्पर्शणें
सहन न होणें कधि मजला! पाहुन जीव बरा गेला!

हे गीततरंग वर उसळले! टिळकांच्या कवितेचे भावी टीकाकार, हें त्यांचें हृद्यंगम गीत वाचून क्षणभर तरी खचित वरमतील! परंतु स्वीकृत कार्यापासून टीकाकारांना परावृत्त करणारें हें गोड भय कवीनेंच पुढें दूर केलें आहे; महा-कवि भवभूतीचे—

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
जानंतु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।

हे अनन्यसाधारण अभिमानोद्गार वाचून स्तिमित झालेला हाच कवि पुन्हां ह्मणतो

रसज्ञ हो ! काय तुह्मांविना मी
करूं जगीं घेउनि काव्य नामी !

* * *

फुललें नवकाव्यपुष्प बोले
रसिकाला विरहें विषण्ण झालें,
'कर जा तुजला रुचेल जें तें
परि ये ये, मज तोड, ने गृहातें !'

तथापि कवीच्या उद्गारांतील या मजेदार विरोधाभासानें मोहून जाऊन काव्य-कुसुमांच्या कृंतनाला सिद्ध झालेला सहृदय टीकाकार, 'कवीची विनवणी' न विसरतां, निःपक्षपातापेक्षां प्रेमानेंच आपल्या कार्याला हात घालील.

टिळक हे महाराष्ट्राचे पहिले ख्रिस्ती शाहिर. महाराष्ट्रशारदेचें भाग्य अलौकिक आहे; स्वधर्मी आणि स्वदेशी संतकवींप्रमाणें परधर्मी आणि परदेशी पंडितांनी सुद्धां महाराष्ट्रशारदेच्या अर्चनांत आपलें वाग्वैभव आनंदानें उधळिलें आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांना जितका मराठी भाषेचा अभिमान होता तितकाच मराठी भाषेचा अभिमान फादर स्टीफन्स व शेखमहंमद यांनाहि होता.

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । अमृतातेंहि पैजा जिंके ॥

या ज्ञानेश्वरींतील ओवींत जें उत्कट भाषाप्रेम आढळतें तेंच उत्कट भाषाप्रेम फादर टॉमस स्टीफन्सनें तयार करविलेल्या ख्रिस्तपुराणांतील

जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी ।
कीं परिमळांमाजी कस्तुरी ॥
तैसी भाषांमाजी साजिरी ।
मराठिया ॥

या ओवींत आढळतें ! ख्रिस्तीधर्मप्रसाराकरितां तनुवाङ्मन वाहून परदेशगमन पत्करणाऱ्या पंडितांनीं महाराष्ट्र-वाङ्मयांत एतद्देशीयांच्या मदतीनें चांगली भर घातली आहे. परंतु हे सगळे प्रयत्न परधर्मीयांच्या साहाय्यानेंच ख्रिस्ती पंडितांनीं

केले होते. ख्रिस्ती धर्माच्या अभिमानानें आणि प्रेमानें संतकवींच्या सारस्वता-सारखं उत्कृष्ट सारस्वत निर्माण करून ख्रिस्तधर्माला मराठी स्वरूप देण्याचें महत्कार्य अद्यापि व्हावयाचेंच होतें; तें कार्य करण्याकरितां हा ख्रिस्ताचा शाहिर या मराठी मुलखांत १८६५ त जन्मास आला! टिळक हे ख्रिस्ती धर्माचे पहिले महाराष्ट्रीय शाहिर; टिळकांच्या प्रतिभेनें ख्रिस्तपुराणाला अस्सल देशीकार लेणें चढविलें, टिळकांच्या प्रतिभेनें ख्रिस्ती धर्माला महाराष्ट्राच्या हृदयांत अभंग-वाणीचें अढळपद प्राप्त करून दिलें; टिळकांच्या प्रतिभेनें ख्रिस्ती सारस्वतांत महाराष्ट्र-भाषेला महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें; आणि टिळकांच्याच प्रतिभेनें स्वदेशाला व स्वभाषेला मुकलेल्या ख्रिस्ती समाजाच्या अंतःकरणांत स्वभाषेचा व स्वदेशाचा अभिमान उत्पन्न केला!

टिळकांच्या काव्यरचनेला आरंभ अगदीं लहानपणीं झाला; टिळकांना आपलें आयुष्य रसिकांच्या आराधनेंत घालविण्याची स्फूर्ति भर तारुण्यांत झाली. रसिकांच्या सेवेकरितां १८८५ त त्यांनीं 'काव्यकुसुमांजलि' हें चिमुकलें मासिक काढिलें. महाराष्ट्ररसिकांना ही पहिली भेट देतांना टिळकांनीं—

" 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो॥' या तुकारामोक्ती-प्रमाणें मनांत ईश्वराचे पाय व जनांत रसिकजन या दोघांवर भाव ठेवून, आम्ही ही आपली सेवा करण्याचें योजिलें आहे. रसिकांची सेवा आमरण घडावी ही आमची जगन्नियंत्यास रोज प्रार्थना आहे व मनाचा निश्चयहि पुरा आहे."

असे उद्गार काढिले आहेत. हाच त्यांचा हेतु 'फुलेंच फुलें' या कवितेंतील

माझें जन्मचि हें फुलां निरविलें ...

या ओळींत व्यक्त झाला आहे. रसिकांच्या सेवेचा टिळकांचा हा हेतु परमेश्वर-कृपेनें सफल झाला. टिळकांच्या काव्यप्रकाशनाला सुरुवात भाषांतरानें झाली. गोल्डस्मिथ कवीच्या 'Deserted Village' या काव्याचें भाषांतर 'माझा ओसाड पडलेला गांव' या नांवानें त्यांनीं १८८६ त प्रसिद्ध केलें; हें भाषांतर साधारण उतरलें आहे. यानंतर एकच वर्षानें 'माझी भार्या' हें त्यांचें सरस काव्य प्रसिद्ध झालें. हें काव्य प्रसिद्ध झालें त्या वेळीं टिळक हिंदु होते व म्हणून या काव्याच्या आरंभीं कवीनें हिंदुदेवतांना नमन केलें आहे. १९१४ त प्रसिद्ध

झालेल्या ' टिळकांची कविता ' या पुस्तकांत कवींनीं हें काव्य पुन्हा हात फिरवून घातलें आहे. या पुनःसंस्करणाच्या वेळीं पहिलें हिंदुदेवतांचें नमन जाऊन त्याच्या जागीं ह्लींचें गृहदेवतांचें नमन आलें आहे ! या खंडकाव्यांच्या रचनेनंतर टिळकांची स्फुट कविता बाहेर पडूं लागली. केशवसुत, विनायक, चंद्रशेखर, दत्त यांची स्फुट कविता या वेळीं नुक्तीच बाहेर पडूं लागली होती. या नवीन धर्तीवर कविता करणाऱ्या सत्कवींच्या कृतीचा—विशेषतः केशवसुतां- च्यां कवितेचा—टिळकांच्या कवितेवर विशेष परिणाम झाला. टिळक या वेळीं नुक्तच ख्रिस्ती झाले होते. मिल्टन, कौपर, वर्ड्स्वर्थ, टेनिसन व ब्राउनिंग यांच्या रमणीय काव्यांचें परिशीलनही त्यांनीं या वेळीं फार उत्तम रीतीनें केलें. या परिशीलनाचें प्रतिबिंब त्यांच्या काव्यगंगेंत स्पष्ट पडलेलें दिसतें. विशेषतः वर्डस्वर्थ व टेनिसन यांच्याच कवितेचें वळण त्यांच्या प्रतिभेला मानवलेलें दिसतें. नवीन पद्धतीवर लिहिलेलीं त्यांचीं स्फुट गीतें यानंतर बाहेर पडूं लागलीं. हीं सर्वच गीतें जरी मधुर नसलीं तरी बहुतेक गोड आहेत. या गोड गीतांनींच टिळकांच्या कवितेकडे रसिकांचें लक्ष्य प्रथम वेधलें. ' कवीची विनवणी ' हें गीत हृदयंगम आहे. कवितेच्या उत्पत्तिस्थितिविषयींची टिळकांची रम्य कल्पना या गीतांत आली आहे. कवनें हीं कवीच्या अंतःकरणांतून बाहेर पडलेलीं देवाचीं निःश्वासितें आहेत ! कविहृदयाच्या हिंदोल्यावर बसून हीं ईश्वराचीं निःश्वसितें वाग्देवी जगावर उधळिते ! ही काव्यकल्पना आम्हां हिंदूंना पूर्ण परि- चित आहे. वेदसूक्तें ज्यांनीं ईश्वराचीं निःश्वसितें मानिलीं त्यांना या कल्पनेंत अभिनव असें कांहींच नाहीं. हिंदुधर्माचा त्याग करून ख्रिस्ती झाल्यावर वेद- सूक्तांच्या आठवणीनें चुकल्याचुकल्यासारखें होऊन ही ' ईश्वराच्या निःश्वसितां- ' ची उणीव टिळकांनीं स्वतःच्या गीतांनीं भरून काढण्याचें योजिलें असावें असें या कल्पनेवरून दिसतें ! यापुढील

रंग नभाचे कसे तरी, कसे तरी ही मजा खरी
किती आपुलीं
फुलें उधळलीं,
कुठें लटकलीं,
चिंता नच ही वेलीला, सुंदरतेची ही लीला !

हें सुंदरतेच्या लीलेचें वर्णन अत्यंत सुंदर आहे. ‘ कवि ’ ही कविताहि अशीच साधी परंतु सुंदर आहे. जळगांवच्या कविसंमेलनाला टिळकांच्या पत्नी कवयित्री लक्ष्मीबाई या कांहीं कारणामुळें जाऊं शकल्या नाहींत. त्या वेळीं त्या संमेलनाला त्यांनीं जो नितांतमधुर निरोप धाडिला होता त्या निरोपांत

मी वहीण, आपण भाउ सखे कैवारी!
कवि तुम्ही, भिकारिण मी हो तुमच्या दारीं!

असे विनयोद्गार काढलेले होते. त्या विनयोद्गारांना टिळकांनीं अतिशय प्रेमळ उत्तर दिलें आहे. त्या उत्तरांतील कवीचें

खरीच कवयित्रि तूं! हृदयिं जीं तुझ्या गायनें
सदैव भरलीं सती! जरि न आयकीलीं जनें.
कवीश ह्मणशी मला, ह्मण खुशाल तूं कौतुकें!
तुझी अनुरती पतीप्रति ह्मगेल तें तें निकें!
असंस्कृत परंतु तूं अतुल रत्न मीं जाणिलें!
नको नवल मानुं कीं तुज यथेच्छ वाखाणिलें!

हे उद्गार मननीय आणि मार्मिक आहेत. टिळकांच्या ज्या थोड्याशा सृष्टिविषयक कविता आहेत त्यांत ‘ भाऊबीज ’ ही कविता उत्कृष्ट आहे. या कवितेंतील सृष्टीच्या भाऊबिजेचें वर्णन फार प्रेमळ आहे. कवीच्या मनःसृष्टीचेंच प्रतिबिंब कवीला बहिःसृष्टींत पडलेलें दिसतें. आणि त्यामुळें कवि व बहिःसृष्टि यांच्यांतील भिन्नता, कविसृष्टीच्या अद्वैताचें एकतान गीत, वैर विसरून, आळवूं लागते ! ‘ सृष्टीची भाउबीज ’ हें गाणें या कविसृष्टीच्या अद्वैताचें शाब्द स्वरूप आहे.

लहरी, अपुल्या शिरीं घेउनी कोमल फेनाला
कशा नाचती! खेळविती लघु, रम्य भाउ बाळा!

हें सरिल्लहरींचें वर्णन किती सहजरम्य आहे !

फुलवेली, मम कानामध्यें सांग गडे ! पाहूं
भावामध्यें कोण तुझा गे आवडता भाऊ ?
भाग्यवंत तुज पसंत तरु हा, आलिंगुनि यातें
सदैव रमशी; धन्य खरोखर भावाचें नातें !

कवीचें हें विचित्र विधान ऐकून फुलवेली हंसली व ह्मणाली:—

पतिबंधूंतिल भेद कळेना, काय ह्मणूं याला ?
कवी निरंकुश ! आज खरा हा अनुभव मज आला !

फुलवेलींचें हें भाषण ऐकून कवि पुन्हां तिला विनोदानें ह्मणतो--

फुलवेली ! तव बंधु लाडका भ्रमर दिसे मजला !

सदैव स्तुतिपाठ गाऊन दान लुटणाऱ्या त्या भिक्षुकाशीं कवीनें हें आपलें बंधुत्वाचें नातें जोडलेलें पाहून कुपित झालेल्या फुलवेलीनें त्याला पुन्हां झिडकारिलें ! अखेर

'कोण तुझा मग भाऊ' पुसतां कविनें, त्यावरती
उधळी अपुलीं फुलें वेल ती प्रेमोत्कर-वृत्ती !
ह्मणे 'वेलिंना ओंव्या गाई कोण सांग पाहूं ?
भाउबिजेला तोच भेटला आज सखा भाऊ !'

सृष्टीच्या भाऊबिजेचें असें हें प्रेमळ गीत गाऊन तन्मय झालेला कवि ह्मणतो:

"भाउबीज ही" ह्मणे "ईश्वरा ! तव, तव सृष्टीची.
सदा असूं दे अशीच सदया ! सीमा तुष्टीची !"

'बाह्यसृष्टीचें आणि अंतःसृष्टीचें गानवाद' या गीतांतील तत्वही असेंच उदात्त आहे. नद्यांचा दऱ्याखोऱ्यांना घुमविणारा खळखळ शब्द; फुलवेलींना झुलविणाऱ्या चिमण्या झऱ्याचा टपटप शब्द, गर्द राईला निनादित करणाऱ्या कोकिलाचें कुहूगीत--या बहिःसृष्टीच्या संगीताची जगाला केव्हां परवा वाटते ? खिन्न मनाला, निराश हृदयाला उदास एकांताच्या वेळीं हें बहिःसृष्टीचें स्वैर संगीत बिनमोल वाटतें ! कदाकाळीं बोललेला प्रेमाचा शब्द; आनंदाच्या अतिरेकानें अवचित आलेलें हंसूं, आपत्तीच्या अवकाळीं मायेनें दिलेला धीराचा शब्द या सगळ्या 'अल्प' आठवणींचा उपयोग मनुष्याला केव्हां होतो ? सुखाच्या वेळीं मनुष्याला हीं अल्पें स्मरत नाहींत;—

परंतु जेव्हां हृदयाचे
तुकडे होती मनुजाचे,
तेव्हां हीं अल्पेंच तया
सांवरिती दावून दया !

हें या गाण्यांतील तत्व आहे. 'सृष्टीची करमणुकीची घटका' मजेदार वाटते.

' नर्तन ' या पदांतील चराचराच्या नर्तनाची कल्पना रमणीय आहे. ' अगाध कांहीं तरी ' हें चिमुकलें गाणें उत्तमांत मोडेल. यांतील—

रूप निराळें, नाम निराळें; अभिन्न उभयें परी;
समज हीं अजरामर, सुंदरी !
मीपण, तूंपण अपुलें ह्मणजे प्रिये ! एकता खरी !
समज हीं अजरामर, सुंदरी !

या कल्पना नित्यपरिचयाच्या असल्या तरी मनाला आनंद देतात. ' प्रेमसमाधि ' हें गीतही असेंच किंचित् गूढ परंतु गोड आहे. ' प्रेमविषाचा प्याला ' उन्मादरसानें कांठोकांठ भरून अगदीं फसफसतो आहे. हा प्रेमविषाचा प्याला पिऊन मेल्यावर कवि ह्मणतो---

आत्मा माझा कोठें जाइल ?
समाधिस्थ त्वत्प्रेमीं होइल !

' पांखरा ! येशील कां परतून ? हें निरतिशय मधुर गीत बालकवि ठोमरे हे जेव्हां अहमदनगर सोडून गेले तेव्हां त्यांना उद्देशून टिळकांनीं गाइलें; या गीतांत टिळकांच्या कवितेचे प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे तिन्ही 'प्र'कार एकवटले आहेत. या गीतांतील

वाऱ्यावरचा तरंग चंचल जाशिल तूं भडकून !
थांव; घेउं दे रूप तुझें हें हृदयीं पूर्ण भरून !
जन्मवरी मजसवें पहा ही तव चंचूची खूण !
विसर मला परि अमर्याद जग राहीं नित्य जपून
ये आतां ! घे शेवटचे हे अश्रू दोन पिऊन !

हे प्रेमोद्गार कोणाच्या अंतःकरणाला भुरळ पडणार नाहींत ? हें पद वाचतांना बालकवीचें सगळें चरित्र डोळ्यापुढें उभें रहातें; ती स्वैर वृत्ति, तो अलौकिक आनंद, तो प्रेमळ स्वभाव;—आणि त्या उदास आयुष्याची ती अत्यंत हृदयविदारक अखेर; या बालकवीच्या काव्यमय जीविताचें

' पांखरा ! येशिल कां परतून ? '

या कळवळून विचारलेल्या प्रश्नानें स्मरण होतें आणि मन गहिंवरतें. फुलवेलींना ओंव्या गाणारें टिळकांचें हें प्रेमळ पांखरूं कोठें गेलें ?—

स्वर्गीचीं बहरूनि फुलें
सूर्यफुलें, नक्षत्रफुलें
नंदनवन सुंदर वरतें
तें दिसलें नयनीं यातें !
मधुगीतें गंधर्वांचीं
नृत्यकला अप्सरसांची
देवांचीं राज्यें बघुनी
हें भुललें, गेलें उडुनी !

—बालकवि.

बालकवीवर असलेलें टिळकांचें पुत्रनिर्विशेष प्रेम या गीतांत व्यक्त झालें आहे. ' एक अमेरिकन मुलगी ' ही कविता आधुनिक कवींची सौंदर्याविषयींची कल्पना किती पवित्र, उदात्त व निरागस आहे याची उत्तम साक्ष पटविते. ' बापाचे अश्रु ' हें टिळकांचें खंडकाव्य फार हृदयद्रावक म्हणून प्रसिद्ध आहे; या काव्यांतील करुणरस अगदीं काळजाला जाऊन भिडतो असें म्हणतात. परंतु हा शुद्ध अर्थवाद दिसतो. सत्कवीची कृति सहसा नीरस उतरत नाहीं; आणि या नियमाप्रमाणें टिळकांचें हेंहि काव्य बरें साधलें आहे. परंतु सत्कवीच्या कृतीला कसोटीहि सामान्य लावून चालणार नाहीं. तुलनेच्या दृष्टीनें पाहिलें तर हें करुणकाव्य ' केवढें हें क्रौर्य ! ' या कवितेच्या तुळेला खचित येणार नाहीं. गोविंदाग्रजांचा ' राजहंस ' हि या काव्याहून सरस उतरला आहे. परंतु काव्यरसास्वादांत रुचिभेदाला वाव असतो; आणि म्हणून येथें कोणाच्याही मताची अवधीरणा न करितां हे विचार नमूद केले आहेत.

टिळकांना ' फुलामुलांचे कवि ' म्हणण्याचा प्रघात आहे. या प्रघातांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं. टिळकांच्या मुलांवर कांहीं कविता आहेत. ' माझी ताई ' हें गाणें या सर्व कवितांत उत्कृष्ट ठरेल. नेहमींच्याच गोड कल्पना घेऊन टिळकांनीं या गीतांत त्या नवाईनें नटविल्या आहेत; या गीतांतील प्रेमळपणा मनाला अगदीं भुलवितो.

फुल हें हंसतें, तूं हंसशी
परि तव अर्थ किती हास्यीं !

काय फुलांच्या मला पाकळया दावितील मौजे
जसे हे ओठ गडे तूझे !

परंतु हें एक गाणें सोडलें तर टिळकांचीं मुलांवरील बाकीचीं गाणीं इतकीं गोड उतरलेलीं दिसत नाहींत. ' बालबोध मेवा ' या मासिकांत त्यांचीं दोन तीन गोड गाणीं आढळतात. मुलांवरील चांगलीं गाणीं अशीं हीं त्यांचीं तीन-चारच आहेत. मुलांच्या भावनांशीं तितकें उत्कटतेनें, टिळकांना तद्रूप होतां येत नाहीं. मुलांच्या मुग्ध भावनांनीं मोहित केलेलें त्यांचें मन त्या अव्याज-मनोहर बालचरितांत तत्वज्ञान पाहूं लागतें. ' चुंबनासारखें औषध नाहीं ' ही कविता वाचतांना त्या वत्सलरसांत विरलेलें मन शेवटच्या श्लोकांतील तत्वज्ञानानें ठेंचाळून एकदम जागें होतें आणि त्या सगळया आनंदाचा विरस होऊन कवीच्या तत्त्वजिज्ञासेचा राग येतो ! या दृष्टीनें पहातां टिळक हे मुलांचे कवि नसून फक्त फुलांचेच कवि आहेत असें म्हणणें प्राप्त होतें; खुद्द टिळकांनाहि मनापासून असेंच वाटत होतें. ' वनवासी फुला 'ला ते सांगतात—

फुला ! तुझ्यासम काव्यस्फूर्ती कविंना देइ न कोणी
न मीं गायिलीं इतरां कवणां, जितकीं फुलांस गाणीं !
अत्युक्ती हा नाहीं नाहीं, खरेंच तुजला कथितों,
इकडे बघतों फुलें पुढें मी, तिकडे काव्यें गातों !

याच भावनेनें त्यांना सगळया ब्रह्मांडांत ' फुलेंच फुलें ' दिसूं लागलीं होतीं. याच भावनेनें ते आपल्याला ' फुलांतील भ्रमर ' म्हणत असत. याच भावनेनें त्यांना लहानग्या लडिवाळाचें लीलाललित पहात असतां प्रभात–वाऱ्याच्या झोतानें झुलणाऱ्या फुलाची आठवण होत असे. आणि याच भावनेनें त्यांनीं ' वनवासी फुला 'ला पवित्र प्रवृत्तिधर्माचा प्रेमळ पोवाडा गाइला !

' वनवासी फूल ' हें टिळकांचें काव्य प्रकृतिमधुर आहे. फूल आणि कवि यांच्यांतील प्रेमसंबंध कांहीं नवीन नाहीं. वनसृष्टीच्या पावित्र्याची आणि सौंदर्याची परिसीमा फूल दर्शवितें व शब्दसृष्टीच्या पावित्र्याची आणि सौंदर्याची परमावधि काव्य दर्शवितें. फुलवेलींत मुसमुसणारें मधुर सौंदर्य जसें पुष्पमिषानें प्रगटतें, तसेंच कविप्रतिभेंत रसरसणारें रमणीय तेज गीतरूपानें बाहेर पडतें. कवींचा आणि फुलांचा प्रेमसंबंध हा या अवस्थासाम्यानें जडलेला आहे ! कवि

आणि फुलें यांच्यामधील हें अवस्थासाम्य लक्ष्यांत घेऊनच बहुधा कवयित्री लक्ष्मीबाई टिळक यांनीं

हीं काव्यतरूची छाया शीतळ भारी
तुम्हि कवी फुलें हो ह्या तरुवरचीं सारीं!

असे उद्गार काढिले असावे! 'वनवासी फूल' हें काव्य, म्हणूनच प्रकृतिमधुर आहे.

शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे संचार,
दिक्कालानें अप्रतिहत तो ज्याचा स्वैर विहार,
सप्तलोक वा सप्तशत म्हणा,–सारे सांठविलेले
अंतःसृष्टीमधें जयाच्या, तेथुन उदया आले!
आजउद्यां हा भेद न ज्याच्या दिव्य विचारोच्चारीं,
परमेशानें स्वयें निर्मिला सर्व रसांचा धारा.
जसे वसंता नवे नवे द्विज, तैसे नित्य जयाला
वाग्देवीचे दूत शब्द हो आतुर सेवायाला.

असा एक कवि सहज फिरतां फिरतां निर्जन रानांत आला. त्या रानांत त्यानें एक अगदीं कधीं न पाहिलेलें असें अपूर्व फूल पाहिलें. तें फूल पाहिल्याबरोबर, ज्याच्या दृष्टीला चराचर पुष्पमय दिसत असे असा तो 'फुलवेडा' कवि इतर विषय विसरून क्षणांत तन्मय झाला. त्या कवीला पाहून फुलानें त्याचें प्रेमानें स्वागत केलें! आणि खरोखरच

जड इतरांना मुग्ध वाटती पदार्थ, देही ते ते
मित्र बोलके कविचे अवघे परमसुखाचे दाते!
कोण असा, जो दर्शन कविचें घडतां हांसत नाहीं?
बोलत नाहीं? डोलत नाहीं? प्रेमें नाचत नाहीं?

फुलाच्या प्रेमळ स्वागतानें वेडावून जाऊन हर्षोत्कट वृत्तीनें तो कवि त्या फुलाला भेटण्याकरितां एकदम पुढें गेला; परंतु कवीला जवळ येतांना पाहून तें फूल दचकून मागें सरलें! फुलाच्या त्या दचकण्याकडे विशेष लक्ष्य न देतां तो नितांतवत्सल कवि पुन्हा पुढें सरला; तेव्हां

पुन्हा पुष्प तें हांसुन वदलें, " बसा, दुरूनी बोला!

योग्य न शिवणें,-जगदीशाला अर्पित झालें-त्याला !
दो दिवसाचें जीवित माझें दिधलें मीं परमेशा;
ध्यावें त्याला आहे तोंवरि, अन्य नसे मज आशा !
मला समजलें, रसज्ञ आपण, मित्र फुलांचे लोकीं,
यास्तव अपुलें स्वागत केलें, श्रम अपणां दिधले कीं.
कवीश आपण, ओळखिलें कीं भक्तिरसाचे सिंधु !
वनवासी मी, द्या मज दीना दोनचार तरि बिंदु !

फुलाचें हें भाषण ऐकून त्या प्रेमळ कवीनें, हा विजनवास-वनवास सोडून मजसवें आरामीं चल, अशी त्या फुलाला विनंति केली. त्यावर तें फूल ह्मणालें—

............ सारा स्वार्थी मर्त्यलोक हा आहे !
दर्शन राहो दूरचि ! याचें नांव न मजला साहे !
थरथर थरथर पुंख कांपती, उरलें नाहीं भान,
पुष्पीं रत मधुपास भासतें पुष्पचि पंचप्राण !
स्वार्थाचे हे अवघे चाळे ! अमुची वेडी जात !
भ्रमराचें मज नको पहाया मुख साऱ्या जन्मांत !
ज्या ज्या सुमनीं रमेल तें तें तितक्यापुरतें त्याचा—
जीवचि ! परि हें प्रेम न; सगळा लोभ नवीन रसाचा !
नित्य करावें पुढें पुढें, मधु गाणें गावें, न्यावें
लुटून सुरसा, परी शेवटीं ओळख विसरुनि जावें !
'शितें तोंवरी भुतें भोंवतीं' ह्मण ही साधी भारी
परि अनुभूती सकल बुधांची हींत ओतिली सारी !

तुह्मी ज्या जगांत मला बोलावितां तें जग असें आहे. माझ्या या स्थितीला तुह्मी विजनवास ह्मणतां परंतु माझ्या भोंवतालचें तुह्मांला निष्प्रेम वाटणारें हें जग प्रेममय आहे.

कोठें दिनकर, दीन कुसुम मी कोठें ! तरि कुरवाळी
सर्व उग्रता सोडुन मजला, कन्येसम सांभाळी !
दिशादिशांना सौरभ माझा वाहुनि वारा नेतो,
नको नको मी ह्मणतां कुतुकें यश माझें पसरी तो !

सृष्टीही हिममिषें मनोहर नव मोत्यांची जाळी
घाली मजवर ! सजवी मजला ! माय तशी प्रतिपाळी !
सोडुन असले मित्र, निधी हे निष्कामप्रेमाचे,
धूळ जगाची माथां घेणें कोण ह्मणे कामाचें ?

फुलाचें हें सडेतोड उत्तर ऐकून कवि अगदीं थक्क झाला; जगाच्याविषयीं हे नसतें पाप फुलाच्या मनांत कोणीं भरविलें याचा त्याला विचार पडला. काल फुललेलें तें फूल, त्याला हा जगाचा एवढा विलक्षण अनुभव केव्हां आला ? समजुतीचे चार गोड शब्द सांगून त्याच्या मनांतील तें किल्मिष काढावें ह्मणून कवि पुन्हां प्रेमानें त्याला ह्मणाला—

कृतघ्न हें जग, जें तें स्वार्थी, यांत न शंका कांहीं !
परंतु तेणें प्रीतिकरांची प्रीती सरली नाहीं.

जगाला सुख व्हावें ह्मणून सज्जनांचे देह झिजत असतात; परोपकाराकरितां वृक्षलतांनीं फळाफुलांचे भार आणि कुऱ्हाडींचे प्रहार आनंदानें सोसले आहेत; परोपकाराकरितां कडेलोट पत्करून पुण्यसरितांनीं मोकळ्या माळांवर उद्यानें उठविली आहेत. परोपकाराकरितां, तुला कुरवाळणाऱ्या दिनकरानें अफाट अंतराचा अविरत प्रवास प्रेमानें पत्करला आहे; परोपकाराकरितां पंचप्राणांची कुरवंडी करून दुबळ्यांच्या दुर्दशेला आळा घालणें हीच ईश्वरभक्ति !

तुला सांगतों, प्रिया प्रसूना ? म्हणशी तूं जी भक्ति
भक्ति न ती रे, परि परमेशीं स्वार्थास्तव आसक्ति.
जगदीशाच्या निंदुन कृतिला, स्तोत्रें त्याला गावीं,
निर्दय होउनि त्या सदयाची पदवी जवळ करावी;
कोण ह्मणे ही भक्ती ? किंवा उपासना ही कसली ?
जगचालका कशी आवडे मती जगावर रुसली ?
चल जगतीं, तूं रम उद्यानीं, भिऊं नको जगताला,
सेवि जनांला, तेणें होशिल मान्य फुला, देवाला.

तूं उद्यानांत आल्यावर भ्रमर तुझ्या भोंवतीं आपल्या मंजुळ गुंजारवाचा फेर धरितील, आणि त्या अलिगुंजितानें वेडावून गेलेले कवि नवनवीन रससुंदर काव्यकृति जगताला अर्पण करितील. कठोरहृदयी कामिनीच्या अंतःकरणाला पाझर

फुटावा म्हणून हताश झालेला प्रणयी युवक तुलाच तिच्याकडे पाठवील, आणि तुझ्या सहवासानें तिच्या अंतःकरणांत प्रेमलहरी हेलावूं लागतील ! मायभूमीच्या स्वातंत्र्याकरितां शाश्वतकीर्तीचें सरण आनंदानें चढणाऱ्या नरशार्दूलाचा सन्मान, तुलाच अर्पून लोक करितील.

साधुजनाची पूजा करितां प्रथम फुलांचा मान;
साधुसंगती तरि महतींची चल पुष्पा तूं मान !
सज्जनसंगापुढें तुक्याला इतर सुखाची भुक्ति
तुच्छ वाटली ! फार कशाला ? न लगे बोले मुक्ति !

कवीचें हें मधुर भाषण ऐकूनहि त्या फुलाचा निर्धार ढळला नाहीं. रसलोलुप भ्रमर, गंधलुब्ध युवती किंवा पूजनप्रवण ब्राह्मण यांच्या लहरींवर जगांत फुलांचें क्षणभंगुर जीवित अवलंबून रहातें. पाकळी पाकळी तोडून देवार्चन साधणारा भाविक ब्राह्मण, प्रणयकलहांत प्रेमानें दिलेली फुलमाळ पायदळीं घालणारी केलिकुपिता कामिनी, प्रियजनाच्या प्रेतावर फुलांचा साज घालणारा प्रेमळ दुर्दैवी, —यांच्या हातीं लागून या जगांत फुलांचें तरल जीवित मातीमोल व्हावयाचें.

फार कशाला? तुझ्याच हातीं जरि मी येउन पडतें,
कोमुन जातां तरी मला तूं फेंकुन दिधलें असतें !
म्हणशिल नाहीं, देशिल वचनें, घेशिल शंभर आणा !
अनुभव परि हा आजवरी ये बहुधा सर्व फुलांना !
विचार तैसा उच्चारांचा प्रवाह कोठें वाहे ?
उच्चारांसम आचारांची श्रेणी कोठें आहे ?
मनांत भलतें, जनांत भलतें, हा तुमचा व्यवहार !
कापट्याचा सागर ह्मणजे हा तुमचा संसार !
प्रफुल्ल अथवा म्लान सारखें प्रिय मी जगदात्म्याला,
येथें राहिन कसें तरी मी, सेविन नित्य तयाला.

फुलाचें हें प्रत्युत्तर ऐकून कवि हंसला; जगांतलें दुःख टाळावें ह्मणून या फुलानें विजनवास अंगीकारिला. निर्भेळ सुखाच्या आशेनें यानें अरण्य गांठलें ! परंतु खरोखरीच, सुख निर्जनवनांत आहे का? कवि ह्मणतो—

" ध्वांतावांचुन सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाहीं,

दुःखावांचुन नको सुखाची व्यर्थ कल्पना, पाहीं!
तुला सांगतों ज्यांस संकटें ह्मणती त्या वघ ऊर्मी
भवसिंधूच्या,-पोहणार मी, मजला दिसती नामी!

*    *    *    *

अनुरागाचा सुंदर तरुवर दुःखकर्दमीं रुजतो,
अश्रुजलाच्या सारणिमाजि फोंफावत तो जातो!
वनभूमीवर जगे न तरु हा, जनभूमीवर जगतो;
विभूतिनें निज संसाराला सार जगाचें करितो!
छायेखालीं याच्या वसतां जग हें सुखमय सारें,
दुःखाचा लव न दिसे कोठें, सारे रम्य पसारे!
या वृक्षाच्या शाखेमध्यें तुला निवेशित करितों,
चल ये पाहूं!" ह्मणून अपुले हात कवी पसरी तो.

तथापि त्या फुलानें आपला हट्ट सोडला नाहीं; त्याच्या मनांतलें संशय-जाल अजून विरलें नाहीं असें पाहून कवि पुन्हा किंचित् रागानें त्या फुलाला ह्मणाला-

पुन्हा सांगतों जीवन आणि प्रेम भिन्न नच; एक.
प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक!
प्रेमासाठीं सुखा विसरणें हीच सुखाची पूर्ति!
प्रेमासाठीं देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति!
प्रेम मुक्तिसुख, परमेश्वर हा, स्वर्ग हाच, ये पाहूं,
प्रेमरूप ये होऊं आपण, देवासन्निध राहूं!
प्रेमनाम जगदीश, फुला रे! काय आणखी सांगूं?
पुरे करीं वनवास, याहुनी काय दुजें मी मागूं?

कवीचा हा प्रेमपाठ ऐकून फूल क्षणभर गुंग झालें, पण त्यानें आपला आग्रह मात्र सोडला नाहीं. अखेर

बरं, फुला! येतों, तुज घडुं दे अशीच-ईश्वरसेवा!

असे उद्गार काढून त्या प्रेमस्वरूप कवीनें फुलाचा निरोप घेतला;

परि जातांना अश्रू त्याचे गळले भूमीवरती
तेच जहाली पुष्पलता ती न जाणतां शोधीती.

ते लतिकेच्या भिनले अंगीं, त्या तीच्या सुमनाच्या
पहिल्या वृत्ती रहातील मग कोठुन त्या दीनाच्या ?
कविमय झालें चित्त सर्वथा विरक्त वन्य फुलाचें,
मागें, पुढतीं, वरी, खालती कवीच अवघा नाचे ?

* * *

तथापि फुल तें तसेंच तुटनी त्याच्या हृदयीं शिरलें,
गळलें म्हणती परि तें खोटें, कविहृदयीं तें रमलें !

येथें हें अतीव रसाळ खंडकाव्य पूर्ण होतें. सर्व धर्मांना संमत असणारें उत्कृष्ट तत्वज्ञान या सहजसुंदर साक्यांत गुंफिलें आहे. या तत्वज्ञानाचा मक्ते-दार कृष्ण कीं ख्रिस्त, याबद्दल वाद आहे ! मोहरीएवढया मनाच्या आचरट धर्मवेड्यांनीं उपस्थित केलेल्या या वेडगळ वितंडवादाचा विचारसुद्धां न करितां हें तत्वज्ञान विश्वात्मक आहे, विवक्षित धर्मपंथांच्या कक्षेपलीकडलें आहे, एवढेंच ह्मणणें येथें उचित होईल. तत्वज्ञान आणि काव्य हे विषय धर्मभेदातीत आहेत; विशिष्ट धर्ममताच्या अभिमानानें या विश्वात्मक वाग्वैभवाचा मक्ता सांगणें हें केवळ अक्षम्य पाप होय; आणि असलें अक्षम्य पाप करावयाला जे अरसिक धजतात त्यांच्याकरितां हें कवित्वनिवेदन बिलकूल नाहीं.

हें काव्य 'एका फुलाचा इतिहास' या नांवानें प्रथम कुसुमगुच्छांत प्रसिद्ध झालें; त्या इतिहासाची 'वनवासी फूल' ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति होय. या पुनःसंस्करणाच्या वेळीं या काव्याच्या नांवांत जसा गोड फरक झाला, तसा रूपांतहि झाला. पहिल्या आवृत्तीपेक्षां दुसऱ्या आवृत्तींत हें काव्य अधिक अर्थमधुर झालें आहे. याचा प्रत्यय या पुनःसंस्कृत आवृत्तींतील

पुन्हा सांगतों, जीवन आणि प्रेम भिन्न नच; एक.

हा परमोदात्त प्रेमपाठ देईल. टिळकांच्या काव्यांत शब्दालंकार आढळत नाहींत; परंतु या खंडकाव्यांत

"तूं शोकाचें भंजन कुसुमा ! रंजन मूर्त मनाचें,"
"पंडित करिती अखंडितपणें मंडित वाक्संसारा"
"स्यंदमान तव मरंद हृदयीं ... ... ... ..."

अशा सहज साधलेल्या नादमधुर ओळीहि क्वचित् आढळतात. एकंदरींत हें

काव्य नाद, अर्थ आणि ध्वनि या गुणत्रयाच्या सहजरम्य समवायानें सरस उतरलें आहे. टिकळांचे सर्व काव्यगुण, त्यांचें पवित्र ध्येय, त्यांचें उत्कट निसर्गप्रेम, –या सर्वांचा मिलाफ या काव्यांत झाला असल्यामुळें याचें विवेचन इतकें करावें लागलें.

या काव्याप्रमाणें 'सुशीला' हें खंडकाव्यहि ध्येयप्रवण आहे. हें काव्य ख्रिस्ती समाजाकरितां लिहिल्याचें टिळकांनीं या काव्याच्या इंग्रजी प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. या 'सुशीला' काव्यांत

रूपयौवन हें काम्य, परि प्रीती
न गे यांवर निजजीव सांवरीती!
शुक्ति नलगे, मज हवें खरें मोतीं;
रूप नलगे तव, हवी तुझी प्रीती!
पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचें
वेड मजला आंतल्या अमृताचें!

हें निष्काम पतिपत्नीप्रेमाचें उज्ज्वल तत्व ग्रथित केलें आहे. अर्थातच ख्रिस्ती समाजाकरितां जरी हें काव्य टिळकांनीं लिहिलें असलें तरी यांतील तत्वहि सर्वसंमतच आहे. हें काव्य वत्सलरसानें अगदीं ओथंबलेलें आहे.

माय माझी भेटेल मला जेव्हां
आंसवांनीं न्हाणील मला तेव्हां;
मुका बाबा घेतील कपोलांचा
हंसुन भाऊ घेईल गालगुच्चा!
ताइमाई सारूनि दुरी खेळ
धांवुनीया मज मिठ्या मारितील;
ऊन पाउस हीं जशीं एक होतीं
हंसें रडणें होईल त्याच रीती!

हें वर्णन वाचतांना कोणाच्या वृत्ती उचंबळणार नाहींत? शाळा बंद होऊन सुशीला घरीं आल्यावर

घरामध्यें पाहून त्या मुलीतें
कामधंदा विसरूनि जाय जें तें!
किती वांट्याला येइ ती कुणाच्या?

किती आईच्या! ताइमाइ यांच्या!
रात्र सारी गोष्टींत सरूनि गेली,
तयां वाटे ती आज अल्प झाली!
उद्यां परवांचें आज हो जहालें!
कधीं न घडे तें नवल घडुनि आलें!

आणि सुशीलेची स्थिति कशी झाली?

नव्या ओव्या, नव तिचे नित्य खेळ,
सदा वाटे तिज थोडकाच वेळ.
कुठें शाळा? तेथील त्या प्रतीती?
उगा स्वप्नासम पुढें येति जाती!
मुलीची त्या रंगली गृहीं वृत्ती,
मला जाणें परतून विस्मरे ती!

या वत्सलरसानें अंतःकरण अगदीं विरघळून जातें. टिळकांची गृहाविषयींची परमोच्च कल्पनाहि यांत व्यक्त झाली आहे. या काव्याचें कथानक अगदीं साधें असून सुद्धां मनाला भुलवितें. वृत्तहि गोड असून साध्याच परंतु मनोहर भाषेनें रस-परिपोषहि चांगला होतो. या काव्यांत ख्रिस्त व धर्मशास्त्र यांचा उल्लेख दोन तीन ठिकाणीं आढळतो. परंतु या काव्यांतलि तत्व सर्वमान्य असल्यामुळें विरस होण्याचें कारण नाहीं. 'माझी भार्या' या खंडकाव्यांतहि हेंच तत्व अंतर्भूत आहे. पतिपत्नींचें प्रेम हें कामुक असलें कीं त्या प्रेमाची दृष्टि सौंदर्यलोलुप अर्थातच अत्यंत अस्थिर असते. बहिरंगाला भुललेल्या मनाला अंतर्गत सद्गुणांची, अंतः-सौंदर्याची किंमत कळत नाहीं. सद्गुणांवांचून सौंदर्याला शाश्वती नाहीं. वाढत्या वयाच्या वसंतकाळांत बहरलेले गालावरल्या गुलाबाचे ते गुलजार गेंद वार्द्धक्याच्या हिंवाळ्यानें उद्यां वाळून कोळ होतील; परंतु प्रेमळ हृदयाला आलेला सद्गुण-सौंदर्याचा बहर मात्र कधींच करपत नाहीं. साधेपणाला सद्गुणांनीं सौंदर्य चढतें—

उषा साधी स्मेरीं भरित मधु साधेपण तिच्या,
अहा हारी साधी म्हणुनि मन सायंतनरुचा;
स्वभावोक्ती साधी, म्हणुनिच अलंकारिं सरसा,
प्रिया माझी साधी म्हणुनि मम तो स्वर्गचि जसा!

तिची वाणी साधी, परममधुरा यास्तव मला.
रहाणी ती साधी, म्हणुनच तिला जीव भुलला !
जशी सृष्टी तुष्टिप्रद सरल अव्याज म्हणुनी,
तशी माझी वाटे मज सुखद ती रम्य गृहिणी !

हें साधेपणाच्या सौंदर्याचें वर्णन किती समर्पक आहे !

तिच्या अल्पा स्वल्पा कृति, लघु तिची चाटु गदिते,
तिचीं प्रेमस्वप्नें मनिं, नयनिं, वाणींत उदितें;
तिच्या दीनासाठीं अविरत दयेच्या लघु कृती,
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती.
तिचें थोडें थोडें न कळत मला बोध करणें,
मला थोडें थोडें परि दृढ सुमार्गांत धरणें
तिचें थोडें थोडे अमृतकण सारें चरित्र तें !
अनन्या रत्नांची खनि मज वृथा ती न दिसत !

हें गुणसुंदर गृहिणीचें चित्र अतिशय मनोरम आहे. या काव्याची रचना विशेष नीटस नाहीं. टिळकांचीं चांगलीं खंडकाव्यें अशीं हीं तीनच, आणि म्हणून यांचा विचार भरपूर उतारे देऊन इतका सविस्तर केला आहे.

तत्वज्ञानात्मक कवितांत ' थोडें थोडें ! हळू हळू ! ' हें पद फार बहारीचें साधलें आहे. बालकवि ठोमरे हे एकदां कविता लिहित असतां, त्या वेळची त्यांची तल्लीनावस्था पाहून टिळकांनीं ' एका उन्मनस्काला पाहून ' हें गीत लिहिलें. कवीच्या हृदयांतून कविता अवतरत असतां त्या वेळीं त्याची जी विलक्षण स्थिति होते त्या स्थितीचें टिळकांसारख्या अनुभविक सत्कवीनें केलेलें हें वर्णन अगदीं हुबेहूब उतरलें आहे म्हणून नवल वाटण्याचें कारण नाहीं. परंतु उन्मनस्काच्या स्थितीचें हें वर्णन त्यांनीं अगदीं साध्या शब्दांत केलें आहे हा या वर्णनाचा विशेष होय. ' कारण मी वेडा नुसता ' हें गीतही चांगलें आहे. ' अश्रुगुच्छ ' हें गीत उत्तम आहे. या गीतांतील

मनोवृत्तिचीं फुलेंफुलें !
त्यांत रंगले दोन खुळे !
तूं, मी ! फुललें हंसूं रडूं !

मनास माने तेंच खुइं!

ही कल्पना किंचित् गूढ परंतु रम्य आहे. 'अजी कोण्या वसंताचें ह्मणूं सांगा मला गाणें?' हें गाणेंहि असेंच गूढ आहे.

असो; आज्ञा रसज्ञांनो! तरी आतांहि गाइन—
तया रागामध्यें, संज्ञा जया देतां तुह्मी 'मौन'!

या ओळींनीं हा गूढपणा कमी झालेला असल्यामुळें या गाण्याची माधुरीहि अनुभवितां येते. 'एक सुंदर कवि' हें पद फारच गोड आहे.

निंदास्तुतिच्या सवद्यासाठीं रचना याची नसे,
भक्तिरसीं हा निमग्न, याला स्फूर्ति देव देतसे.

हें त्या 'सृष्टीच्या गायकाचें' वर्णन कोणास पटणार नाहीं? 'पुरें जाणतों मीच माझें बळ!' ही कविता ओजस्वी आहे; आणि प्रत्येक ओळीगणिक हें ओज वाढत गेलें असल्यामुळें कविप्रतिभेनें वर्णिलेलें हें मनुष्याचें सामर्थ्य खरोखरीच अचाट आहे असें क्षणभर तरी वाटल्यावांचून रहात नाहीं!

महाराष्ट्र-धर्माला, महाराष्ट्र-परंपरेला आणि महाराष्ट्र-भावनांना टिळक हे धर्मांतरानें पारखे झालेले होते. धर्मोद्धाराकरितां धारातीर्थावर देह वहाणाऱ्या महाराष्ट्रवीरांच्या आत्मयज्ञाचे ऊर्जस्वल पोवाडे ऐकून त्यांच्या राष्ट्रभावना थरारणें शक्य नव्हतें; गरुडटक्क्याचें निशाण घेऊन प्रेमानंदानें नाचणाऱ्या वारकऱ्यांनीं केलेला विठ्ठलनामाचा पवित्र गजर ऐकून त्यांच्या भक्तिभावना भरारणें शक्य नव्हतें; 'पृथ्वींत अवांतर प्राणी अनेक असतां सवाई माधवरावालाच आयुष्य कमी कां घातलेंस?' ह्मणून कठोरहृदयी काळाला कळवळून हांक फोडणाऱ्या प्रभाकराचे करुणारव ऐकून त्यांचें काळिज करपणें शक्य नव्हतें; आणि प्रतापशाली गोकलखांच्या साडेतीन हात शरीराबरोबर शिवशाहीचा—मऱ्हाटशाहीचा—हिंदुपदपादशाहीचा अखेरचा आधारस्तंभ अष्ट्याच्या अपेशी मैदानावर कोसळल्याची करुण कहाणी ऐकून त्यांचें भान हरपणें शक्य नव्हतें! शारदेच्या साम्राज्यांतला असला हा मोलाचा मोहरा महाराष्ट्र-भावनांना मुकावा, पूर्वपरंपरेला परका व्हावा हें केवळ दैवदुर्विलसित होय. परंतु धर्मांतरानें कालच्या मराठी भावनांना जरी टिळक मुकले होते तरी आजच्या मराठी भावनांनीं त्यांचें अंतःकरण उचंबळत असे; टिळक हे ख्रिस्ती होते परंतु

महाराष्ट्रीय होते! मऱ्हाठी मनाची आवडनिवड, मऱ्हाठी हाडाचे गुणावगुण हे जितके केशवसुत-विनायकांच्या कवितेंत उतरले आहेत तितकेच टिळकांच्याहि कवितेंत उतरले आहेत; केशवसुत-विनायकांच्या बोलाप्रमाणें टिळकांचा बोल खडा मऱ्हाठी आहे! गोविंदाग्रज किंवा रेंदाळकर यांच्या शृंगारलेल्या संस्कृतप्रचुर मऱ्हाठीपेक्षां टिळकांचें साधें, सोपें परंतु सुंदर मऱ्हाठी महाराष्ट्राला अधिक जवळ आहे. महाराष्ट्राच्या मनाला भुलविण्याचें सामर्थ्य केशवसुत-विनायकांप्रमाणें टिळकांच्याहि वाणींत आहे. मऱ्हाठी-राष्ट्राच्या अत्युग्र वीरवृत्तींचें तेज केशवसुत-विनायकांच्या कवितेंत चमकतें आणि मऱ्हाठी हृदयाच्या अत्युत्कट प्रेमवृत्तींचें प्रतिबिंब टिळक-बालकवींच्या गीतांत आढळतें. मऱ्हाठी मर्दाच्या रांगड्या इष्काची लाडकी लज्जत केशवसुत-विनायकांच्या कवितेंत विलसते, आणि मऱ्हाठी मनाच्या भावड्या भक्तिभावाची भोळी भुलावणी टिळक-अनंततनयांच्या वाणींत विराजते! संतकवींची अभंगवाणी टिळकांना किती प्यार होती हें त्यांचा 'अभंगांजलि'च सांगेल. महाराष्ट्राचें सर्वच सारस्वत टिळकांना प्रिय होतें.

तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी
झालों, तरी गे, तृषा मन्मताची कधींही कधींही न होणें कमी!

हे त्यांचे प्रेमोद्गार अगदीं जाणिवेचे होते. त्यांनीं मराठींतील सगळें उपलब्ध शब्दजात आलोडिलें होतें. महाराष्ट्राच्या या प्राचीन धार्मिक सारस्वताला ते आपला 'जुना करार' समजत व म्हणत असत. ही त्यांची समजूत अगदीं यथार्थ होती. यहुदी राष्ट्रांत ख्रिस्त अवतरला म्हणून त्यानें यहुदी राष्ट्राच्या तत्वज्ञानाला व धार्मिक कल्पनांना आपला 'जुना करार' म्हटलें. हिंदुराष्ट्रांचें 'नियमशास्त्र पूर्ण करण्याकरितां' जर तो महाराष्ट्रांत जन्म घेता तर त्यानें महाराष्ट्राच्या प्राचीन धार्मिक सारस्वताला खचित आपला 'जुना करार' मानलें असतें. टिळकांच्या या समजुतीचें हें मर्म लक्षांत न आल्यामुळें त्यांचे कांहीं धर्मबंधु त्यांना 'प्रच्छन्न हिंदु' म्हणत! तें कसेंहि असो, या टिळकांच्या समजुतीवरून त्यांचा महाराष्ट्र-सारस्वताविषयींचा आत्यंतिक प्रेमादर दिसून येतो. या सारस्वताचें त्यांनीं चांगलें अध्ययन केलें होतें. परंतु त्यांतल्या त्यांत तुकाराम, श्रीधर व मोरोपंत यांचा व्यासंग त्यांनीं विशेष निष्ठेनें केला होता. टिळकांची गणना एकाकाळीं संस्कृत पंडितांत होत असे; संस्कृत कविता करण्याचा नाद

त्यांना बराच होता. या त्यांच्या अध्ययनाचा व अंतर्वृत्तींचा परिणाम कवितेवर होऊन तिचें वळण जुनें राहिलें.

सामान्यतः टिळकांची कविता सोपी असते. अडल्या वेळीं केशवसुतांप्रमाणें रांगडा शब्द न घेतां अगर नवा न बनवितां ते संस्कृतावरच निर्वाह करितात. कृंतन, कील, तक्षणपाटव, संस्तुति, समीक्षा, वार्णिका, पिधान हीं याच निर्वाहाचीं उदाहरणें; प्रीतिकर, वाङ्भुक्त, ज्ञप्ति, व्यंजन, अव्यय, चित्रकर, जुष्टि, अपहा, कुटल, कुट्टिम असले कर्णकटु, क्लिष्ट व चमत्कारिक संस्कृत शब्दही त्यांत आढळतात. संस्कृत धर्तीचे

"आत्मसंयमीं झाला क्षीणोपाय!"
"अधिक लग्ना ती दिसे शैशवार्शी"
"करुणाचें भाजन रिक्त जहालें!"
"सुस्वप्न-खरा मम झाला,"

असले वाक्यप्रयोग क्वचित् सांपडतात. मोरोपंती थाटाचे

"'तत्स्द्ब्रह्मार्पणमस्तु' असें किति वेळां मी वदलों"
"वाक्य 'न मातुः परदैवतमिति'"

असे शुद्ध संस्कृत वाक्यांचे प्रयोग ह्मणीदाखल ह्मणून केले आहेत. परभाषेंतील वाक्याचा उपयोग

"क्यौं यह बकवा? 'जय जय' बोलो!"

हा एकच आढळला. जुन्या मराठी शब्दांची योजना 'अभंगांजलींत' ठिकठिकाणीं केलेली आहे. त्याशिवाय अहेव, लाहो, भावू, भावो, अंतू असे शब्द व प्रयोगहि क्वचित् दिसतात. टिळकांची रचना कित्येक वेळां कर्णकटुहि असते; ही रचना कर्णकटु व्हावयाला क्रियापदांच्या ह्रस्वदीर्घांची ओढाताण हें एक प्रमुख कारण होय.

"पुरा बोलिजेलें गृहिणिसहि 'भोज्येषु जननी'!"
"नच वाचीला परंतु कितिदां उघडीला, चाळीला!"

या ओळी मासलेवाईक आहेत. अक्षयतेचा पैलतट, व्योमधरेचें चुंबन, प्रीतिलता हे टिळकांचे सांप्रदाय ह्मणतां येतील; ऊनपाउसाचा सांप्रदाय या सर्वांत फार गोड व नवीन वाटतो. हे सांप्रदाय टिळकांनीं पुनःपुन्हा उपयोजिले

आहेत. कल्पनांच्या पुनरुक्तीची तर त्यांना खातरहि नसे! 'वनवासी फूल,' 'सुशीला' या दोन्ही खंडकाव्यांत त्यांनीं आपली प्रीतिलतेची कल्पना सविस्तर मांडिली आहे; याशिवाय या एकाच कल्पनेवर 'कुणी सांगा बघूं नांव!' व 'कोण सांगेल नांव?' या दोन भिन्नवृत्त कविता आहेत. या पुनरुक्तीची टिळकांनाहि जाणीव होती; कारण 'बापाचे अश्रु' या खंडकाव्यांत ते म्हणतात—

का खेदाचा अंत करावा? खेदकर्दमीं बीज
प्रीतिलतेचें रुजे; हें न मी नवें सांगतों आज.

अशीच पुनरुक्ति भ्रमराच्या व फुलाच्या स्थितीविषयीं 'वनवासी फूल' व 'शुष्क गुलाब' या काव्यांत आहे; ही पुनरुक्ति तर केवळ शब्द फिरवून केलेली दिसते! टिळकांनीं केलेल्या भाषांतरांत 'फिरंग्याचें संगीत' ( Portuguese Donnets ) हीं ब्राउनिंग कवयित्रीच्या चतुर्दशकांचीं भाषांतरें भिकार आहेत.

टिळकांची राष्ट्रीय कविताहि बरीच आहे. 'रणशिंग' व 'बोंबाबोंब' वगैरे ओजस्वी कवनें त्यांनीं लिहिलीं असून शिवाय 'ब्रिटॅनिया' हें एक त्यांचें खंडकाव्यहि राष्ट्रीयच आहे. टिळकांची प्रतिभा स्वभावतःच शांत; केशवसुत व विनायक यांच्या कवनांत अलौकिक तेजःस्फूर्तीची जी विलक्षण झळाळी मारते ती राष्ट्रीय तेजाची झळाळी टिळकांच्या कवितेंत सांपडणें कठिणच. टिळकांची संथपणानें वहाणारी स्वभावशांत काव्यगंगा केशवसुतांच्या काव्यगंगेप्रमाणें कांहीं आकाशगामिनी तेजोगंगा नव्हे. आपल्या तरल तेजःप्रकर्षानें राष्ट्रीय भावनांचें उद्दीपन करणाऱ्या 'तुतारी-स्फूर्ती' सारख्या देदीप्यमान नक्षत्रकमलांचा आढळ टिळकांच्या काव्यगंगेंत होणें शक्यच नाहीं. केशवसुतांच्या तुतारीरवानें ज्यांचा सुप्त राष्ट्राभिमान जागृत होऊन बोलता झाला त्या कवींपैकींच टिळक हे एक होते.

टिळकांच्या कवितेवर केशवसुतांच्या कवितेचा किती विलक्षण परिमाम झाला होता याची साक्ष त्यांची सर्व राष्ट्रीय कविता देते. टिळकांनाही याची पूर्ण जाणीव होती. १९०६ च्या मनोरंजनाच्या फेब्रुवारीच्या अंकांत टिळकांची 'अपूर्णा' ही कविता आली आहे, त्या गीतांत ते म्हणतात--

गात गात तो मावळला,
गात गात उदया आला

हा येथें ! हा वघ तेथें !
आहे नाहीं दोन्हीतें,
केशवसुत करि गानातें,
आह्मी गातों सांगातें,
झपूर्झा, गडे झपूर्झा !
अक्षयतेच्या पैलतिरीं,
बसून आतां ताल धरी,
या तर मग या
कविता गाया !
कृष्णानें जी शिकवीली
दावूं गाउन त्या सगळी,
झपूर्झा, गडे झपूर्झा !

हें सगळेंच गाणें या दृष्टीनें महत्वाचें आहे, १९०६ सालच्या काव्यरत्नावलीच्या पहिला अंकांत पुन्हां टिळक म्हणतात--

ये ये कृष्णा ! चढव अपुला सूर जो भौतिकाला
विंधी, जाई वरतिंवरती, भेदुनी अंतराला.
टाकीं मागें मज बघुं सख्या ! गाउं ये एकवार
नाहीं माझी तुजविण कुणी हौस ही फेडणार.

महाराष्ट्रकाव्यप्रसारक मंडळातर्फे रा. ना. म. भिडे यांनीं केशवसुतांच्या निवडक कवितांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकाला टिळकांची लहानशी उत्कृष्ट प्रस्तावना आहे. त्या प्रस्तावनेंत टिळक ह्मणतात—

" जगाच्या दृष्टीनें या वर्गांत ( स्वतंत्र मार्ग काढणाऱ्या कवींच्या वर्गांत ) येणारे आधुनिक मराठी कवि फारच थोडे आहेत, आणि त्यांमध्यें **जग केशवसुतांना पहिली जागा देत आहे.** " खरें काव्य ह्मणजे कवीचेंच अंतःकरण " हें इमर्सनचें ह्मणणें सिद्ध करणारा मराठी कवि हाच होऊन गेला, तथापि हा होऊन गेला इतकेंच, **जणूं काय आधुनिक मराठी कवींना एक हितकर नवीन दिशा दाखविण्यापुरताच हा कवि जगांत आला आणि गेला.** "

या केशवसुतांनीं दाखविलेल्या नवीन दिशेनें जे कवि गेले त्यांतच टिळकांची गणना होते. १९१६ सालच्या डिसेंबरांत लिहिलेल्या या प्रस्तावनेंत टिळकांनीं 'तुतारी' या कवनाला 'सर्वोत्कृष्ट' म्हटलें असून 'तुतारीमंडळांची' आवश्यकताहि दर्शविली आहे. केशवसुत व टिळक या उभयतांचे रसिक मित्र किरात यांचेंहि मत असेंच पडतें. कालक्रमाच्या दृष्टीनें पाहिलें तर 'तुतारी'चे सूर झेलून गायिलेलें कवन 'रणशिंग,' नवयुग मासिकाच्या अवताराचें अभिनंदन करण्याकरितां, नुक्तें सहासात वर्षांपूर्वींच बाहेर पडलें आहे. इतरांचीं मतें लक्ष्यांत न घेतां केवळ केशवसुत–टिळकांच्या कवितेचें या दृष्टीनें सूक्ष्म निरीक्षण केलें तरी अंतःप्रमाणें याच मताला पोषक सांपडतात. परंतु हा खटाटोप करण्याचेंहि कारण नाहीं. खुद्द टिळकांना या अनुकरणाची जाणीव होती हें त्यांच्या उद्गारांवरून स्पष्टच झालें आहे. तेव्हां हें मत यापुढें कोणाला कितीही अप्रिय वाटलें तरी तें आतां सिद्ध व सत्य आहे.

या सिद्धांताप्रमाणें निःपक्षपातानें पाहिलें तर 'रणशिंग' तुतारीच्या सुरांत सूर मिसळून फुंकिलें आहे हें सहज समजेल. टिळकांच्या राष्ट्रीय कवितेंत जर कुठें ओज चमकत असेल तर तें या केशवसुतांच्या धर्तीवर लिहिलेल्या चिमुकल्या गीतांतच होय. या चिमुकल्या गीतांत 'बोंबाबोंब' हें गीत विशेष ओजस्वी आहे.

किती युगांची नीज असेना—
उघडीलें ना अंतीं नयना ?
मरणावांचुन
नच संजीवन;
कां मग बोंबाबोंब ?

हा या कवनांतील आशावाद कोणाला धीर देणार नाहीं ? 'सहकारित्व' व 'ब्राह्मण किंवा महार' हीं कवनेंहि चांगलीं साधलीं आहेत. 'ब्रिटॅनिया' हें खंडकाव्य अगदीं साधारण आहे. दिल्लीदरबारच्या वेळेला राजनिष्ठेच्या फुकट्या प्रदर्शनांत ज्या वाग्भटांनीं आपली वाणी अहमहमिकेनें झिजविली त्या वाग्भटांच्या कृतींत हें काव्य, जरा निराळ्या विचारांनीं प्रेरित होऊन नवीनच धर्तीवर लिहिलें असल्यामुळें, बरें ठरेल इतकेंच. बाकी हें काव्य ह्मणजे वृथा वाग्विस्तार

आहे; खुद्द टिळकांना सुद्धां असेंच वाटत होतें कीं काय कोण जाणे! कारण 'टिळकांची कविता' या १९१४ त प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रहांत, हें 'वनवासी फूल' व 'सुशीला' यांहून छोटें असलेलें खंडकाव्य समग्र न घालतां, 'वैचित्र्य आणि ऐक्य' व 'ऐक्याचा आभास' हे त्यांतले दोन उतारे मात्र घातले आहेत. कदाचित् हे उतारे निवडक म्हणून घातले असतील; कांहींहि हेतु असो, असें झालें आहे एवढें मात्र खरें!

टिळकांचा राष्ट्राभिमान निस्तेज दिसतो. टिळक हे ख्रिस्ती होते; जाणून बुजून स्वधर्माचा त्याग करून परधर्माचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीला त्या स्वीकृत धर्माचा अभिमान अर्थातच उत्कटत्वानें वहावा लागतो! त्यांतून टिळक हे ख्रिस्ती धर्माचे दीक्षित प्रचारक होते; व ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणून ते कीर्तन-भजन-पुराण या लोकप्रिय हिंदुपद्धतींचा उपयोगहि करीत असत. हिंदुस्थान हें हिंदिस्थान व्हावें—ख्रिस्तस्थान व्हावें हें त्यांचें उत्कट अभिलषित होतें. अर्थातच असल्या नितांत धर्माभिनिवेशाच्या शबल सावटाखालीं राष्ट्राभिमानाचें रोपडें फोंफावणें केवळ अशक्य होतें.

> प्रियकर हिंदिस्तान। आमुचा। प्रियकर हिंदिस्तान!
> ह्या प्रियभूमिस्तव ख्रिस्तपदीं मी वाहुन बसलों प्राण!

ही त्यांची श्रद्धा होती. ते पुढें सांगतात—

> ही ज्ञानाची खाण। खरोखर। ही ज्ञानाची खाण!
> परि येशूवांचुन कोण उद्धरी सर्व हींतलें ज्ञान?
> तुझें गुरूचें स्थान। खरोखर। तुझें गुरूचें स्थान!
> प्रिय जन्मभूमि, तूं ख्रिस्तरूप हो, सोड गडे अभिमान!

या ओळींशीं 'माझ्या जन्मभूमीचें नांव' या कवितेंतील

> आई! गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें! यांत शंका न कांहीं जरी

ही ओळ ताडून पहावी म्हणजे या ओळींतील 'जरी' या शब्दाची खोंच सहज समजेल! जन्मभूमीला टिळकांनीं देऊं केलेलें 'गुरुस्थान' हें असें आहे! राष्ट्राभिमान व धर्माभिमान यांचा तरतमभाव दाखविणाऱ्या या भिन्न कविता वाचतांना आजच्या अत्यंत परधर्मसहिष्णु असलेल्या राष्ट्राभिमानी सुशिक्षिताला उद्वेग व संताप आल्याशिवाय खचित रहाणार नाहीं. हिंदुस्थानाची आजची स्थिति

अशी विलक्षण नाजूक आहे कीं, त्या वेळीं हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती व पारशी या भिन्नधर्मीय समाजांनीं धर्माभिनिवेश न धरितां राष्ट्राभिनिवेशच धरिला पाहिजे. धर्माचा योग्य अभिमान वहावयाला कांहीं हरकत नाहीं; परंतु राष्ट्रापेक्षां आज धर्माचा अधिक अभिनिवेश धरणें भयावह, दुःखावह आणि पापावह आहे. अशा स्थितींत ' हिंदुस्थान ख्रिस्ती होवो ' अशी वाणी आज उच्चारणें म्हणजे केवळ अधम अनुदारवृत्तीनें हिंदु, मुसलमान व पारशी या तीन बंधुसमाजांचें अनिष्ट चिंतणें व अस्तित्व नाकारणें आहे ! स्वार्थाचा इतका नीच मासला दुसरा क्वचितच सांपडेल. हे शब्द निष्ठुर वाटले तरी सत्याकरितां निष्ठुर लिहिले आहेत; आणि ' हिंदुस्थान–हिंदुमुसल्मानांचें हिंदुस्थान–ख्रिस्ती होवो ' या आशीर्वाणी-पेक्षां हे शब्द खचित अधिक निष्ठुर नाहींत. इतिहासाकरितां, त्रिकालाबाधित सत्याकरितां निष्ठुर लिहिणें प्राप्त व न्याय्य आहे. आणि म्हणून ऐतिहासिक कवितेंत मुसलमानांच्या गतकालीन दुष्कृत्यांचा सणसणीत उच्चार एकाद्या हिंदु कवीनें ओघानें केला तर तें क्षम्य ठरेल; व तें वाचून, तें ऐतिहासिक सत्य उच्चारलेलें ऐकून चिडण्याइतकें आमच्या मुसलमानभाईचें मन निस्संशय दुबळें नाहीं. तसें चिडणें अतिशय असमंजसपणाचें व अविचाराचें आहे हा भाग वेगळाच ! परंतु हिंदुस्थानाचें ख्रिस्तीपण हें कांहीं त्रिकालाबाधित सत्य नव्हे; तें काल नव्हतें, आज नाहीं आणि उद्यां होईल कीं नाहीं देव जाणे ! तेव्हां अशा स्थितींत ' हिंदुस्थान ख्रिस्तिस्थान होवो ' अशी अभद्र वाणी उच्चारणें हा एक धर्मवेड्या अविचारी मनाचा क्षुद्र विकार आहे असें म्हणणें प्राप्त होतें. हें म्हणणें कितीहि कडु, कठोर वाटलें तरी खरें आहे. टिळकांचा राष्ट्राभिमान हा असा आहे ! ' माझ्या जन्मभूमीचें नांव ' ही कविता उत्कृष्ट आहे. बडोदें येथील साहित्य-संमेलनाच्या वेळीं ही कविता जेव्हां प्रथम प्रसिद्ध झाली त्या वेळीं तिचे चारच श्लोक होते. हल्लींच्या ' टिळकांची कविता ' या पुस्तकांतील या कवितेच्या नवीन आवृत्तींत, राजनिष्ठेच्या प्रदर्शनाकरितां, एक श्लोक वाढविला आहे; हें त्या शालजोडीला शुद्ध घोंगडीचें ठिगळ दिसतें. ' राजनिष्ठा ' हीं चतुर्दशकें चांगलीं साधलीं आहेत. ' टिमकीवाला ' हें कवनहि बरें आहे.

टिळकांनीं भक्तिपर कविता पुष्कळच लिहिली असून ती रसाळहि आहे. या भक्तिपर कवितेंत ' ख्रिस्तायन ' हें अपूर्ण महाकाव्य बरेंच वर लागेल. अखिल

मानवजातीच्या उद्धाराकरितां विनदिक्कत सुळावर चढणाऱ्या जगद्वंद्य विभूतीचें-ख्रिस्ताचें अद्भुतरम्य चरित्र वर्णावयाला टिळकांनीं या काव्यांत आरंभ केला होता. हें काव्य वाचतांना मुक्तेश्वर-श्रीधरांची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. ओंवी वृत्तांत हें रचिलेलें असून, चारी चरणांत यमक साधिलें आहे. हें काव्य फार चांगलें उतरलें आहे. स्फुट कवितांत येऊन गेलेल्या गोड कल्पना या काव्यांत ठिकठिकाणीं आढळतात ! ' गवताची गंजी ' हें खंडकाव्य ख्रिस्तीधर्मप्रसाराकरितां लिहिलेलें आहे. या काव्याच्या उपसंहारांत कवि ह्मणतो—

हिंदपुत्र हो ! प्रियकन्या हो ! धर्मभूमि ही हिंद
करा कार्य जें करील निजभू सर्व जगाला वंद्य.
ख्रिस्ती आपण, त्या ख्रिस्तासह निजदेशाला सेवूं.
आर्धा आणुन जगद्गुरूच्या भजनीं याला लावूं.
हीच जगाला खरें ख्रिस्तिपण खरें करुनि दावील !
हीच जगाला स्वर्ग ह्मणाया दूतांना लावील !

हें ध्येय आपल्या धर्मबांधवांपुढें या काव्यांत कवीनें ठेविलें आहे. उपासना–संगीतांतील गीतांत ' हिंदुस्थानांतील ख्रिस्ती ' हें गीत सरस उतरलें असून या गीतांत हिंदभूमीच्या सेवेला सर्वस्व वहाण्याचा आपल्या धर्मबांधवांना कवीनें केलेला उपदेश स्तुत्य आहे. ' ईश्वराच्या लेकरांची सत्ता ' व ' नाममाधुर्य ' हीं गाणींही चांगलीं आहेत. ' पुष्कळ अजुनि उणा ' हें पद भक्तिरसानें अगदीं ओथंबलेलें आहे.

टिळकांच्या भक्तिपर काव्यांत त्यांचा ' अभंगांजलि ' सर्वोत्कृष्ट ठरेल. हे अभंग अगदीं उत्कट तळमळीनें लिहिलेले दिसतात.

तुझ्या पडोनीयां गळां । कंठ करोनी मोकळा
रडावेंसें मला वाटे । ऊर वारंवार दाटे
येई प्रभुराया येई । धरीं मला ये हृदयीं
सखा माझा वाटेकरी । तूंच दीनांचा कैवारी

अशी उत्कट तळमळ सर्वच अभंगांत भरलेली आहे. अभंग सगळेच चांगले आहेत, तेव्हां त्यांत उताऱ्याकरितां निवड ती काय करणार ?

बीज मातींत टाकीलें । दृष्टिआड सदा केलें

मेल्यामधून अंकुर । फुटे, वाढे वृक्षवर.
कोष रिकामा पडला । मेला कीटक त्यांतला
तोच पुष्पीं तृणांकुरीं । पंख करी खालवरी
चिंध्या कामांतुन गेल्या । कोठें तरी फेकुन दिल्या
तोच कागद सुरेख । धरी महाकाव्यलेख
दास ह्मणे आह्मी राहूं । देह गेला तरी जाऊं.

हें पुनरुत्थानाचें समर्थन किती सुंदर आहे! टिळकांच्या अभंगांतील हा प्रसाद आणि हें प्रेम पाहून कित्येकांना त्यांची गणना वारकरी सांप्रदायाच्या संतकवींत करण्याचा मोह होतो! आचारानें टिळकांची गणना पुण्यचरित संतकवींच्या पवित्र परंपरेंत होईल कीं नाहीं देव जाणे!—परंतु विचारोच्चारांनीं तरी खचित होणार नाहीं. परेहून परत्या घरीं रहाण्याचा ज्यांचा हव्यास, उपकारापुरते उरण्याचा ज्यांचा अभिलाष त्या महाविभूतींना 'हा हिंदु व हा अहिंदु' असला इहजगतांतच लुडबुडणाऱ्या दुबळ्या दृष्टीला दिसणारा क्षुद्र भेद सुचलाहि नसता व खपलाहि नसता. अवघीं भूतें त्यांना साम्या आलीं होतीं. त्यांची दृष्टि दृश्य जगाच्या पलीकडे पहात होती. त्यांना जात, गोत, धर्मपंथ यांची पर्वाच नव्हती.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।

या भगवदुक्तीच्या अढळ आधारावर त्यांचा सांप्रदाय उभा होता. म्हणूनच मूर्तिपूजेचा अत्यंत तिटकारा असणाऱ्या परधर्मीयांचा त्या सांप्रदायांत समावेश होत असे. तुकोबाबरोबर शेखमहंमदाचें स्मरण, चंद्रभागेच्या वाळवंटांत, म्हणूनच प्रेमानें केलें जातें! 'ख्रिस्ताशिवाय हिंदुस्थानाचा उद्धार नाहीं' हे उद्गार ज्याच्या अंतःकरणांतून बाहेर पडले त्याचें अंतःकरण दृश्य जगाच्या स्वार्थी संसारांत घोटाळत होतें हें स्पष्टच आहे. ज्याचे विचारोच्चार इतके किंवा याहूनही कोते आणि संकुचित होते त्याची गणना,—मग तो कितीही ख्रिस्तपर प्रेमळ अभंग लिहो,—संतकवींच्या सांप्रदायांत कालत्रयींहि होणें शक्य नाहीं. विशिष्ट धर्मपंथाच्या प्रसारासाठीं, संकुचित धर्ममतांच्या सवड्यासाठीं ज्यानें आपली वाणी झिजविली, त्या वाग्वीराचा समावेश धर्मवीर संतकवींच्या परंपरेंत कदापि होणार नाहीं; तो अधिकार त्याचा नव्हे, ती पुण्याई त्याची नव्हे आणि तें भाग्यही त्याचें नव्हे! ज्यांचीं देह, मनें व वचनें पुण्यामृतें वोतिलीं आहेत आणि ज्यांच्या प्रेमदिठीपुढें

'परमेश्वर आणि मानवजाति' हेंच द्वंद्व फक्त उभें रहातें. ते समदृष्टि संत कुठें आणि विशिष्ट धर्ममतांनीं व राजकीय मतांनीं पछाडलेले व्यावहारिक वृत्तीचे टिळक कुठें? संतकर्त्यांच्या लिखाणापेक्षां टिळकांचें लिखाण सरस आहे असें एखाद्या भिन्नरुचि रसिकाचें मत पडल्यास त्याला दोष देण्याचें कारण नाहीं; कारण काव्य हें धर्मभेदातीत आहे. परंतु टिळक कितीहि उत्तम अभंग लिहोत, त्यांची तुलना संतकर्त्यांशीं होणें अशक्य! हें विषयांतर झालें; परंतु हें विषयांतर केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. हें अतिशय अप्रिय सत्य आहे. पण अशीं अप्रिय सत्येंहि व्यवहाराच्या चोखपणाकरितां पचविणें भाग आहे.

असो! टिळकांच्या अभंगांतून भक्तिरस अगदीं ओसंडतो आहे.

जीव ख्रिस्तासंगें युक्त। परात्परीं रहे गुप्त ॥
तिथें देहाचें धारण। किंवा देहविसर्जन ॥
दोन्ही सारखीं सारखा। जणूं भावंडेंच सख्खीं ॥

ही त्यांची भावना अखेर अखेर होन गेली; आणि याच भावनेंत गुंग असतां १९१९ त हा ख्रिस्ताचा मऱ्हाठी शाहिर ख्रिस्तविलीन झाला.

टिळकांच्या कवितेचें हें विवेचन येथें पूर्ण झालें; कृतसंकल्पाप्रमाणें हें कृंतनकार्य प्रेमानेंच केलेलें आहे. प्रसंगोपात्त हें विवेचन किंचित् कठोर झालें असेल पण त्याला इलाज नाहीं. टिळक हे जरी ख्रिस्ती होते तरी ते मऱ्हाठी कवि होते; आणि ह्मणून सत्कवि अनंततनय यांनीं ह्मटल्याप्रमाणें

नच निसर्गसिद्धा बाध कधींहि गुणांसी!

हें तत्त्व लक्ष्यांत घेऊन या फुलांच्या गंधरसांचें सेवन आदरानें आणि आनंदानें करणेंच रसिकांचें कर्तव्य आहे.

मनामाजीं जनामाजीं वनामाजीं फुलें सारीं!
फुलें सारीं घरीं दारीं! फुलें उत्फुल्ल कासारीं!
फुलें पृथ्वीवरी साऱ्या! फुलें आकाशगंगेंत!

—माधव.

असा हा जादूचा अद्भुत फुलबाग निर्माण करणारा फुलमाळी ख्रिस्ती असला तरी फुलांच्या कैवाऱ्यांना निरंतर प्राणाहून प्यार वाटेल! फूल दहनभूमींतील असो अगर देवमंदिरांतील असो, हें फूल आहे, गंधरसांनीं अगदीं थोथंबलेलें

आहे, एवढेंच रसलोलुप भ्रमराचें पहाणें; टिळक हे ख्रिस्ती असोत अगर हिंदु असोत, ते कवि आहेत, रसाळ वाणीचे प्रतिभासंपन्न कवि आहेत एवढेंच जातिवंत रसिकाचें पहाणें ! आणि ह्मणून टिळकांच्या काव्यकुसुमांचे गंधरस सेवन करीत असतां, त्यांच्या तीव्र धर्माभिनिवेशाचे कांटे कितीही बोचले, तरी–

कांट्यावांचुनि गुलाब नाहीं

—केशवसुत.

हा निसर्गनियम ध्यानांत धरून आह्मी 'फुलांतले भ्रमर' आनंदानें गुणगुणूं,–

विरह फुलांचा नाहिं बरा !

—टिळक

१८९७

३

# केशवसुतांची कविता.

हळुहळू कां
असतें;
स्व-

# केशवसुतांची कविता.

## ( कृष्णाजी केशव दामले. )

१८६६—१९०५

अपकर्षामागून उत्कर्ष, दुःखामागून सुख, निराशेमागून आशा—असल्या परिस्थितीच्या या चक्रनेमिक्रमानें हें विराटस्वरूप विश्वचक्र निरंतर फिरत असतें. विरोधी भावांनीं विनटलेल्या विश्वसंसाराला वैचित्र्य आणणारा हा चक्रनेमिक्रम शब्दसंसारांतहि सदैव आढळून येतो. शब्दांच्या संसाराला—मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भूत होणाऱ्या विविध विचारतरंगांच्या विलसितांनीं घडलेल्या या शब्दविश्वालाहि—विरोधी भावांच्या या चक्रनेमिक्रमानें एक प्रकारचें विलक्षण सौंदर्य आणिलें आहे. हें सौंदर्य सहज आहे; विरोधी भावांचा विलास म्हणजेच मानवी जीवित ! कारण सुखदुःखांचे, आशानिराशांचे चार डाव खेळत असतां प्रपंचरंगांत रंगलेल्या जीवाला जी हारजीत, प्रसंगोपात्त जे अनेकविध अनुभव येत असतात त्या अनुभवांवरच शब्दसृष्टीची उभारणी झालेली आहे. आणि म्हणूनच मानवी अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या क्षणिक विचारतरंगांवरच ज्याची सर्गस्थिति विशेषतः अवलंबून असते त्या काव्यवाङ्मयांत हा चक्रनेमिक्रम अधिक आढळून येतो. विश्वसंसाराचा किंवा किंचित् मर्यादित असलेल्या राष्ट्रसंसाराचा आणि शब्दसंसाराचा असा अगदीं निकट संबंध असल्यामुळें त्या त्या काळच्या राष्ट्रीय परिस्थितीचें प्रतिबिंब तत्कालीन वाङ्मयांत, विशेषतः काव्यवाङ्मयांत स्पष्ट पडलेलें दिसून येतें. स्वातंत्र्याकरितां सर्वस्वाचें समर्पण करून स्वराज्यस्थापना करणाऱ्या शिवप्रभूच्या कर्तव्यप्रेरक कारकीर्दींत जर प्रपंचपराङ्मुख संतकवींच्या प्रतिभेनें निर्माण केलेला निराशावाद नष्ट करून राष्ट्रभावनांचें उद्दीपन करणारीं ओजस्वी कवनें निर्माण झालीं, तर रंग उडवून राज्य राखणाऱ्या रावबाजीच्या अपेशी अमदानींत विषयलोलुपांच्या वैषयिक वृत्तींचें वर्णन करणाऱ्या अत्यंत अधम शृंगारगीतांचाच विशेष प्रादुर्भाव झाला. अध्यात्माच्या अढळ आधारावर उभारण्यांत आलेल्या महाराष्ट्र–भाषेच्या या भव्य मंदिरावर कामुक मनाच्या कोत्या कल्पनांचे, शबल भावनांचे क्षुद्र मनोरे या स्वराज्यविनाशाच्या

विपरीत कालांतच लावणी-कवींनीं चढविले; आणि

नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं
परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर

—नामदेव.

या पुण्यचरित संतकवींच्या परमोदात्त ध्येयापासून च्युत झालेली महाराष्ट्र-शारदा वीणागुण चाळून नामसंकीर्तन करण्याऐवजीं डफाच्या तालावर लावण्या आळवूं लागली! आधुनिक म्हणजे नवीन धर्तीच्या मराठी कवितेचा उगम येथेंच सांपडतो. जीवन्मुक्त संतकवींच्या प्रशांत प्रतिभेच्या प्रकर्षानें प्रारंभींच्या मराठी कवितेचें स्वरूप केवळ आध्यात्मिकच ठेविलें. शिवशाहींत आणि विशेषतः पेशवाईंत बदलत्या परिस्थितीप्रमाणें हें प्रारंभींचें स्वरूप पालटून महाराष्ट्र-शारदा नुसतें नामसंकीर्तनच न करितां पुराणकथांचे विविधालापहि गाऊं लागली. आधुनिक कवितेचा अगदीं सूक्ष्म उगम प्रथम येथेंच सांपडतो. पारमार्थिक किंवा पौराणिक विषय जाऊन त्यांची जागा ऐहिक किंवा ऐतिहासिक विषय याच संधिकालांत प्रथम व्यापूं लागले. निरंजनमाधवाचें प्रवासवर्णन, जगन्नाथाचें राशिसेना काव्य, जीवनाची अनुभवलहरी, महिपतीचीं संतचरित्रें व अनंतफंदीचा माधवग्रंथ,—हे सर्व काव्यप्रबंध या बदलत्या परिस्थितीचे व अभिरुचीचे द्योतक आहेत. लोकाभिरुचीचा रागरंग पाहून स्वतःच्या प्रतिभेला नाचविणारे कवि याच काळांत निर्माण झाले; आणि त्यांच्या नादमधुर कवितेला लौकिक पठणाचें अमर अधिष्ठान मिळालेलें पाहून ऐहिक विषयांवर विशेष भर देणारे लावणी-कवि पुढें सरसावले. अध्यात्मापासून ऐहिकाकडे व परमार्थापासून प्रपंचाकडे झालेलें हें परिवर्तन महाराष्ट्रशारदेला असह्य झालें; आणि म्हणूनच बहुधा स्वराज्याच्या विनाशकाळांत शृंगाराचे विपरीत खेळ महाराष्ट्र-कवींना आठवले! मराठी कवितेचे प्राचीन आणि अर्वाचीन किंवा आधुनिक असे भेद पाडून इंग्रजी अमदानीपासून आधुनिक कवितेचा आयुर्दाय मोजण्याच्या अलीकडील रूढीला इतिहासाची साक्ष ही अशी प्रतिकूल पडते. प्रत्येक पिढीला अधिकाधिक निस्तेज होत चाललेल्या छत्रपतींना व पेशव्यांना घरीं बसवून लोकसत्तेच्या मार्गावर हळुहळु राज्यशकट नेणारी व्यवहारचतुर बारभाईंची खेती यशस्वी होती आणि महाराष्ट्रांत जरी आज सुधारलेलें स्वराज्य नांदतें तरी सुद्धां आजचें

युगतेज ओळखून कवींना, राज्यकर्त्यांप्रमाणेंच जुन्या वळणाचा हळुहळू कां होईना पण त्याग करून, कवित्वाचें आधुनिक वळण स्वीकारावें लागलें असतें; आणि स्वभाषेचा अभिमान वाहून तिच्या उत्कर्षाची चिंता करणारें तसलें स्वदेशी सरकार जर आज विद्यमान असतें, तर युगतेज ओळखून नवीन धर्तीवर प्रबंध रचणाऱ्या कवींनाच राजाश्रय मिळाला असता असें खचित वाटतें.

परंतु निःपक्षपाती रसिकांच्या तर्काला आणि युक्तीला पटणाऱ्या या कल्पनाजालांत, ज्यांचें समाधान कधींच होणें शक्य नाहीं अशा निंदकांच्या समाधानाकरितां अधिक न गुंततां प्रस्तुताकडे वळणेंच विशेष श्रेयस्कर आहे. अव्वल इंग्रजी अमदानींत कवित्वगुणाची बूज न होऊन सामान्यजनतेचें लक्ष गद्याकडेच विशेष वेधलें. संपन्न संस्कृत सारस्वताच्या साहाय्यानें मराठी काव्यवाङ्मयाला सुधारण्याचे प्रयत्न, या दुःस्थितींत प्रथम शास्त्रिमंडळानें केले. चिपळूणकर, राजवाडे, लेले, पारखी या विख्यात संस्कृत पंडितांनीं मराठी काव्यवाङ्मयांत चांगलीच भर घातली. मेघदूताचें चिपळुणकरकृत सहजसुंदर भाषांतर सोडलें तरी गडबोले यांचें मृच्छकटिक व उत्तररामचरित्र, राजवाडे यांचें मालतीमाधव आणि लेले यांचा रघुवंश हीं भाषांतरें सरस आहेत. लेले यांचें शिवचरित्रावरील स्वतंत्र काव्य अगदीं नीरस आहे. इंग्रजी पंडितांच्या कृतींत रा. ब. महाजनि यांची ‘ कुसुमांजलि ’ मधुर आहे. प्रधानांचें ‘ दैवसेनी ’ हें लघुकाव्यहि सुरस आहे. परंतु हे सर्व प्रयत्न अस्वतंत्र होते. स्वतंत्र काव्यांत गणण्याजोगे पाळंदे यांची ‘ रत्नमाला ’ व चिंतामणिपेठकरांची ‘ गंगावर्णना ’ हे दोनच काव्यग्रंथ आहेत. पाळंदे यांच्या रत्नमालेचें जुनें वळण कांहीं सुशिक्षितांना जरी मान्य व प्रिय झालें असलें, तरी एकंदरींत जुन्याला विटलेल्या सुशिक्षित समाजाला तें प्रिय होणें शक्य नव्हतें. पाळंदे यांचीं एकदोन उत्कृष्ट पदें मात्र महाराष्ट्रांत अगदीं सर्वतोमुखीं झालीं आहेत. ‘ गंगावर्णना ’ हें काव्य जुनें वळण न सोडतां जरी लिहिलें असलें तरी त्यांत नावीन्यहि कांहीं ठिकाणीं आढळतें. या काव्याची रचनाहि फार सफाईदार आहे. परंतु इंग्रजी कवितेच्या मोहनीनें ज्यांची दृष्टि धुंद झाली होती त्यांना स्तिमित करण्यासारखा कोणताहि उत्कट गुण ह्या स्वतंत्र काव्यांत नव्हता; आणि त्यामुळें या काव्याचें तेज इंग्रजी कवितेपुढें पडलें नाहीं. निव्वळ इंग्रजी किंवा संस्कृत धर्तीवर स्वतंत्र काव्यरचना करण्याचे प्रशंसनीय

प्रयत्न कुंटे, खरे आणि मोगरे यांनींच विशेष केले. कवित्वगुण कमी असल्यामुळें कुंट्यांची कविता कायमची मागें पडल्यासारखी दिसते. खरे यांच्या कवितेचें वळण जुनें असल्यामुळें तीहि सुशिक्षितांना मान्य झाली नाहीं. 'जन्मभूमि' या कवितेसारखे त्यांचे कित्येक चुटके चांगले उतरले आहेत. सुबोध व सुश्लिष्ट रचना, प्रासादिक व प्रेमळ कवित्व या गुणांमुळें मोगरे यांची कविता अधिक लोकप्रिय आहे. परंतु कल्पनेचे स्वैर संचार किंवा हृदयंगम संवेदना मोगरे यांच्या कवितेंत सहसा आढळत नाहींत. निव्वळ नादलुब्ध मनाला आनंद देणारें श्रुति-सुभग शब्दसौंदर्य मात्र त्यांच्या कवितेंत भरपूर आहे; परंतु जातिवंत रसिकाच्या मनाला भुलविणारा काव्याचा आत्मा जो ध्वनि तो मात्र अगदीं नाहीं. आधुनिक काव्यवाङ्मयाला परिस्थितीप्रमाणें नवीन वळण लावण्याचें सामर्थ्य मोगरे यांच्या वाणींत अर्थातच नव्हतें; भाषान्तराचा किंवा अनुकरणाचा नित्यक्षुण्ण प्रदेश सोडून प्रतिभेच्या प्रभावानें नवीन सृष्टि निर्माण करणारा वागीश्वरच आधुनिक कवितेला वळण लावावयाला पाहिजे होता. जुन्या कल्पना, जुने सांप्रदाय, जुने वृत्तबंध यांच्या पार्थिव पाशांत गुरफटलेल्या प्रतिभेला बंधमुक्त करून

मी न तुझी—त्याची
मी न माझी—कुणाची
ब्रह्मांडाच्या घडामोडी करी—ग!

—Bee

असल्या अचल आत्मप्रत्ययानें अज्ञाताच्या अफाट अंतराळांत अप्रतिबंध नाचविणारा स्वातंत्र्याचा शाहिरच तें कार्य करावयाला हवा होता! आणि असाच एक दैवी स्फूर्तीचा शाहीर या महाराष्ट्र भूमींत १८६६ त जन्मास आला. त्या मंगल-कालीं, त्या अर्भकाच्या अस्फुट रुदनानें जागृत झालेल्या माल्यकूटांतल्या वन-देवतांनीं

गाऊं या! हृदयांत या अमुचिया प्रीती असे दाटली!
गाऊं या! हृदयांत या अमुचिया कां स्फूर्ति ही वाढली?

असे आश्चर्योद्गार काढून त्या नवजात कविश्रेष्ठाच्या स्वागतार्थ नितांतमधुर निःशब्द गीतें बहुधा गाइलीं असतील!

भाषांतराच्या पांगुळगाड्याचा आधार घेऊन केशवसुतांच्या प्रतिभेनें वाङ्मय-

प्रदेशांत पहिलें पाऊल टाकिलें. केशवसुतांची भाषा प्रारंभीं संस्कृतप्रचुर असे, याची साक्ष, रघुवंशाच्या सातव्या सर्गांतील सात श्लोकांचें पहिलें भाषांतर, 'सूर्यास,' 'सृष्टि आणि कवि' व 'प्रियेचें ध्यान' या गोड कविता देतात. 'कविता आणि कवि' ही अगदीं सामान्य कविता त्यांचें हें संस्कृत वळण सुटून शुद्ध मराठी वळण लागल्याचें स्पष्ट दर्शविते. या कवितेंतील चवथ्या श्लोकांत कवित्वाचा हेतु आणि शेवटल्या दोन श्लोकांत कवीचें निरंकुशत्व या दोन महत्वाच्या विषयांवरील कवीचीं बाणेदार मतें आलीं आहेत. 'अढळ सौंदर्य' या सुंदर कवितेनें कवीनें नवीन स्वीकारलेलें वळण चांगलें आहे अशी खात्री होते. जगांतील सर्व वस्तूंचें सौंदर्य आरंभींच आनंददायक असतें; अतिपरिचयानें नवलाई कमी होत जाऊन त्यांतील आनंद उडून जातो असा अनुभव आहे. नवेपणांत नवलाई नांदते; व असें अक्षय्य नवेपण निसर्गांतच आहे,—निसर्गदृश्यांतच शाश्वत सौंदर्य सामावलेलें आहे—या तत्वाचा परिचय या कवितेंत होतो. 'अपर कवितादैवत' या कवितेंत प्रेमगीतें कां व कशीं उत्पन्न होतात याचें मार्मिक उत्तर दिलेलें आहे. केशवसुतांच्या प्रेम-कविता वाचतांना हे केवळ कल्पनातरंग नसून विरहव्याकुळ अंतःकरणाचे तळमळीचे उद्गार आहेत असें वाटल्यावांचून रहात नाहीं. 'एक खेडें' ही केशवसुतांची एक उत्कृष्ट कविता आहे. खेडेगांवाच्या रहाणीचें इतकें रम्य व पवित्र वर्णन दुसरें क्वचितच असेल.

देवळीं त्या देवास बळें आणा
परी राहे तो सृष्टिमधें राणा.

ही विश्वसौंदर्यांत विश्वेश्वर पहाण्याची भावना अत्यंत उदात्त आहे. शहरांतील घालमेलींचें वर्णन नागर मनापेक्षां खेडवळ मनाला अधिक आनंद देतें; कारण शहरांतल्या आनंदापेक्षां नागरिकांना दुःखच जास्त जाणवतें. खेडवळाच्या भावड्या मनाचा भोळा आनंद या कवितेंत फार चांगल्या रीतीनें दाखविला आहे. केशवसुतांनीं नव्यानें पत्करलेलें मराठी वळण या कवितेंत दृढ झालेलें दिसतें. 'आगबोटीच्या कांठाशीं उभ्या असलेल्या तरुणीस' हें केशवसुतांचें अपुरें राहिलेलें खंडकाव्य असावेंसें वाटतें. या रमणीय काव्यांत केशवसुतांच्या कल्पनेचे चंचल विलास दृष्टीस पडतात. सृष्टीच्या त्या सुतेला पाहून अंतःकरणांत उचंबळून आलेल्या तरल भावना, निसर्ग—नियमांना तुडविणाऱ्या मानवजातीवि-

षयीं मनांत असलेला तिटकारा, परराष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या जुलमी राष्ट्रांविषयीं मनांत असलेला द्वेष—हे सर्व भाव कवीनें या काव्यांत प्रकट केले असून कल्पनानिर्मित वरुणसृष्टीचें वर्णनहि फार बहारीचें केलें आहे. सामाजिक सुधारणेविषयीं केशवसुतांना अतोनात आदर वाटत असे; देशाची सर्व बाजूंनीं झालेली दुर्दशा पाहून तळमळणाऱ्या त्यांच्या अंतःकरणाची उत्कटता

तेव्हां आह्मीं ह्मटलें—" ही ऱ्हासाची
रजनी केव्हां विरून जाइल साची ?
स्वतंत्रतेची पहाट ती येईल
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ?
या डोळ्यांनीं पहाट ती बघण्याचें
असेल कां हो नशिबीं दुर्दैव्यांचे ?
किंवा तीतें आणायाचे कांहीं
यत्न आमुच्या होतिल काय कराहीं ? "

या उत्कृष्ट कवितांत व्यक्त झाली आहे. केशवसुतांचे गुरु समाजसुधारक आगरकर यांच्या तेजस्वी मतांचा विलक्षण परिणाम केशवसुतांच्या कवितेवर झालेला दिसतो. प. वा. आगरकर यांचीं सामाजिक बाबतींत जशीं अत्यंत बाणेदार मतें होतीं, तशींच तीं राजकीय बाबतींतहि होतीं. समाजकारणांत घायकूतपणानें सुधारणा घडवून आणूं पहाणारे आज जसा राजकारणांत धिम्मेपणाचा उपदेश करूं पहातात तसला एकदेशीय उपदेश करण्याचें कसब आगरकरांना कधींच साधलें नाहीं. आगरकरांचें तर्कशास्त्र सडेतोड होतें; सामाजिक अन्याय आणि राजकीय अन्याय त्यांच्या सरळ व प्रामाणिक बुद्धीला सारखेच जाचक वाटले; सामाजिक अन्यायांवर कडक टीका करणारी त्यांची निःस्पृह राष्ट्रभक्ति राजकीय अन्यायांवर टीका करतांना कधींच वचकली नाहीं. मनाला जें सत्य वाटेल तें बोलणार असा अभिमान त्यांनीं आमरण वाहिला. हाच शुद्ध सत्याभिमान केशवसुतांच्या ठिकाणीं अगदीं ओतप्रोत संचरला होता. ' तुतारी ' फुंकून जितक्या आवेशानें त्यांनीं—

जुनें जाउं द्या मरणालागुनि !

असे अंतःकरणाच्या तळमळीचे तीव्र उद्गार काढिले, तितक्याच आवेशानें त्यांनीं

गोफण झुगारून कठिण शब्दरूपी धोंड्यांनीं हाणाहाण केली. ‘मजुरावर उपासमारीची पाळी’ व ‘अंत्यजांचीं मुलें’ या हृदयंगम कवितांत त्यांचीं हीं मतें उत्तम रीतीनें स्पष्ट झालीं आहेत. ‘आई! आई!’ या कवितेंत विद्यार्जनाकरितां आईपासून दूर गेलेल्या–पहिल्यानेंच दूर गेलेल्या–मुलाच्या हृदयद्रावक मनोवृत्तींचें वर्णन केलेलें आहे. स्वजनांविषयीं केशवसुतांच्या अंतःकरणांत अपार प्रेम असे. स्वजनांची ताटातूट झाल्यानें मनाची होणारी तडफड त्यांनीं अनुभविली होती. गांवाला गेलेल्या मित्राची बंद झालेली खोली पाहून त्यांना एकदां त्रिभुवन आठवलें होतें आणि त्याच्या सहवासांत लाधलेल्या सुखक्षणांचे स्मरण करून त्यांनीं अश्रु ढाळिले होते. अशाच एका वेळीं स्वजनांपासून दूर असतां ‘घराकडील गोष्टी’ बोलत बोलत ते कल्पनावारूवर बसून घरीं जाऊन आले होते! ‘घराकडील गोष्टी’ ही एक त्यांची अप्रतिम कविता आहे. प्रेमळ मित्राशीं घरगुती गोष्टी बोलत असतां त्यांचें देहभान अगदीं उडून गेलें आणि त्यांच्या दृष्टीपुढें अत्यंत सुखमय असें तें गृहचित्र उभें राहिलें. रम्य वस्तु किंवा रम्य स्मृति यांच्याशीं केशवसुत तेव्हांच तन्मय होत असत.

> जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
> गाणें मनांत मग होय सवेंचि जागें!

हे त्यांचे उद्गार अगदीं यथार्थ आहेत. या फुलावरून त्या फुलावर बागडणाऱ्या भृंगाला पहात असतां, त्या वेळच्या तल्लीनावस्थेंत त्यांना स्फुरलेलें गाणें अतीव मधुर आहे. पहांटेस फांकणारें अरुणाचें सौम्य तेज आणि कमीकमी होत जाणारा अंधार पाहून त्यांना काव्यस्फूर्तीच्या वेळीं कविहृदयांत हळुहळू उदित होणाऱ्या प्रतिभातेजाचें व त्या तेजाच्या उदयामुळें उणावत जाणाऱ्या ऐहिक उपाधींच्या अंधाराचें स्मरण झालें आणि सृष्टि कवयित्रीच दिसली! वृक्षवेलींवर अर्धवट उमललेल्या कळ्या याच त्या कवयित्रीच्या कल्पना; आणि या कवयित्रीचें काव्य कोणतें?—

> भृंगा! आणि तुझें गान
> सृष्टीचें गमतें कवन!

मनुष्याची कल्पना व दृष्टि परिस्थितीनें कोती केल्यामुळें त्याला निर्दोषांतहि दोष, सुंदरतेलाहि कुसें दिसूं लागलीं आहेत. मनुष्याच्या मनाला जडलेली ही

कृत्रिमता निसर्गाशीं तद्रूप झाल्याशिवाय जाणार नाहीं; व म्हणून कवि भृंगाच्या रसिकतेची अपेक्षा करीत आहे. अशा तऱ्हेची स्वर्गीय रसिकता न लाधल्यामुळेंच, भृंग जसा पुष्पाशीं प्रेमानें गुजगोष्टी करीत, त्याचे मुके बोल गुणगुणत वातावरणांत विहरतो तसें कवीला विहरतां येत नाहीं. 'पुष्पाप्रत' या गोडकवनांत कवीनें ही आपली निराशा तीव्र शब्दांत सांगितली आहे. बाल्याच्या सीमेवर डुलत असतांना फुलांत व मुलांत कांहींच अंतर नसतें; वाऱ्याच्या झोंक्याबरोबर हेलकावणाऱ्या फुलवेलीच्या अस्थिर स्थितीची जशी फुलाला जाणीव नसते तशीच आईच्या मांडीवर अंगाई करणाऱ्या मुलाला मातेच्या सांसारिक चिंतांची कल्पना नसते! परंतु बाळपणची ही निश्चिंत व निरागस स्थिति मनुष्याला कायमची कधींच लाभत नाहीं; उलट, कवि फुलाला म्हणतो

> सौकुमार्य तव अजुनी आहे !
> हंसताचि आहे हास्य तुझें हें;
> परि मम भाळीं ढग अश्रूंचा;—हाय, डवरलाहे !

सांसारिक उपाधींचा विसर न पडल्यामुळेंच कवीला 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' शब्दांनीं रेखाटतां येणें अशक्य होतें. आणि जगाच्या जाचानें रागावून परत गेलेल्या शब्दांनीं मागें फिरावें म्हणून 'शब्दांनो मागुते या !' अशी कळवळून हांक फोडावी लागते. 'दिव्य ठिणगी,' 'कलकता,' 'कवि' व 'चिन्हीकरण' हे चिमुकले चुटके चांगले आहेत. कवितेच्या उद्भवाला कवि हा केवळ निमित्तमात्र असतो. सृष्टीमध्यें जें कांहीं रम्य असतें तें कवीच्या अंतः-करणांत घोळूं लागलें कीं काव्य आपोआप निर्माण होतें. भृंग, पुष्प, किंवा फूल-पांखरूं यांना पाहिल्याबरोबर सृष्टीशीं समरस होणाऱ्या कवीला भान रहात नाहीं. त्या मनोरम हृदयांतलें रम्यपण त्याच्या अंतःकरणाला भुरळ पाडितें. जगाचा जाच क्षणभर त्याला पारखा होतो आणि

> 'सर्व विनाशी असती प्राणी'
> ही मज खोटी वाटे वाणी;
> फूलपांखरूं-मरण पाहिलें—
> आहे कां कोणीं ?

असा भ्रम-गोड भ्रम फूलपांखराला हवेंत भिरभिरतांना पाहून त्याच्या मनाला

पडतो. प्रत्येक फुलावर क्षणभर रमणाऱ्या फूलपांखराला पाहतांच

तरल कल्पना जशी कवीची
सुंदर विषयांवरुनी साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे—
—फूलपांखराची !

अशी गोड उपमा कवीला सहज सुचते ! सृष्टिसौंदर्यांत जर कवीच्या मनाला तल्लीन करण्याचें सामर्थ्य नसतें तर जगांतल्या काळज्यांनीं कवीचें कोमल मन तेव्हांच करपून गेलें असतें. आणि म्हणूनच ‘ काव्य कोणाचें ? ’ असें विचारलें असतां कवि ‘ तें आपलें नव्हे; सृष्टीचें—सृष्टिसौंदर्याचें आदिकरण जी दिव्यशक्ति तिचें आहे ’ असें सांगतो. जगांतल्या दुःखांच्या आघातांनीं कवीचें अंतःकरण इतकें हळू झालेलें असतें कीं नुसत्या करुणकल्पनेच्या स्पर्शानें सुद्धां तें कळवळतें. पहाटेच्या प्रहरीं पडलेले ‘ दंवाचे थेंब ’ पाहून बाळानें विचारलेल्या प्रश्नांनीं आईला मृत अपत्यांचें स्मरण होऊन शोकाचा उमाळा आला; आईच्या अंतः-करणांत उठलेल्या त्या करुणाकल्लोलांत विरून जाऊन

होते हिमबिंदु सकाळीं
कोठें ते सायंकाळीं ?

असा प्रश्न कविहि आपल्या मनाला खेदानें विचारूं लागला ! प्रापंचिक आप-त्तींनीं गांजल्यामुळें केशवसुतांच्या मनाची अशी अगदीं नाजुक स्थिति झाली होती. कविता हाच त्यांच्या दुःखी मनाला विरंगुळा होता. कवीला जें इतकें कवितेचें महत्व वाटतें त्याचें कारण त्याच्या विव्हल मनाचें हें वेड होय ! स्व-जनांचा वियोग झाल्यामुळें किंवा देशाच्या विपन्न स्थितीच्या चिंतनानें त्याचें मन खिन्न झालें असतां कविताच त्याला या दुःखांचा क्षणभर विसर पाडते. ‘ कवि-तेचें प्रयोजन ’ कवीला जितकें जाणवतें, तितकें इतरांना जाणवणें शक्य नाहीं. त्यांतून राष्ट्राच्या दुःस्थितीचें रडगाणें कानींकपाळीं कायमचें लागलें असतांना कवीचें गाणें कोण ऐकत बसणार ? अशा वेळीं फक्त एकाच कारणानें कवितेचें महत्व लोकांना जाणवणें शक्य असतें. पारतंत्र्यांत खितपणाऱ्या जनतेला पूर्व-कालीन स्वातंत्र्याचें स्मरण जितकें प्रिय असतें तितकें दुसरें कांहींच नसतें, असें म्हटलें तरी चालेल. पूर्व वैभवाच्या स्मरणानें प्राप्तकाळाची दुर्दशा क्षणभर

तरी डोळयांपुढून दूर होतें; पूर्वजांच्या पराक्रमांचे पोवाडे ऐकून क्षणभर तरी अंगावर रोमांच थरारतात आणि प्राप्त काळाला झुगारून देण्याची बुद्धि होते! अंतःकरणांत अशा वेळीं उठणाऱ्या क्षणिक स्फूर्तींच्या लहरी सदोदित थरारत्या राखणें 'कवितेचें प्रयोजन' असतें. हें कार्य कविता जर करील तर तिचें महत्त्व जनतेला पटल्याशिवाय रहाणार नाहीं. केशवसुतांनीं हें जाणूनच 'दोन वाजी,' 'गोफण' असलीं ओजस्वी कवनें गाइलीं. हॅम्लेटनें ज्याप्रमाणें 'दोन बापांची' तुलना करून आपल्या बहकलेल्या आईचें बेतरम मन ताळया-वर आणिलें त्याचप्रमाणें दोन बऱ्यावाईट ऐतिहासिक पुरुषांची अगर प्रसंगांची तुलना करून राष्ट्राची विवेकबुद्धि जागृत करणें हें नुसता आंधळा देशाभिमान चेतविण्यापेक्षां अधिक हितकर असतें. या दृष्टीनें केशवसुतांचा 'दोन वाजी' हा पोवाडा अप्रतिम आहे. परंतु जनतेकरितां कविता असते असें ह्मणण्यापेक्षां ती कवीकरितां असते असें ह्मणणें अधिक उचित आहे. जनतेला वेड लावण्याच्या आधीं ती कवीला वेड लावीत असते; आणि तिच्या नादानें कवि जेव्हां पुरा वेडा होईल तेव्हांच तो जनतेला वेड लावूं शकतो! हा अनुभव आल्यामुळेंच केशवसुतांनीं कवितेला 'विजेचें वेड' ह्मटलें आहे. त्यांना स्वतःला कवितेनें किती विलक्षण वेड लाविलें होतें याची साक्ष त्यांची 'फिर्याद' ही कविता देते. अकस्मात दर्शन देऊन अंतर्धान पावलेल्या त्या 'दृष्ट सुंदरीस' प्रसन्न करण्याकरितां विजनवास पतकरला; जननिंदा सहन केली; तरीहि ती प्रसन्न होईना, ह्मणून अखेर वैतागलेल्या कवीनें तिच्यावर ही 'फिर्याद' लाविली आहे! कवितेवर जसें केशवसुतांचें आत्यंतिक प्रेम होतें तसेंच तें पत्नीवरहि होतें असें त्यांच्या प्रेमगीतावरून दिसतें. 'भटकणाराचें गाणें' हें त्यांचें प्रेमगीत अत्यंत हृदयस्पर्शी आहे. 'कर्तव्य आणि प्रीति' ही कविता गोड घरगुती उपमांनीं विशेष गोड झाली आहे. 'प्रणयकथन' या गीतांत लौकिक शहाणपणापलीकडील अमर्याद प्रेमाची याचना प्रियतमेजवळ करून कवि 'फार दिवसांनीं भेट' झाल्यावर तिला सांगतो—

> कालें आणिक कष्टदशेनें
> क्षीणत्वाला होतें जाणें
> सगळयांचेंही, परि प्रीतिचा
> जोम वाढतो उलटा साचा!

केशवसुतांच्या कांहीं कवितांचें येथवर जें थोडेंबहुत विवेचन झालें त्यावरून केशवसुतांच्या कवितेचें बहुविध स्वरूप किती मनोहर आहे याचा प्रत्यय येतो. केशवसुतांचा काळ हा महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय संक्रमणाचा काळ होता. नवीन ध्येयें, नवीन भावना, नवीन अनुभव असा हा सगळा नवलाईचा डाव मांडून पाश्चात्य संस्कृति महाराष्ट्राची नजरबंदी करीत होती. त्या नजरबंदीच्या मोहजालांतून केशवसुतांची प्रतिभा आपला मार्ग काढीत होती. सभोंवतालच्या या खवळलेल्या वातावरणाचा परिणाम केशवसुतांच्या कवितेवर स्पष्ट घडलेला दिसतो. जुनें कां नवें, पौरस्त्य कां पाश्चात्य, संस्कृत कां इंग्रजी अशा तऱ्हेचीं विचित्र कोडीं या नव्या परिस्थितीनें तत्कालीन तरुण पिढीपुढें— कर्तबगार तरुणांपुढें टाकिलीं होतीं. कीर्तिकर, महाजनि हे नवीनाच्या, पाश्चात्याच्या, इंग्रजीच्या मागून गेले; चिपळूणकर, मोगरे यांनीं प्राचीनाचें, पौरस्त्याचें अनुकरण करून पूर्वपरंपरा कायम ठेविली. केशवसुतांनीं कोणाचेंच अनुकरण न करितां नवीन मार्ग, नवीन सांप्रदाय काढिला. जुन्यानव्याचें, पौरस्त्यपाश्चात्याचें या सांप्रदायाला सारखेंच साहाय्य आहे. आधुनिक कविमंडळांत असलेली अव्यवस्था हा नवीन सांप्रदाय-स्थापन करून केशवसुतांनीं नष्ट केली. इंग्रजी विचारांचा, इंग्रजी कल्पनांचा, इंग्रजी भाषापद्धतीचा पगडा जरी केशवसुतांच्या कवितेवर पडला असला तरी केशवसुतांच्या कवितेचें अंतःकरण पूर्ण महाराष्ट्रीय आहे. विश्वप्रेमाच्या विशाल स्वप्नांत केशवसुतांची प्रतिभा गुंग झाली असेल, सृष्टिसौंदर्याशीं समरस होतांना प्राप्तपरिस्थितीचा तिला क्षणभर विसर पडला असेल,–परंतु म्हणून कांहीं केशवसुतांची प्रतिभा महाराष्ट्राला परकी झाली नाहीं. विश्वप्रेमाचीं स्वप्नें पडत असतांनाच गरिबीनें गांजलेल्या, दास्यानें दडपलेल्या आणि निराशेनें निष्प्राण केलेल्या अभागी महाराष्ट्राचे करुणारव कानीं पडल्यामुळें दचकलेल्या, द्रवलेल्या, दुःखित झालेल्या केशवसुतांच्या प्रतिभेनें 'तुतारी' फुंकिली! नवीन विचारांची छाया 'तुतारी' या कवनावर अतोनात पडली आहे; केशवसुतांचें अंतःकरण कोणत्या विचारांनीं निरंतर व्यापिलें होतें, केशवसुतांच्या अंतःकरणांत कोणत्या भावना उचंबळत होत्या याची साक्ष 'तुतारी' देते. 'झातारी,' 'झपूर्झा' असलीं कल्पनांचीं अगर तत्वांचीं जाळीं विणीत केशवसुत कदाकाळीं वातावरणांत विहरले असतील; पण त्या गीतांत,—तीं

कितीही उत्कृष्ट असोत, केशवसुतांनीं आपलें अंतःकरण ओतलें नव्हतें; देशाचें दैन्य पाहून रात्रंदिवस तडफडणाऱ्या केशवसुतांच्या अंतःकरणाची धडधड 'तुतारी-स्फूर्ती-' तच ऐकूं येते. केशवसुत आणि इतर आधुनिक कवि यांच्यांत जर कांहीं वैषम्य असेल तर तें हेंच आहे. स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांत विरून गेल्यावर समाजाच्या सामुदायिक सुखदुःखांचें स्मरण इतरांना सहसा राहिलें नाहीं. राव-बाजींच्या रंगेल राजवटींत इतर शाहिर इष्काचे पेले झोकण्यांत दंग असतां,

कोण करिल प्रतिपाळ, तूतें मुलखास लागली बती ।

ही चिंता ज्याप्रमाणें ती अंदाधुंदी पाहून प्रभाकरशाहिराच्या जिवाला जडली होती त्याचप्रमाणें इतर कवि शृंगाराचे किंवा भाषांतराचे खेळ खेळत असतां

जाऊं बघतें नांव लयाप्रत,
तशांत बनलां मऊ मेंढरें
अहह ! घेरिलें आहे तिमिरें

हा घोर केशवसुतांच्या जिवाला लागला होता. केशवसुतांचें मराठी भाषेवर प्रभुत्व नसेल, केशवसुतांची भाषा खडबडीत असेल, पण

फणसा अंगीं कांटे । आंत अमृताचे सांठे
—शेखमहंमद.

या जगाच्या अनुभवाप्रमाणें केशवसुतांची कविता अत्यंत रसाळ आहे. केशव-सुतांच्या वाणींत विलक्षण ओज होतें; आणि त्यांच्या वाणींतील या ओजस्वितेला राष्ट्रीय भावनांचें वर्णन करितांना अगदीं भरतें येत असे. अन्यायाची त्यांना चीड होती; पाश्चात्य विद्येच्या प्रभावानें महाराष्ट्रांत जें नवीन तेज अवतरलें होतें त्या तेजाची प्रभा 'तुतारी' या कवनावर पडली आहे.

नियमन मनुजासाठीं, मानव—
नसे नियमनासाठीं जाणा
प्रगतिस जरि तें हाणी टोणा—
झुगारुनि तें देउनि, वाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव !

अशी भाक त्यांनीं आपल्या स्वाभिमानशून्य देशबांधवांना घातली आहे.

प्राप्त काल हा विशाल भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरती नोंदा !

हा ऊर्जस्वल संदेश आजच्या निस्त्राण झालेल्या महाराष्ट्राला सांगण्याकरितांच त्यांनीं ' तुतारी ' फुंकिली. केशवसुत हे क्रांतिकारक कवि होते असें ह्मणावयाचें याच कारणाकरितां ! इतर कवींनीं जें केलें नाहीं, इतर कवींना जें करण्याची स्फूर्ति झाली नाहीं तें केशवसुतांनीं केलें. केशवसुत आणि इतर आधुनिक कवि यांच्यांत जें कांहीं अंतर आहे तें इथेंच आहे. इतरांनीं युगतेज ओळखलें नाहीं, परंतु केशवसुतांनीं युगतेज ओळखलें आणि तुतारीच्या सुराबरोबर त्याला पहिली ललकारणी दिली ! तुतारीची प्रत्येक ओळ वाचतांना अंतःकरण थरारतें आणि

गंगौघापरि भव्य केशवसुता ! सावेश वाणी तुझी

—रेंदाळकर.

हे स्तुतिगीत हृत्कुहरांत आपोआप घुमूं लागतें ! अध्यात्माकडून ऐहिकाकडे वळलेल्या महाराष्ट्रशारदेला तिथेंच स्थिर करून, ऐहिकांतच अध्यात्म दाखविण्याचें सामर्थ्य महाराष्ट्रांत फक्त केशवसुतांच्या प्रतिभेंत होतें. कृत्रिमतेचा गंज चढून स्थिरावलेल्या काव्यचक्राला कलाटणी देण्याचें कार्य केशवसुतांनीं केलें; आणि ह्मणूनच त्यांची तुलना विश्वाच्या भवितव्यांत क्रांति घडवून आणणाऱ्या अद्वितीय धूमकेतूशीं करावयाची ! मळलेल्या मार्गानें प्रवास करणाऱ्या पृथग्जनांचीं स्तुतिगीतें काळाच्या प्रचंड झंझावातांत नष्ट होतात; परंतु महाकवींच्या,—काव्यसृष्टीच्या भवितव्यांत क्रांति घडवून आणणाऱ्या धूमकेतूंच्या–यशस्तेजाची भरती प्रत्येक शतकाशतकाला अप्रतिहत वेगानें पुढें जात असते. महाकवींचे सांप्रदाय कोणीं निर्माण करावे लागत नाहींत; ते निर्माण होतात; ते स्वयंभू असतात. त्यांचें कार्य प्रगतीची दिशा दाखवावयाचें असतें. अनुसरणाकडे, सांप्रदायस्थापनेकडे लक्ष्य देण्याइतकें क्षुद्रत्व त्यांच्या वसुधैवकुटुंबक वृत्तींत संभवत नाहीं. केशवसुतांचा सांप्रदाय स्वयंभू आहे. केशवसुतांची कविता सदोष असेल, परंतु त्यांचें कार्य, त्यांनीं घडवून आणिलेली क्रांति निर्दोष निःश्रेयसाचा मार्ग दाखविणारी आहे.

केशवसुतांच्या कवितेचें अंतरंग जसें सुंदर आहे तसें बहिरंग सुंदर नाहीं. केशवसुतांनीं आधुनिक कवितेला जें नवें वळण लाविलें त्या नव्या वळणाला अनु-

रूप अशी सुंदर भाषा त्यांना अखेरपर्यंत लिहितां आली नाहीं. केशवसुतांची भाषा प्रथम संस्कृतप्रचुर असे. पुढें गांवढळ मराठी झाली व अखेर अखेर ते चांगली मराठी लिहूं लागले होते ! परंतु ही त्यांची चांगली मराठी सुद्धां सामान्य आहे. इंग्रजी कवितेवरच केशवसुतांचा व्यासंग फार असे. मराठीचा व्यासंग तुकारामापलीकडे गेलाच नाहीं ! इंग्रजी कवितांचीं पारायणें करून इंग्रजी विचार व कल्पना त्यांनीं अगदीं आपल्याशा करून टाकल्या होत्या. हे विचार व कल्पना यांचें आपलेंपण तादात्म्यानें आलें होतें. या तादात्म्याची छाया त्यांच्या कवितेवर फार पडली आहे. ते कविता करूं लागले कीं, ज्या गोड इंग्रजी कल्पना अगर विचार त्यांच्या अंतःकरणांत घोळत असत, त्या कल्पना अगर ते विचार त्यांच्या कवितेंत त्यांना अगदीं नकळत उतरत. केशवसुतांच्या कवितेंतील विचार व कल्पना यामुळें अगदीं नवीन परंतु परकी वाटतात. कल्पना व विचार यांचें हें परकेपण रूढ अगर सराईत भाषेच्या जिव्हाळ्यानें कमी करितां येतें. नित्याच्या वाचनांत येणाऱ्या शब्दांनीं गुंफिलेली जर एकादी नवीन रम्य कल्पना कवितेंत आढळली तर ती सहज आल्यासारखी वाटते; व तिचा परकीपणा न भासून तिची मोहनी मात्र मनावर कायम रहाते. नवीन कल्पना जुन्या शब्दांनीं गुंफिल्या ह्मणजे त्यांचें परकीपण जाऊन मनाला भुलविणारें नावीन्य तेवढेंच मागें उरतें. ही कला केशवसुतांना साधली नाहीं; आणि ही कला साधण्याइतकें भाषाप्रभुत्व त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळें ही कला साधणें त्यांना शक्यहि नव्हतें. कविता लिहितांना केशवसुत फार श्रम घेत असत. हातीं घेतलेल्या विषयाचें त्यांचें मनन कित्येकवेळां वर्षभरहि चालत असे ! विषयाचें व्यवस्थित मनन करून नंतरच ते कविता लिहावयाला प्रारंभ करीत असत; आणि लिहिल्यावरहि तिच्यावर पुनःपुन्हां सफाईचा हात फिरत असे. 'ह्मातारी' व 'तुतारी' या त्यांच्या उत्तम कवितांचा इतिहास असेंच सांगतो. या दोन्ही कवितांची भाषा चांगली आहे; त्यांतल्या त्यांत 'ह्मातारी' या कवितेची अधिक चांगली आहे. इतके श्रम घेऊनहि त्यांच्या कविता—उत्तम कविता—कर्णकटु कां रहाव्या? भाषाप्रभुत्व नव्हतें हेंच याला उत्तर; दुसरें उत्तरच नाहीं. केशवसुतांची कविता अद्यापिहि तितकी लोकप्रिय होत नाहीं, याचें कारण ही रांगडी भाषा व त्यामुळें वाटणारा कवितेचा परकीपणा. सामान्य साक्षर जनता शब्दांच्या शोभेला तेव्हांच

भुलते; ती शोभा मुळींच नाहीं, व उलट कल्पनांचा परकीपणा मात्र हवा तितका. त्यामुळें केशवसुत आजपर्यंत कवींचे कवि राहिले आहेत व आणखीही कांहीं काळ ते लोकप्रिय होणार नाहींत असें वाटतें. त्यांच्या कांहीं थोड्या कवितांची भाषा फार चांगली आहे, परंतु सामान्यतः केशवसुतांचें मराठी भाषेवर प्रभुत्व नव्हतें असें ह्मणावयाला कांहीं हरकत नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां त्यांच्या रांगड्या भाषेला, त्यांनीं मुद्दाम नवीन बनविली असें ह्मणून, गोड करून घेण्याचें कांहींच कारण नाहीं. केशवसुत हे जरी प्रतिभासंपन्न कवि असले तरी त्यांची कृति ही मनुष्यकृतिच आहे; व मनुष्यकृतींत दोष असणें हें अत्यंत स्वाभाविक आहे. केशवसुतांच्या या दोषांवर पांघरूण घालून त्यांची आधींच सरस असलेली कृति कांहीं अधिक सरस होईल अशांतला बिलकूल भाग नाहीं, किंवा दोषाला दोष ह्मटल्यानें तिची रसवत्ता कमीहि होणार नाहीं.

आरंभीं आरंभीं केशवसुतांच्या कवितेंत भाषादोष भरपूर असत; आणि पुढेंहि ते अगदींच कमी झाले होते असें नाहीं. निव्वळ मराठी शब्द घेतले तरी लाडीगुडी, लकडी, दह्यांडी, मुदली, अंतुरी, वस्ताद, चाज हे शब्द शुद्ध गांवढळ आहेत. चाडी, हळाळतीं, कुसमुडी हे अपप्रयोगहि शुद्ध मराठी आहेत. शुद्ध मराठी घरगुती शब्दांचे दुरुपयोगाप्रमाणें सदुपयोगहि केशवसुतांनीं केले आहेत. करमूं, पुता, जिवा, किरकिऱ्या हे सदुपयोग शोभादायक आहेत. याशिवाय 'दोन बाजी' ही कविता या सदुपयोगांचें उत्तम उदाहरण आहे. 'यो' व 'धजल' असले मोरोपंती व रामजोशी-थाटाचे प्रयोगहि क्वचित् आढळतात. निव्वळ संस्कृतप्रचुर कविता सोडल्या तरी इतर कवितांतहि भुवि, प्लुति, तिरमा, दाढर्यविशिष्ट, चोदक, स्फीति असले कठिण संस्कृत शब्द सांपडतात; शिवाय क्लिष्ट, उद्धर, कौरूप्य, हतवेला असे चमत्कारिक उपयोगहि आहेत. मोरोपंतां प्रमाणें संस्कृत वाक्यें घुमवडण्याची हौसहि 'सृष्टि, तत्व आणि दिव्यदृष्टि' व 'फुकट दवडलेला तास' या दोन कवितांत कवीनें फेडून घेतली आहे. अनुप्रासादि शब्दचमत्कारांचें केशवसुतांना अगदीं वावडें होतें; अपवादादाखल

वाद्य वेडेंवांकुडें वाजवीन !

ही एकच नमुनेदार ओळ त्यांच्या काव्यग्रंथांत अनुप्रासाची अशी आढळते ! वृत्तविविधता हा एक त्यांच्या कवितेचा अनुकरणीय विशेष आहे. विषयाला

अनुरूप वृत्त योजण्याकडे त्यांची फार प्रवृत्ति असे. ‘ भृंग ’ कवितेचें बागडतें वृत्त, ‘ म्हातारी ’ कवितेचें उडतें तुटक वृत्त हीं त्यांच्या योजकत्वाची साक्ष देतात. सद्वृत्ताप्रमाणें त्यांची कविता कांहीं ठिकाणीं दुर्वृत्तहि आहे. ‘ पुष्पाप्रत ’ ही स्रग्विणी वृत्तांतील कविता त्या वृत्तांत शोभत नाहीं. त्याचप्रमाणें ‘ फुलांतले गुण, ’ ‘ मूर्तिभंजन ’ या कवितांचीं वृत्तेंही चांगलीं नाहींत. ‘ फिर्याद ’ या कवितेचें वृत्त सदोष असून पुन्हां वाईटहि आहे. केशवसुतांची भाषा बहुधा विषयाला अनुरूप असते. ‘ भृंग ’ व ‘ पुष्पाप्रत ’ या गाण्यांची मधुर भाषा, ‘ दोन बाजी ’ व ‘ मयूरासन आणि ताजमहाल ’ यांची जोरदार भाषा—या सर्व कविता त्यांच्या समर्पक भाषापद्धतीची साक्ष पटवितात. परंतु अयोग्य भाषापद्धतिहि कित्येक ठिकाणीं आहे. ‘ तुतारी ’ या कवनांतील जाज्वल्य देशाभिमानावर विश्वप्रेमाचा उतारा देणारें ‘ नवा शिपाई ’ हें गीत कवितेच्यापेक्षां गद्याच्या सदरांतच अधिक चांगलें दिसेल. वृत्ताच्या बाबतींत अभिरुचिभेदाला जागा असते, पण भाषापद्धतीच्या बाबतींत अभिरुचिभेद क्वचितच संभवेल. ‘ कविता आणि कवि, ’ ‘ पटवर्धन यांस, ’ ‘ पंतोजीस ’ या कविता ह्मणजे शुद्ध छंदोबद्ध गद्य आहे. या वृत्तबद्ध गद्यांत कर्णकटुत्वाचीही कित्येक ठिकाणीं भर पडली आहे.

“ डोक्याच्या भ्रमणामुळें बिघडुनी विक्षिप्त तीं जाहलीं ”
“ आलेख्यीं लिहिण्या मला गवसला उत्कृष्ट हा मासला ”
“ ज्या मत्क्लप्ति तुझ्याविशीं चघळितों त्या स्वांघ्रि जैशीं मुलें ”

हीं वेंचक उदाहरणें वरील विधानांची सत्यता पटवितील. केशवसुतांच्या काव्यरचनेला प्रारंभ भाषान्तरानें झाला व पुढेंहि त्यांनीं कांहीं भाषांतरें केलीं. ‘ ग्रुवड ’ हें त्यांचें भाषांतर सर्वोत्तम असून मूळ कृतीइतकेंच सरस वठलें आहे. ‘ मदन आणि मदनिका ’ ‘ तिने जातां चुंबिलें ’ हीं भाषान्तरें बरीं आहेत. ‘ ईश्वराचा अंत्र ’ हें भाषांतर वाईट आहे शेक्सपीअरच्या चतुर्दशकांचीं त्यांनीं केलेलीं सर्वच भाषांतरें भिकार आहेत. ‘ काल आणि प्रियेचें सौंदर्य ’ हें त्यांचें भाषांतर स्वतंत्रांत गणिलें गेलें आहे ! परंतु शेक्शपीअरच्या

“ Since brass, nor stone, nor earth, nor boundless sea ”

या अत्यंत सरस चतुर्दशकाचें तें अत्यंत नीरस भाषांतर आहे. भाषांतरापेक्षां इंग्रजींतून त्यांनीं केलेलें वृत्तांतर अधिक निर्दोष आहे. इंग्रजींतील चतुर्दशकाच्या

( sonnet ) धर्तीवर मराठींत त्यांनीं चतुर्दशक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ' शार्दूलविक्रीडित ' हें जुनें वृत्तच त्यांनीं या कामीं उपयोजिलें आहे. गंभीर, उदास किंवा आवेशपर मनोवृत्तींना हें वृत्त अगदीं उत्कृष्ट वाहन आहे. कल्पनांचे व विचारांचे आरोह आणि अवरोहही या वृत्तांत उत्तम रीतीनें दाखवितां येतात. अर्थातच केशवसुतांची ही निवड यशस्वी झाली. ' आह्मी कोण ' व ' प्रतिभा ' या दोन उत्तम कविता या त्यांच्या यशस्वितेची साक्ष पटवितात. केशवसुतांच्या निर्यमक ह्मणून समजल्या जाणाऱ्या कविता म्हणजे हीं त्यांचीं चतुर्दशकें होत. वस्तुतः हीं चतुर्दशकें निर्यमक नाहींतच; हीं आलटून पालटून सयमक आहेत. ' कोठें जातोस ? ' या कवितेंतील तिसरी दिंडीहि अशीच सयमक आहे. केशवसुतांनीं अर्थातच निर्यमक कविता लिहिलेली नाहीं. हें बहिरंगपरीक्षण झालें. केवळ कर्तव्य म्हणून हें बहिरंगपरीक्षण अगदीं न्यायनिष्ठुर मनानें केलें आहे. परंतु केशवसुतांच्या कवितेचें महत्त्व या बहिरंगावर नाहीं; तें तिच्या आंतर आस्वादावरच आहे. आणि ह्मणूनच बहिरंग इतकें खडबडीत असतांहि

मृत्कुंभसंभृत जरी असलें, असेना!
पीयूष! यास मज दोष मुळीं दिसेना.

—चंद्रशेखर.

अशा भावनेनें त्या क्रांतिकारक महाकवीचा हा प्रसाद आनंदानें व आदरानें ग्रहण करून त्याला धन्यवाद द्यावयाचे! केशवसुतांच्या कवितेचें बहिरंगपरीक्षण येथें पूर्ण झालें; आतां त्यांच्या उत्कृष्ट कवितांच्या आंतर आस्वादाचा लाभ घ्यावयाचा.

केशवसुतांच्या उर्वरित उत्कृष्ट कवितांचें विवेचन केलें ह्मणजे त्यांच्या कवितेच्या अंतरंगाचें पूर्ण दर्शन होईल. अत्यंत क्षुद्र वस्तूंत अंतर्हित असलेलें शाश्वत सौंदर्य पहाण्याचें सामर्थ्य केशवसुतांच्या प्रतिभेंत होतें. नित्याच्या सरावानें सामान्य दृष्टाला जें नसतें झालें त्या नसत्यांतून नवीन तत्वसृष्टि ते उभी करीत असत अजाण अर्भकांच्या पायदळीं नाहींशी होणारी रांगोळी;–पण केशवसुतांच्या अंतर्भेदी दृष्टीला त्या रांगोळींत अंतर्हित असलेलें अविनाशी तत्व दिसलें आणि ते तत्व त्यांनीं कवितेंत गुंफून अमर केलें! सामान्य दृष्टीला दिव्य दिसणाऱ्या दिवसाचें दुःखद स्वरूप, ' दिवस आणि रात्र ' या हृदयंगम कवनांत

त्यांनीं उत्तम रीतीनें दाखविलें आहे. केशवसुतांच्या प्रतिभेला अदृश्य, अगम्य अवाच्य असें कांहींच नव्हतें! महाराष्ट्रांतील मुलांच्या नित्य परिचयाच्या म्हातारीशीं तद्रूप होऊन केशवसुतांनीं एकदां गोड गाणें गाइलें. 'म्हातारी' आणि 'हरपलें श्रेय' या त्यांच्या दोन कविता

मज वय विसरूं दे—मग्ध मधुबाल्यीं उतरूं दे!

या एकाच विचारसूत्रांत अनुस्यूत झाल्या आहेत. मुलीला घेऊन दारांत उभें असतां हवेंतून तरंगणारी ही म्हातारी कवीच्या दृष्टीस पडली. म्हातारीला पाहतांच मुलीचें मन लोभावलें आणि तिला धरण्याकरितां मुलीनें आपले चिमुकले हात पुढें केले. त्या हातवाऱ्याबरोबर म्हातारी अधिकच दूर गेली. हें चित्र पहात असतां मुलीचें खिदळणें ऐकून दचकलेलें कवीचें सूक्ष्म मन जागें झालें, आणि

दडपण संसृतिचें—निघालें मम चित्तावरचें

अशी स्थिति होऊन कवि त्या वाऱ्यावर तरंगणाऱ्या म्हातारीशीं बोलूं लागला. आपली वयस्कता पाहून तर ही म्हातारी परत फिरत नाहींना, अशी शंका मनांत येऊन कवीनें तिला, आपल्या मुलीकरितां तरी-तिच्या मधुर शैशवाकडे पाहून तरी परत ये अशी विनंती केली आहे. आणि बाल-भावाला भुलणारी ती म्हातारी आपली वयस्कता बघून परत फिरली, या भाव-नेनें उद्विग्न झालेला कवि म्हातारीला म्हणाला—

मज वय विसरूं दे—मुग्ध मधुबाल्यीं उतरूं दे।
ते दिन पुष्पांचे—कोंवळ्या किरणीं खेळाचे
हे दिन चिंतांचे— परंतू लटिकें हंसण्याचे!
हे दिन ...... जाऊं दे— मला तुज गाणें गाऊं दे!

असें म्हणून कवीनें म्हातारीच्या स्थितीविषयीं मधुर कल्पना करीत तद्रूपतेनें हे गोड गाणें गाइलें आहे. गाणें गातां गातां अखेर कवि म्हणतो, तुझें ज्ञान जर होईल, तूं कोण आहेस हें जर मला कळेल,

..............तर जगीं भरला जो दिसतो
मी तो अंधार—लोपवूं झटेन साचार!

तुझ्या ठिकाणीं असलेल्या चित्तत्त्वाचें ज्ञान जर जगताला झालें तर लहान मुला-प्रमाणें वेडें होऊन जग तुझ्यामागें लागेल. तुझें स्वरूप, तुझें आस्तित्व अगम्य,

अज्ञात आहे; परंतु तुझ्या ठिकाणीं जें अद्भुत वसत आहे तें, कवि म्हणतो

प्रत्यक्षांतुनि तें—परोक्षीं शीघ्र मला नेतें;

आणि तेथें गेल्यावर ज्या दिव्य अननुभूत आनंदाचा लाभ मला होतो त्या आनंदानें वेडावून जाऊन माझी प्रतिभा गाऊं लागते! या गाण्यांत केशवसुतांची कल्पनासृष्टि पूर्णत्वानें अवतरली आहे. उत्तम कवितेचा उद्भव कसा होतो, कोणत्या स्थितींत होतो, याचें अत्यंत मार्मिक उत्तर या कवितेच्या शेवटच्या चार ओळींत केशवसुतांनीं दिलें आहे. या गाण्यांत दिसून येणारी, अतींद्रिय आनंदाच्या प्राप्तीकारितां कवीच्या मनाला लागलेली हुरहुर 'हरपलें श्रेय' या हृदयद्रावक गीतांत उत्कटत्वानें व्यक्त झाली आहे. अतींद्रिय आनंदाकरितां आसावलेल्या अंतःकरणाला ऐहिक सुखांत तथ्य वाटत नाहीं; लहानपणीं लग्न होऊन माहेराला मुकलेल्या मुलीसारखी त्याची स्थिति होते आणि तें तळमळूं लागतें. बाळपणीं जो आनंद अनुभविला तो प्रपंचाच्या प्रखरतेनें नष्ट झाला; आणि आतां

चुकचुकल्यापरि
वाटे अंतरिं
होउनि वावरि

कविप्रतिभा, कवीचें अंतःकरण त्या निजश्रेयाच्या शोधाला लागलें आहे. संसाराची क्षणभंगुरता ओळखून अंतर्मुख होण्याऐवजीं संसारांत रमलेल्या या बहिर्मुख बुद्धीला होऊन गेलेल्या हानीबद्दल आतां खेद वाटून उपयोग काय? जो सौदा तूं आपण होऊन केला त्यांत खोट लागल्यास दोष कोणाचा? परंतु हा 'हतविनिमय' आपण होऊनच केला असला,

दिलें हिरण्मय
हातीं मृण्मय

अशी फसगत जरी आपणच आपली करून घेतली असली, तरी त्या फसगतीबद्दल मनाला खरखरा हा लागतोच, हळहळ ही वाटतेच! मनाला अशी रुखरुख लागून विरक्त झालेलें मन सर्व सांसारिक उपाधींना दूर सारून, संसाराची दयमय करून अत्यंत क्षुद्र वस्तूंत सुद्धां—झरोक्यांतून पडलेल्या सूर्यकिरणांत सुद्धां त्या निजश्रेयाचा शोध करूं लागतें!

मज माझें लाभेल कसें?

ही एकच असोशी मनाला निरंतर लागून रहाते. त्या हरपल्या श्रेयाची साक्ष—त्या अलौकिक आनंदाचा ओझरता अनुभव विजनवासांत, सृष्टिसौंदर्याच्या सहवासांत उत्कंठित मनाला येतो; परंतु हें सुखहि,

स्वभाव दाउनि
परि तें झटदिनि
जाई लोपुनि !

याप्रमाणें वेड लावून नाहींसें होतें. कविमनाला लागलेलें हें विचित्र वेड पाहून जडबुद्धि जग त्याचा उपहास करूं लागतें; परंतु,

जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे ?

ही जाणीव जागृत असल्यामुळें तें वेड कायमच रहातें, आणि

एक शब्द बोलेन जरी
सकलां कुंठित करिन तरी

असा आत्मविश्वास असतांना सुद्धां बेपर्वा झालेलें मन आपलें मौन सोडीत नाहीं. पुण्यश्लोक पतिव्रता प्रेमळ प्रियकराच्या शाश्वत सहवासाकरितां सर्वस्वहानि स्वीकारुन सरणावर चढतात; पतंग दीपशिखेच्या दिव्य तेजाला लोलुप होऊन आत्मयज्ञ करितो. अशा तऱ्हेचें दिव्य करावयालाहि मन तयार आहे; परंतु त्या दिव्यानें तरि त्याचा लाभ होईल का ? त्रिखंड हिंडून झालें तरी

न परि हरपलें तें गवसे
म्हणुनि जीव पाखडीतसे !

ही स्थिति कायमच आहे, 'हरपलें श्रेय' तें हरपलेंच ! या गीताची रचना व भाषा नीटस नसून शिवाय वृत्तदोषहि आहेत. परंतु या गीतांतील कविमनाच्या उत्कटतेचें वर्णन केवळ अनुपमरम्य आहे. या गीतांत भरलेल्या निराशेची किंचित् अस्पष्ट छाया 'कोणीकडून कोणीकडे' या कवनावर पडली आहे. भारतीय युद्धाच्या वेळीं सगेसोयरे रणांगणावर जमलेले पाहून विषण्ण झालेल्या अर्जुनाचें समाधान करण्याकरितां

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ?

असा कोटिक्रम भगवंतांनीं लढविला आहे. परंतु असल्या कोटिक्रमानें कांहीं सुसंस्कृत मनाची रुखरुख रहात नाहीं. मनुष्य इकडून आला आणि तिकडे जावयाचा,

तिमिरामधेंच—तिमिरामधून

असल्या प्राकृत बोलांनीं कांहीं विचारी मनाचें समाधान होत नाहीं. ज्या प्रदेशांतून आलों तो प्रदेश अज्ञात व ज्या प्रदेशांत अखेर जावयाचें तोहि अज्ञात; या दोन्ही दिशांना अज्ञाताचें तिमिर दाटलें असतां

घडीभर पडे मधेंच ऊन

असलें हें सांप्रतचें दुःखमय जिणें. घडिभर पडणाऱ्या या आयुष्याच्या चंचल उन्हांतसुद्धां सांसारिक आपत्तींचीं अभ्रें; असलें हें चमत्कारिक दृश्य बघून निराशेनें काळीज फाटून जातें. परंतु ही निराशाहि टिकत नाहीं. सांप्रत आपण आहों ही जाणीव कायम असल्यामुळें

संशयडोहीं नौका फसे

याप्रमाणें मन संशयाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात रहातें. अशा रीतानें अज्ञानाच्या अंधारांत चांचपडणाऱ्या या यत्नशील मनाला, वारंवार विचारणा करीत असतां

ह्या भ्रमबुद्‌बुद जातो फुटून

व भ्रमनिरास झाल्यामुळें दिव्यदृष्टि लाधते, आणि

शून्य ह्मणूं जें मागें पुढं
त्यांतुनि दीप्ती दृष्टि पडे

याप्रमाणें जें आतांपर्यंत शून्य होतें, अंधारमय होतें, तेंच आतां दिव्य प्रकाशमय, आनंदमय दिसूं लागतें. या आत्मानुभवानें मनाची तळमळ नष्ट होऊन त्याला ऋणें—देव, पितर, ऋषि आणि राष्ट्र यांचीं ऋणें फेडून पुन्हां ज्या धामाहून आलें त्या धामाकडे—निजधामाकडे—स्वधामाकडे जावयाला उत्साह येतो. ‘ झपूर्झा ’ हें गाणेंहि या गाण्याप्रमाणेंच तात्त्विक विचारांनीं भरलेलें आहे. ‘ झपूर्झा ’ हा शब्द केशवसुतांनीं मुद्दाम नवीन बनविलेला आहे. मुली फेर धरितांना ‘ झिम् पोरी-झिम् ’ असें अर्थशून्य कडवें एकसारखें ह्मणत असतात. तें म्हणत असतां फेर ऐन रंगांत येऊन देहभान हरपलेल्या मुली त्या कडव्याचा जो अपभ्रष्ट व अस्पष्ट उच्चार त्या तन्मयतेंत घाईघाईनें करितात, त्या अस्पष्ट व अपभ्रष्ट उच्चारावरून

केशवसुतांनीं हा शब्द बनविला असावा असें वाटतें. अर्थातच हा शब्द मनाची देहभानविरहित स्थिति, गुंगी, तन्मयता, एकतानता दर्शवितो. अशा तऱ्हेची एकतान वृत्ति ज्या महात्म्याची झाली आहे, त्याच्या मनःस्थितीचें निरुपम मनोहर वर्णन या गाण्यांत केलें आहे. कंटकांचीं शल्यें आणि मखमालीची लव हीं ज्याला सारखेंच सुख देतात; प्रकाश आणि तिमिर हे ज्याच्या दृष्टीला सारखेच भासतात; हर्ष आणि खेद या द्वंद्वांपलीकडे ज्याचें मन गेलें आहे त्या स्थितप्रज्ञाच्या द्वंद्वातीत स्थितीला कोणतें नांव द्यावयाचें? कवि ह्मणतो—

झपूर्झा, गडे झपूर्झा !

हेंच नांव त्या स्थितीचें ! हर्ष-शोक हे ज्यांना जडलेले आहेत त्या प्रापंचिकांना काय विशेष कळतें ह्मणून त्यांनीं या निर्विकार विभूतींना-या 'जडभरतांना'-हंसावें आणि त्यांच्या बाहेरून जड दिसणाऱ्या अवस्थेचा उपहास करावा? सविकार व सांसारिक जग ज्यांना वेड्यांत काढितें ते हे वेडे काय ह्मणतात?-

व्यर्थीं अधिकचि अर्थ वसे
तो त्यांस दिसे
ज्यां ह्मणति पिसे!

तुह्मां सांसारिकांना जें नसतें झालें, जें व्यर्थ झालें, त्या व्यर्थांतहि अर्थ पाहण्याचें सामर्थ्य या वेड्यांच्या वृत्तींत आहे. तो अर्थ कसा आहे? कवि ह्मणतो

झपूर्झा, गडे झपूर्झा !

एकतान झाल्याशिवाय, त्याच्या एकतानवृत्तीशीं एकरूप झाल्याशिवाय त्या अर्थाचें स्वरूप कळणें अशक्य! मनुष्याच्या दुबळ्या कल्पनेनें जें ज्ञात ह्मटलें, जें दृष्ट ह्मटलें त्या दृष्ट-ज्ञातांच्या आकुंचित सीमा उल्लंघून, अज्ञात आणि अदृष्ट अशा अपरविश्वांत भराऱ्या मारणाऱ्या या 'चिद्गगनचपलेला'-या चैतन्यघनमालेंत उद्भूत झालेल्या चंचल चपलेला त्या अज्ञात प्रदेशांत घुमणारीं जीं अप्सरोगीतें ऐकूं येतात त्या गीतांचेच, त्या उदात्त अवस्थेंतील अनुभवांचेच, हे अस्पष्ट पडसाद आहेत! त्या अज्ञात विश्वांत अक्षुण्ण असे अनंत प्रदेश आहेत; पण तेथें जाणार कोण?

सनदी तेथें कोण वदा?-
हजारांतुनी एकादा!

याचा अर्थ असा नव्हे कीं तेथें जावयाला कोणाला अटकाव आहे. तेथें जाऊन

दिव्य वस्तु आणावयाला- 'वनमाला' आणावयाला कोणालाहि अटक नाहीं.

मात्र गात हा मंत्र चला-
झपूर्झा, गडे झपूर्झा !

हा झपूर्झाचा मंत्र गात चला, ही नितांत एकतानता प्राप्त करून घ्या ! पुरुषाशीं प्रकृति निरंतर क्रीडा करीत आहे: पुरुष,-चैतन्य,-या विश्वाचा अदृश्य आत्मा; प्रकृति,-जड,-या विश्वाची दृश्य कुडी. या प्रकृति-पुरुषांचा संगम म्हणजेच हें दृश्य विश्व होय. अमूर्त अर्थ हा कवितेंत ज्याप्रमाणें शब्दमालेनें मूर्त होतो त्याप्रमाणें पुरुष हा प्रकृतीनें मूर्त होतो. अर्थ ज्याप्रमाणें शब्दमालेला सदैव बिलगून असतो त्याप्रमाणें पुरुष प्रकृतीला बिलगून असतो. पुरुषप्रकृतीच्या त्या क्रीडेचा ध्वनि-स्वरसंगम ओळखणें, तिचें रहस्य जाणणें हा ज्ञानाचा हेतु;

........तयाची सुंदरता
• व्हाया चित्ता—
प्रत ती ज्ञाता
वाडेंकोडें गा आतां—
झपूर्झा गडे झपूर्झा !

त्या रहस्याचें अंतःसौंदर्य जर जाणणें असेल तर एकतान होणें हाच एक उपाय आहे ! अक्षयतेच्या सदाफुलीवरली फुलें तोडीत, नक्षत्रांना निस्तेज करीत सूर्य, चंद्र आणि ग्रहमाला जेथें नर्तन करीत आहेत तेथें जाण्याची जर इच्छा असेल तर

धरा जरा निःसंगपणा
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा—
झपूर्झा गडे झपूर्झा !

या कवीच्या अनुभविक उपदेशाप्रमाणें निःसंग होऊन, जगाची भीडमुरवत सोडून एकतान व्हा ! 'तुतारी' हें कवन म्हणजे केशवसुतांच्या हृदयांतील संवेदनांचा अत्यंत उत्कट उद्रेक, आणि 'झपूर्झा' हें गाणें म्हणजे केशवसुतांच्या कल्पनाशक्तीचें अत्यंत उच्छृंखल उड्डाण. आधुनिक महाराष्ट्रकाव्यरत्नाकरांतली हीं दोन दिव्य रत्नें आहेत. 'झपूर्झा' या गीताची रचना मुलींच्या फेराच्या धर्तीवर

थांवत्या गिरगिरत्या वृत्तांत केली आहे; वृत्ताच्या या गिरगिरतेपणाचा प्रत्यय शेवटचें कडवें वाचतांना फारच येतो. 'झपूर्झा' ची भाषाही मधुर आहे. फक्त वृत्ताच्या दृष्टीनें तिसरें कडवें सदोष आहे. 'वातचक्र' या गीतावराहि सात्विक विचारांची उदास छाया पडली आहे. बरसातीचे दिवस जाऊन हिंवाळाही हळुहळू संपत आला होता. अशा सुमाराला मेघराज इंद्राच्या आज्ञेनें चतुर्मास आकाशांतून मेघांना वाहून नेणारे वारे—मरुद्गण आतां कार्यमुक्त झाले होते. आणि

म्हणुनि मरुद्गण खेळांत
मग्न होउनि चक्रावरती

आरोहण करून मौजेनें

........सांप्रत हे जाती
गरगर भरभर एका निमिषामध्यें गगनांत!

मरुद्गणांचा हा मजेचा खेळ चालला असतां, त्यांच्या त्या चक्रांत मिसळून धूळ, पक्ष्यांचे पर, पाचोळा हें सर्व क्षुद्र वस्तुजात वरती उड्डाण घेत होतें; आणि ह्यामुळें

सृष्टीचा हा असा भोंवरा

गरगर फिरत झपाट्यानें गगनाला भिडत आहे असें भासत होतें. असें हें विचित्र दृश्य पहातां पहातां तन्मय झालेला कवि वाग्देवीला म्हणतो आहे

वाग्देवी गे! दे शब्दांतें
भोंवऱ्यांत या फेंकुनि, त्यांतें
जरा जाउं दे निजधामातें

असे ते या भोंवऱ्यांतून चढत चढत निजधामाला गेले म्हणजे त्या शब्दांवर चढलेलीं पार्थिवतेचीं पुटें गळून पडून, पापी मनुष्यांच्या संसर्गानें सामर्थ्यहीन, निर्जीव झालेले ते शब्द सजीव व सचेतन होऊन परत पृथ्वीवर येतील. आणि ते शब्द,—ज्यांच्या साहाय्यानें मी माझ्या अंतःकरणांतला अमूर्त अर्थ मूर्त करितों ते शब्द गेल्यावर मग मीहि कशाला इथें राहूं? या जगद्वृक्षाचें मी अगदीं पिकलें पान आहें; मला त्रिविधतापतप्ताला सच्चिदानंदांत लीन होण्याकरितां

तर भरभर उडूं द्या मज शब्दांसंगें स्वर्गांत!

हें गीत वाचीत असतां आपण जणुं कांहीं वावटळच पहात आहों असें वाटतें. इतकी याची रचना विषयाला अनुरूप आहे. केशवसुतांची ही अगदीं अखेर-

अखेरची कविता असावी असें शेवटच्या उद्गारांवरून वाटतें. काव्यमय आयुष्याच्या आरंभीं ते सश्रद्ध होते असें 'सूर्यास' ही कविता वाचून कळतें. मध्यंतरीं त्यांची श्रद्धा डळमळली होती; परंतु पुन्हा अखेर अखेर त्यांची श्रद्धा बळावून त्यांना साक्षात्काराचा ध्यास लागला असावा असें 'वातचक्र,' 'कोणीकडून कोणीकडे' व विशेषतः 'हरपलें श्रेय' या तीन गाण्यांवरून वाटतें. आणि ह्याच ध्यास वाढत जाऊन कदाचित् शेवटीं

तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळां। वृत्ति या चंचळा स्थिरावल्या ॥

अशी त्यांच्या मनाची स्थिति झाली असेल. 'सतारीचे बोल' हें गाणें एका विशिष्ट प्रसंगींच्या मनःस्थितीवर आहे. एके प्रसंगीं कांहीं कारणानें कवि अगदीं उद्वेगला होता. मनाच्या अशा अतिशय त्रस्त स्थितींत तो रस्त्यानें जात असतां त्याच्या कानावर एका खिडकींतून सतारीचा सूर पडला; तो मधुर नाद कानावर पडतांच कवीला अत्यंत चीड आली. त्या वेळीं सोंसाट्याचें वादळ सुटतें किंवा भुतें भोंवतीं येऊन नाचतीं तरी तें त्याला पत्करतें;

कारण आंतील विषण्ण वृत्ती
बाह्य भैरवीं धरिते प्रीती.

परंतु तसें न होतां ही आनंदाची वीणावाणी कानांवर पडली. सतारीच्या बदलत्या गतीबरोबर कवीची वृत्ति कसकशी बदलत गेली याचें सुंदर शब्दचित्र येथून पुढें रेखाटलें आहे. अगदीं शेवटीं शेवटीं त्या सतारींतून प्रेमरसाचे हृदयंगम सूर निघूं लागले. ते सूर कानांवर येतांच उद्वेगाच्या भरांत जगाला विटलेल्या कवीला सर्व विश्व सुखमय दिसूं लागलें आणि

स्वर्ग धरेला चुंबायाला
खालीं लवला—मजला गमला!

असा स्वर्भूसंगमाचा साक्षात्कार त्याला झाला! अशा रीतीनें त्याचें निराश मन आनंदमय झालें असतां त्या सतारींतून शांत गती वाजूं लागली आणि सर्व विश्व शांत रसांत विरून गेलें असें कवीला वाटलें. मनाच्या अशा शांत व आनंदमय स्थितींतच कवि घरीं गेल्यावर त्याला निद्रा लागली. त्या निद्रेंतसुद्धां, कवि ह्मणतो

बोल बोललों परी कितिकदां
स्वप्नीं—दिड दा, दिड दा, दिड दा!

रसिक मनुष्याच्या खिन्न मनावर मधुर गायनाचा किंवा वादनाचा परिणाम किती उत्तम होतो याचें अगदीं सूक्ष्म वर्णन कवीनें या कवितेंत केलें आहे. अतिशय मधुर गीतनादांतलें हें विलक्षण सामर्थ्य जाणूनच समर्थांनीं

धन्य ते गायनी कळा !

असे अत्यंत मार्मिक धन्योद्गार काढून तिचें महिमान गाइलें आहे. केशवसुतांना या सामर्थ्याचा अनुभव येऊन त्यांनीं हे 'सतारीचे बोल' महाराष्ट्राला ऐकविले आहेत. या गीताची भाषा व रचना दोन्ही चांगलीं आहेत. या कवितेप्रमाणें 'नैर्ऋत्येकडील वारा' या कवितेमध्येंहि कवीनें त्या वातलहरींच्या स्पर्शाबरोबर आपल्या अंतःसृष्टींत उद्भूत झालेल्या तरंगततीचें निरतिशय रम्य वर्णन केलें आहे. स्वजनांची ताटातूट हा केशवसुतांचा आवडता कवित्वविषय होता असें वाटतें. महाराष्ट्रांतील इतर आधुनिक कवींना बहुधा फक्त प्रियाविरहच जाणवला व जाणवतो असें त्यांच्या कवितेवरून दिसतें ! शृंगार हा मनुष्याला अत्यंत सहज आहे व तरुणवयांत मनुष्य क्वचितच तरुणीरक्त नसतो ! परंतु कवि हा सामान्य मनुष्यांहून श्रेष्ठ व उदात्त मनोवृत्तींचा असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं ही एकदृष्टीनें पाशवी मानलेली वासना असूं नये, निदान मर्यादेबाहेर तरी असूं नये असें सहजच वाटतें. परंतु संस्कृत कवींप्रमाणें आधुनिक मराठी कवींच्या बाबतींतहि हें वाटणें निखालस खोटें ठरतें ! आधुनिक कवींत केशवसुतांना मात्र प्रियाविरह आणि मित्रविरह किंवा इतर स्वजनांचा विरह सारखाच जाणवत असे. इतर आधुनिक कवि व केशवसुत यांच्या मनोवृत्तींमधला हा एक फार महत्त्वाचा भेद आहे. तारुण्याच्या अगदीं ऐन भरांतसुद्धां, पत्नीविरहानें व्याकुळ होऊन त्यांनीं ज्याप्रमाणें

अहा ! अंकीं माझे तुज बघतसें मी वसलिस,
शिरा स्कंधीं माझे लववुनि गडे तूं पडलिस,

अशा गोड आठवणी गाइल्या आहेत त्याचप्रमाणें मित्रविरहानें व्यथित होऊनहि

देशाविषयीं गोष्टी बोलत येथें
बसलों विसरुनि कितीकदां निद्रेतें;
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां,
अश्रूमध्यें अश्रु गळाले तेव्हां !

असे प्रेमळ उद्गार काढिले आहेत. ते स्वजनांचा हा वियोगकाल, त्यांच्या घडि-घडी आठवणी काढून कंठीत असत, असें ' घराकडील गोष्टी ' या कवितेवरून स्पष्ट दिसतें.

पाशांविण या कोठें कांहीं नाहीं,
पाशांकरितां चाले अवघें कांहीं;—
पाशांतुनि या सुटतां सुंदर तारे,
तेज तयांचें विझूनि जाई सारें.

अशी केशवसुतांची श्रद्धा असल्यामुळें विद्यार्जनाकरितां अगर वित्तार्जनाकरितां स्वजनांना सोडणें त्यांना अगदीं प्राणसंकट वाटत असे. अर्थातच हें संकट प्रिय-स्मृतींनीं शक्य तितकें सुखावह करण्याचा प्रयत्न ते करीत. ' नैर्ऋत्येकडील वारा ' ही कविता अशीच अत्यंत हृदयद्रावक स्मृतींनीं भरलेली आहे. ' घराकडील गोष्टी ' या कवितेंत त्यांनीं आपल्या मित्राला पडवीपासून माजघरापर्यंत अगदीं प्रत्येक दृश्य दाखवीत नेला आहे. त्या कवितेंतील तें वर्णन जसें अगदीं क्रमवार, सुसंगत व सूक्ष्म आहे तसेंच तें या कवितेंतीलहि आहे. या कवितेंत कविकल्पनेनें गांवाशेजारील डोंगरापासून घरापर्यंत प्रवास केला आहे. कवीच्या त्या वेळच्या बसण्याच्या ठिकाणापासून तों त्याच्या जन्मग्रामापर्यंत तिला वाटेंत जें जें दिसलें तें तें सर्व तिनें या कवितेंत चितारलें आहे. नैर्ऋत्येकडून वहात आलेला तो वारा,—आपल्या स्पर्शानें पुलकित होऊन तन्मय झालेल्या कवीच्या अर्धोन्मीलित नेत्रांपुढें त्याला अतिशय प्रिय असलेलीं दृश्यें—त्या दृश्यांचे चलच्चित्रपट आणीत होता. अत्यंत प्रियतम अशा जन्मभूमीवरून वहात आलेल्या त्या मरुद्गणांनीं त्याच्या त्या अर्धवट मिटलेल्या डोळ्यांपुढें ते गगनचुंबी उत्तुंग पर्वत, त्या धों धों वहाणाऱ्या नद्या आणि गिरिगव्हरांतून नाचणारे निर्झर, पराक्रमी पूर्वजांच्या पुण्यप्रतापांचा प्रत्यय पटविणारे व पूर्ववैभवाचें स्मरण देणारे ते पडके किल्ले—हें सगळें हृदयस्पर्शी दृश्य एका क्षणांत उभें केलें. तें दृश्य पाहून, ते पडके किल्ले पाहून कवीला असा भास झाला कीं, सांप्रतच्या दुरवस्थेनें दडपलेल्या त्या दुर्गदेवता त्वेषानें आपल्याला म्हणत आहेत—

कोठें पूर्वज धीर वीर तव ! तूं कोणीकडे पामरा !
ये येथें ! इतिहासपत्र पडकें वाचून पाहीं जरा !

अशा रीतीनें क्षणभरच टिकून हें दृश्य त्याच्या दृष्टीपुढून नाहींसें झालें. नंतर

कवीच्या अंतश्चक्षूंपुढें त्याच्या जन्मग्रामाचें चित्र उभें राहिलें आणि मातापितरांचे आशीर्वाद त्या वाऱ्यावरून तरंगत येऊन कवीच्या कानांत गुणगुणूं लागले. त्याच्या दृष्टीपुढें तें मुग्ध मधुबाल्य उभें राहिलें व आजोळची आठवण होऊन त्याचें अंतःकरण दाटून आलें. हेंही चित्र नाहींसें होऊन त्या मरुद्गणांनीं आणिलेलीं विरही दयितेचीं, नितांतमधुर उष्ण निःश्वासांनीं लिहिलेलीं प्रेमपत्रें कवि वाचूं लागला. इतक्यांत त्याच्या दृष्टीपुढें त्या समुद्राचें रम्य तरंगतांडव दिसूं लागलें आणि व्याकुळ झालेला कवि—

प्रीती या जगतांत कंटकयुता ही एक वल्ली असे

असा निश्चय करून सागरिकांना-जलदेवतांना—मंजुमधुर गीतें गावयाला सांगत आहे. तीं गीतें ऐकून तरी त्याच्या विरहविषण्ण मनाला निद्रा येईल. ती निद्रा कशी ? कवि म्हणतो

निद्रा दीर्घ—जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल.

या कवितेची रचना ओवड धोवड आहे. परंतु अंतरंगाचें उत्कृष्टत्व बहिरंगाचें उणेपण भासूं देत नाहीं. केशवसुतांच्या जाज्वल्य देशभक्तीची छाया जशी या कवितेवर तशीच त्यांच्या ‘ निशाणाची प्रशंसा ’ या कवितेवरही पडली आहे. पटखंड—कापडाचा तुकडा, पण त्या तुकड्याकडे पाहून रणांगणावर झगडत असलेल्या वीरांना आवेश चढतो, उत्साह येतो; राष्ट्राच्या यशापयशाचें, राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें भवितव्य त्या निशाणाच्या फडफडण्याबरोबर हेलकावत असतें. वर्षाकालांत ज्यांच्या सौधशिखरावर श्रांत झालेले वारिवाह विश्रांति घेतात, त्या देवालयांवर, त्या प्रासादांवरहि निशाण निरंतर फडकत असतें. ‘ ज्या ज्या ठिकाणीं दिव्यत्व, ऐश्वर्य, भक्ति आणि पौरुष वसत असतें, त्या त्या ठिकाणीं ’ कवि म्हणतो, निशाणा ! तुझा वास आहे.

म्हणूनि मानवचित्ताची उंचावर जी धांव
तीचें चिन्हचि तूं;—तुजला निशाण सार्थचि नांव !

असा सिद्धांत बांधून कवि पुढें म्हणतो—

मिळमिळीत ज्याची कविता न असे रंडागीत
खचित जडेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत !

असें सांगून या स्वतंत्रतेच्या शाहिरानें आपल्या देशबांधवांना जीवितसंगरांत झटून लढावयाला आव्हान केलें आहे! ओजो-गुणानें रसरसलेल्या या प्रशंसा-गीताचें वृत्त 'दोहा' आहे. 'सवाई' वगैरे कांहीं हिंदी वृत्तें मराठींत शिरून स्थायिक झालीं आहेत; परंतु 'दोहा' हें हिंदीवृत्त मराठी कवितेला फक्त परघरचें म्हणूनच परिचित आहे. मोरोपंतांचें 'दोहारामायण' सोडलें तर मराठींत या वृत्ताचा उपयोग केलेला सहसा आडळत नाहीं. असें हें मराठीला विशेष परिचित नसलेलें जोरदार वृत्त उपयोगांत आणण्यांत केशवसुतांची योजकता व मार्मिकता दिसून येते. या दोह्यांत आढळणारा आवेश 'स्फूर्ति' या कवनांत अगदीं उत्कट रूपानें व्यक्त झाला आहे. सामान्य लोक कवीची गणना उन्मत्तांत करितात. कवीला हा उन्माद स्फूर्तिमदिरेच्या प्राशनानें चढतो; आणि त्या उन्मादानें बेफाम झालेला हा शाहिर ही मदिरा जड जगताला द्यावयाला उद्युक्त झाला आहे. अशा तऱ्हेचें विलक्षण मादक पेय पिऊन बेफाम झालेल्या जगाचे रंग क्षणोक्षणीं पालट-तोल—जगांत क्रांत्या घडून येतील. जग आम्हांस बडबड्यांत काढतें, मद्यपी म्हणतें; मग आम्हीं तरी जगाची पर्वा कां करावी? परमेश्वरानेंच आम्हांला हें बडबडण्याचें कार्य सांगितलें आहे. ज्या मदिरेच्या, ज्या दिव्य दारूच्या प्रभावानें —उष्णतेनें स्वर्भूसंगम होतो ती ही दारू पिऊन

होउनियां मग दंग मनीं
व्हावें तें आणा ध्यानीं
गा मग सुचतिल तीं गाणीं

आणि त्या धुंदींत, त्या दिव्य एकतानतेंत तुमच्या मुखांतून बाहेर पडलेलीं हीं गीतें गरिबांना गांजणाऱ्या गतानुगतिकांना गर्भगळित करून सोडतील! तेजस्तत्त्वाची आराधना करितांना आद्यऋषींनीं जीं ओजःसूक्तें गाइलीं त्या ओजःसूक्तांचे प्रतिध्वनि आमच्या अंतःकरणांत घुमले कीं त्या ईश्वरी स्फूर्तीच्या अद्भुत सोमरसाच्या प्राशनानें धुंद होऊन आम्ही कल्पनेच्या विशुद्ध वातावरणांत विहार करूं—कल्पनेच्या नौकेंत बसून व्योमसागराचें आलोडन करूं आणि तिथून या गरीब धरेवर काव्यरत्नें उधळूं! अशा त्या दिव्य वातावरणांत जातांना

अडवितील जर देव तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं

हार न खाऊं रतीभरी

आणि हा स्वर्गही या दृश्यसृष्टीच्या बाल्यावस्थेंत तिला सन्मार्गाला लावण्याकरितां शब्दसृष्टीच्या ईश्वरांनीं निर्माण केला असें जगाला जाहीर करूं. विधिघटनेनें ही प्रतिभेची तरफ आमच्या हातीं आली आहे. जनतेच्या बधिरलेल्या बुद्धीवर ही प्रतिभेची तरफ टेंकून आपण विचारक्रांति करूं—हें जग उलथून टाकूं! आज जगावर सर्वत्र जो जुलुम माजलेला दिसत आहे तो जुलूम या प्रतिभेच्या बळानें मातीला मिळवूं! ईश्वरी आवेशाचे ऊर्जस्वल संदेश प्रत्येक क्षणाला, वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकेबरोबर आमच्या अंतःकरणाला येऊन भिडत आहेत; अशा वेळीं आह्मी जर स्वस्थ बसलों तर आम्हांला मरणाशिवाय दुसरी कोणती गति आहे? म्हणून हा स्वतंत्रतेचा शाहिर साद घालीत आहे-

उठा! उठा! बांधा कमरा!
सत्त्वाचा उदयोस्तु करा!
मारा किंवा लढत मरा!

छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या.!
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या.

केशवसुतांच्या या कवनांत विलक्षण आवेश आहे. केशवसुत क्रांतिकारक कवि होते, कवींचे कवि होते अशी साक्ष हें त्यांचें कवन महाराष्ट्राला सदैव देत राहील. राष्ट्रोद्धाराला किंबहुना विश्वोद्धाराला हातभार लावण्याकरितां महाराष्ट्राच्या भावी कवींना या आधुनिक आद्यकवीनें हें उघड उघड आव्हान केलें आहे! 'तुतारी' हें उत्तान कवन या कवनापुढें फिकें पडतें. 'प्रीति' हें केशवसुतांचें गाणें फार मधुर आहे. अंतःकरणांतून या गाण्याचा ओघ अगदीं सहज उचंबळलेला आहे; अर्थातच या गाण्याला वृत्ताचें तितकें दृढ असें बंधन नाहीं. प्रीति कोठें मिळेल? प्रीति—बहिरुपार्थीनीं असंश्रित प्रीति कोठें मिळेल? निस्स्वार्थ, निरंतर प्रीतीचा उद्भव कोठें झाला?—

नंदनवनामधीं आला
कल्पलतेला बहर भला.
तिचि हृदयीं बीजें पडलीं
प्रीति त्यांतुनी अवतरली!

प्रीतिची असे अशि ग मात;
पहा आपुल्या हृदयांत !

लाभाविणें कळवळणाऱ्या प्रीतीची जात स्वर्गाची आहे. ही प्रीतीची प्रभातरल ज्योत वसुधातलावर निर्माण होत नाहीं. निष्पाप, निर्दोष, निर्व्याजमधुर हृदयांत प्रीत वास करिते. निरपेक्ष प्रीतीचा सौदा संपदेनें, सौंदर्यानें, सुखाच्या लालचीनें होत नाहीं, प्रीतीनें, फक्त प्रीतीनेंच होतो. अशा या निरपेक्ष प्रीतीला उपचार कोणते ?

हृदयीं आलिंगन पहिलें
चुंबन मुखकमलीं वहिलें

असल्या साध्या सरळ उपचारानें प्रीति वाढेल; आणि अशी प्रीति, कवि ह्मणतो

पहा तूं प्रियजनहृदयांत !

या निर्हेतुक प्रीतीचा आपला अनुभव केशवसुतांनीं '–प्रत ' या हृदयद्रावक कवितेंत नमूद केला असुन ' प्रीतीची भाषा ' या गोड कवितेंत तिच्या भाषेची ओळख करून दिली आहे. ' मयूरासन आणि ताजमहाल ' हा याच निस्स्वार्थ प्रीतीचा जोरदार पोवाडा आहे,

केशवसुतांच्या या उत्कृष्ट आणि उद्बोधक कविता वाचीत असतां जे नवनवीन विचार प्रत्येक वाचनाला सुचले त्या विचारांचा परिपाक या विवेचनांत उतरला आहे. अपरब्रह्मांडांत अनिरुद्ध संचार करणाऱ्या चिद्घनचपलेनें जीं अद्वितीय अनुपमसुंदर दृश्यें पाहिलीं त्या दृश्यांचें दर्शन रसिकमनाला येथें खचित होईल-केशवसुत महाकवि — काव्यसृष्टींत क्रांति घडवून आणणारे कवीश्वर होते. तरल कल्पनेच्या विशुद्ध वातावरणांत स्वैर संचार करणाऱ्या चिद्घनचपलेच्या स्वर्गीय संगीतलहरींचे नितांतमधुर निनाद, अस्पष्ट आलाप ज्या अंतःकरणांत उमटतात त्या उदात्त अंतःकरणांत उद्भूत झालेल्या गीततरंगांचा उच्छृंखल उद्रेक, ह्मणजेच महाकाव्य होय ! अर्थहीन शब्दांचा अचेतन संसार,—त्याला महाकाव्य कोण ह्मणेल ? मनाला मोहनी घालणारे, अंतःकरणाला उचंबळून सोडणारे अद्भुत रसतरंग ज्या रसतरंगिणींत हेलावत असतात, त्याच रसतरंगिणीला महाकाव्य अशी संज्ञा आहे. आणि अशा तऱ्हेचे अद्भुत रसतरंग केशवसुतांच्या काव्य-तरंगिणींत निरंतर हेलावत आहेत. ज्याच्या निर्मितीनें नवतेजाचा, नवीन परंपरे-

चा उदय होतो आणि भविष्यत्कालीन वाङ्मयाला वळण लावण्याचें, नवीन स्वरूप देण्याचें सामर्थ्य ज्या काव्यांत, ज्या वाग्विलासांत वसत असतें, त्या वाग्विलासाला महाकाव्य ह्मणतात. केशवसुतांच्या कवितेनें महाराष्ट्राच्या काव्यवाङ्मयांत क्रांति घडवून आणिली आणि एक नवीनच युग, नवीनच सांप्रदाय सुरू केला. प्रतापशाली पृथ्वीश्वरांच्या पार्थिववैभवाची परिसीमा शकगणनेनें होते आणि वैभवशाली वागीश्वरांच्या विश्वविजयाची परिसीमा सांप्रदायनिर्मितीनें होते ! जीवसृष्टीच्या जुलुमी जेत्यांचे ते जयस्तंभ आणि त्या शकगणना काळाच्या प्रचंड वावटळींत नष्ट होतात; परंतु शब्दसृष्टीच्या ईश्वरांची विशाल वाग्वैजयंती त्या विश्वभक्षक वावटळीला न जुमानतां आचंद्रार्क अप्रतिहत फडकत राहते ! केशवसुत गेले,—परंतु केशवसुतांची काव्यसंपदा शाश्वत आहे, चिरंजीव आहे. जड देहाचा बंध तोडून अनंतांत अंतर्हित झालेल्या त्या चिद्घनचपलेचीं अमर गीतें महाराष्ट्राच्या कानांत जोंपर्यंत घुमत आहेत, परतंत्र राष्ट्राचा स्वाभिमान जागृत करणारे ‘ तुतारीचे ’ पडसाद ऐकतांच ईश्वरी ‘ स्फूर्तीनें ’ जोंपर्यंत महाराष्ट्राचें अंतःकरण थरारत आहे तोंपर्यंत महाराष्ट्र अभिमानानें आणि आदरानें ह्मणेल—

केशवसुत कसले गेले ? केशवसुत गातचि बसले !

—गोविंदाग्रज.

# ४

# विनायकांची कविता.

# विनायकांची कविता.

## ( विनायक जनार्दन करंदीकर. )

१८७२—१९०९.

राष्ट्राचें अंतःकरण, राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राचे विकार ज्या कवितेंत आविर्भूत झालेले असतात ती राष्ट्रीय कविता. सामान्य जनतेच्या आशा-अपेक्षांशीं, विचार-विकारांशीं समरस झालेल्या ज्याच्या अंतःकरणांतून राष्ट्रभावनांनांच्या उज्ज्वल लहरा उसळूं लागतात तो राष्ट्रकवि. कवि हे सामान्य जनांच्या विकारांचे उद्गाते आणि विचारांचे विनयकर्ते आहेत! सामान्य जनतेचें अंतःकरण हेंच आज खऱ्याखुऱ्या काव्याचें अधिष्ठान आहे. सर्व काव्याचा उद्भव, आजच्या जगांत, सामान्य जनांच्या अंतःकरणापासून होतो आणि सर्व काव्याचें आश्रयस्थानही आज तेंच आहे. अनेक आपदांनीं गांजलेल्या आणि नाना चळवळी-उलाढालींनीं गजबजलेल्या आजच्या या लोकसत्तेच्या युगांत कवींनीं जर मनांत आणिलें तर ते काय करूं शकणार नाहींत? राष्ट्र स्वतंत्र असो कीं परतंत्र असो, संपन्न असो कीं विपन्न असो, सामान्य जनांची हेळसांड आणि हेळणा आज सर्वत्र सारखीच चाललेली आढळून येते. संपत्तीची विषम वांटणी व भांडवलवाल्यांची बेगुमान भोगलालसा हीं जोंपर्यंत जगांत कायम आहेत तोंपर्यंत जगाची स्थिति अशीच असावयाची. अशा असमान स्थितींत असलेल्या या जगच्चक्राचे दांते एकमेकांवर रगडत असतां, त्यांच्या भीषण ध्वनीला आपल्या ऊर्जस्वल वाणीनें निरंतर साथ देण्याचें कार्य जर कवींनी केलें तर जगच्चक्राच्या उत्पत्ति-विनाशाचीं सूत्रें जशीं जगदीश्वराच्या हातांत आहेत तशीं त्याच्या स्थितिगतीचीं सूत्रें वागीश्वरांच्या हातीं रहातील यांत शंका नाहीं!

काव्य हें कांहीं नुसतें विद्वज्जनांच्या विनोदनाचें साधन नव्हे. मणिनूपुरांचें सिंजित किंवा कांतेनें मृदु शब्दांनीं केलेला उपदेश हे बैठ्या कवितेचे विषय झाले. ज्या राष्ट्राचें रक्त नव्या भावनांनीं आणि आकांक्षांनीं सळसळत असतें, त्याचें काव्य असें असत नाहीं. त्या राष्ट्रांत, सामान्य जनांच्या विनयनाचें महत्कार्य कवितेला करावयाचें असतें; राष्ट्राच्या अंतःकरणाची तळमळ आणि विचारांची

खळबळ त्या काव्यांतून उत्कटत्वानें ध्वनित व्हावयाची असते. घरबैठ्या मनाची करमणूक करणारें नेभळें आणि दुबळें काव्य त्या राष्ट्राला रुचणार नाहीं. खरें काव्य, जातिवंत काव्य, कवीच्याहि हृदयाला हलवील असें काव्य सामान्य जनांच्या अंतःकरणांत, वासना-कामनांत, हंसण्या-रडण्यांत भरलेलें असतें; तें काव्य ओळखून, त्या काव्याचें रहस्य आकळून त्याचा ओघ आपल्या वाणींतून वहाता ठेवणें हें राष्ट्रकवींचें कर्तव्य. राष्ट्रकवीची प्रतिभा विश्वकुटुंबी सहसा नसते. राष्ट्ररक्षणासाठीं तिला आटी करावयाची असते; राष्ट्रसंसाराच्या संवर्धनांत तिचा जीव गुंतलेला असतो; बहुजनसमाजाचा कैवक्ष घेऊन तिला झगडावयाचें असतें.

अशा राष्ट्रकवीच्या कवितेनें त्या राष्ट्रांतल्या सामान्य लोकांना कितीही भुलविलें तरी विश्वहृदयाला मोहनी घालणें तिला शक्य होत नाहीं. राष्ट्रवैभवाचे पोवाडे गाणाऱ्या शाहीराच्या वाणीचें वैभवहि राष्ट्रीयच असतें. समान परिस्थितीनें पारतंत्र्यांत खितपणाऱ्या दोन भिन्न राष्ट्रांत सहानुभाव वाढल्यामुळें त्या वाढत्या सहानुभावाबरोबर राष्ट्रकवींच्या अधिराज्याची सरहद्दही कधींकाळीं वाढत असते; परंतु राष्ट्रकवींना हें अंतर्राष्ट्रीय प्रेमपूजनाचें वैभव जरी कधीकाळीं लाधलें तरी विश्वाच्या प्रेमपूजनाचें सार्वत्रिक वैभव सहसा लाधत नाहीं!

काव्यें कवीचीं जगतांत गांवीं
त्यांचें न त्याच्या परि चोज गांवीं.

हें विनायकांचें वर्णन विश्वकुटुंबी कवींच्या स्थितीला लागू पडतें. ओसाडींत पांवा वाजवून त्यांना दिवस काढावे लागतात. विनायकासारखा विरळ रसिकच त्यांच्या गीतनादानें वेडा होऊन त्यांच्या शोधाकरितां रान घ्यावयाचा! परंतु राष्ट्रकवींना मात्र समानधर्मा निर्माण होईपर्यंत ताटकळत बसावें लागत नाहीं; त्यांच्या कवितेचे चोज देखतां डोळां होतें. राष्ट्रीय आवेशानें रसरसणारी राष्ट्रशाहिरांची वाणी राष्ट्रहृदयांत तेव्हांच अधिष्ठित होते. भारत–रामायणांच्या मराठी आवृत्त्या काढणाऱ्या अभिजात कवींच्या वाग्विलासापेक्षां सामान्य जनतेचीं भावनाचित्रें रेखाटणाऱ्या रांगड्या शाहिरांच्या साध्यासुध्या साखर-बोलांनींच महाराष्ट्राला अधिक भुरळ पाडिली; आणि त्यांच्या कवनांचा झरा समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोंचला.

राष्ट्रीय भावनांनीं भरसर भरलेल्या अंतःकरणाच्या वृत्ति अनावर झाल्यावर,

पूर आल्यामुळें त्यनावर झालेला नदीचा ओघ जसा धरण फोडून वेगानें बाहेर पडावा, तसे त्या उच्छृंखल अंतःकरणांतून काव्यतुषार आपोआप उसळूं लागतात. राष्ट्रकवीचें कवन हें असें सहज हृदयंगम असतें. पूर्ववैभवाचा, पूर्वपरंपरेचा, पूर्वेतिहासाचा ओघ राष्ट्रीय कवनांतून वहात असल्यामुळें केवळ आपलेपणाच्या जाणीवेकरितांच आसावलेल्या सामान्य जनतेचें अंतःकरण राष्ट्रीय कवितेवर सहजच लुब्ध होतें. महाराष्ट्रामध्यें जनतेच्या हृदयाचे मालक होणारे असे जातिवंत कवि गतकाळांत दोन चारच झाले. आणि या अर्वाचीन काळांत अनेक शतकें आचरिलेल्या वैराग्यव्रताचा अखेर वीट येऊन महाराष्ट्रशारदा एकाएकीं प्रणयचंचल झालेली दिसते. आधुनिक कवींचे कुलगुरु केशवसुत यांच्या कवनांतून राष्ट्रीय भावनांचें तेज विशेष चमकतें. परंतु बाकी इतर कवींच्या कवितेंत तत्वगाथा, प्रणयकेलि, निसर्गवर्णनें हींच फक्त आढळतात. वस्तुतः महाराष्ट्रांतील आधुनिक कवींना महाराष्ट्राच्या कालच्या व आजच्या चळवळींशिवाय दुसरें कांहींहि सुचतां कामा नये. महाराष्ट्राला जसें सृष्टिवैभव आहे, महाराष्ट्राला जसें सारस्वत आहे, महाराष्ट्राला जशी पूर्वपरंपरा आहे, तशी पूर्वपरंपरा, तसें सारस्वत आणि तसें सृष्टिवैभव हिंदुस्थानांतील बहुधा दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राला नसेल. इतर राष्ट्रांच्या ठिकाणीं यांपैकीं एक एक अगदीं परिणतावस्थेंत असेल व आहेही; परंतु हीं सर्व एकवटलेलीं पहावयाला मात्र दुसरीकडे कुठेंहि मिळणार नाहींत. महाराष्ट्रमंडळाच्या इतिहासाकडे पाहिलें कीं

महाराष्ट्र हें सर्व राष्ट्रांस राजे

हे मुक्तेश्वराचे अभिमानोद्गार अगदीं यथार्थ वाटतात.

शत्रुसीरांची लाखोली । जेणें समरांगणीं भूलिंगा वाइली
सागरांत पृथ्वी भोगून त्यागिली । तोचि एक पुरुषार्थी.

असा पुरुषार्थी पुण्यश्लोक नृपति आणि

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें

असा बोध करणारा राष्ट्रनिष्ठ धर्मवीर महाराष्ट्राशिवाय हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्या राष्ट्राला लाभला आहे? महाराष्ट्राच्या या पूर्वेतिहासाला साजेल असाच गेल्या अर्ध शतकाचा महाराष्ट्राचा अर्वाचीन इतिहास आहे. अशा या महाराष्ट्राचें वैभव आधुनिक कवींनीं खरोखरीच मुक्तकंठानें गायिलें पाहिजे. पण आधुनिक

कवींत केशवसुत व विनायक यांच्याशिवाय स्वदेशाची आठवण इतर कोणाही कवीनें तळमळीनें ठेविलेली दिसत नाहीं. महाराष्ट्राच्या पूर्ववैभवाची आठवण केशवसुत–विनायकांनीं आपल्या जोरदार कवनांनीं जागृत ठेवण्याचा प्रयत्न बराच केला; त्यांतल्या त्यांत केशवसुतांपेक्षांहि विनायकांची कविता अधिक राष्ट्रीय आहे.

विनायकांचा जन्म १८७२ त झाला. केवळ महाराष्ट्रावर, महाराष्ट्रविभूतींवर अशा विनायकांच्या कविता फारच थोड्या आहेत. 'तुतारी'सारखीं आवेशपर कवनेंहि त्यांनीं केलीं नाहींत. त्यांच्या कवितेंत देशाभिमान अगदीं सर्वत्र आढळतो हाच त्यांच्या कवितेचा विशेष होय. केशवसुत-टिळकांच्या कवितेपेक्षां विनायकांची कविता भाषेनें व भावनेनें महाराष्ट्राला अधिक जवळ आहे. केशवसुतांची कांहीं ठिकाणीं अगदीं गांवठी व कांहीं ठिकाणीं अगदीं इंग्रजी भासणारी भाषा विनायकांच्या काव्यसंग्रहांत आढळत नाहीं. टिळकांची भाषा साधी असली तरी क्वचित् संस्कृतप्रचुर व ' अभंगांजलि ' सोडला तर बहुधा संस्कृत वळणावर असते. विनायकांची कविता शिष्ट मऱ्हाठींत सहसा बोलत नाहीं. तिची बोली जानपद मऱ्हाठी—अवलासुबोध परंतु जोरदार मऱ्हाठी—आहे. रामदासी वळण याला ह्मणतां येईल; हें वळण सहज ओजस्वी, सहज काळजाला भिडणारें,—हृदयंगम असतें. भाषेचा नखरा या वळणांत नसतो; अंतःकरणाचा उमाळा हाच या वळणाचा आत्मा; आणि त्यामुळें हें वळण क्वचित् खडबडीत भासलें तरी जात्या काव्यमय असतें. समर्थांच्या स्फुट कवितेंत असलें सहज-काव्य ठिकठिकाणीं आहे. रामदासी बोलणें बहुतक सर्व आतुर असावयाचें; तसें तें विनायकांचे आहे. मात्र या काळाला शोभेल अशी भाषेची सफाई व रचनेची व्यवस्था त्यांच्या कवितेंत, रामदासी कवितेपेक्षां, अर्थातच अधिक दिसते.

जनतेच्या रूढ भाषेंत विचार गुंफणें फार धोक्याचें असतें. अगदीं न कळतां कित्येक वेळां ही गुंफण ग्राम्य शब्दांच्या मिश्रणानें गांवठी तर संस्कृत शब्दांच्या मिश्रणानें बेडौल होते. केशवसुत–टिळकांच्या कवितेंत अशी गांवठी अगर बेडौल रचना कांहीं ठिकाणीं आढळते. विनायकांची कविता या दोषापासून आलिप्त आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. विनायकांची विचारसरणीही शुद्ध मऱ्हाठी आहे. इंग्रजी विचारांचा पगडा केशवसुत-टिळकांच्या कवितेवर अतोनात पडला आहे. केशवसुतांचीं ' सतार,' ' आगबोटीच्या कांठाशीं उभ्या

असलेल्या तरुणीस;' व टिळकांचीं 'सुशीला,' 'वनवासी फूल' हीं काव्यें निव्वळ इंग्रजी विचाराच्या धर्तीवर आहेत. विनायकांचें 'सुवास' हें गीतच फक्त इंग्रजी धर्तीवरलें ह्मणतां येईल. 'गणिकोद्धार,' 'मोहानंतर,' 'ध्यास तो भास,' 'वीरमती' हीं त्यांचीं खंडकाव्यें भाषेनें व भावनेनें केवळ महाराष्ट्रीय आहेत. संतकवींच्या कवितेचें, विशेषतः समर्थांच्या कवितेचें अध्ययन त्यांनीं असोशीनें केलेलें होतें. संतकवींच्या वैराग्याची लहर त्यांना वेळोवेळीं येते. 'गणिकोद्धार' हें काव्य असल्याच वैराग्यानें भरलेलें आहे. संतकवींच्या वैराग्याप्रमाणें विनायकांच्या वाणींत रामदासी तडफही उत्कटत्वानें आढळते. देशाच्या दारुण दुर्दशेचें चित्र त्यांच्या दृष्टीपुढून कधींच हललें नाहीं; देशाची दुर्दशा पाहून त्यांच्या अंतःकरणाला पडलेला पीळ ठिकठिकाणीं व्यक्त झाला आहे. स्वदेशाप्रमाणें स्वधर्माचाही त्यांना उत्कट अभिमान होता. 'ध्यास तो भास' या कवितेंत हा अभिमान अगदीं रसरसतो आहे. मऱ्हाठी अंतःकरणाला भुरळ पाडणारी मोहनी विनायकांच्या वाणींत ओतप्रोत भरलेली आहे. मऱ्हाठी राष्ट्राच्या संस्कारांनीं विनायकांची वाणी पावन झालेली आहे. मऱ्हाठी राष्ट्राचा रांगडा शृंगार आणि भाबडा भक्तिभाव, शतकानुशतकें पारतंत्र्याचा असह्य कांच सोसल्यामुळें ऐहिकाचा आलेला वीट आणि आठवलेलें वैराग्य;

पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ

हा इतिहासाचा बोध स्मरत असल्यामुळें वर्तमानाच्या घनातिमिरांतूनहि वैभवशाली भविष्यत्कालाच्या उज्जल तेजःश्छटा पहाण्याची उत्सुकता;—हे आजच्या मऱ्हाठी राष्ट्राचे उत्कट मनोविकार विनायकांच्या कवितेंत प्रतिबिंबित झालेले आहेत.

अव्वल इंग्रजी अमदानींत पाश्चात्य सुधारणेच्या प्रथमदर्शनानें ज्यांचे डोळे दिपले त्यांना, आपल्या देशाच्या लुप्त झालेल्या सद्गुणांचें भान न राहून, नुसता दुर्गुणांचा अवशेष मात्र दिसला, धर्माचा परमोदात्त अंतरात्मा त्यांच्या दृष्टीआड होऊन धर्महीन रूढीचें भेसुर प्रेत मात्र त्यांच्या दृष्टीला पडलें. पूर्ववैभव, पूर्वपरंपरा, पूर्वेतिहास व स्वधर्म यांचा अभिमान या आकस्मिक स्थित्यंतरामुळें शिथिल झाला. केशवसुतांच्या मतांची घडण या स्थित्यंतरांतच झाली होती. 'तुतारी' हें कवन या मतांचें व्यक्त स्वरूप आहे. या मतांतराच्या भोंवऱ्यांत सांपडून टिळकांनीं स्वधर्माचा त्याग केला. विलुप्त झालेल्या पूर्ववैभवाचें, विच्छिन्न झालेल्या

पूर्वपरंपरेचें आणि विलुलित झालेल्या दिव्य धर्मतत्वांचें स्मरण केशवसुतांच्या ठिकाणीं जागृत होतें. परंतु टिळकांनीं धर्मत्याग केल्यामुळें त्यांचा आणि पूर्व-परंपरेचा संबंध सुटला. महाराष्ट्राच्या सारस्वताला आणि स्वराज्याला धर्माचें अधिष्ठान होतें. धर्मवीरांचें वाग्बल आणि कर्मवीरांचें बाहुबल धर्मसेवेला वाहि-लेलें होतें. धर्मसेवेच्या, धर्मोद्धाराच्या, धर्मरक्षणाच्या, भावनेनें स्वराज्य निर्माण झालें; आणि त्या भावनेच्या अंताबरोबर स्वराज्याचाही अंत झाला! धर्म हा महाराष्ट्राच्या पूर्वसारस्वताचा, पूर्वपरंपरेचा आणि पूर्वेतिहासाचा आत्मा आहे. धर्माचा आणि पूर्वेतिहासाचा महाराष्ट्रांत असा जिव्हाळा आहे आणि त्यामुळें जो महाराष्ट्रांत धर्माला मुकतो तो त्या पूर्वधर्माबरोबर पूर्वेतिहासाला, ' पूर्व दिव्या-लाहि ' मुकतो. टिळकांच्या कवितेंत, धर्मांतरामुळें भावी काळाविषयीं आशा आणि आस्था दिसली तरी पूर्वकाळाविषयीं तितका अभिमान आणि आदर दिसत नाहीं. केशवसुत-टिळकांच्या कवितेंतील ही उणीव विनायकांनीं आपल्या तेजाळ प्रतिभेच्या साहाय्यानें भरपूर भरून काढिली.

विनायकांच्या कवितेचें स्वरूप अपें शुद्ध मऱ्हाठी आहे. त्यांच्या कवितेचा काल-क्रम कळावयाला साधन नाहीं. विनायक अत्यंत भाविक होते; शंकराचार्यांच्या परापूजेचें त्यांनीं केलेलें गोड भाषांतर घरोघरीं गाइलें जातें; भजन संपल्यावर हें गीत शेवटीं ह्मणण्याची कांहीं ठिकाणीं वहिवाट आहे. विनायकांसारख्या ' नवीन ' कवीच्या कवितेविषयीं हें विधान अतिशयोक्त वाटेल; परंतु तें अनुभव-सिद्ध आहे. आधुनिक कवीच्या कवितेला असा मान मिळाल्याचें क्वचित् आढ-ळून येतें. पाळंदे, गर्दे, माधवानुज, दास गणू या आधुनिक कवींची कविता अशीच हरिदासांच्या व लोकांच्या तोंडीं आहे. ही कविता अर्थातच भक्तिपर आहे. पाळंद्यांचीं ' प्रभुविण संकट कोण निवारी ? ' यासारखीं अतिशय मधुर भक्तिपर पदें तर रस्त्यावरले भिकारीही गातात! महाराष्ट्रांतील सामान्य जन-तेच्या अभिरुचीचा ओघ अद्यापिही कोणत्या दिशेनें वहात आहे हें यावरून स्पष्ट होतें. टिळकांनीं ही दिशा अजमाविली होती; परंतु या दिशेनें टिळकांनीं केलेले प्रयत्न, धर्मान्तरामुळें, सामान्य जनांत दृढमूल होतील असें वाटत नाहीं.

शिवचरित्रावरील विनायकांच्या दोनच कविता ओजस्वी आहेत. ' शिवराज-दर्शन ' या कवितेपेक्षां ' शिवसंदेश ' ही कविता अधिक जोरदार आहे. ' इति-

हासाचें मर्म ' ही उत्तम कविता विनायकांची मार्मिकता दर्शविते. ' महाराष्ट्र-लक्ष्मी ' हें पद उत्कृष्ट आहे; या पदांत महाराष्ट्राचें वैशिष्ट्य उत्तम रीतीनें दाखविलेलें आहे. या पदापेक्षां ' हतभागिनी ' हें गाणें अधिक हृदयंगम असून त्या गाण्यांतील करुणरसाच्या छटा अतीव रम्य आहेत.

एकाश्रुबिंदुकारणें
तियेच्या, रणें झुंजले मनें
असे सुत व्याली—जयकालीं माउली.
कारटीं करंटीं तिथें
निपजलीं भुतें! मातृशोणितें—
स्वतांला लाली—आणाया धांवली!
कल्याण काय नेणती
नित्य भांडती, आपसांत तीं,
परां वश झालीं—स्वत्वाला विसरलीं!
गेले दिन यावे कसे,
वर्तनें असे, एकदां फसे—
गाय जी गाळीं—चेंपत ती चालली!

हें मायभूमीच्या आजच्या दुर्दशेचें वर्णन कोणाच्या अंतःकरणांत उद्वेग आणि डोळयांत अश्रु उभे करणार नाहीं? विनायकांच्या कवितेंत करुणरस विशेषसा नाहींच; त्याच्या ओझरत्या छटा ' गणिकोद्धार,' ' यापुढें ' व ' हतभागिनी ' या कवनांत आढळतात; या छटा परमरमणीय आहेत. महाराष्ट्राची पूर्वस्थिती आणि सद्यःस्थिति यांची तुलना करितांना विनायकांच्या रसवंतींतून करुणरस ओसंडूं लागतो.

स्त्रीगीतें हा विनायकांच्या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. महाराष्ट्रमहिलांच्या मुखांत खेळण्याजोगीं सहजमधुर गीतें आधुनिक कवितेंत नाहींतच. गोविंदाग्रजांच्या 'राजहंस,' 'घुंगुरवाळा,' 'घास' या गीतांनाच आधुनिक काव्यवाङ्मयांतील स्त्रीगीतें म्हणतां येईल. विनायकांनीं या दिशेनें प्रथम प्रयत्न केला. खानदेशांत घरोघरीं या गाण्यांचा बराच प्रसार झाला आहे असें कळतें. हीं सर्वच गाणीं गोड आहेत असें नाहीं; 'पद्मिनी,' 'दुर्गावती,' 'संयोगिता'

हीं गाणीं बरीं साधलीं आहेत. विनायकांच्या इतर कवनांच्या मानानें हीं गाणीं साधारणच आहेत. गाण्याकरितां केलेल्या चारित्रांची निवड चांगली आहे, परंतु या रमणीरत्नमालेंतून रावसाहेब पेशव्यांच्या पतिनिष्ठ पत्नी रमाबाई व झांशीच्या पराक्रमी राणीसाहेब दिगंतकीर्ति लक्ष्मीबाई हीं दोन महाराष्ट्रीय युवतिरत्नें कशीं गळलीं देव जाणे! हा बहुधा 'पुरुषाचा धर्म भ्रम' असावा. 'कृष्णाकुमारी' हें गाणें या गीतमालेंत सर्वोत्तम आहे; या गाण्याचा आरंभ नितांतसुंदर असून यांतील करुणरसहि अंतःकरणाला पाझर फोडतो.

स्फुट गीतांत 'जोहार' हें पद चांगलें आहे. ऐनरंगांत दंग असतां कर्तव्याची कठोर हांक कानावर पडल्यामुळें 'रंगाचा भंग' होऊन कर्तव्याकरितां स्त्रीवधाला सज्ज झालेल्या रजपुताच्या मनःस्थितीचें शब्दचित्र

घेउन तलवार बळी । गेला शेजेजवळीं
प्रेमाची ती पुतळी—भंगाया सज्जला.
बघतां ती मूर्ति परी । धडकी भरली तदुरीं
धैर्य गळे कंपभरीं—खड्‌ग पडे भूतला.
एक चित्त जाय रणीं । एक न सोडी रमणी
एका प्रिय कीर्ति जनीं—एका स्त्री प्रेमला.
एकच घेईन मुका । केला निर्धार निका
दशशत घेऊन मुका । तो मुकाच राहिला.

या ओळी डोळ्यांपुढें हुबेहुब उभें करितात. 'नागपंचमी' हें पद बरें आहे. 'गाण्याचें गाणें' हें गीत उत्तमांत मोडेल. 'कवि आणि पोपट' हा संवाद सुंदर साधला आहे; या संवादांतील

नगर कासया आम्हां व्हावें? भला वास काननीं,
जळो ती जगताची कांचणी!
असते गुणभोक्ते जर नगरीं, चतुरा! तर कां गुणी,
हिंडते भ्रमिष्टापरी वनीं!
मज हाल पुराची काय पांखरा कळे!
परि वदती नगरीं अज्ञानाचि कोंदलें,
रसिकता सर्व करपली मत्सरानलें,

हें पोपटाचें मार्मिक भाषण कोणाला पटणार नाहीं ? 'प्रो. छत्र्यांचा केसरी' हें गाणेंही उत्तम आहे. छत्र्यांच्या केसरीचें वर्णन करितांना विनायकांनीं काढिलेले

जीवंतपणीं स्वत्वाची होतां हानी । प्रेतकळा पावे प्राणी
मृदुलता अशी धरितां लोण्यावाणी । खातील तुला ओटांनीं
समज हे मानवीं कावे
कुरवाळित घेती चावे
मृगजलास या न फसावें
ही इष्ट नव्हे परवशतेंत बहाली । नाचरंग दीस महालीं ।

हे उद्गार केवळ अनुभवसिद्ध आहेत. 'नदी आणि कवि' ही चिमुकली कविता चटकदार आहे. 'चिमणी' व 'अवंतिके' या दोन्ही कविता बऱ्या आहेत. 'सोंगटीचा खेळ' ही कविता जुन्या वळणाच्या वैराग्यविचारांनीं भरलेली आहे.

विनायकांच्या स्फुट कवनांप्रमाणें त्यांचीं खंडकाव्येंहि सरस आहेत; किंबहुना अधिक सरस आहेत असें ह्मटलें असतांहि वावगें होणार नाहीं. ही खंडकाव्यांची रसवत्ता पाहून विनायक हे उत्तम महाकाव्य निर्माण करूं शकले असते असें वाटतें. टिळकांचीं खंडकाव्यें सरस आहेत. परंतु टिळकांच्या खंडकाव्यांत कल्पनांची व विचारांची पुनरुक्ति अतोनात असते; 'माझी भार्या' व 'सुशीला' हीं काव्यें या दृष्टीनें केवळ नमुनेदार आहेत शिवाय स्फुट कवितांतील कल्पना या खंडकाव्यांत डोकावतात त्या निराळ्याच! विनायकांचीं खंडकाव्यें या सर्व दोषांपासून अलिप्त आहेत. हीं खंडकाव्यें कथानकात्मक आहेत. या कथानकांची निवड पुराणें व इतिहास यांतून झालेली आहे. 'ध्यास तो भास' हें एकच खंडकाव्य कल्पनानिर्मित आहे. या स्वदेशी कथानकांमुळें हीं खंडकाव्यें नवीन असलीं तरी परिचयाचीं वाटतात,—परकीं वाटत नाहींत. त्या मानानें टिळकांची खंडकाव्यें परकीं वाटतात. 'सुशीला' हें कथानक नांवें सोडलीं तर निव्वळ परकी आहे. 'वनवासी फूल' हें काव्य तर अगदींच नवीन धर्तीचें आहे. केशवसुतांनीं खंडकाव्यें लिहिलींच नाहींत; परंतु लिहिलीं असतीं तरी तीं नव्या धर्तीवरच लिहिलीं असतीं असें वाटतें. नव्या धर्तीवर काव्यें लिहिणें प्रगतीच्या दृष्टीनें अतिशय आवश्यक आहे. परंतु तूर्त तरी, लोकाभिरुचीला वळण लावण्याकरितां जुन्यानव्याचें बेमालुम मिश्रणच लोकांपुढें ठेवणें अगत्याचें आहे. कारण निर्भेळ

नवें सहन करण्याची ताकद लोकाभिरुचीला अद्यापि आलेली नाहीं. विनायकांनीं दुर्बल लोकाभिरुचि लक्ष्यांत घेऊनच ही कथानकांची निवड केली असावी.

विनायकांचीं खंडकाव्यें चार आहेत. या सर्वांत 'गणिकोद्धार' हें खंडकाव्य उत्कृष्ट आहे. 'ध्यास तो भास' व 'वीरमती' हीं दोन खंडकाव्यें आर्यावृत्तांत आहेत. विनायकांची आर्या सहजसुंदर असते. पंतांच्या वेळेपासून आर्यावृत्त हें मराठींत अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें बहुतेक कवि आर्यावृत्तांत रचना करूं लागले. निव्वळ पंतांचे अंतेवासी व अनुयायी सोडले तरी 'अभिनव कादंबरी' व 'मेघनादवध' हीं केवळ आधुनिक काव्येंहि आर्यावृत्तांतच आहेत. अलीकडील कवींत आर्यावृत्ताचा उपयोग विनायकांइतका लीलेनें व सुंदरतेनें कोणींच केला नाहीं. मराठी भाषेवर प्रभुत्व गाजविणाराला, तो कवि नसला तरी, आर्यावृत्ताचा उपयोग लीलेनें सहज करितां येतो. परंतु त्या आर्या सदोदित सुंदर असतातच असें नाहीं. आधुनिक कविमंडळांत मोगरे यांना 'आर्यापति' ह्मणावयाला हरकत नाहीं; मोगरे यांची आर्या बरेच वेळां गद्याच्या वळणावर असते, हा त्यांच्या आर्यारचनेंतील प्रमुख दोष आहे माधवानुजांची आर्या बहुधा सहज व सुरस असते; परंतु माधवानुजांच्या आर्येंत तडफ मात्र अगदीं नाहीं, नुसता नेभळट गोडवेपणाच आहे. चंद्रशेखरांची आर्यावृत्तांत विशेषशी रचना नाहीं; 'काय हो चमत्कार!' हें त्यांचें अद्भुतरम्य खंडकाव्य आर्यावृत्तांत आहे. विनायकांच्या 'गणिकोद्धाराहूनही' हें काव्य सुरस आहे असें ह्मटलें तरी चालेल. रचना अगदीं पाहून घ्यावी. परंतु रचनेहूनही रसवत्ता विशेष. विनायकांच्या आर्येच्या तोडीची आर्या फक्त चंद्रशेखरांचीच.

'ध्यास तो भास' व 'वीरमती' हीं दोन्ही काव्यें रचनेनें व रसवत्तेनें चांगलीं उतरलीं आहेत. आज जसे द्रव्याच्या आभिषाला फसून पुष्कळ लोक ख्रिस्ती होतात तसेच मुसलमानांच्या, विशेषतः अकबराच्या अमदानींत मुसलमान होत असत. अशा एका फसून मुसलमान झालेल्या रजपूत वीराच्या मनःस्थितीचें वर्णन 'ध्यास तो भास' या काव्यांत केलेलें आहे.

स्तंभासमीप होता तो त्या समयास एकटा बसला,
नव्हती वृत्ति ठिकाणीं; चिंतेच्या सागरीं दिसे फसला.
तेज मुखावर नव्हतें, गळली होती उरस्थळीं मान,

हृदय उडे, आंत कढे, चिरडे जसें पडून पाषाण !
तंतूच्या वायावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात
भालीं कर तो फिरवी, वरचेवर मग्न निज विचारांत.

हें शब्दचित्र किती मनोहर आहे ! अशा स्थितींत तो रजपूत वीर उभा असतां त्याला भास झाला !—धर्मांतरानें परकी झालेली त्याची जिवलगा, त्याच्या हृदयाची आधिदेवता तेथें आली, त्याच्यापुढें आली; ती त्या वेळीं कशी दिसत होती ?–

होता गुलाब गालीं—ओष्ठावरती तशी तिच्या लाली,
चिंतेचा ढग भालीं, धरि त्यावर सांवली परी काळी.
नेत्रांत तेज होतें, परि निश्चल त्या सरोवरावाणी.
चंचलता मावळली; शून्यपणा काळजी तया आणी.
साधेंसुधेंच पातळ, हिरवी अंगांत कंचुकी ल्याली;
कृष्णकुरळ केश तिचे ते अस्ताव्यस्त विखुरले भालीं.
बोलावयास्तव तिनें कर वर केला तयांतुनी पार
दिसता चंद्र तुम्हांला असा तिचा काय दिव्यतासार.

नंतर त्या प्रणयी युवयुवतींचा संवाद झाला. स्वधर्मांत पुन्हां परत येण्याविषयीं त्या रजपूतरमणीनें त्याला विनविलें, नानापरींनीं आळविलें; परंतु व्यर्थ ! त्या तरुणानें स्वीकृत परधर्माचा अभिमान सोडला नाहीं. चिंतेच्या जंजाळांत सांपडलेल्या त्या तरुणाला हा सर्व भास झाला ! मनाला जो त्याच्या ध्यास जडला होता त्यानेंच त्याच्यापुढें हें इंद्रजाल उभें केलें ! ‘ वीरमती ’ हें खंडकाव्य क्षात्रधर्मावर आहे. जोधपुरचा राजा जसवंतसिंग आणि त्याची करारी व पतिव्रता राणी ‘ वीरमती ’ यांच्या चरित्रांतील रमणीय प्रसंगावर हें काव्य आहे. रणांगणांतून पराभूत झालेला जसवंतसिंग त्या रात्रीं पळून आला होता. त्यानंतर त्या शूर परंतु विषयासक्त जसवंताची स्थिति त्या निद्रामग्न सुंदरीला पाहून कशी झाली आणि विषयलंपट पतीची कर्तव्यबुद्धि राणीनें कठोर वर्तनानें कशी जागृत केली याचें मनोरम वर्णन या खंडकाव्यांत केलें आहे.

क्षत्रियधर्म—निधावें समरा, सांडून वाढलें ताट
अव्हेरून प्रेमें वा स्त्रीनें घातला गळां हात.

या क्षात्रव्रताचें उत्कृष्ट विवरण या खंडकाव्यांत केलें आहे. पंतांच्या विद्युल्लोपा-

त्यानाशीं हें खंडकाव्य जरूर तुलून पहावें, बहुधा हें अधिक चांगलें उतरलें आहे असें वाटेल. ' मोहानंतर ' हें खंडकाव्य महाभारतांतील सुधन्वा राजाच्या सुप्रसिद्ध कथानकावर आहे.

झेंप दिव्यावर घालून पडे पतंग मरणापाशीं,
त्यापूर्वी त्या ज्योत वाटते केवळ तेजोराशी.
फसतात–फसायाचे प्राणी ज्ञानाविचारविहीन
ज्ञानी म्हणवून जगीं फसती मानव तदधिक हीन !

हें तत्त्व या काव्यांत गुंफिलें आहे. या काव्याचें वृत्त साकी आहे. मराठींत साकी-वृत्ताइतकें दुसरें गोड वृत्त जवळ जवळ नाहीं. कै॰ कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या साकीबद्ध मेघदूतापासून बहुतेक सर्व आधुनिक कवींनीं हें वृत्त थोडया फार प्रमाणांत अतोनात हाताळलें आहे. परंतु शास्त्रीबुवांच्या मेघदूताइतकी गोड साकी टिळक, अनंततनय किंवा रेंदाळकर यांपैकीं एकाचीहि नाहीं. क्रियापदांच्या ऱ्हस्व-दीर्घांची ओढाताण टिळकांच्या साकींत असते; अनंततनय व रेंदाळकर यांच्या साकीला संस्कृताच्या मिश्रणानें कांहीं ठिकाणीं बोजडपणा आला आहे. विनायकांची साकी मेघदूताची बरीच बरोबरी करिते.

विनायकांची कविता केशवसुत–टिळकांच्या कवितेपेक्षां अधिक निर्दोष आहे. भाषेचा रूक्षपणा अगर कल्पनांची पुनरुक्ति त्यांच्या कवितेंत बिलकूल नाहीं. त्यांच्या भाषेचें वळण रामदासी थाटाचें, अर्थागळें—

शब्द थोडे अर्थ फार । —वामन.

असें आहे. गोविंदाग्रज–बालकवि यांच्या कवितेंत आढळणारा शब्दांचा पसारा विनायकांच्या कवितेंत अर्थातच नाहीं. शब्द थोडेच परंतु सूचक,—अर्थानें भरलेले आणि जाणीवेच्या तेजानें रसरसलेले असे असावयाचे. केशवसुतांची भाषाही अशीच बव्हर्थ आणि अल्पाक्षर आहे. विनायक हे केशवसुतांच्या छायेखालचे; केशवसुत, टिळक आणि विनायक या कवींनीं महाराष्ट्राच्या बधिरलेल्या काव्य-वाङ्मयांत चेतनेचें वारें,–नवीन भावनांचें, नवीन विचारांचें वारें खेळविलें. महाराष्ट्र-काव्यवाङ्मयाला नवीन वळण कुंट्यांनीं, प्रधानांनीं अगर मोरोपंतांनीं लाविलें नाहीं, तें केशवसुतांनीं आणि केशवसुतांच्या या सहकारी सत्कवींनीं लाविलें. याचा अर्थ असा नव्हे कीं, या कवित्रयाच्या कवितेचें स्वरूप सारखवट

आहे. कवितेचें स्वरूप भिन्न असेल पण त्यांचें ध्येय एक होतें, त्यांच्या काव्य-विषयक कल्पना एक होत्या, त्यांच्या कार्याची पद्धति एक होती. त्यांच्यामध्यें नांदणारें परस्परप्रेम अपूर्व होतें. सहजस्फूर्तीनें केशवसुत आपल्यामध्यें श्रेष्ठ आहेत हें त्यांनीं जाणिलें आणि केशवसुतांना अग्रेसराचा मान त्यांनीं आपण होऊन दिला. केशवसुतांवरलें टिळक आणि विनायक यांचें प्रेम सर्वश्रुत आहे. टिळकांच्या सहवासांत घालविलेल्या दिवसांचें स्मरण होतांच केशवसुतांच्या डोळयांत आनंदाश्रु उभे रहात असत आणि केशवसुतांचें गुणगान करितांना टिळकांचे देहभान उडून अहंकाराचा वारा त्यांना लागत नसे ! विनायक भ्रष्ट होते, दुर्वर्तनी होते. विनायकांच्या दुर्वर्तनाचें शल्य केशवसुतांच्या अंतःकरणाला फार जाचे; परंतु झाल्या गेल्या गोष्टीला इलाज नाहीं असें समजून ते विनायकांना ‘ महाराष्ट्राचे बायरन ’ ह्मणत असत ! विनायकांच्या वर्तनांतील दुर्गुणांचें आणि वाणींतील गुणांचें हें मार्मिक वर्णन आहे. केशवसुत, टिळक आणि विनायक यांची ही मैत्री अढळ होती; कालांतरानें, धर्मांतरानें अगर अवस्थांतरानें तिला बाध आला नाहीं. महाराष्ट्रांतील आधुनिक कवितेला आजचें हें रमणीय स्वरूप यावयाला ही मैत्री फारच कारणीभूत झाली. ‘ केशवसुतांची शाळा,’ ‘ केशवसुतांचा सांप्रदाय ’ ह्मणून ज्याला म्हणतात तो याच मैत्रींतून अवतरला. नवीन विचारांचे, नवीन वळणाचे जे कवि केशवसुतांच्या वेळेपासून पुढें आले आहेत त्या सर्वांनीं आपल्याला या सांप्रदायाचे अभिमानी म्हणविण्यांत भूषण मानिलें आहे. केशसुतांचें युग, ‘ केशवसुतीय युग ’ ह्मणून ज्याला म्हणतात तें हें हल्लींचें या कवींचें युग होय ! केशवसुतांच्या परंपरेचे पाइक ह्मणवून घेण्यांत माधवानुज, bee, गोविंदाग्रज, बालकवि, रेंदाळकर यांच्यासारख्या सत्कवींना अभिमान आणि आनंद वाटला आहे. महाराष्ट्रांत ज्यांची कविता आज जनमुखीं झाली आहे त्या मान्यवर सत्कवींनीं केशवसुतांच्या शिष्यत्वाचीं बिरुदें गर्वानें मिरविलीं ! केशवसुतांच्या कवित्वाविषयीं, बोलून दाखवित नाहींत तरी, कित्येकांच्या मनांत अद्यापि पुष्कळच शंका आहे केशवसुतांचें हें वाढतें यशोवैभव पाहून ही त्यांची शंका यापुढें त्यांना मनांतच ठेवावी लागेल यांत शंका नाहीं. असो ! अंतरीं निर्मळ व वाचेचे रसाळ असे हे शाहिर असल्यामुळें एकदा जडलेला हा प्रेमबंध कधींच तुटला नाहीं. ऋणानुबंधाच्या या गांठी मृत्यूनें तोडिल्या !

विनायक हे केशवसुतांच्या सांप्रदायांतले कवि होते. केशवसुत आणि विनायक यांच्या कवितेंत बराच फरक आहे.

अर्वाचीन कवींत कोण गगनीं मारी भरारी वरी ?

—रहाळकर.

या प्रश्नाचे उत्तर जसें केशवसुत हें सहज सुचतें, तसेंच

राष्ट्राच्या हृदयीं प्रभातरल ती वाणी कुणाची स्थिरे ?

या प्रश्नाचें उत्तर विनायकांची वाणी असेंच द्यावें लागेल. केशवसुतांच्या कवितेची अस्पष्ट छाया विनायकांच्या कवितेवर क्वचित् पडलेली आढळते. केशवसुतांच्या —

हर्षखेद हे मावळले

या ओळीप्रमाणें

हास्याचे दिन मावळले

ही ओळ ' यापुढें ! ' या कवनांत आहे. त्याचप्रमाणे ' चिमणी ' या गाण्यांतील पहिलीं अकरा कडवीं व केशवसुतांच्या ' भृंग ' या गाण्यांतील विचार आणि रचना हीं सारखीं आहेत. केशवसुतांप्रमाणें विनायकांची रचना गद्याच्या धर्तीवर नसली तरी अशी रचना स्त्रीगीतांत सांपडते. ' अहल्या ' हें गाणें या रचनेचा नमुना आहे. वाईट शब्द विनायक वापरीत नाहींत; शोधाअंतीं मुस्कलीं, ठेवी व हाल हे तीन अपप्रयोग आढळले; संस्कृत वाक्यें व परभाषेंतील वाक्येंहि विनायकांनीं अगदीं वापरलेलीं नाहींत. ' वीरमती ' या खंडकाव्यांत त्या रजपूत नायिकेच्या तोंडीं

जा, समरीं फडकूं द्या स्वयशाचा अरिवरी जरीपटका

असे उद्गार घातले आहेत. या उद्गारांतील ' जरीपटका ' या निशाणाचा उल्लेख रजपुतांना लागू पडेल कीं नाहीं, याची शंका वाटते. शब्दांचे खेळ आर्यावृत्तांत विनायकांनीं बरेच केले आहेत. दामयमकें तर त्यांनीं लीलेनें ठिकठिकाणीं साधलीं आहेत. विनायकांचे हे शब्दचमत्कार सहज साधलेले व सुंदर आहेत. भाषांतरें त्यांनीं केलींच नाहींत. ' राजा भोज ' हें ' Abou Ben Adhem and the angel ' या हंट याच्या चुटक्याचें रूपांतर आहे. ' हिरकणी ' ही विनायकांची शेवटची अपूर्ण कविता आहे. या कवितेचा आरंभ फार सुंदर आहे. हें आरंभींचें संध्याकाळाचें सहजमनोहर व वास्तविक वर्णन वाचावें आणि गोविंदा-

अग्रजांच्या ' अरुण ' या कवितेंतील उत्प्रेक्षांची चढती उतरती भांजणी मनांत आणावी, ह्मणजे गोविंदाग्रजांचें निसर्गवर्णन किती हुबेहूब असतें तें कळेल !

' गणिकोद्धार ' या खंडकाव्याचें कथानक अशोकचरित्रांतून घेतलेलें आहे. कथानक साधेंच परंतु करुणसुंदर आहे. मथुरा नगरींत वासवदत्ता नांवाची एक लावण्यलतिका वारयुवति रहात असे. तिचें चारित्र्य

जन्में गणिका, परी चंद्रिका आचरणें अकलंक
परपुरुषस्पर्शें न जियेचा विटाळला पर्यंक
एकासचि मानून देवता, करी त्यावरी प्रेम,
तोच जिवाचा सखा तियेचा; ती सीता, तो राम.

अशा तऱ्हेचें होतें. एके रात्रीं ती वासवदत्ता आपल्या नियुक्त पतीसह मंदिरांत निजलेली असतां तिच्या त्या प्रियकराचा कोणीं दुष्टानें गळा कापिला. त्या मरणोन्मुख प्रियकराच्या शेवटच्या किंकाळीनें वासवदत्ता दचकून जागी झाली; आणि तें अघोरकर्म पाहून त्या स्वभावभीरु सुंदरीनें आक्रोश मांडिला. परंतु तिच्या त्या आक्रोशाचा परिणाम विपरीत झाला. ही गणिका जातीवर गेली, धन-लोभाकरितां हिनें हा पुरुषवध केला आणि आतां आकांत करून तें दुष्टकृत्य जिरवूं पाहते असा आरोप तिच्यावर येऊन ती

न्यायदृष्टिनें दोषी ठरली—अपराध तसा दंड,
पडे स्मशानीं होऊन स्तनयुगुलनासिकाखंड,
आप्त-इष्टजन दासदासिगण धनानुगामी सारे
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे ?

ज्या वेळीं तिला ही शिक्षा होऊन ती स्मशानांत येऊन पडली ती वेळ संध्याकाळची होती ?—

रुधिरें सिंचित पटासारिखें दिसे पश्चिमाकाश
सूर्यास्तानें दिसूं लागलें भुवन उदास ! उदास !
पतिनिधनास्तव अशौचदर्शक कृष्णपट दिशा ल्याली
पति प्रकाश स्त्रीचा—त्याविण काळेंच तिच्या भालीं.
चिता धडकल्या—ज्वाला उठती—भरे दशदिशा धूर
कंवट्या फुटती, अग्नीमाजी होय अस्थिचा चूर.

घटिका ती राक्षसी—मृत्युचा, स्मशान तें, दरबार;
स्थल देण्याचें इहलोकींचा मानवास करभार.
उठे दीर्घ रोदन स्मशानीं त्या समयास भयाण,
निराश्रिता कवितेची जैशी उदासवाणी तान.
प्रत्येक स्वन त्यांत मधुर, परि आर्त, करुणतापूर्ण,
करील ज्याचें श्रवण निश्चयें पाषाणास विदीर्ण.

तो करुणारव त्या वासवदत्तेचा होता !

मदनमंजिरी, भुवनसुंदरी तीच त्या स्थलीं वन्य
धुळींत लोळत पडली होती, हाय ! छिन्नाविच्छिन्न.
मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला,
तीच धरेवर पडली उघडी भुज घेऊन उशाला !
अधरस्पर्शें कपोल व्हावे रक्त असे सुकुमार
खावा लागे आज त्यांजला धूलिकणांचा मार !
इहलोकींचे नश्वर वैभव—हा क्षणभंगुर खेळ
जलबुद्बुद्—भोपळा भ्रमाचा फुटे न लगतां वेळ.

* * * *

स्वभावतां मन असतें स्त्रीचें पुष्पासम सुकुमार,
त्यांत जाहला असा त्यावरी दुःखांचा भडिमार.
अधिकचि तें अलवार जाहलें—नवस करी मरणास;
परी थरर कांपवी तयाला सहज निघाला श्वास

अशा त्या काळवेळीं तिला तिच्यासमोर कोणी उभें आहे असें वाटलें. ती तसली भयंकर वेळ; कोल्हीं हुकी घालीत होतीं; सर्पांच्या हालचालीनें पाचोळा सळसळत होता; धडधडत्या चितांचे भीषण आवाज उठत होते. अशा त्या अवकाळीं त्या आसन्नमरण, अनाथ एकाकी अबलेला वाटलें—हें आपल्यासमोर कोण आहे ? पिशाच तर नव्हे ना ? अशी कल्पना मनांत येऊन तिच्या पोटांत धडकी भरली आणि क्षणोक्षणीं मृत्यूची झांपड बसत चालल्यामुळें अंधुक होणाऱ्या आपल्या दृष्टीपुढून तें दारुण दृश्य दूर सारण्याकरितां त्या अभागिनीनें डोळ्यांवर हात ठेविले. तरीही तें भयाण दृश्य दृष्टीपुढून हलेना. तेव्हां अत्यंत व्याकुळ होऊन ती भग-

वंताला आळवूं लागली. जरा वेळानें पुन्हा डोळे उघडून पाहूं लागली, तरीहि तें दृश्य कायमच! तेव्हां अखेर तिनें त्या व्यक्तीला विचारिलें—

आलां समजूं पिशाच आपण घडीं भराया माझी ?
दीनेस्तव कीं प्रगट जाहलां करुणाघन देवाजी !

हा प्रश्न ऐकून तो वणिग्वृत्तीनें उपजीवन करणारा बुद्धगुरूचा स्वच्छील शिष्य उपगुप्त त्या वासवदत्तेला म्हणाला—

स्मरत असेल–तुवां दर्शविली मम भेटीची आस
क्षमा करावी, केलें तुज मीं त्या समयास निराश.
श्वानासम तुजपुढें नाचले जन विभवीं असतील
मी न त्यांतला गणिके! संकटसेवा हें मम शील.
आलों आतां; सेवेस तुझ्या सादर केला काय
संकोच त्यज; सांग करावी तुझी चाकरी काय ?

त्यावर वासवदत्तेनें उत्तर दिलें—

खिडकींत उभी असतां पाहत निज रमणाची वाट
मदनमनोरम मूर्ति आपुली आली दृष्टिपथांत.
मंद मंद टाकीत पाउलें होतां मार्गी जात
रोवीत जणुं ध्वज मदनाचे तरुणींच्या हृदयांत.
जलौघ वाहे, सभोंवतींची काय वनश्री त्यास ?
तशी दृष्टि आपुली न पाहे तरुणीभ्रुकुटिविलास !

अशा रीतीनें आपण जात असतां आपल्याला पाहून माझें मन वेडें झालें आणि

वरून मीं फेंकिलें, कराया खूग, पुष्प आरक्त,
पुष्प नव्हे तें प्रणयलेख तो वा हृदयच अनुरक्त.
न कळत गमतें, पडे आपुला पुष्पावर त्या पाय,
हाय! केवढा तेणें बसला मम हृदयावर घाय.
हृदय तळमळे तरी न माझी दृष्टि आपणां सोडी
गेलां, झालां आड, तिला तरि त्याच दिशेची गोडी.

त्या दिवसापसून मला आपला निदिध्यास लागून मी अखेर आपल्याकडे पुष्पहार पाठविला. परंतु त्या वेळीं माझ्या आमंत्रणाचा आपण अव्हेर केला.

येतां जर त्या समयीं, नव्हती आपल्या सुखा जोड.
प्रीतिबलानें केली असती भू स्वर्गाहुनि गोड.
नव्हती सदनीं द्रव्यसंपदासुखास कांहीं वाण
आपणांस पुष्पांत ठेवितें मानून स्वप्राण.
उरलें आतां काय? जाहली ऐश्वर्याची होळी
आशाप्रेत धरून उराशीं अश्रु येथ मी ढाळीं.

हें तिचें आर्त भाषण ऐकून उपगुप्तानें तिचें सांत्वन केलें आणि परमार्थाचा उपदेश करून तिचें मन अशाश्वतापासून शाश्वताकडे वळविलें. 'शोकावर्त,' 'सुशीला,' 'कुंजकूजन' या आधुनिक रसमधुर खंडकाव्यांत हें विनायकाचें कथनकाव्य सर्वोत्तम ठरेल. या काव्यांत व्यर्थ अशी एक ओळ नाहीं किंवा वावगा असा एक शब्द नाहीं. काव्याच्या सहजरम्य आणि प्रशांत ओघाबरोबर अंतःकरण अगदीं सभरस होऊन वहात जातें. स्मशान आणि सायंकाळ यांचें स्वाभाविक वर्णन ते देखावे अगदीं दृष्टिपुढें उभे करितें. या खंडकाव्यांत जी विलक्षण माधुरी आहे ती कांहीं त्यांच्या इतर खंडकाव्यांत आढळत नाहीं.

'सुवास' हें विनायकांचें गीत इंग्रजी धर्तीवरलें आहे. हें गीत फारच गोड आहे. एके दिवशीं ओसाडींत सहल करीत असतां कवीला कस्तुरीसारखा वास आला.

उद्भवला हा परिमल कोठें?
पडलें मजला कोडें मोठें.

त्या वासाच्या शोधाकरितां कवि हिंडहिंड हिंडला; पण व्यर्थ! त्याचें मूळ कांहीं सांपडलें नाहीं;

कार्य आणि कारण या जगतीं
तीच वस्तु नटलेली दिसती,
तैसें माझें मानस आतुर
शंका काढी देई उत्तर.

स्वतःचें सुगंधसर्वस्व पुष्परूपानें प्रकट झालें असतां त्याला—त्या फुलांच्या बहराला कोणी उपभोक्ता नाहीं; उलट

खेळावीं जीं रसिकां हातीं
होते त्यांची संतत माती.

अशी विपरीत स्थिति पाहून खिन्न झालेला गुलाब
टाकि उसासे सारा वेळ
त्याचा कां हा गंध असेल,
किंवा हृदयेश्वराला प्रेमाच्या पुष्पांची माला वाहून जिवाभावानें त्याला सर्वस्व अर्पण केलें– काय होय तें परि पुरुषाला,
नव पुष्पावरच्या भ्रमराला ?
आणि त्या सर्वस्वदानाचा अव्हेर झाल्यामुळें
बाला भग्नमनोरथ झाली,
मौक्तिकापरी अश्रू ढाळी.
दुःखानें एकांतीं स्फुंदे
तेंच काय त्या स्थानीं गंधे ?
अथवा स्वार्थी जगाच्या व्यवहाराला कंटाळून कोणी कवीनें–
अज्ञानाची मिरवे द्वाही,
रसिकत्वाला थारा नाहीं
काय अशा जनतेंत रहावें ?
काय पहावें ? काय चहावें ?
असा विचार केला आणि ओसाडींत जाऊन, ओढयासंगें गाणीं गाण्याकरितां स्वच्छंदानें– वाजविला जो सुस्वर पांवा,
त्याचा कां हा वास असावा ?
असे विचार करीत त्या सुवासाचा माग काढण्याकरितां सगळें रान पायाखालीं घातलें. पण ते सर्व श्रम वायां गेले; त्या सुवासाच्या नादानें कवीला अगदीं वेड लाविलें. तो सुवास कोठून आला हें जर त्याला कळतें तर
सांठवितों कवितेंत तयाला
वाग्देवीला सुखवायाला !
स्वानुभूत वासाचें दान
करावयाला जोंवर ये न,
तोंवर कवितालतिकेवरती
कर्णिकार-सुमनांची भरती !

या गीताच्या तिसऱ्या कडव्यांत विनायकांची जी स्त्रीविषयक काव्यमय कोमल कल्पना व्यक्त झाली आहे त्याच कल्पनेचा आधार 'स्त्री आणि पुरुष' या चिमुकल्या हृदयंगम गीताला आहे.

फुललिं फुलें—त्या योगें उपवन खुललें
दरवळला—परिमळ सुखवाया सकलां.
स्वैरगती—अलिगण उडती-बागडती.

अशा त्या रमणीय उपवनांत एक युवति हिंडत होती. त्या बागेंत हिंडण्याकरितां एक पुरुषही तेथें आला.

कौतुकला—हंसला, बाग मनीं ठसला,
नव फुललें—पुष्प एक त्या आवडलें

तें फूल त्या पुरुषानें खुडिलें, हुंगिलें, चुंबिलें! परंतु

क्षणमात्रें—होय नकोसें तें त्यातें.
कुसकरिलें—फेंकुनि धरणीवर दिधलें.
सर्व कृती—स्त्री ती अवलोकित होती,
गहिंवरली—टिपें तिचीं टपटप गळलीं.
कां तीं? तें—काय कथूं मी रसिकांतें.

हें गीत अगदीं उत्कृष्ट ध्वनिकाव्य आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या मनोभावनांतला नैसर्गिक फरक अतिशय नाजूक रीतीनें या गीतांत दाखविला आहे. विनायकांच्या कवितेंत स्त्रियांविषयीं आदर विशेषसा दिसत नाहीं. उलट संतकवींच्या सारस्वतांत आढळणारा

स्त्रीच्या पायीं तरले थोडे; बहुत बुडाले ठार!

असला ठराविक नमुन्याचा प्रतिकूल भाव मात्र आहे. 'गणिकोद्धार' आणि विशेषतः 'मोहानंतर' या खंडकाव्यांत हा भाव व एकंदर जुन्या धर्तीचे वैराग्य-विचार ठिकठिकाणीं आढळतात. परंतु हा परिणाम संतकवींच्या सतत व्यासंगाचा असावा. नितंबिनी या वागुरा खऱ्या, पण त्या कोणाला? कामिकुरंगाला. अंतस्त्यागी सच्चरित गृहस्थाला प्रपंचाच्या या खडतर मार्गांतून, गृहधर्मापासून चळूं न देतां, गृहिणीच अस्खलित चालविते. संसाराची सर्वस्वसंपदा, आयुष्याची अधिष्ठात्री, जीवितांतील जादू स्त्री आहे हें विनायकांना पटलें होतें. पतिनिष्ठ पत्नी

प्रपंचांतली प्रीतिदेवता आहे!—

माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं?
प्रेमें बालक कोण सुंदर, वदा देईल माझ्या करीं?
आतां भासतसे मला भवन जें सर्वस्व चेतोहर—
त्या येईल खरोखरीच वनता, प्रीती निमाली तर!

अशी त्यांची श्रद्धा होती. प्रेमळ पत्नी हें पतीचें आदिदैवत आणि प्रेममय प्रपंचाचें एकमेव अधिष्ठान आहे!—

भीतीनें मरतील मानवकुलें प्रीती निमाली तर!

हा त्यांचा सिद्धांत आहे. 'प्रीति निमाली तर,' जीवितांतली ही जादू उडून गेली तर, ज्या मुरलीनें स्त्री ही राष्ट्रजननी व्हावी म्हणून मीं स्त्रीगीतें गाइलीं, ती माझी मोहनमुरली मी एका निमिषांत भंगून टाकीन असे उद्गार, त्यांनीं प्रपंचाचें रहस्य ओळखूनच काढले. 'विरह' हें हृदयंगम पद याच उत्कट प्रणयरसानें ओथंबलेलें आहे.

चालतों बोलतों घरीं
हांसतो वरी–अंतरीं परी
अश्रु वेल्हाळे! विरहानें तव गळे.

निष्काम प्रेम बहिरंगावर लुब्ध होत नाहीं, त्याची दृष्टि अंतःसौंदर्यावर असते.

नाहींस रूपशालिनी
परी गुणखनी, प्रेमरूपिणी
गुणें प्रिय झालें, रूप तुझें सांवळें.

विरहानें व्याकुळ झालेल्या प्रेमळ मनाला सुखक्षण आठवून काळ कंठावा लागतो.

तव अकपट प्रेमळ हंसें
अंतरीं ठसे, बोल गोडसे
श्रुतींचीं पाळें होउनियां बेसले.
तव हालचाल लाडकी
आठवुनि सखी, एकसारखी
जड क्षण झाले, कंठितसे प्रेमळे!

कवीला जडलेलें हें सुखक्षणांच्या आठवणींचें वेड इतकें उत्कट होतें कीं निद्रेंत सुद्धां, थंडीनें कुडकुडत स्टेशनावर क्षणभर लवंडलें असतां सुद्धां त्याला प्रिये-

चेंच गोड ' स्वप्न ' पडावें ! ही मनाची तळमळ इतकी वाढली कीं तिला हा देह-सुद्धां जड झाला.

अलि असतों तर बैसुनी
वायुवाहनीं, गात येऊनी
तुला वनमाळे ! असतें मीं चुंबिलें.
परि दुबळी मानवकुडी
व्यर्थ बापुडी, तियेची उडी
बेत केलेले, सर्व कुणा साधले ?

परंतु असल्या गोड जागृतिस्वप्नांत गुंग असतांना सुद्धां विनायकांच्या मनांत

सुंसार दिसे सुंदरसा
झांकून चालतां डोळे—मानिनी !

असले उदास विचार घोळतच होते ! महाराष्ट्राची आजची स्थितिच अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, त्या स्थितीचें चिंतन करणाऱ्या विचारवंताच्या अंतःकरणांत असल्या उदास विचारांचें ठाणें कायमचें बसावें. उदगीरच्या लढाईच्या वेळची महाराष्ट्राची उमेद आठवली, पानिपताच्या रणांगणावर भाऊंच्या शौर्य-भरारीबरोबर कायमच्या थिजलेल्या आणि अखेरच्या निजलेल्या मानधन महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षा आठवल्या आणि आजची ही हीनदीन स्थिति पाहिली म्हणजे ' यापुढें ! ' काय ? हें गीत आपोआप पिळवटलेल्या हृदयाच्या तारांवर तरंगूं लागतें.

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे—जयांनीं दिले—आपुले गळे, देशनिर्वाणीं
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें !

समरशार्दूल शंभु छत्रपतीच्या वधानंतर अलमगिराच्या बादशाही सैन्यानें ज्या-वेळीं ' रामराज्य ' व्यापिलें, शिवशाही संपुष्टांत आणिली त्या वेळीं रणगाजी धनाजी पुढें झाला !—

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं
यवनांना धायी धायीं—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें—राज्य आपुलें--असे व्यापिलें, जयां यवनांहीं
कोण असा प्रसवे आई—यापुढें !

धनाजीच्या मागें शाहू छत्रपतीच्या वाढत्या वैभवाला—महाराष्ट्राच्या अमर्याद महत्त्वाकांक्षांना ' अटक ' घालावयाला ज्या वेळीं प्रतिनिधि कचरले त्या वेळीं पुरुषसिंह बाजी पुढें झाला !--

फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें—स्थापिलें नवें—राज्य त्या जवें, वाढवी बाजी
सर करील त्याची कोण--यापुढें !

बाजीच्या अकालनिधानानंतर ' रूमशाम ' च्या सीमेपर्यंत भगवा झेंडा फडकविण्याच्या मऱ्हाठ्यांचा रोमहर्षण महत्त्वाकांक्षेला राघो भरारीचें नाकर्तेपण आडआलें. त्या वेळीं पानिपताच्या अपशकुनी मैदानावर मराठ्यांच्या नशिबाची खडतर परीक्षा पहाण्याकरितां निधड्या छातीचा दिलदार परंतु दुर्दैवी भाऊ पुढें झाला ! —

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्यभरारी—यापुढें !

फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी--यापुढें!
जी खनी—प्रसवली मणी—यापरी जनीं, बहुगुणी भारी
झाली ती हाय! भिकारी—यापुढें!

आणि त्या वैभवाच्या चढाओढींत तोंडघशीं पडलेला आजचा महाराष्ट्र—त्याची काय अवस्था आहे?—ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं--यापुढें!
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें!
यापरी—नाडलों तरी—लोचनांतरीं नीज ही भरली
ती निघेल कवण्या काळीं--यापुढें!

स्वदेशाची दुर्दशा पाहून पोळलेलें आपलें अंतःकरण विनायकांनीं या उत्कृष्ट करुण-कवनांत ओतलें आहे.

विनायकांचा देशाभिमान जाज्वल्य होता. पूर्ववैभवाचें स्मरण त्यांना अगदी वेडें करीत असे. शतकानुशतकें महाराष्ट्रानें आपदा सोसल्या आणि अखेर स्वराज्य पाहिलें; परंतु पुरतें दीड शतकसुद्धां तें वैभव दुर्दैवानें महाराष्ट्राला उपभोगूं दिलें नाहीं. दीड शतकाच्या अल्प अवधींत महाराष्ट्रीयांनीं जें अभूतपूर्व वैभव भोगलें, त्याचा अभिमान विनायकांना निरंतर वाटत होता. दुबळ्यांना पायाखालीं तुडवून त्यांच्या रक्ताच्या चिखलानें डागळलेलें वैभव महाराष्ट्रानें भोगिलें नाहीं. मराठे-मुसलमानांना समतेनें पाहून, देऊळ-दर्ग्याला समान लेखून महाराष्ट्रानें वैभव वाढविलें. महाराष्ट्राच्या वैभवाला न्यायाचें, दयेचें आणि धर्माचें अधिष्ठान होतें. अशा दिव्य परंपरेचा अभिमान विनायकांना होता; आणि म्हणूनच महाराष्ट्राला आज जशी हवी तशी कविता विनायकांची उतरली आहे. प्रवृत्ति-निवृत्तींचें एकीकरण करणारा, प्रपंच-परमार्थांची सांगड घालणारा, भूतकाळ आणि भाविकाळ यांचा सांधा जुळविणारा कवि, आधुनिक काळांत विनायकांशिवाय झाला नाहीं. विनायकांची कविता फार थोडी आहे; परंतु हें त्यांचें थोडें कवित्व अत्यंत

अर्थागळें आहे ! असें अर्थागळें कवित्व या महाराष्ट्रमंडळांत ज्या दिवशीं विपुळ होईल त्याच दिवशीं या महाराष्ट्राची भाषा—मऱ्हाठी भाषा ही खरीखुरी ' भूलोकभाषा ' होईल ! परमार्थाचें रहस्य उकलून, मानवी जीविताचें कोडें उलगडून संस्कृतभाषा ही ' गीर्वाग भाषा ' झाली; आणि प्रपंचाचें रहस्य उकलून प्रपंचाची—राजकारणाची उभारणी देवधर्मावर—सत्यधर्मावर—भगवंताच्या अधिष्ठानावर झाली पाहिजे हें तत्व स्थापून मऱ्हाठी भाषा ही उद्यां ' भूलोकभाषा ' होईल ! उद्यांच्या महाराष्ट्राचे प्रयत्न या दिशेनें व्हावयाचे आहेत. या दिशेनें राष्ट्र जात असतां त्याला उमेद आणील, त्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देईल अशी महाराष्ट्राची आजची व उद्यांची कविता असली पाहिजे.

दुःखाच्या डोहीं जन सांपडले, लागले बुडूं खोल
त्राता तूंच तयाला--

हे बोल जसे व्यक्तिमात्राला तसेच राष्ट्रालाहि लागू आहेत. संपन्न व्यक्तींनीं जसा विपन्न व्यक्तींना हातभार द्यावयाचा तसाच प्रबळ राष्ट्रांनीं दुर्बळ राष्ट्रांना हातभार दिला पाहिजे. महाराष्ट्रापुढें, भविष्यत्कालीन महाराष्ट्रापुढें जें ध्येय आहे तें हें आहे. हें उद्यांचें ध्येय सिद्ध होण्याकरितां आज महाराष्ट्राच्या पडत्या काळांत कवीनीं त्याची परंपरा अविच्छिन्न राखण्याकरितां अभिमानानें झटलें पाहिजे. महाराष्ट्राचा अभिमान वहाणें ह्मणजे कांहीं इतर राष्ट्रांचें अनिष्ट चिंतणें किंवा दुबळ्या राष्ट्रांनीं महाराष्ट्राच्या कैचींत सांपडावें असा अभिलाष धरणें नव्हे. महाराष्ट्राचा अभिमान वहाणें ह्मणजे सत्याचा आणि स्वातंत्र्याचा अभिमान वाहाणें ! महाराष्ट्राचा असा अभिमान विनायकांनीं वाहिला. विनायकांचा देशाभिमान ह्मणजे कांहीं साम्राज्यमदाच्या नशेनें धुंद झालेल्या रुड्यार्ड किपलिंगचा देशाभिमान नव्हे. संतकवींनीं आपल्या अभंगवाणीनें ज्या आनंदवनभुवनांत विश्वधर्माचें पीक पिकविलें, त्या आनंदवनभुवनांत अशा पापी भावना कधींहि रुजणार नाहींत. महाराष्ट्राच्या कालच्या भावनांशीं महाराष्ट्राच्या आजच्या भावनांचे दुवे जुळते राखण्याचा विनायकांनीं थोडाबहुत प्रयत्न केला. हा त्यांचा प्रयत्न पुढें चालवून महाराष्ट्राची देवधार्मिक राष्ट्रीय परंपरा कायम ठेवणें हें आधुनिक कवींचें कर्तव्य आहे.

५

# गोविंदाग्रजांची कविता.

# गोविंदाग्रजांची कविता.

( राम गणेश गडकरी. )

१८८६—१९१९.

महाराष्ट्र-काव्यवाङ्मयांत केशवसुतांनीं जी क्रांति घडवून आणिली तिचें पूर्ण स्वरूप टिळक-विनायकांच्या कवितेंत दृष्टीस पडतें. बहुजनसमाजाला समजेल अशी साधी भाषा, बहुजनसमाजाला कळावयाला कठिण जाणार नाहींत अशा कोमल कल्पना व बहुजनसमाजाच्या हृदयाला हलवितील अशा हृदयंगम संवेदना यांचा स्पृहणीय संगम टिळक-विनायकांच्या कवितेंत आढळतो. शब्दांपेक्षां अर्थाकडे व भावनेपेक्षां संवेदनेकडे त्यांचें लक्ष्य अधिक असे व त्यामुळें त्यांची कविता सुबोध, सुंदर आणि हृदयस्पर्शी झाली आहे. टिळक-विनायकांची कविता ही या मऱ्हाटीच्या मुलुखांतल्या बहुजनसमाजाची,-महाराष्ट्राची कविता आहे केशवसुतांची कविता कांहीं ठिकाणीं गूढ असली तरी सामान्यतः कळावयाला कठीण नाहीं. केशवसुतांच्या बऱ्याच कल्पना परक्या भाषेंतल्या, परक्या वळणांतल्या आहेत; व त्यामुळेंच त्यांची कविता इतकी दुर्बोध वाटते. केशवसुत, टिळक आणि विनायक यांची कविता साधी परंतु सुंदर आहे. टिळक-विनायकांच्या नंतरच्या पिढींतले कवि गोविंदाग्रज आणि बालकवि-विशेषतः गोविंदाग्रज-यांच्या कवितेचें वळण, या पूर्वकवींच्या वळणाहून, कांहींसें निराळें पडतें. अर्थापेक्षां शब्दांवर व संवेदनेपेक्षां कल्पनेवरच गोविंदाग्रजांच्या कवितेचा विशेष भर आहे. हृदयाला हलविण्यापेक्षां बुद्धीला भुलविण्यांतच गोविंदाग्रजांचें कौशल्य अधिक दिसून येतें. पूर्वकवींच्या कवितेपेक्षां गोविंदाग्रजांची कविता, कांहीं बाबतींत, निःसंशय श्रेष्ठ आहे. भाषा आणि कल्पना यांचें पूर्ण सौंदर्य त्यांच्या कवितेंत बऱ्याच ठिकाणीं आढळतें. मनाला घटकाभर घोटाळ्यांत पाडणारें 'कलगीचें गाणें' व 'फुटकी तपेली,' क्षणभर रंजविणारें 'गुलाबी कोडें' व 'विरामचिन्हें' आणि उत्प्रेक्षांच्या गजबजाटानें दिपविणारा 'प्रेमपाठ' व 'अहग' हीं कवनें गोविंदाग्रजांच्या कल्पक बुद्धिमत्तेची साक्ष देतात. काव्याचा, हृदयाला हलविणाऱ्या रसवत्तेचा भाग या कवनांत फार थोडा आहे. गोविंदाग्रजांइतक्या तऱ्हेतऱ्हे-

ज्या उत्प्रेक्षा आधुनिक कवींत फारच थोड्यांनीं केल्या असतील. हर्षचरिताच्या आरंभीं बाणानें दाक्षिणात्य कवींविषयीं

उत्प्रेक्षा दाक्षिणात्येषु ।

असे उद्गार काढले आहेत. हे उद्गार आधुनिक कवींत गोविंदप्रजांना पूर्णपणें लागू पडतात. हरतऱ्हेच्या उत्प्रेक्षांनीं त्यांचें वर्णनात्मक काव्य गजबजलेलें आहे; इतकेंच नव्हे तर बाणानें उल्लेखिलेलें गौडाचें अक्षरडंबरहि गोविंदप्रजांच्या ठिकाणीं कांहीं कमी नाहीं! नुसत्या बहिरंगाकडे पाहिलें तर टिळक-विनायकांच्या कवितेपेक्षां गोविंदप्रजांची कविता खाचित अधिक सुंदर दिसेल. जाईचें पांढरें शुभ्र फूल पाहून दृष्टि लोभावत नाहीं; परंतु त्याचा परिमळ मात्र मनाला अगदीं गुंग करितो. केशवसुत, टिळक आणि विनायक यांच्या कवितेची अशीच स्थिति आहे; त्यांची कविता म्हणजे अरण्यांत बहरलेली वनलता किंवा आश्रमांत उपवर झालेली शकुंतला आहे! गोविंदाप्रजांच्या कवितेचें स्वरूप पुष्कळच कृत्रिम व फाजील सुंदर आहे. फाजील सौंदर्याचें दर्शन सहसा सुखकारक होत नाहीं. पूर्ण फुललेल्या गुलाबाच्या पसरलेल्या पाकळ्यांपेक्षां अर्धवट उमललेल्या गुलाब-कळीचें मंदस्मितच अधिक मधुर असतें. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या फटफटीत प्रभेपेक्षां द्वितीयेच्या चिमुकल्या चंद्रकलेचें मुग्ध सौंदर्यच मनाला अधिक आनंद देतें. गोविंदाप्रजांच्या कवितेचें कृत्रिम स्वरूप सुंदर भासलें तरी तें पाहून मन प्रसन्न होत नाहीं. सुंदर रचना व विशाळ कल्पना हा त्यांच्या कवितेचा एक विशेष आहे; परंतु हा विशेष सदैव सुखदायक असतोच असें नाहीं. गोविंदाप्रजांच्या कल्पना बऱ्याच वेळां क्लिष्ट व कृत्रिम असतात; लिहितां लिहितां त्या सहज सुचल्या असतील असें वाटत नाहीं. चांफ्याच्या फुलाचा रंग भपकेदार व गंध उग्र असतो; पुनःपुनः त्या फुलाचा वास घ्यावा असें वाटत नाहीं. गोविंदप्रजांची कविता सामान्यतः चांफ्याच्या फुलासारखी आहे. रचना सुंदर, परंतु सहज नव्हे; व कल्पनाहि बहुधा कृत्रिम आणि दुर्बोध असतात. अंतःकरणाचा जिव्हाळा त्यांच्या कवितेंत फारच थोड्या ठिकाणीं उतरला आहे; परंतु जिथें उतरला आहे तिथें मात्र त्यानें अगदीं मर्यादा सांडिल्या आहेत! गोविंदाप्रजांचें अंतःकरण, गोविंदाप्रजांचें जातिवंत काव्य त्याच कवनांत सांपडतें.

काव्यकला विकला विफला,

एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळा ही ॥

असे उद्गार वऱ्हाडांतील संतकवि देवनाथ यांनीं कवितेविषयीं काढिले आहेत. या उद्गारांचें मर्म गोविंदाग्रजांची कविता वाचतांना उत्तम रीतीनें अनुभवाला येतें. त्यांच्या ज्या कवनांत हृदयींची प्रेमकळा अवतरली आहे त्या कवनांत त्यांच्या कवितेचें सहज, शाश्वत व शुद्ध सौंदर्य दृष्टीस पडतें. त्यांची इतर कविता कित्येक ठिकाणीं विकळा, कित्येक ठिकाणीं विफळा भासते! गोविंदाग्रजांच्या हृदयशारदेनें गाइलेलीं भक्तिप्रेमाचीं गीतें महाराष्ट्राला निरंतर आनंद देत रहातील. महाराष्ट्राच्या काव्यसंपदेंत मोलाची भर घालणारा हा मुरलीचा–भक्तिप्रेमाचा–शाहिर सन १८८५ च्या मे महिन्यांत गुजरातेंत जन्माला आला!

गोविंदाग्रजांच्या काव्यगंगेचा उगम 'सत्सुमदाम' या कवितेंत सांपडतो; ही चिमुकली कविता थेट मोरोपंती वळणाची आहे. 'सन्मणिमालेचें' हें एक साधें व छोटें अनुकरण आहे. त्यांची अगदीं पहिली कविता एका ज्ञातान्याच्या वर्णनाला वाहिलेली आहे. 'सत्सुमदामाच्या' प्रकाशनापूर्वी त्यांच्या कांहीं छोट्यामोठ्या कविता 'काळ' पत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत. 'काळ' पत्राच्या रसिक संपादकांनींच गोविंदाग्रजांचा 'पानिपताचा फटका' प्रथम प्रसिद्ध केला. या फटक्याची रचना रेखीव आहे; परंतु या रेखीव रचनेला चेतनेची जोड मुळींच मिळालेली नाहीं. पानिपतच्या दैवी आपत्तीची तुलना राष्ट्रीयसभेच्या सालोसाल भरणाऱ्या अधिवेशनाशीं याच फटक्यांत केली आहे! राष्ट्रीयसभेंतील बखेड्यांशीं ही पानिपतच्या युद्धाची तुलना अत्यंत हास्यास्पद व पुन्हा उद्वेगजनक आहे; त्यांत देशभक्ति दिसून येत असेल, परंतु औचित्य खास दिसत नाहीं. हा निर्जीव पोवाडा अथवा फटका यापुढें रसिक फक्त गोविंदाग्रजांनीं लहानपणीं लिहिलेला ह्मणून आदरानें वाचतील. महाराष्ट्रांत गोविंदाग्रजांचें नांव सर्वतोमुख करण्याचें श्रेय या फटक्याला मिळालें नाहीं. तें श्रेय मांडीवर मलूल झालेल्या राजहंसाला जिवाभावानें आळविणाऱ्या नवविधवेच्या करुणाकल्लोळांना लाधलें! मराठी काव्यवाङ्मयांत याच्या तोडीचें करुणगीत दुसरें क्वचितच आढळेल. या गीताची रचना अत्यंत निर्दोष व रसपरिपोषाला अनुकूल आहे. आपल्या आशेचा अखेरचा आधार तुटलेला पाहून भ्रांत झालेल्या अनाथ अबलेच्या करुणारवांनीं कळवळलेलें महाराष्ट्राचें चित्त गोविंदाग्रजांच्या गीतनादांत यापुढें कायमचें

गुंग झालें. गोविंदाग्रजांच्या रसवंतीच्या चढत्या उद्रेकांनीं महाराष्ट्ररसिकांना या पुढें कायमचें वेड लाविलें आणि गोविंदाग्रजांची कविता 'मनोरंजनांत' येतांच-

> ही येतांच उठोनि कौतुक जणों नेत्रांतुनी पाहतें,
> धांवोनी अवधान ये लगबगां, कानीं उभें राहतें;
> देण्याला बहुमान मान लवते, उल्हास ये मानसा,
> वाटे आज शरत्प्रभात नटुनी ही येतसे राजसा.
>
> —चंद्रशेखर.

अशा तऱ्हेची विलक्षण स्थिति उत्सुकतेनें वेडावलेल्या महाराष्ट्ररसिकांची होत असे! 'गुलाबी कोडें'. पुढें टाकून रसिकांना रिझविण्याचा प्रयत्न गोविंदाग्रजांनीं यापूर्वीच केला होता. हा चिमुकला चुटका चमत्कृतिजनक आहे. पश्चिमक्षितिजावर रविसहवासानें चढलेली लाली पूर्वक्षितिजावर कां नाचते, रसिक प्रियकराच्या प्रेमचुंबनानें एका गालावर थरकणारी लाली दुसऱ्या गालावर कशी फिरकते, का फिरकते,—हें कोडें अत्यंत मार्मिक व काव्यमय आहे. गोविंदाग्रजांच्या अनन्यसामान्य रसिकतेची साक्ष हें कोडें सदैव देत राहील. गुलाबी कोड्यापेक्षां 'पहिलें चुंबन' विशेष सरस आहे. यौवनाच्या नव्हाळीनें खुलणाऱ्या मुग्धेचें वर्णन सुंदर साधलें असून

> नित्य जन्मुनी । मरण सोसावें
> परि पहिलें चुंबन घ्यावें । फिरुनिही ॥

हे उद्गार पहिल्या चुंबनानें मनाला लाविलेलें वेड किती उत्कट आहे हें उत्तम रीतीनें दर्शवितात. 'विचार' हा चुटकाही फार चांगला साधला आहे. विचाराचें इतकें मर्मभेदक विनोदी वर्णन दुसरें नाहीं, निदान मराठींत तरी खचित नाहीं. 'वेडा' ही कविताही अशीच मर्मभेदक आहे. या कवितेचें केशवसुती वळण रसपरिपोषाला अनुकूल आहे.

> छे! मैदान उजाडतें, तरि तिथें हा वायु आहेच ना?
> वारें कांहितरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना!

हें वेड्याच्या भावशून्य भयाण मनांत खेळणाऱ्या भावनांचें वर्णन हृदयभेदक आहे. 'प्रेमपाठ' हें गीत विशेष चांगलें उतरलेलें नाहीं. बालकवींच्या सृष्टिवर्णनात्मक सुंदर कविता त्या वेळीं नुकत्याच पुढें येत होत्या. बालकवींच्या नादमधुर

निसर्ग-गीतांनीं गोविंदाग्रजांच्याहि प्रतिभेला झुलविलें; आणि त्या नादांत गोविंदाग्रजांनीं 'प्रेमपाठ,' 'भयंकर अरुण' व 'चांगला अरुण' हीं गीतें लिहिलीं. 'प्रेमपाठ' हें गीत म्हणजे बऱ्याच उत्प्रेक्षांची उलटापालट व कल्पनांची कसरत आहे. ही कसरत नादमधुर असून त्यांत कांहीं ठिकाणीं काव्याचीहि चमक मारते. 'अरुण' ही कविता म्हणजे नुसत्या उत्प्रेक्षा आहेत. नांवावरून प्रभातशोभेच्या रमणीय वर्णनाची कल्पना कोणा रसिकाच्या मनांत आली तर ती निव्वळ कल्पनाच ठरेल! प्रभातशोभेच्या वर्णनाची एक ओळही या कवितेंत नसून त्याच्या जागीं बऱ्या वाईट उत्प्रेक्षांची नुसती रेलचेल उडालेली आहे. ब्राह्ममुहूर्तावर भूपाळी आळविण्याचा प्रसंग गोविंदाग्रजांवर बहुधा सगळ्या हयातींत आला नसावा; मग प्रभातशोभेचें वर्णन साधणार कसें? या कवितेंतील कांहीं कल्पना नवीन असून मनोहर आहेत. 'भयंकर अरुण' अप्रसिद्ध आहे. या कवितेच्या ... दिलेल्या टीपेंत गोविंदाग्रजांनीं बालकवींचा प्रे... .ह. घुंगुरवाळा हें गीत उत्कृष्ट आहे. प... पतिपत्नींच्या पवित्र प्रेमावर ईश्वरी आशी... .च्या त्या पहिल्या साक्षीदाराला, पाळण्यांत ... नाचवितांना पाहून प्रेमळ मातेच्या प्रणयमूढ मन

१२२

कालेनाव ... .नहसारे स्थितं ।

असे ज्याचें भवभूतीनें ... तें आजचें प्रेमाद्वैत उभें रहातें; आणि पहिल्या परिचयाच्या प्रसं... , प्रेमाची, अस्फुट आनंदाची आठवण होऊन पाळण्यांत पहुडलेल्या लह... .डेवाळाला ती सहजच म्हणते—

वदलों जें न । संवादीं । तुझिया जन्माआधीं
पहिल्या प्रीतीचें । गमतीचे । कांहींसे भीतीचे
बाळा ! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल

त्या वेळीं हृदयांत झुळझुळणारें तें अस्फुट मंजुळवाणें गाणें गावयाला धीर झाला नाहीं.

वदलों मग पाहीं । दोघेंही । लाजुनि कांहीं कांहीं
हृदयीं खळवळलें । दरवळलें । विनाऐकिल्या कळलें !

तेंच गाणे आज तुझ्या वाळ्याभोंवतीं झुळझुळतें आहे; आणि म्हणूनच

गुंग झालें. गोविंदाग्रजांच्या रसवंतीच्या चढत्या उद्रेकांनीं महाराष्ट्ररसिकांना या पुढें कायमचें वेड लाविलें आणि गोविंदाग्रजांची कविता ' मनोरंजनांत ' येतांच-

> ही येतांच उठोनि कौतुक जणों नेत्रांतुनी पाहतें,
> धांवोनी अवधान ये लगबगां, कानीं उभें राहतें;
> देण्याला बहुमान मान लवते, उल्हास ये मानसा,
> वाटे आज शरत्प्रभात नटुनी ही येतसे राजसा.
>
> —चंद्रशेखर.

अशा तऱ्हेची विलक्षण स्थिति उत्सुकतेनें वेडावलेल्या महाराष्ट्ररसिकांची होत असे! ' गुलाबी कोडें ', पुढें टाकून रसिकांना रिझविण्याचा प्रयत्न गोविंदाग्रजांनीं यापूर्वीच केला होता. हा चिमुकला चुटका चमत्कृतिजनक आहे. पश्चिमक्षितिजावर रविसहवासानें चढलेली लाली पूर्वक्षितिजावर कां नाचते, रसिक प्रियकराच्या प्रेमचुंबनानें एका गालावर थरकणारी लाली दुसऱ्या गालावर कशी फिरकते, कां फिरकते,—हें कोडें अत्यंत मार्मिक व काव्यमय आहे. गोविंदाग्रजांच्या अनन्यसामान्य रसिकतेची साक्ष हें कोडें सदैव देत राहील. गुलाबी कोड्यापेक्षां ' पहिलें चुंबन ' विशेष सरस आहे. यौवनाच्या नव्हाळीनें खुलणाऱ्या मुग्धेचें वर्णन सुंदर साधलें असून

> नित्य जन्मुनी । मरण सोसावें
> परि पहिलें चुंबन घ्यावें । फिरुनिही ॥

हे उद्गार पहिल्या चुंबनानें मनाला लाविलेलें वेड किती उत्कट आहे हें उत्तम रीतीनें दर्शवितात. ' विचार ' हा चुटकाही फार चांगला साधला आहे. विचाराचें इतकें मर्मभेदक विनोदी वर्णन दुसरें नाहीं, निदान मराठींत तरी खचित नाहीं. ' वेडा ' ही कविताही अशीच मर्मभेदक आहे. या कवितेचें केशवसुती वळण रसपरिपोषाला अनुकूल आहे.

> " छे! मैदान उजाडतें, तरि तिथें हा वायु आहेच ना?
> वारें कांहितरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना!

हें वेड्याच्या भावशून्य भयाण मनांत खेळणाऱ्या भावनांचें वर्णन हृदयभेदक आहे. ' प्रेमपाठ ' हें गीत विशेष चांगलें उतरलेलें नाहीं. बालकवींच्या सृष्टिवर्णनात्मक सुंदर कविता त्या वेळीं नुकत्याच पुढें येत होत्या. बालकवींच्या नादमधुर

निसर्ग-गीतांनीं गोविंदाग्रजांच्याहि प्रतिभेला झुलविलें; आणि त्या नादांत गोविंदाग्रजांनीं 'प्रेमपाठ,' 'भयंकर अरुण' व 'चांगला अरुण' हीं गीतें लिहिलीं. 'प्रेमपाठ' हें गीत म्हणजे बऱ्याच उत्प्रेक्षांची उलटापालट व कल्पनांची कसरत आहे. ही कसरत नादमधुर असून त्यांत कांहीं ठिकाणीं काव्याचीहि चमक मारते. 'अरुण' ही कविता म्हणजे नुसत्या उत्प्रेक्षा आहेत. नांवावरून प्रभातशोभेच्या रमणीय वर्णनाची कल्पना कोणा रसिकाच्या मनांत आली तर ती निव्वळ कल्पनाच ठरेल! प्रभातशोभेच्या वर्णनाची एक ओळही या कवितेंत नसून त्याच्या जागीं बऱ्या वाईट उत्प्रेक्षांची नुसती रेलचेल उडालेली आहे. ब्राह्ममुहूर्तावर भूपाळी आळविण्याचा प्रसंग गोविंदाग्रजांवर बहुधा सगळ्या हयातींत आला नसावा; मग प्रभातशोभेचें वर्णन साधणार कसें? या कवितेंतील कांहीं कल्पना नवीन असून मनोहर आहेत. 'भयंकर अरुण' अप्रसिद्ध आहे. या कवितेच्या शिरोभागीं दिलेल्या टीपेंत गोविंदाग्रजांनीं बालकवींचा प्रेमादरपूर्वक उल्लेख केलेला आहे. घुंगुरवाळा हें गीत उत्कृष्ट आहे. पहिल्यावहिल्या बाळाच्या जन्मानें प्रेमळ पतिपत्नींच्या पवित्र प्रेमावर ईश्वरी आशीर्वादाचें अखंड कवच चढतें. प्रीतीच्या त्या पहिल्या साक्षीदाराला, पाळण्यांत घुंगुरवाळ्याच्या तालावर पाय नाचवितांना पाहून प्रेमळ मातेच्या प्रणयमूढ मनापुढें--

कालेनावरणात्ययात्परिणते यत्स्नेहसारे स्थितं ।

असे ज्याचें भवभूतीनें वर्णन केलें आहे तें आजचें प्रेमाद्वैत उभें रहातें; आणि पहिल्या परिचयाच्या प्रसंगींच्या मुक्या प्रेमाची, अस्फुट आनंदाची आठवण होऊन पाळण्यांत पहुडलेल्या लहानग्या लडिवाळाला ती सहजच म्हणते—

वदलों जें नादीं । संवादीं । तुझिया जन्माआधीं
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । कांहींसे भीतीचे
बाळा! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल

त्या वेळीं हृदयांत झुळझुळणारें तें अस्फुट मंजुळवाणें गाणें गावयाला धीर झाला नाहीं.

वदलों मग पाहीं । दोघेंही । लाजुनि कांहीं कांहीं
हृदयीं खळवळलें । दरवळलें । विनाऐकिल्या कळलें!

तेंच गाणें आज तुझ्या वाळ्याभोंवतीं झुळझुळतें आहे; आणि म्हणूनच

बाळा हालूं दे । बोलूं दे ! आनंदें डोलूं दे

एकच हा चाळा । वेल्हाळा । घे रे तान्ह्या बाळा !

त्याच वाळ्याच्या छंदावर गोविंदाग्रजांनीं हें गीत गाइलें आहे. रचनेच्या दृष्टीनें ' मुरली ' सुद्धां या गीतापुढें फिकी पडेल. समर्पक, साधे व सुंदर शब्द, हृदयाला हलविणारा मधुर–नितांतमधुर–अर्थ आणि रेखीव रचना या विरळ गुणांचा गोड समुदाय या गीतांत झाला आहे. ' गोड निराशा ' हें गीतहि असेंच रमणीय आहे. प्रणयिनीच्या चुंबनानें अतृप्त राहिलेल्या मनाची गोड निराशा या गीतांत गाइली आहे. नवतीच्या नयनमनोहर नवलाईनें नटलेली नाजुक नार ही पुष्पशराची फुलती दुनिया होय ! तिचें वर्णन करितांना रसिक कवि म्हणतात —

गुलाब होते दोन तसे । आनंदाचे गोड ठसे;

कळ्यावांचुनी फुललेले । कांट्यांच्या त्रासा चुकले;

जणूं फडकतीं मौजेचीं । नवीं निशाणें लाजेचीं !

ते हसणारे गुलाब पाहून —

हृदयीं धरिलें या भावा । एक तरी काढुनि न्यावा !

परंतु तीं जादूचीं फुलें हाताला लागत ना. कारण—

रक्षण त्यांचें करणार । मनांतला जादूगार !

तेव्हां मग––

निश्चय केला जिंकाया । जादूची असली माया;

तोंडानें उडवायाचा । मंत्र हांकिला प्रेमाचा !

पण या उपायानें गुलाब तोडावयाला गेल्यावर काय झालें ?

अधिक पसरला चहूंकडे । तोडितांच उलटा वाढे !

आणि या मांत्रिकाच्या अंगावर मात्र

त्या कुसुमांचे

संसर्गाचे

कांटे साचे

मांडिति अंगीं थैमान !

परंतु या फजितीनें तो मांत्रिक वरमला नाहीं. उलट

चोरी असली लाजेची । वाटे त्याला मौजेची !

आणि तो देवाला विनवितो—

निराशाच दे गोड अशी!

स्त्रीसौंदर्याच्या बाबतींत गोविंदाग्रजांची रसिकता अपूर्व आ... कविहि स्त्रीसौंदर्याचे चहाते होते; परंतु संस्कृत कवींचें सौंदर्य... वागजपाशिवाय क्वचितच पुरें झालेलें आढळतें! गोविंदाग्रजांची किंबहुना आ... निक कवींची रसिकता बरीच निर्दोष आहे. ‘विरामचिन्हें’ ही कविता चटकदार आहे. ‘हुरहुर’ हें चतुर्दशक कल्पनेच्या दृष्टीनें उत्तमांत मोडेल. ‘केशवसुत गेले’ ही कविता अगदीं सामान्य आहे; गोविंदाग्रजांची उत्कट गुरुभक्ति या कवितेवरून दिसून येते. ‘चिमुकलीच कविता’ हें एका दशवर्षी कन्यकेचें वर्णन आहे. हें वर्णन ह्मणजे सौंदर्यविषयक जुन्यानव्या कल्पनांची, उत्प्रेक्षांची व उपमांची एक कंथा आहे. एका ठिकाणीं ओंठांना गुलाबाच्या पाकळ्यांच्या घडीची उपमा, तर दुसऱ्या ठिकाणीं पारिजातकाच्या फुलांच्या देंठांची उपमा दिलेली आहे! गुलाबाच्या पाकळ्या व पारिजातकाचे देंठ यांचें सादृश्य गोविंदाग्रजांनीं बहुधा कल्पनानिर्मित बागेंतच पाहिलें असावें! किंवा निदान हा तांबडा ‘गुलाब’ तरी असावा!

निजहृदयींच उतराया वर्तुळ मुख जणुं लांववि ही!
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरीं पाप कोण बसवी?

असल्या नादमधुर व काव्यमय ओळी वाचल्या ह्मणजे मोरोपंतांच्या वाढल्या यमकांच्या हव्यासाशीं गोविंदाग्रजांच्या चढत्या उत्प्रेक्षांच्या हव्यासाची तुलना करावीशी वाटते! ‘ती कोण?’ हें चतुर्दशक सुंदर आहे. ‘ओसाड आडांतील एकच फूल’ हीं चतुर्दशकेंहि हृदयंगम आहेत;

आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें,
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं!

हें ओसाड आडांतील फुलाचें वर्णन किती हृदयविदारक आहे! ‘हा क्षण’ व ‘गीतविरक्ति’ या दोन्ही कविता चांगल्या आहेत. ‘कधीं!’ ही कविता रचना व रसपरिपोष या दोन्ही दृष्टींनीं मनोहर आहे. ‘—स,’ ‘प्रेमाखातर’ व ‘गोफ’ या तीन उत्तम कवितांत गोविंदाग्रजांच्या प्रेमविषयक कल्पना व्यक्त झाल्या आहेत.

रघुवीरांनीं जलनिधिवरती पर्वत नाचविले
सांग कोणतें संकट दुसरें त्यांवरि ओढवलें ?
कां ब्राह्मणपदपादशहाला राणी मस्तानी ?
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं ?
सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या ?

हें प्रेमाच्या महिम्याचें वर्णन अप्रतिम आहे. 'गोफ' या प्रेमगीतांत गुंफिलेला हृदयाच्या ब्रह्मांडांतला गोविंदाग्रजांचा अनुभव मनाला चटका लावितो. 'मुरलीचा नाद' हें गाणें गोड आहे. परतीरीं मुरलीमोहन उभा होता;

पैलथडीं कपटी काळा । ऐलथडीं राजसबाळा

नदीचें पाणी सारखें चढत होतें: परंतु मुरलीच्या नादांत विरून गेलेल्या गौळणीला त्याचें भान राहिलें नाहीं. आणि

तनु हरपली । जरी सलिलीं । तीं तरी । नच सांवरी

त्या जागीं दुसऱ्या दिवशीं गोपाळांना पुष्पांच्या नवख्या राशी दिसल्या! देहाचीं फुलें होण्याची ही कल्पना नवीन नाहीं; हा अद्भुत चमत्कार संतचरित्रांत आढळतो. 'सगुणस्वरूप' हें उत्कृष्ट गीत भक्तांच्या भावबळानें पंढरीला आणिलेल्या भक्तवत्सल भगवंताच्या श्यामसुंदर समचरणांवर वाहिलेलें आहे. 'वेंचलेलीं फुलें' हें गीत रसमधुर आहे. अनेक ठिकाणचीं फुलें वेंचिलीं आहेत, परंतु हीं फुलें मी कोणाला वाहूं! असा प्रश्न यांत कवीनें विचारिला आहे! 'मागें पहाणें' हें पद मनाची विपण्ण निराशा दाखवितें. जगाच्या वाळवंटावरली या फकिराची ही मुशाफरी सारखी चाललेलीच आहे;

जहांगिर या फकीर, हा पिशापरी।

राजा आणि रंक, जगज्जेता आणि फकीर या पिशाला सारखेच. या फकीराला कसलाच पायबंद नाहीं. कारण—

मागुनि मज शोकवशा । पाहीना कुणी आशा।

'मनांतली पाल,' 'तीन तरी' व 'एकाद्याचें नशिब' या तीन कवनांत गोविंदाग्रजांची कल्पकता दिसून येते. 'अल्लड प्रेमास' या गीतांत जगाचा कडु

अनुभव भरलेला आहे. ‘बागेंत बागडणाऱ्या लहानग्या लाडक्यास’ या गाण्यांतील कल्पना मनोरम आहेत. जीविताविषयींचे गोविंदाग्रजांचे उदास विचार ‘जीवितास’ या कवितेंत उतरले आहेत. ‘हलत्या पिंपळपानास’ हें गोड गाणें वाचून केशवसुतांच्या ‘म्हातारी’ या चुटक्याची आठवण होते. हें गाणेंही उदास मनानें गाइलेलें दिसतें. याची रचना कांहींशी कृत्रिम असूनही पुन्हा रेखीव नाहीं. ‘कांहीं इंग्रजी कविता वाचून’ हें गीत अत्यंत मार्मिक आहे. महाराष्ट्रांतील कांहीं आधुनिक कवींच्या थिल्लर मनोवृत्तींचें वर्णन करितांना कवि ह्मणतात—

अह्मां मराठी शाहिरांच्या कवनाचा वाहे पूर
समाधान त्यांतच चूर !
पोत घालुनी गळयांत, फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी,
कवीश्वरें चढलीं भारीं !

स्वतःच्या चार चुटक्यांच्या तुटपुंज्या तयारीवर भवभूति, मुक्तेश्वर, तुकाराम, यांच्यासारख्या वागीश्वरांना चीत करावयाला झटणाऱ्या कवींचें हें वर्णन समर्पक आहे. पूर्व कवींचा व्यासंग नसतां विद्यमान कवींच्या शिळया कल्पनांवर गुजराण करीत शब्दसृष्टि निर्माण करणाऱ्या कविकीरांचें काव्यदारिद्र्य पाहून इतका खेद होत नाहीं—

गरिबीला बोलणें नसे हें, दोष दरिद्री गर्वाला
हात घालि जो स्वर्गाला !

आणि या दरिद्र्यांची

बाष्कळ बडबड ऐकुनि चित्तीं हास्याचे ध्वनि उठतात
आणि आंतडीं तुटतात !

गोविंदाग्रजाच्या शिष्यत्वाचीं बिरुदें मिरविणारांनीं जर हा उपदेश ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें आचरण केलें तर या उपदेशाचें पुष्कळच चीज होईल.

गोविंदाग्रजांची बरीच कविता अप्रकाशित आहे. या अप्रकाशित कवनांत ‘प्रेमाचा प्रळयकाळ’ हें कवन अत्युत्कृष्ट आहे. महात्म्यांच्या—‘परावें तें आत्मवत्’ मानून जगदुद्धाराकरितां सर्वस्व सांडणाऱ्या अलौकिक विभूतींच्या-उदात्त भावनांची परमावधि हाच ‘प्रेमाचा प्रळयकाळ’ होय ! त्या प्रळय-

काळाचें अद्भुतरम्य वर्णन या कवनांत केलेलें आहे. रा. न. चिं. केळकर यांच्या ‘ वेषभूषा ’ या चिमुकल्या चटकार चुटक्याचें अभिनंदन ‘ वेषभूषाकारास सादरार्पित पद्यभूषा ’ या नादमधुर गीतानें गोविंदाग्रजांनीं केलें आहे. बालकवि त्र्यं. बा. ठोमरे यांना उद्देशून गोविंदाग्रजांनीं एक गोड भूपाळी गाइली आहे. बालकवीवरील त्यांचें प्रेम या भूपाळींत दिसून येतें. बालकवींच्या ‘ अरुण ’ व ‘ चौघडा ’ या दोन सुंदर गीतांचा उल्लेख या भूपाळींत आला आहे. याशिवाय एका ‘ बालकवीची ’ नादमधुर परंतु अर्थशून्य कविता वाचून

गा रे गा रे गाच जरा । माझ्या चिमण्या मुशाफरा !

हें मधुर गीत गोविंदाग्रजांनीं गाइलें आहे. ‘ शेवटची कविता ’ हें हृदयंगम गीत लिहून गोविंदाग्रजांनीं काव्यदेवतेला आत्मसमर्पण केल्याचें दिसतें; चराचराला आपल्या कर्तृत्वाचा इतिहास या गीतांत त्यांनीं ऐकविला आहे. इंग्रजी धर्तीवर लिहिलेला शिवप्रभूचा ‘ पांच देवींचा पाळणा ’ पूर्ण होता तर चांगला झाला असता. ‘ भीमक बाळा ’ हें कवन काशिकवींचें अनुकरण दिसतें. महाराष्ट्राचे वंद्यचरित लोकनायक बाळ गंगाधर टिळक विलायतेला गेल्या वेळीं त्यांना निरोप म्हणून गोविंदाग्रजांनीं एक कविता लिहावयाला घेतली होती; ती अपुरी असल्यामुळें तिच्याविषयीं कांहींच म्हणतां येत नाहीं. ‘ महाराष्ट्र ’ ही कविताहि अपूर्ण आहे. अंजन कांचन करवंदींच्या देशा, शिवरायांच्या–टिळकांच्या देशा, अशा संबोधनांनीं महाराष्ट्राला गौरवून, संतकवींची साधी वाणी जिथें नांदली, तिथेंच श्रीपादांची—कोल्हटकरांची कलावती वाणी, कृष्णाची—केशवसुतांची जोरदार वाणी, गीतारहस्याची गहनवाणी नांदत आहे; गाईच्या दुधाच्या धारेच्या तालावर भूपाळी आळविणाऱ्या होनाजी बाळाची रसाळ वाणी,

प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला

असें जिचें वर्णन स्वतःच प्रभाकरानें केलें आहे ती त्याची ओजस्वी वाणी इथें नांदत आहे. असा महाराष्ट्राचा महिमा या गीतांत गाइला आहे. या गीतांत अभिमान आहे, परंतु ओज नाहीं इतकें मात्र खरें. ‘ घुबड ’ ही कविता पूर्ण वाचावयास न मिळाल्यामुळें इथें नुसत्या उल्लेखावरच भागविणें प्राप्त आहे.

गोविंदाग्रजांच्या निवडक कवितांचें स्वरूप अशा तऱ्हेचें आहे. गोविंदाग्रजांची

कविता विविध विषयांवर असली तरी त्यांच्या कवितेचें ध्येय प्रेम—अहेतुक प्रेम–हेंच आहे;

अर्धे जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे.

अशा तऱ्हेचें ज्याचें वर्णन गोविंदाग्रजांनीं केलें आहे, त्या जीवित–वसंताच्या ऐन बहरांत, गोविंदाग्रजांना अर्धविराम तर राहोच, परंतु स्वल्पविराम सुद्धां न मिळतां उलट निर्वाणीच्या निराशेचें निबिडतिमिर अंतःकरणांत दाटून त्या तसल्या उदास मनःस्थितींत—

अवेळ तरीहि बोल—कोकिळे !–अवेळ तरीहि बोल. !

असे करुणोद्गार काढून काव्यदेवतेला आळविणें अखेर प्राप्त झालें ! आणि विषण्ण चित्तावर वात्सल्याचा वर्षाव करण्याचें हें अलौकिक ईश्वरतेचें काम काव्यकोकिळेनें बजावल्यामुळें प्रपंचापासून पराङ्मुख झालेलें त्यांचें हताश मन प्रेमस्वरूप परमेश्वराच्या प्रेमसुखाचा अनुभव घेण्याकरितां आतुर झालें; प्रेमसंन्यासांत लीलेच्या संशयित दृष्टीनें साशंक भावानें परमेश्वराकडे पहाणारे गोविंदाग्रज पुण्यप्रभावांत वसुंधरेच्या अढळ आत्मविश्वासानें ईश्वराला आळवितांना याच आतुरतेमुळें दृष्टीस पडतात. वृंदावनाच्या पाषाणहृदयांत वत्सलभावानें अवतरलेला वसुंधरेचा भक्तवत्सल भगवंत हाच गोविंदाग्रजांच्या हृदयांत दाटलेल्या निर्वाणीच्या निराशेंतून अमर आशेच्या—अहेतुक भक्तीच्या–रूपानें अवतरलेला प्रेमानिधान परमेश्वर होय ! ' भुताच्या गाण्यांत ' ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंक असलेले गोविंदाग्रज ' अनामिकाच्या अभंगांत '

पांडुरंगा ! आम्ही युगाचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥

असल्या उद्गारांनीं आपल्या पापाचा पाढा वाचून—

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिलें आपोआप ॥

अशा अनन्य भावानें देवाच्या सख्यत्वासाठीं आतुर झाले ! देवदयेनें दीर्घायुष्य लाधतें तर महाराष्ट्राच्या श्राव्य व विशेषतः दृश्य काव्यांत उत्तम प्रतीची भर घालून गोविंदाग्रजांनीं आपलें शेष आयुष्य कदाचित् पांडुरंगाचें गुणगान करण्यांत घालविलें असतें. परंतु देवाच्या मनांत भलतेंच आलें; आणि महाराष्ट्रशारदेचा हा राजस राजहंस अकालीं कालवश झाला ! आयुष्याचे जे थोडेसे दिवस गोविंदाग्रजांनीं या जगांत काढले, त्यांत त्यांना

सुखाचा वारा असा फारच थोडा लागला. त्यांचें बाळपण दारिद्र्यांत, तारुण्य दुःखांत आणि अखेरचें आयुष्य दुर्धर रोगांशीं झगडण्यांत गेलें! तारुण्यांत त्यांच्या वर्तनाला आळा उरला नव्हता असा लोकप्रवाद आहे. तरुणपणीं अनावर होणाऱ्या मनोवृत्तींना प्रेमबंधनानें प्रपंचांत स्थिर करणारा मनाचा आळा तुटला कीं पुढें वर्तनाचाही आळा सुटत असतो. गृहसुख गोविंदाग्रजांना कधींच लाधलें नाहीं व त्याचाच हा बहुधा परिणाम असावा. परंतु या परिणामाचें प्रतिबिंब त्यांच्या कवितेवर पडलेलें नाहीं. त्यांची कविता निराश असली तरी पापभावनांचा संपर्क तिला लागलेला दिसत नाहीं. कवीचें मन भावनावश असतें; आणि म्हणून सामान्य मनुष्य जीं प्रापंचिक दुःखें सहज विसरतो तीं दुःखें त्याच्या मनांत नेहमीं घोळत रहातात. कोमल भावनांची—प्रेमळ मनोवृत्तींची पायमल्ली झाली तरी सामान्य मनुष्याला ती तितकी जाणवत नाहीं आणि झाल्यागेल्या गोष्टींच्या वायफळ चिंतनांत वेळ न घालविणाऱ्या प्रापंचिक मनाचा संसार सुखानें होतो! परंतु आयुष्यांत अनुभवलेलीं सुखदुःखें कल्पनेनें पुनःपुन्हा अनुभवून गुंग होणाऱ्या आणि आपल्यावरोबर जगानें गुंग व्हावें म्हणून धडपडणाऱ्या भावनावश कवींना कोमल भावनांची—प्रेमळ मनोवृत्तींची पायमल्ली झाली कीं, प्राणांतिक दुःख होतें. असलीं दुःखें अनुभविण्यांत गोविंदाग्रजांचें तारुण्य गेलें व असल्या अनुभवांचीं दृश्यें चितारण्यांत त्यांचें आयुष्य गेलें!

गोविंदाग्रजांच्या कवितेचें वळण सामान्यतः जुनें आहे. त्यांच्या कल्पना नवीन असल्या तरी त्या नवीन भासत नाहींत; नवीन भासूं नयेत अशा खुबीनें ते आपल्या नवीन कल्पना मांडतात. गोविंदाग्रजांच्या कवितेचें हे नव्या परिस्थितील साजणारें जुनें वळण मोहक आहे. जुन्या कवींपैकीं तुकाराम, श्रीधर यांच्या कवितेचें त्यांचें अध्ययन जिव्हाळयाचें होतें. भाषाप्रभुत्वासाठीं मोरोपंतांचा अभ्यासहि त्यांनीं केला होता. शेले, कीट्स व विशेषतः बायरन या इंग्रजी कवींच्या कवितेचेंहि त्यांनीं चांगलें परिशीलन केलें होतें. गुजराती भाषा ही त्यांची ‘जन्मभाषा’ असल्यामुळें त्या भाषेचें अध्ययन त्यांना सहज घडलें होतें; व विख्यात गुजराती कवि कलापि याच्या स्फुट कविता त्यांना अत्यंत प्रिय होत्या. आधुनिक कविमंडळांत केशवसुत व कोल्हटकर सोडले तर विनायक, दत्त व तांबे यांच्या कवितेवर त्यांचा विशेष लोभ असे. समकालीन Bee

यांच्या कवितेविषयीं त्यांना फार आदर होता; बालकवींविषयीं त्यांचा स्नेहभाव आणि आदर विशेष असे. आधुनिक कविमंडळांतील वडील पिढीविषयीं त्यांचा आदर अनन्यसामान्य होता. मराठी शाहिरांचा त्यांचा व्यासंग विलक्षण होता व त्या व्यासंगाची छाया त्यांच्या कवितेवर अतोनात पडली आहे. 'महाराष्ट्र,' 'प्रेम आणि मरण,' 'कळगीचें गाणें' हीं गीतें या व्यासंगाचींच फळें आहेत. 'मुरली' या गाण्याचा उत्तरभागहि याच साहित्यानें सजविलेला आहे. 'कृष्णाकांठीं कुंडल' हें कवन म्हणजे या उसनवारीचा अतिरेक होय! इतकी उसनवारी करूनहि गोविंदाग्रज 'मी कोणापासून कांहींहि घेतलें नाहीं' असें म्हणतच असत. वस्तुतः अशी उसनवारी करण्यांत बिलकूल कमीपणा नाहीं; मात्र ती जरा कुशलतेनें केली पाहिजे. पूर्व कवींच्या काव्यसंभारांतून आपल्याला उपयुक्त तें साहित्य घेऊन जर निराळी अधिक मनोहर अशी सृष्टि उत्पन्न करितां आली तर त्या योग्य उसनवारीचें चीज होतें; व तशी उसनवारी करणें हें एकापरी भूषणास्पदच आहे. महाराष्ट्रांतील सर्व पूर्वकवींनीं अशी उसनवारी करून 'पूर्वजांच्या' ठेवण्यांत चांगली भर घातली आहे. अशा उसनवारीचा उपहास करणारांना व अशी उसनवारी आपण करीत नाहीं असा डौल मिरविणारांना उद्देशून मुक्तेश्वरांनीं

कितीएकांसी आग्रह मोठा । नातळों ह्मणती कवि-उच्छिष्टा
हा समर्थवाद योग्य श्रेष्ठा । ईश्वरकृपा ह्मणोनी ॥
एकएक अक्षराची भीक । जीर्ण कवींतें मागूनि देख
मी सर्वज्ञ कविनायक । ऐसें ह्मणविल लौकिकीं ॥

असे मार्मिक उद्गार काढिले आहेत. या दृष्टीनें विचार केला तर गोविंदाग्रजांचा डौल वावगा व व्यर्थ वाटतो. अनुकरणाचा त्यांना अत्यंत तिटकारा होता, परंतु त्यांचें बहुतेक सगळें अमर कर्तृत्व अनुकरणात्मक आहे! आपल्या तोडीचा कोणीही कवि उरला नाहीं अशी खात्री करून घेऊन गोविंदाग्रजांनीं काव्यरचना सोडली! गोविंदाग्रजांच्या डोळ्यांदेखत दोन दशकांच्या अल्प अवधींत 'फुलराणी,' 'निर्झर' व 'कवीची इच्छा' असलीं अनन्यमधुर गीतें गाऊन बालकवि गेले; गोविंदाग्रजांच्या डोळ्यांदेखत 'कमला,' 'चांफा,' 'वेडगाणें' हे Bee या आज सुदैवानें हयात असलेल्या कवींच्या प्रतिभेचे प्रकामसुंदर प्रसव महाराष्ट्राच्या पुढें आले. असलीं

उत्कृष्ट कविता पुढें येत असतां 'माझ्यासारखा कवि आतां कोणी उरला नाहीं' असे दर्पोद्गार काढणें अत्यंत अधम मनोवृत्तींनाच साजतें. असल्या दुर्मद दर्पोक्तीला भाविक भक्त मान तुकवितील; परंतु ज्या राष्ट्रानें ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम व केशवसुत निर्माण केले त्या राष्ट्राच्या वाङ्मयाचे विवेकशील विद्यार्थी असल्या बाष्कळ बडबडीला कवडीची किंमत देणार नाहींत. दासबोधासारखा अनन्य-साधारण ग्रंथ लिहिणाऱ्या सत्कवीनें पुढें होणाऱ्यासुद्धां कवींना वंदन केलें आहे. त्या मानानें गोविंदाग्रजांना इतका गर्व व्हाण्याचें अगदींच कारण नाहीं. असो. अध्ययनाचा संस्कार गोविंदाग्रजांच्या कवितेवर फार झाला आहे; व त्यामुळें त्यांच्या कवितेचें वळण जुनेंच आहे. नवीन कल्पना जुन्या वेंचक शब्दांनीं गुंफण्याची त्यांची हातोटी अपूर्व होती; व म्हणून त्यांची कविता सहसा परकी किंवा अपरिचित वाटत नाहीं. गोविंदाग्रजांच्या कवितेंत आढळून येणारी विलक्षण कल्पकता हें त्यांची कविता लोकप्रिय व्हावयाला एक प्रबळ कारण झालें. त्यांचीं नाटकें लोकप्रिय, विशेषतः नवीन पिढीला फार प्रिय झालीं; व आरंभीं नाटकांकडे झुकलेला हा लोकप्रियतेचा ओघ त्यांच्या कवितेकडे वळण्यास विलंब लागला नाहीं. इंग्रजी कवितेची ज्यांच्यावर मोहनी पडली होती, परंतु केशवसुत-टिळकांची साधीभोळी कविता ज्यांना आवडली नाहीं, त्यांचा लोभ गोविंदाग्रजांच्या शब्दसुंदर कवितेवर तेव्हांच जडला. आम्ही महाराष्ट्रीय बौद्धिक करामतीचे विशेष चहाते आहों. आणि गोविंदाग्रजांच्या कांहींशा क्लिष्ट, रम्य व चमत्कारिक कल्पनांनीं व सुंदर रचनेनें आमच्या बुद्धीला तेव्हांच मोह घातला! विनायकांची जोरदार वाणी, केशवसुत-टिळकांचीं साधींच परंतु हृदयंगम कवनें आणि बालकवींचे मधुर बोल आम्हांला भुलवावयाला असमर्थ ठरले. याचें कारण, आम्हांला क्षणभर स्तिमित करील असें बुद्धिवैभव त्यांत आमच्या दृष्टीला पडलें नाहीं. त्यांची कविता म्हणजे नुसता अंतःकरणाचा उमाळा!-मजेदार उत्प्रेक्षा नाहींत, चमत्कारिक कल्पना नाहींत, सुंदर शब्द नाहींत;-आमच्या बुद्धीला भुलवील, मस्तकाला डुलवील, असें त्यांत काय आहे? महाराष्ट्राच्या बुद्धीला गोविंदाग्रजांनीं थक्कित केलें व म्हणून गोविंदाग्रज महाराष्ट्राला प्यार झाले. गोविंदाग्रजांच्या कवितेनें आधुनिक कवितेकडे महाराष्ट्राचें लक्ष्य कायमचें वेधलें; आधुनिक कवितेच्या आयुष्यांत गोविंदाग्रजांनीं ही चिरस्मरणीय क्रांति घडवून आणिली आहे. गोविंदाग्रजांच्या

बुद्धिवैभवाच्या प्रभेनें त्यांची कविता विराजते आहे. केवळ रसभावपूर्ण अशी त्यांची कविता थोडी; व ही रसभावपूर्ण कविताहि बहुतेक प्रेमभक्तिपर आहे. राष्ट्रीय कवनें त्यांचीं जवळ जवळ मुळींच नाहींत: समाजाशीं त्यांना कधींच तद्रूप होतां आलें नाहीं; राष्ट्रीय आकांक्षांशीं ते एकतानतेनें समरस झालेले सहसा दिसत नाहींत. त्यांच्या मनाचा ओढाच तिकडे नव्हता व त्यामुळें त्यांना राष्ट्राशीं उत्कटतेनें कधींच तद्रूप होतां आलें नाहीं. 'भुताचें गाणें,' 'दसरा' व 'महाराष्ट्रगीत' हीं गीतें कमीअधिक प्रमाणानें ह्मणूनच नीरस, निर्जीव उतरलीं आहेत. हा दोष नव्हे; सगळ्या भावनांचें सारखें वर्णन एकाच कवीला साधणें शक्य नाहीं. आणि ह्मणूनच गोविंदाग्रजांच्या कवित्वाला या उणेपणानें बाध येत नाहीं.

गोविंदाग्रजांच्या कवितेच्या सामान्य स्वरूपाचें विवेचन येथवर झालें; आतां गुणदोषविचार. गोविंदाग्रजांनीं केशवसुतांच्या पाउलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्या प्रयत्नांत गुणांबरोबर अवगुणही त्यांच्या कवितेंत उतरले आहेत. केशवसुतांच्या धर्तीवर गोविंदाग्रजांनीं कांहीं चतुर्दशकें लिहिलीं आहेत; हीं चतुर्दशकें सामान्यतः चांगलीं आहेत; व त्यांतल्या त्यांत 'ती कोण?' हें उत्कृष्ट आहे. केशवसुतांच्या मानानें गोविंदाग्रजांची काव्यरचना चोखट आहे. परंतु सामान्यतः गोविंदाग्रजांची रचना सदोषच आहे. ऱ्हस्वदीर्घांचा निर्बंध त्यांना अगदीं पाळतां आला नाहीं. 'मनांतली पाल,' 'मनांतली दिवसरात्र,' 'चिमुकलीच कविता,' 'मुरली' हीं गीतें या विधानाची उत्तम साक्ष पटवितील. रचनेचा रेखीवपणाहि विशेषसा आढळत नाहीं. गद्यरचना तर पुष्कळच ठिकाणीं आहे. 'गुलाबी कोडें,' 'चिमुकलीच कविता,' 'लीलेस' या कविता ह्मणजे शुद्ध छंदोबद्ध गद्य आहेत. कल्पना नुसती काव्यमय असून उपयोगी नाहीं; रचनेंतहि काव्य खेळलें पाहिजे.

"ओंठ-गोष्ट मग कशीं बोललीं तीं मिटलीं तोंडें"

या चरणांत व गद्यांत काय अंतर आहे?

"जोडीचा महिमा असा चहुंकडे; धिक् सर्व जोडीविणें,
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें."

किंवा "नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं"

या ओळीहि मासलेवाईक आहेत. 'वेडा' हीं चतुर्दशकेंहि गद्याशीं आपलें जवळचें नातें दाखवितात. केशवसुतांप्रमाणें निष्कारण गांवढळ व रांगडे शब्दहि गोविंदाग्रज योजीत असत. भकास, झपझपा, पत्ता, पल्याड, कुंपणें, वाडगें, ओंड हे शब्द अगदीं रांगडे असून त्यांचा उपयोगहि रसापकर्षक झाला आहे. त्याचप्रमाणें मर्या, तीर्यजल, प्रवहण असले क्लिष्ट संस्कृत शब्दहि क्वचित् आढळतात. 'वेडा' या कवितेंत 'रंगाविती' असा चमत्कारिक प्रयोग आला आहे; ज्ञानेश्वरींत 'तेंचि रंगाथिलें अंबर' असा प्रयोग आहे. परंतु 'रंगाविती' असा प्रयोग मराठींत कोठेंहि आढळत नाहीं. अर्थातच हें नाणें गोविंदाग्रजांनीं अगदीं खासगत टांकसाळींतून काढिलेलें दिसतें! 'वेडा' या कवितेंतील—

"व्हावें काय तयास हें समजण्या रस्ता न कांहीं उरे"

या चरणांत 'मार्ग' या संस्कृत शब्दाऐवजीं 'रस्ता' हा मराठी शब्द योजिला आहे. मराठींत असा उपयोग आजपर्यंत कोणींही केलेला नाहीं; अर्थातच गोविंदाग्रजांनीं हा नवीन उपयोग रूढ करण्याचें श्रेय मिळविलें आहे! 'एकाद्याचें नशिब' या कवितेंतील—

"अर्धे जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे"

या चरणांत 'साक्षी' हा शब्द उपयोजिला आहे; 'मनाची साक्ष पटली' असें म्हणतात; 'साक्षी पटली' असें कधींहि म्हणत नाहींत. अर्थात् हाही प्रयोग गोविंदाग्रजांचा अगदीं खासगत असावा! रांगड्या शब्दांचा दुरुपयोगाप्रमाणें सदुपयोगहि कित्येक ठिकाणीं केलेला आहे. डोकावति, ब्याद, सांथी, पेरणी, मळा, थैमान, दफन, वेड्याबगड्या हे शब्द कुशलतेनें उपयोजिलेले आहेत. वर्णनाच्या ऐन ओघांत किंवा भाषणाच्या भरांत परकी भाषेंतील समर्पक शब्दांचा अथवा वेंचक वाक्यांचा उपयोग कित्येक प्रसंगीं रसपरिपोषक होतो; असा उपयोग करण्याची संधि मोरोपंतांनीं सहसा वायां जाऊं दिलेली नाहीं. गोविंदाग्रजांनींही

"दुःख सब झूट"
"अब खेल करो बनमालि!"
"खुबी ओळखा क्या है अंदर!"

असे मोरोपंती वळणाचे उपयोग 'पुनर्जात प्रेमास,' 'मुरली,' 'फुटकी तपेली'

व ' कुंडल ' या कवितांत केलेले आढळतात. परकी शब्दांचा उपयोगही गोविंदाग्रजांनीं आपल्या कवनांत अगदीं सर्रास केला आहे. त्यांच्या वाचनांत त्यांना जो जो चांगला म्हणून शब्द आढळला त्या त्या शब्दाला त्यांनीं आपल्या कवितेंत कुठें ना कुठें तरी स्थळ दिलें आहे !

" ' वरं ब्रूहि ' झाली वदती "

असा मोरोपंती धर्तीचा संस्कृताचा उपयोगहि केलेला सांपडतो. स्वतःच्या प्रतिभेच्या प्रभावानें गोविंदाग्रजांनीं कांहीं नवीन सांप्रदायांचीहि मराठींत भर घातली आहे. गोविंदाग्रजांचे हे सांप्रदाय रमणीय आहेत. ' अश्रूंची मोहनमाळ,' ' फुलती दुनिया,' ' गाणें झुळझुळणें,' 'गाणें उधळणें,' ' वाऱ्यावरची वरात,' ' जीवाची झूल,' ' जिवाचा रास,' हे त्यांचे सर्वच सांप्रदाय मनापुढें एकएक गोड कल्पना उभी करितात. इंग्रजी शब्दांचा उपयोग, मोगरे यांच्या धर्तीवर, गोविंदाग्रजांनीं कोठेंहि केलेला आढळत नाहीं. एकच अपवाद आहे; ' समसमा संयोग कीं जाहला ' या कवितेंत ' ग्रामोफोन ' हा शब्द उपयोजिला आहे ! गोविंदाग्रजांची कविता बहुतेक सद्वृत्त आहे. ' मुरली,' घुंगुरवाळा,' ' गोड निराशा,' ' दसरा,' ' अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ' व ' कलगीचें गाणें,' हीं वृत्तें त्यांच्या वृत्तयोजकत्वाची साक्ष देतात. केशवसुतांच्या कवितेंत कृत्रिमता व कल्पनांची पुनरुक्ति अगदीं नाहीं. गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें केवळ कृत्रिम आहेत; ' हृदयशारदेस ' हें गीत कृत्रिमतेचा उत्तम नमुना आहे. केशवसुतांच्या प्रेमगीतांत आढळणारी उत्कटता गोविंदाग्रजांच्या प्रेमगीतांत निम्म्यानें सुद्धां दिसत नाहीं; नुसता कल्पनेचा खेळ व भाषेचा नखरा मात्र आहे. गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें श्रुतिसुभग आहेत परंतु हृदयंगम नाहींत. उत्प्रेक्षांचेंहि विलक्षण वेड गोविंदाग्रजांना होतें. रसहानि पत्करली, परंतु चढत्या उत्प्रेक्षा सुटतां कामा नयेत असें त्यांचें धोरण असे. या त्यांच्या दुष्ट धोरणाला ' अरुण,' ' प्रेमपाठ,' ' चिमुकलीच कविता ' हीं गीतें बळी पडलीं आहेत. परंतु एकंदरींत केशवसुतांपेक्षां गोविंदाग्रजांचें पाऊल प्रगतीच्या मार्गांत कांहीं बाबतींत तरी पुढें पडलें आहे यांत शंका नाहीं.

गोविंदाग्रजांच्या कवितेच्या गुणदोषांचा येथपर्यंत विचार झाला. विविध विषयांवर गोविंदाग्रजांनीं जरी कवनें रचिलीं असलीं तरी त्यांच्या कवित्वाचा उत्-

कर्ष मनोवृत्तींचें, अंतर्वृत्तींचें वर्णन करितांनाच विशेषतः दिसून येतो. प्रेम, अहेतुक प्रेम, निराशप्रेम हेंच गोविंदाग्रजांच्या कवितेचें ध्येय होतें; आणि अहेतुक प्रेमाचें, अहेतुक प्रेमाकरितां लागलेल्या निराश तळमळीचें वर्णन करितांना त्यांची रसवंती वर्ण्यविषयाशीं अगदीं तद्रूप होऊन नितांतसुंदर नवीनच सृष्टि निर्माण करिते. कवीचें अंतःकरण ज्या विषयावर विशेष आसक्त असतें त्याच विषयाचें वर्णन त्याच्या हातून सरस उतरतें आणि म्हणूनच ज्या विषयाच्या वर्णनांत कवीच्या कवित्वाचा परम उत्कर्ष झालेला आढळतो, त्याच विषयाला कवीनें आपलें वाग्वैभव वाहिलें आहे, तोच विषय कवीला ध्येयीभूत आहे असें समजण्यांत येतें. गोविंदाग्रज प्रेमाचे शाहिर होते, मुरलीचे शाहिर होते असें म्हणूनच म्हणावयाचें. 'प्रेम आणि मरण' ही त्यांची उत्कृष्ट कविता हें त्यांचें ध्येय किती उदात्त होतें याची उत्तम साक्ष पटविते.

"जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी!"

—होनाजी बाळ.

या आख्यायिकेप्रमाणें प्राणाहुतीनें पूर्णत्वाला पावणाऱ्या परमोच्च पतंगप्रेमाचें वर्णन या कवनांत केलें आहे. या कवनाच्या हृदयस्पर्शी कथासूत्राचा अगदीं विरळ धागा

"वृक्षावरी वीज जधीं पडावी
त्याच्या स्थितींतचि तिची महती पहावी"

या केशवसुतांच्या एका साध्या कवितेंतील दोन चरणांत सांपडतो! या कथासूत्रांत गोविंदाग्रजांनीं अहेतुक प्रेमाचें उत्कृष्ट तत्व गुंफिलें आहे. एका मोकळ्या मैदानांत एक वृक्ष वाढला होता. या वृक्षाच्या भोंवती झुडपांची व वेलींची गर्दी होती. परंतु त्यांपैकीं एकहि वेल त्या वृक्षराजाच्या आश्रयानें सनाथ झाली नव्हती. त्या वेली त्याच्या आश्रयाकरितां तळमळत होत्या!

परि कर्माचें विंदान।
कांहीं तरि असतें आन॥ चहुंकडे॥
कोणत्या मुहूर्तावरती।
मेघांत वीज लखलखती॥ नाचली॥

आणि अंतराळांत ती प्रभातरल ज्योत तळपतांच

त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ।

तेव्हांपासून त्या वृक्षाला त्या गगनांतल्या चंचल बालेचें-विद्युल्लतेचें वेड लागलें. त्या वेडानें तो वृक्षराज जगांतून उठल्यासारखा झाला;

मुसळधार पाउस पडला ।
तरि कधीं टवटवी त्याला ॥ येइना ॥
कैकदां कळयाही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या ॥ परि कधीं ॥

वसंतऋतु आला परंतु त्या ध्यानमग्न वृक्षाला पालवी फुटली नाहीं. पावसाच्या नव्या पाण्यानें त्याला त्यापुढें कधींच नवजीवन प्राप्त झालें नाहीं. अशा रीतीनें तो जगाला मेल्यासारखा झाला. परंतु त्याच्या या दुरवस्थेंत असहज असें कांहींच नव्हतें.

कारण—

प्रीतिचा रोग । लागला ज्याला ।
लागतें जगावें त्याला । हें असें ॥

हें त्याचें विलक्षण वेड पाहून भोंवतालची दीड वितीची दुनिया त्याची कींव करूं लागली. परंतु इतरांच्या तिरस्कारानें त्याच्या त्या असिधाराव्रतांत अणुभरहि उणेपणा आला नाहीं.

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥

इष्काचें वेड ज्याला लागलें त्या जीवाची स्थिति जिवंत असून अशी मेल्यासारखी होते. तो त्या वृक्षाचा निर्वाणींचा निश्चय पाहून संतुष्ट झालेली तपोदेवता त्याच्यापुढें प्रगट होऊन ह्मणाली—

तप फळास आलें पाहीं ।
माग जें मनोगत कांहीं ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होई ॥ नंदनीं ॥

प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवरा ॥

परंतु हीं सगळीं भाग्यपदें त्या वृक्षानें नाकारलीं; तो म्हणाला—

देवि सर्व दे । हेंचि एक दे ।
भेटवीं मजला । जीविंच्या जिवाची वाला ।

त्याचें तें विलक्षण मागणें ऐकून देव चकित झाले व म्हणाले

स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी ॥

हें त्या विजेचें वेड तूं सोड, असें त्यांनीं त्या वृक्षाला नानापरींनीं सांगितलें; तेव्हां तो निग्रही वृक्षराज अखेर उपहासानें म्हणाला—

निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें ॥ धिक् तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा ॥ मग पुढें ॥

इतकें बोलून तो गप्प बसला; त्याचा तो निग्रह पाहून निरुपाय झालेल्या देवांनीं त्याच्या इच्छेप्रमाणें विद्युल्लतेला प्रेरणा केली; तेव्हां ती

धांवली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ॥ त्याकडे ॥

आणि त्या विजेचा स्पर्श त्या वृक्षाला होतांच त्या क्षणीं काय झालें ?—

वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला ॥

परंतु त्या प्रेमज्योतीच्या स्पर्शानें जळत असतांनाच त्या कैक वर्षें न पालवलेल्या जीवन्मृताला-वठलेल्या वृक्षाला अलौकिक आनंदानें एकदम पालवी फुटली; व

हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारीं ॥ हांसलीं ॥
त्या कळ्या सर्वही फुलल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥ अजुनिही ॥

ही अद्भुतरम्य कथा सांगून गोविंदाग्रज म्हणतात–

प्रीतिचा रोग । लागला ज्याला ।

लाभतें मरणही त्याला । हें असें ॥

हें गीत अतीव हृदयद्रावक आहे. याची रचनाहि रेखीव असून भाषा शाहिरी थाटाची—रसपरिपोषाला अतिशय अनुकूल आहे. असल्या निराशप्रेमाचा अनुभव गोविंदाग्रजांना आला होता. त्या अनुभवाचीं अभ्रें स्मरणाच्या क्षितिजावर दाटल्यामुळें व्याकुळ होऊन 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस' गोविंदाग्रजांनीं एकदां आळविली होती. ती अपरात्र होती.

निष्प्रेमाची शेज सोबती
भयाण दुनिया सारी भंवती

असें त्या वेळीं संसाराचें स्वरूप दिसत होतें. भुरकट काळ्या मेघांची गर्दी आकाशांत झाल्यामुळें कृष्णपक्षांतल्या कृश चंद्रकलेचे कोमल चांदणें अधिकच निस्तेज झालें होतें. त्यांतच भयाण वाऱ्याची भर पडून

उदासीनता छाया पसरी
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी
खिन्नताच तरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

असें वाटूं लागलें होतें. अशा त्या अवकाळीं हताश हृदयाला सांत्वनाचे शब्द कोण सांगणार ? जगांत सुखाचे सोबती, भाग्याचे भागीदार, वाढत्या वैभवाचे वाटेकरी हवे तितके आहेत. दुनिया दुर्बळांची, दुःखितांची नाहीं; भाग्यवंतांच्या भाग्यांत भर घालण्याकरितां दुनिया धडपडते !

असतां आनंदाची माया
वृद्धि क्षणभर तिची कराया,
लागे ज्याचा तोच गावया
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु अभाग्याला आनंदाचीं गाणीं गाण्याचें काम ईश्वरतेचें—उदात्त अंतःकरणाचें आहे. ह्मणून अशा या उदास अपरात्रीं हें बाहेरचें जग सुखनिद्रित असतां हें हताश हृदय, ही अभागी अंतःसृष्टि

रडते तशीच राहुनि जागी
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !

आणि ही अवेळ तरी कसली ?

अवेळ येथ कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांही !
अनुकंपेला नियम न कांहीं !

रिघ्या मनीं या ओत सूर त्या जाऊं दे अति खोल !

खिडकींतून भणभणणारा वळवाचा हा गार वारा अंगाला झोंबतो आहे; भग्नमनोरथ मनाच्या उदास हास्यासारखें हें ढगाआडचें उदास चांदणें; अशा या एकांतस्थितींत हा दिवसाच्या दगदगीनें थकला–भागलेला जीव निद्रेच्या शांतीकरितां अखेर अंथरुणावर पडला आहे;—

निद्रा कुठली परि त्या हृदया भविष्य नाहीं ज्यास !

दुःखानें दडपलेल्या जीवाला झोंप येणार कशी ?—

हातीं संसाराची मार्ता
मनिच्या आशा मनास खातीं,
भूतकाळचीं भूतें रडतीं

आणि ताटकळलेल्या डोळ्यांपुढें पुढच्या निराशेचें, अभागी आयुष्याचें चित्र उभें रहातें. हा असला दारुण एकांतवास, ही भोंवतालची भगाण दुनिया,—यामुळें अंतःकरणांत विषण्ण विचार वावरूं लागून–

बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

तेव्हां माझ्या या हताश हृदयाला रमविण्याकरितां गोड गाणें गा; माझ्या खिन्न मनाला रमविण्यांतच तुझ्या कर्तृत्वाचें खरें चीज आहे; भाग्यवंतांकरितां दुनिया धडपडतेच आहे;—

आनंदा खेळविणें वायां,
मशाल दिवसा लावुनि होतो लाभ कुणाला काय ?

ह्मणून माझ्या निराश मनाला तूं अंगाईगीतें गा; तुझी ही दयाशीलता पाहून

द्रवेल कोणी भगिनी, माता,
शांत कराया हताश चित्ता
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

आणि त्या अश्रूच्या शीतलतेनें या अंतःकरणाची आग विझून—

निद्रा घेतां शांत मनानें
गोविंदाग्रज ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरीहि बोल !

गोविंदाग्रजांचें हें गाणें वाचीत असतां केशवसुतांचे 'सतारीचे बोल' कानांत घुमूं लागतात. बहिःसृष्टि व अंतःसृष्टि यांच्या सादृश्याचें दोहोंतलें चढतें वर्णन अगदीं सारखें आहे; आणि 'सतारीच्या बोलांत' विरून जाऊन झोंपेंत जीव गुंगला असतां सुद्धां स्वप्नांत 'दिड दा! दिड दा!' हे बोल बोलण्याची कल्पना व निद्रेच्या गुंगींत 'कोकिळे! अवेळ तरीहि बोल! हे बोल ऐकण्याची कल्पना यांतही सादृश्य दिसतें. हें गाणें रचनेच्या दृष्टीनें अत्यंत निर्दोष व नितांत-मधुर आहे. अलौकिक ईश्वरतेचें काम काव्यकोकिळेनें बजावल्यामुळे गोविंदाग्रजांचें अंतःकरण ईश्वरी साक्षात्काराकरितां आतुर झालेलें दिसतें. 'अनामिकाचे अभंग' हे त्या आतुरतेचे उद्गार आहेत. हे अभंग रसाळ असून मनाची तळमळ या अभंगांत अगदीं ओतप्रोत भरली आहे. 'फुटकी तपेली' ही कविता क्लिष्ट आहे. अनंतकाळापासून आत्मजीवनाची तहान लागल्यामुळे जीव सारखा पाणी पाणी करीत आहे. तहानेनें कासावीस झालेल्या त्या जीवाला ही वासनामय देहाची फुटकी तपेली देऊन त्याची नुसती थट्टा चालविली आहे. आणि अशा या विव्हल स्थितींतच जीवाला—

प्रवास करणें फार दूरवर !

अनादि आणि अनंत स्थानापासून जीवाच्या या प्रवासाला प्रारंभ झाला आहे; आणि हा प्रवासहि साधारण नव्हे ! अशीं कैक अनंतें चालावयाचें असतें. जें विश्व या जीवाला गांठावयाचें आहे त्या विश्वापुढें तुमचीं हीं विश्वें म्हणजे शुद्ध 'दर्यामें खसखस' होत. या प्रवासाची मर्यादा कल्पनातीत, कल्पनेच्याही कल्पनेपलीकडली आहे एका विश्वाच्या अंतानें दुसऱ्या विश्वाच्या प्रवासाला आरंभ होतो; आणि अशा रीतीनें आद्यंतांचें हें अंतर कापीत पुढें जावयाचें !

कडक कायदा धांवायाचा !

पाउल एकादें जरि चुकणें । पहिल्यापासुनि पुन्हां धांवणें ।

असा हा अविश्रांत प्रवास आहे ! पाऊल चुकलें कीं पुन्हां पहिल्यापासून प्रारंभ ! असा प्रवासाचा कडक कायदा आहे ! आरंभीं जीवाला पुष्कळांची सोबत असते;

परंतु प्रवासाच्या श्रमानें अर्ध्या मार्गांतच अनेक गळतात; आणि मग--

माझीच मला उरते संगत

माझा हा मीपणा फार मोठा आहे. त्यामुळें माझें कोणाशीं न पटून मला एकट्यानें प्रवास साधावा लागतो. माझी ओळख मला पटल्यावर—'सर्वं खल्विदं ब्रह्म' हें तत्व अंतरीं ठसल्यावर मी इतरांना विसरून गेलों!

तऱ्हाच माझी विचित्र असली!

मी असा विलक्षण व प्रवास तसा विलक्षण; मग असल्या कडक कायद्याच्या प्रवासांत ही वासनामय शरीराची फुटकी तपेली मला कां बरें देतां? माझी तृष्णा अनंत आहे; जों जों पाणी मिळतें तों तों ती अधिकच वाढते! ह्मणून—

जलब्रह्म द्या परि तिजसाठीं

तरीच होईल मग ती राजी!

तुमचीं हीं फुटकीं भांडीं माझ्या कामीं कशीं येतील? भरतां भरतां रिकामीं होणारीं व भरलीं तरी रिकामीं होणारीं हीं भांडीं तुह्मी आतां कधीं परत घेणार? फुटकी असल्यामुळें ही तपेली व्यर्थ आहे; व ही नसत्या आशेच्या आभासानें मनाला भुलविते. त्या खोट्या आशेला, त्या मिथ्या मृगजलाला भुलून मी या तपेलींत शिरतों आणि

अफाट तरि मी त्यांतचि बुडतों;

म्हणून ब्रह्मांडाची तपेली करा. माझी ओळख—आत्मज्ञान हेंच तिच्यांतलें पाणी; त्या पाण्यांत असलीं कैक खोटा अनंतें जिरतील. ही तपेली सदोदित भरलेली,—आत्मजीवनानें ती वरसर भरलेली आहे. आणखी भरण्याचा प्रयत्न केला तरी तिच्यांत भर पडणार नाहीं किंवा कमी करून कमीहि होणार नाहीं. ही आतां झालेली स्वतःची नवी ओळख, हा नवा आत्मानुभव जुन्याची, अनादि तत्वाची ओळख झाली म्हणजे होतो; व जुन्या पाण्यांत नवें पाणी मिसळून जीवशिव एक होतात! ह्मणून ही फुटकी तपेली फेंकून देऊन—

सर्वस्वाची करा तपेली
माझ्या पाण्यानें भरलेली
पाहुनि तिजला तीन्ही काळीं
खुबी ओळखा क्या है अंदर!

या गाण्यांतील गोविंदाग्रजांची फुटक्या तपेलीची कल्पना वेदांताच्या विद्यार्थ्यांना कांहीं नवीन नाहीं. या कवितेंतील

कडक कायदा धांवायाचा !

ही गोविंदाग्रजांची समजूत चुकीची आहे. मोक्षमार्गाच्या प्रवासांत, गोविंदाग्रज समजतात त्याप्रमाणें, विश्रांति न घेण्याचा कायदा मुळींच नाहीं; उलट

न हि कल्याणकृत्कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति ।

या भगवदुक्तीवर व्याख्यान करितांना ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

परि तेतुला वेग नव्हेचि । म्हणऊनि विसावा तरि निकाचि ।
पाठीं मोक्ष तव तैसाचि । ठेविला असे ॥

अर्थातच गोविंदाग्रजांची ही कडक कायद्याची कल्पना केवळ कल्पनाच आहे ! ‘ फुटकी तपेली ’ या गीतापेक्षां ‘ मुरली ’ हें गीत सोपें आहे. जगाच्या आध्यात्मिक इतिहासांत भागवतकवींची ‘ राधागौळण ’ ही अत्यंत अद्भुतरम्य व अलौकिक व्यक्ति आहे. भागवतकवींच्या उदात्त अंतःकरणांतली आत्यंतिक प्रेमाची अद्भुत कल्पना राधेच्या रूपानें प्रगटली आहे. स्त्रीस्वभावाला सहज असलेल्या शृंगाराला--सहेतुक प्रेमाला अहेतुक प्रेमाच्या—आत्मानुभवाच्या अलौकिक आनंदाच्या अत्यंत शुद्ध स्वरूपाला चढवून भागवतकवींनीं ही मधुर भक्तीची मोहनमूर्ति जगापुढें उभी केली आहे ! मुरलीमोहनाच्या नादमाधुरीला मुकल्यामुळें व्याकुळ झालेली ही वेडी गौळण

ही एक आस मनिं उरलि । कन्हय्या ! बजाव बजाव मुरलि !

असल्या अगदीं अधीर असोशीनें त्या व्रजविलासाला आळविते आहे. तुझ्या त्या मुरलीचे नाद कानांत सारखे घुमत असल्यामुळें माझे कान बाह्यविश्वाला जरी बधिर झाले असले व वृत्ति उडाल्यामुळें मन इतर विषयांना बेभान होऊन जरी मेलें असलें तरी एवढी एकच असोशी अंतःकरणाला लागून राहिली आहे. तुझें गाणें कां ऐकावेंसें वाटतें तें देखील मला आतां कळेनासें झालें आहे ! पण कां तें कोणाला ठाऊक, माझें मन तें गाणें ऐकण्याकरितां अगदीं उतावीळ झालें आहे; मला वाटतें—

मी अगदीं भोळी राधा । तूं माधवजी नच साधा
मोहनी करी सुखबाधा--

चांदणें चहूंकडे खुलून त्याच्या सुवासस्पर्शानें हे दगडसुद्धां द्रवले आहेत. मला वाटतें, तुझ्या गीतस्फूर्तीच्या फुलवंतीनें हें विश्व जसें कांहीं फुललें आहे! तुझ्या त्या स्फूर्तीनें माझ्या अंतःकरणांत आनंदाचे बोल नुसते नाचताहेत. आणि सर्व वृत्तींचा विलय होऊन माझें शरीर आनंदानें अगदीं बहरलें आहे. माझ्या या बेभान मनापुढें आतां फक्त

अब नंदलाल! कर खैर। प्रेमाची दुनिया उरलि!

तुझ्या मुरलीचा नाद आतां कानावर पडणार अशी खात्री झाल्यामुळें माझी बुद्धि अधीर होऊन आशेचा एकच भाव आतां अंतःकरणांत उरला आहे,—अंतःकरण आशामय झालें आहे. आशेला निराशेचा आळा आतां उरला नाहीं, सर्वत्र आशाच झाली आहे! समुद्राला तीराची मर्यादा न उरून जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें आहे; अभावाला, रितेपणाला, शून्याला वावच न राहतां त्यांतहि जशी नवीन सृष्टि निर्माण व्हावी त्याप्रमाणें माझ्या अंतःकरणांत आतां निराशेंतहि आशा भरली आहे. झाडाच्या शेंड्याला मुळें फुटावीं त्याप्रमाणें माझ्या निराशेला आशेचीं फुलें लागलीं आहेत! इतका अनिर्वचनीय आनंद आज मला झाला आहे; तो तुला मी कसा सांगूं? जन्माचें सार्थक होऊन आज माझ्या अंतर्वृत्ति कायमच्या जाग्या झाल्या आहेत. ज्या मायेमुळें, ज्या भेदभावामुळें हें जग मला दुरावलें ती माया मरून विश्वाचें रहस्य,—हें विश्व ब्रह्ममय आहे असें ज्ञान मला झाल्यामुळें माझ्या अंतःकरणांत चैतन्य रसरसून हें जग मला पुन्हा आनंदमय वाटूं लागलें आहे! त्या चैतन्यघनांतून आनंदामृताचा अविरत वर्षाव होत असून माझ्या अंतःकरणांत आनंदाच्या अगदीं लहरीवर लहरी उठताहेत; आणि अंतःकरणांत वरसर पसरलेल्या त्या आनंदामृतांत सगळे अवकाश, सगळे भेदभाव विरून गेले आहेत. या तद्रूपतेमुळें

पुष्पाविण येई वास। वाऱ्याविण चाले श्वास॥
हर्षाविण आतां हास। मरणाविण सुटका झालि!

अशी स्थिती होऊन मी स्वतःला अगदीं मेलें आहे! चोहोंकडे आतां मला तूं दिसूं लागून हें विश्व मला त्वन्मय झालें आहे; या गौळणीसुद्धां मला तुझ्यासारख्याच झाल्या असून मला माझ्या ठिकाणींहि आतां तूंच दिसूं लागला आहेस! आणि अशा रीतीनें हा आपपरभाव सुटल्यामुळें

स्वैराचा वाढे चाळा । बावरी राधिका बनालि!

तुझ्या मुरलीचा सूर ऐकून दुःख नाहींसें झालें आहे तरी सुद्धां हृदयाची हुरहुर कमी होत नाहीं. ही हुरहुर कसली आहे बरें ? तूं मनमोहन, मनकवडा आहेस; मग माझ्या हृदयांत हे कसले बोल लपले आहेत सांग पाहूं ?

बोल बोल तव बिनमोल । जीवाचें देइन मोल
परि बोल एकदां बोल । नातरी राधिका मुकालि !

मला सांभाळून तूं हा विश्वगोल फिरून ये; तुझ्या प्रेमाचा सोल घट्ट धरून मी तुझ्या पाठोपाठ येईन. तुझ्या मुरलीची भांग प्याल्यामुळें माझें अंग थरारतें आहे; आणि अंगावर आनंदाच्या लहरी उठताहेत ! वृत्ति स्वैर झाल्यामुळें देहाचे अणुरेणु उमलून जीव नुसता नाचतो आहे. तुला भेटण्याकरितां तुझ्याशीं तद्रूप होण्याकरितां ही जीवकला फुलली आहे; त्यामुळें फुलासारखें हलुवार होऊन माझें अंग वाऱ्यावर तरंगतें आहे ! माझ्या देहाच्या या उमललेल्या अणुरेणूंत तुझ्या मुरलीचा नाद भरूं दे ! तुझ्या मुरलीच्या मधुनिनदानें माझ्या हृदयाला भुलवून माझी हृदयग्रंथि उकल. तुझ्या मुरलीच्या नादस्पर्शानें माझ्या हृत्कमलाची पाकळीन् पाकळी फुलल्यावर—

कृष्णजी ! त्यांत तूं भृंग । त्यांतच रे होई गुंग
गुंजारव करि उत्तुंग । ही मोहरात्र ओसरलि !

हें दिलरंगी चांदणें दुनियेला डुलवीत आहे; तुझ्या नादरसांत गुंग झालेला माझा जीव त्या रसतरंगांवर झुलत आहे. त्या आनंदरसानें न्हालेल्या माझ्या या देहावर आनंदाचा फुलोरा फुटला आहे—

करुनि त्या फुलांचा झेला । जीवाचा छेलछबेला
नटवीन कधीं अलबेला । झेला मज आलें जवळि !

स्त्रीस्वभावाला अत्यंत सहज असलेल्या शृंगारभावानें तुझ्याशीं समरस होण्याकरितां मी झटलें; परंतु अखेर आत्मानुभव येऊन तुझ्याशीं मी तद्रूप झालें.

वांकड्या अधारें हा पावा । वांकडाच डोळा डावा
किति वेळ असाच पहावा । अब खेल करो बनमालि !

तुझ्या मनोहर मुरलीनादानें मला जवळ ओढून घे व तुझ्या श्वासाशीं समरस होऊन मला तुझ्या हृदयाशीं एकजीव होऊं दे !

चुंबनेंच कीं मज बनवीं । तव ओठावरली लालि !

नला इतकें निरंतर आलिंगन दे कीं, त्या आलिंगनानें एकरूपता येऊन आपण एकजीव होऊं. इतका वेळ मी तुला आळवीत होतें, परंतु आतां या तद्रूपतेनें माझ्या अंतःकरणांतील बोल जागच्या जागीं जिरून तुझ्याशीं बोलावयास मला आतां भाषाच उरली नाहीं !

जीवाचा पंचीप्यारा । मज आतां दिससी न्यारा
मुरलीचा पिउनि वारा । चहुंकडेच राधा झुकलि !
उरलें न शीत वा उष्ण । कांहीं न शुभ्र वा कृष्ण
एकरूप राधाकृष्ण । जयनाद गात ही मुरलि !

आणि अशा तऱ्हेचा हा आत्मानुभवाचा आनंद लाधावा ह्मणून—

भोगुनी तापमय उष्णा । मुरलिची लागतां तृष्णा
जग गाइल राधाकृष्णा । ही साक्ष मनोमन मुरलि !

गोविंदाग्रजांच्या वाग्वैजयंतींतलें ‘ मुरली ’ हें कौस्तुभरत्न आहे.

महाराष्ट्रांतील नवीन पिढीला गोविंदाग्रजांची कविता अत्यंत प्रिय आहे. गोविंदाग्रजांच्या अकाल-निधनानें महाराष्ट्रसारस्वताची फार हानि झाली यांत शंका नाहीं. परंतु ईशकृपेनें गोविंदाग्रज जरी आणखी कांहीं काळ जगते तरी त्यांच्या हातून यापुढें अधिक काव्यरचना बहुधा झाली नसती. त्यांच्यासारख्या ‘ बुद्धिजीवी ’ लेखकाला सांपत्तिक दृष्टीनें नाट्यलेखनच विशेष उपकारक होतें. नाट्यलेखनाचा छंद जडल्यापासून कवितेवरून त्यांचें मन उडालें होतें; व गेल्या तीनचार वर्षांत त्यांनीं नांवाजण्यासारखी कविता जवळ जवळ मुळींच लिहिली नाहीं. श्राव्यकाव्यापेक्षां दृश्यकाव्यच मनुष्याला अधिक आवडतें; कारण तें प्रत्यक्ष असल्यामुळें कळावयाला कठीण पडत नाहीं. गोविंदाग्रजांच्या काव्य-लेखनाला श्राव्यकाव्यानें प्रारंभ झाला व त्याची परिणति अखेर दृश्यकाव्यांत झाली. काव्याचीं हीं दोन्हीं अंगें त्यांनीं सारख्याच सुंदरतेनें सजविलीं व महा-राष्ट्र-सारस्वताच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें.

---

६

# बालकवींची कविता.

# बालकवींची कविता.

( त्र्यंबक बापूजी ठोमरे. )

१८९०—१९१८

वाऱ्याच्या झुळुकेंतून वहात आलेला पुष्पपरिमळ आणि गाण्याच्या लकेरींतून घुमत आलेलें सहज-काव्य कोणाच्या मनाला आनंद देणार नाहीं? संध्याकाळच्या शांत वेळीं दिवसाच्या दगदगीनें श्रांत झालेल्या मनुष्याला, वाऱ्याची झुळुक अंगावरून जातांच किती तरी सुख होतें. या नुसत्या वाऱ्याच्या झुळुकेमुळें होणारें सुख निव्वळ शारीरिक असतें; परंतु तीच जर त्या वाऱ्याची झुळुक फुलांच्या मधुर सुवासानें सुगंधित झालेली असली तर तिच्या स्पर्शानें शारीरिक सुखाबरोबर मनालाहि विशुद्ध आनंद लाभतो. आपत्तींचीं अभ्रें आयुष्याच्या आकाशांत दाटल्यामुळें निर्विण्ण झालेल्या सुसंस्कृत मनुष्याला, नुसती गाण्याची मंजुळ लकेर जर कानावर पडली तर, क्षणभर तरी स्वतःच्या दुःखाचा विसर पडल्याशिवाय रहात नाहीं; आणि त्यांतल्या त्यांत जर त्या निर्जीव नादमाधुरीबरोबर व्याकुळ अंतःकरणाचे जिवंत उद्गार घुमत आले तर, तें गाण्याच्या लकेरींतून घुमत आलेलें सहजकाव्य त्या उदास अंतःकरणाला भिडतांच मनाची

तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं
भावस्थिराणि जननांतरसौहृदानि ।

—कालिदास.

अशी विलक्षण स्थिति होऊन एक प्रकारचें उदात्त आणि अननुभूत सुख प्राप्त होतें. वसंतऋतूंत उत्कंठेचे सूर आळविणाऱ्या कोकिळेचें कुहूगीत ऐकतांच, गतकाळीं अनुभविलेल्या प्रसंगांच्या अस्पष्ट आठवणी जागृत होऊन, सुखांत असलेलें मन सुद्धां पर्युत्सुक होतें, बावरतें. या बावरण्यांत, या उत्सुकतेंतहि एक प्रकारचा गोड आनंद असतो. ही उत्सुकतेची गोड जादू भरलेली असल्यामुळें विहंगसंगीतें सुसंस्कृत मनाला भारतात. नुसत्या नादमाधुरीला मन भुलत नाहीं. फार तर तें क्षणभर गुंग होईल. परंतु त्या मंजुळ आलापांतून बोलणारें अधीर अंतःकरण, नादमाधुरीनें आधींच बेभान केलेल्या मनाला, तन्मयतेचें रम्य वेड

लावितें. सामान्य मनाला अर्थहीन भासणाऱ्या विहंगसंगीतांत असलेलें हें अंतः-करणाचें सहजकाव्य सुसंस्कृत मनाला, उत्कट भावनांच्या कविहृदयाला तेव्हांच उमजतें आणि सृष्टिसतीचे हे पिढीजाद गंधर्व गाऊं लागले कीं त्यांच्या गायनानें वेडावलेल्या कविमनाला

ga ga ga विहगा गीतें, टाक भारुनी जगतातें !
सुंदर वातावरणांत, निर्मुनि देवाचे दूत
जड जगताला,
शून्य नभाला,
ब्रह्मांडाला
जीवित नव अर्पायातें, गा गा गा विहगा गीतें !
आकाशामधले बोल, सृष्टीचे मंजुळ ताल,
एकसरें वर्णायाला, गाण्याची गुंफी माला !
हीं सृष्टीचीं
निगूढतेचीं
तत्वें साचीं
सांग उकलुनी आह्मांतें, गा गा गा विहगा गीतें !
काळाचे भेसुर बोल, गोड करुनि तूं कथिशील
विश्वाला माधुर्य खरें, तूंच गोजिऱ्या देशिल रे !
प्रेमळतेनें
सौंदर्यानें
सुधारसानें
सृष्टीला न्हाणायातें, गा गा गा विहगा गीतें !

असलें हृदयंगम स्फूर्तगीत सहज सुचतें !

गाण्याचे आलाप मनाला क्षणभर गुंगवितात; परंतु नुसतें गुंगविणें आणि पावित्र्याच्या व माधुर्याच्या कोमल भावनांनीं मनाला भारणें यांत अंतर आहे. नुसते मंजुळ नाद कानावर पडले कीं, वाऱ्याची झुळूक जशी अंगावरून गेली असतां शरीराला सुख होतें, तसा मनाला घटकाभर आनंद होईल; परंतु तेंच जर वाऱ्याच्या झुळुकेंतून वाहणाऱ्या पुष्पपरिमळाप्रमाणें मंजुळ आलापांतून तरंगणारें

कोमल कवन किंवा स्वभावसुंदर विहंगसंगीत कानावर पडलें तर मनाला आनंद होऊन शिवाय एक प्रकारच्या उदात्त वातावरणांत तें हेलावूं लागतें! नाद-ब्रम्हाचा साक्षात्कार नुसत्या सुरेल लकेऱ्यांनीं होत नाहीं; त्या सुरेल लकेऱ्यांतून पवित्र भावनांचा प्रवाह जेव्हां वाहूं लागतो तेव्हांच मानवी मनाला नादब्रम्हाचा साक्षात्कार होतो. कविप्रतिभेची परमावधि दर्शविणाऱ्या उदात्त भावना आणि शब्दसौंदर्याचें सर्वस्व प्रकट करणारे मंजुळ आलाप यांच्या नितांत एकतानतेनें नादब्रम्ह निर्माण होत असतें! कोमल कल्पना व मधुर संवेदना यांच्या इत-कीच उत्कृष्ट कवितेचा अवतार व्हावयाला सुंदर शब्द व सुरेल संगीत यांची जी आवश्यकता वाटते, तिचें कारण तरी ही नादमाधुर्यांत असणारी गुंग करण्याची शक्ति हेंच होय. कमीअधिक प्रमाणानें नादमाधुरी ही बहुधा प्रत्येक कवितेंत असतेच. नादमाधुरीशिवाय काव्य सहसा अस्तित्वांत येऊं शकत नाहीं. कारण कांहीं तरी गुणगुणण्याच्या—गाण्याच्या मनुष्याला असलेल्या स्वाभाविक छंदा-चेंच काव्य हें प्रकट आणि परिणत स्वरूप आहे. रामायणासारखें सहजस्फूर्तीचें आद्यकाव्यहि, मनुष्याच्या याच प्रवृत्तीमुळें, तंतुवाद्याच्या तारांवर तरंगणाऱ्या अनुष्टुभ्-छंदांत अवतरलें. शब्दसौष्ठव हें संस्कृतभाषेला सहज आहे. परंतु मरा-ठी भाषा ही जात्याच रांगडी आहे. आणि म्हणूनच, संस्कृत कवितेंत सहज साध-णारें शब्दसौष्ठव मराठी कवितेंत आणण्याकरितां, बहुधा अर्थहानि करणाऱ्या यमकांची योजना झाली असावी! मराठी कवितेंत, इतके प्रयत्न करूनसुद्धां, एकं-दरीनें नाद कमीच. जुन्या मराठी कवितेंत, ज्ञानेश्वरी व मुक्तेश्वर-वामनांची कांहीं कविता सोडली तर, बाकी बहुतेक कवितेंत नाद आढळत नाहीं. सर्वस्वीं नाद-मधुर कविता, मराठींत फक्त, कीर्तनसुखार्थ अवतरलेल्या अमृतरायांचीच आहे. लावणी-काव्यांत रामजोशी यांच्या लावण्यांत नादाचा ठेका अगदीं ठिकठि-काणीं आहे. आधुनिक मराठी काव्यांत मोगरे यांची कविता बरीच नादमधुर आहे. परंतु मोगऱ्यांच्या कवितेंत ध्वनि फार कमी असल्यामुळें ही नादाची गुंगी अ-गदीं थोडा वेळ टिकते. चंद्रशेखर, दत्त व गोविंदाग्रज यांची कविताहि साधारण मधुर आहे. परंतु बालकवि ठोमरे यांच्या कवितेंत आढळणारें नादमाधुर्य कांहीं अपूर्व आहे; त्यांची सर या तिघांहि कवींच्या कवितेला करितां येणार नाहीं. शिवाय बालकवींची कविता इतरांच्या कवितेप्रमाणें निव्वळ नादमधुरच नाहीं;

नाद अर्थ व ध्वनि या गुणत्रयाचा सारखा सुंदर समुदय त्यांच्या वाणींत झालेला आहे. आणि त्यामुळें

शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे

ही ओवीनायकाची उक्ति त्यांच्या कवितेच्या बावतींत यथार्थ झाली आहे असें वाटतें. बालकवींच्या वाणींत वसणारें हें विलक्षण नादमाधुर्य पाहूनच टिळकांना, त्यांचें गुणगौरव करितांना,

मधुरकोमलकांतपदावलिं ।

या जयदेवोक्तीचा पुनरुच्चार करावासा वाटला. ‘ सृष्टीच्या गायकांची ’—विहंगांची वाणी सहजमधुर असते. बालकवि हेहि ‘ सृष्टीचे गायक ’ होते आणि म्हणूनच त्यांच्या वाणींत इतकी माधुरी आहे.

बालकवींचा जन्म १८९० त झाला. कविता करण्याचा नाद त्यांना अगदीं बाळपणींच लागला. आईच्या व बहिणीच्या मुखांत घोळणारीं गोड गाणीं ऐकतां ऐकतां ठोमऱ्यांना अगदीं लहानपणींच काव्य-स्फूर्ति झाली. कवींच्या काव्यरचनेला प्रारंभ बहुधा लहानपणींच होत असतो. वयांत आल्यावर वृत्तदर्पणाच्या मदतीनें रचना करणारे हठकवि सहसा कविपदवीला पोंचत नाहींत. लहानपणीं काव्यरचनेला सुरवात झाली एवढ्यावरच कोणाला कवि किंवा बालकवि म्हणतां येणार नाहीं. असें नसतें तर भेंड्या लावतांना ईर्ष्येनें कविता जुळविणाऱ्या चलाख मुलालाहि ‘ बालकवि ’ म्हणावयाला हरकत राहिली नसती. ठोमरे हे लहानपणींच ‘ कवि ’ या पदवीला पात्र झाले, सुंदर कविता करूं लागले, म्हणून त्यांना, त्या त्यांच्या असाधारण गुणाबद्दल, ‘ बालकवि ’ या अभिधानानें गौरविण्यांत आलें. १९०७ सालीं जळगांवाला भरलेल्या कविसंमेलनांत कवींच्या अग्रणींनीं त्यांना ‘ बालकवि ’ म्हटलें व त्यांचा सत्कार केला. प्रतिपदेपासून प्रतिदिनीं वाढणाऱ्या चिमुकल्या चंद्राचें सानसुंदर स्वरूप पाहून, गगनाच्या गाभाऱ्यांत तळपणाऱ्या तेजस्वी ताऱ्यांना हा तेव्हांच निस्तेज करील, हें जसें सहज समजतें तसेंच अल्पवयस्क ठोमऱ्यांचीं रसाळ कवनें ऐकून, हा बालकवि उद्यां सर्व कवींना मागें टाकून महाकवि होईल, असें महाराष्ट्र-रसिकांना आपोआप वाटलें.

बालकवींच्या कवितेला त्यांच्या बाळपणींच जें इतकें मनोहर बाळसें आलें त्याला कारण त्यांची परिस्थिति हेंच होय. वडिलांच्या मृत्यूनें वैतागून ते अगदीं

लहानपणींच घराबाहेर पडले. दुर्दैव पाठीला लागल्यामुळें पोटाकरितां जी त्यांना पायपिटी करावी लागली त्या पायपिटींतच हिंदुस्थानाच्या नैसर्गिक सौंदर्याचें दर्शन घडून ते ' सृष्टीचे गायक ' झाले ! त्यांचें आयुष्यच काव्यमय होतें. कवित्वाचा संस्कार त्यांना आनुवंशिक होता. भक्तिमत्व आणि कवित्व हीं त्यांच्या घरांत, त्यांच्या जन्मापूर्वीपासूनच, नांदत होतीं. भक्ति व कविता यांचा मिलाफ महाराष्ट्रांत फार प्राचीनकाळापासून आढळतो. भक्तिभावनांनीं भारलेल्या भाविकाचे बोल कवित्वरूपानें प्रकटणें अगदीं स्वाभाविक आहे. भक्तिमत्व ठोमऱ्यांच्या घरांत पिढ्यानुपिढ्या नांदत आलें होतें. ठोमऱ्यांची आजी अत्यंत भाविक होती; पंढरीची वारी करण्यांत आणि पांडुरंगाचें वैभव गाण्यांत तिचें सर्व आयुष्य गेलें होतें. अशा अतिशय श्रद्धाळु मातेच्या सहवासांत ठोमऱ्यांच्या आईचें बाळपण गेलें. आजीचे हे सर्व गुण ठोमऱ्यांच्या आईच्या ठिकाणीं उतरले होते. ठोमऱ्यांचे वडीलहि फार भाविक होते. हा भाविकपणा त्यांना त्यांच्या आईपासून—ठोमऱ्यांच्या आजीपासून लाभला होता. ठोमऱ्यांची ही आजीहि फार श्रद्धाळु होती. संतकवींच्या कवितेचा व पुराण-काव्यांचा या बाईचा व्यासंग विलक्षण होता. खानदेशाच्या बाजूला हिंदी भाषेचें वळण असल्यामुळें उत्कृष्ट हिंदी कवनेंहि या बाईच्या मुखांत रुळत होतीं. सत्कवींच्या सहवासानें आणि सरावासरावानें ठोमऱ्यांच्या या आजीच्या ठिकाणीं कवित्वस्फूर्ति संचरून त्या गोड हिंदी कवनें करूं लागल्या होत्या. भक्तिमत्व, कवित्व व रसिकत्व या तिन्ही गुणांचा लाभ ठोमऱ्यांना असा वंशपरंपरेनें झाला. मातृपरंपरेनें व पितृपरंपरेनें पोसत आलेले हे दैवीभाव ठोमऱ्यांच्या ठिकाणीं अगदीं उत्कटत्वानें अवतरले आणि ठोमरे हे बालकवि झाले ! त्यांच्या वडिलांनीं हा त्यांचा कवित्वगुण ओळखून त्यांना उत्तेजन दिलें. वडिलांच्या अनुज्ञेनें, ' वनवासी ' या नांवानें आधुनिक कविमंडळांत प्रसिद्ध असलेल्या एका हरिदास कवींजवळ मराठी कवितेचा अभ्यास घडावा म्हणून बालकवि राहिले. लोकांच्या मनोरंजनाकरितां मधुर व चमत्कृतिजनक काव्यें आणि सुभाषितें हरिदासांना मुखोद्गत ठेवावीं लागतात; यामुळें हरिदासांची वाणी पाल्हाळिक पण रसाळ होत असते. या सहवासापासून ठोमऱ्यांना पुष्कळच फायदा झाला असावा. यांच्या बरोबर त्यांनीं देशाटणहि उदंड केलें. वडिलांकडे फौजदारीचें काम असल्यामुळें, त्यांच्यावर फिरतीची पाळी आली कीं, ठोमरे त्यांच्या

बरोबर कधीं कधीं जात असत. खेडोपाडीं स्वारीच्या निमित्तानें जंगलांतून जातांना, निसर्गाचें भव्य आणि रमणीय स्वरूप पाहून, ते तल्लीन होत असत. झाडाझुडपांनीं गजबजलेल्या आणि हिरवाळींनीं विलसलेल्या ओढयाकांठीं ते बसले, म्हणजे त्यांचें देहभान नाहींसें होऊन, " हे ओढे, ही वेलूची किर्र झाडी आपल्याशीं कधीं काळीं बोलेल काय ?" असा ध्यास त्यांच्या जिवाला जडत असे.

दिव्यरसीं विरणें जीव । जीवित हें याचें नांव

हें उदात्त वेड त्यांना याच ध्यासामुळें लागलें होतें आणि जीविताविषयींची उदात्त भावना, हींच दिव्य दृश्यें पहातां पहातां, त्यांना स्फुरली होती. अगदीं लहानपणींच बालकवींना जडलेलें हें वेड, 'वनवासी' कवींबरोबर हिंडतांना व वडिलांच्या मृत्युनंतर पुढें घराबाहेर पडल्यावर, एकसारखें वाढतच गेलें. बडोद्यास भरलेल्या साहित्यसंमेलनानंतर १९१० सालापासून ते टिळकांकडे राहूं लागले होते. प्राचीन काळीं महाराष्ट्रांत जसें नामदेवांचें कविकुटुंब होऊन गेलें तसें अर्वाचीन काळीं टिळकांचें कविकुटुंब झालें. टिळकांच्या कुटुंबांत त्यांच्या सहवासानें सर्वच माणसें थोडीं फार कवि झालीं होतीं. टिळकांच्या संगतीच्या, त्यांच्या कुटुंबावर घडलेल्या, या अद्भुत परिणामाचें त्यांच्या पत्नी कवयित्री लक्ष्मीबाई टिळक यांनीं आपल्या 'पतिपत्नी' या काव्यांत सुरस वर्णन केलें आहे. अशा कविकुटुंबांत येऊन पडल्यामुळें ठोमऱ्यांच्या कवित्वस्फूर्तीला विलक्षण बहर आला. अगदीं बाळपणापासून सभोंवतालची परिस्थिति व आनुवंशिक संस्कार हे असे काव्यमय असल्यामुळें ठोमरे हे लहानपणींच सरस कविता करूं लागले यांत कांहीं विशेष नवल वाटण्यासारखें नाहीं.

ठोमऱ्यांच्या कविता प्रथम काव्यरत्नावलींतून प्रसिद्ध होऊं लागल्या. त्यांचे अगदीं लहानपणचे छोटे चुटके त्यांच्या बंधूंच्या व मित्रांच्या तोंडीं आहेत. 'भ्रमर आणि कवि' ही त्यांची कविता गोड आहे. कवि आणि भ्रमर यांच्यामधील मधुर साम्य या कवितेंत मधुरतेनें दर्शविलें आहे. सृष्टीशीं समरस होण्याचा हव्यास त्यांना अगदीं लहानपणींच कसा लागला होता हें या कवितेवरून स्पष्ट दिसतें. 'माझा लहानसा बाग' ही त्यांची कविता अगदीं आरंभींची असावी असें वाटतें. ही कविता साधारण आहे. 'माझें गाणें' व 'मी गाणें' हीं दोन्हीं गाणीं खोल विचारांनीं व कोमल कल्पनांनीं भरलेलीं आहेत. 'अनंत' या कवि-

तेंत विश्वाच्या एकंदर अनंतत्वाचें चांगलें वर्णन केलेलें आहे. 'तृणपुष्प' हें गाणें फार मधुर आहे. निसर्गदृश्यांचीं हृदयंगम वर्णनें ठोमरे पुढें तद्रूपतेनें करूं शकतील अशी या गाण्यावरून खात्री पटते. 'दिव्य आणि प्रीति' हें एक बालकवींचें उत्तम गीत आहे.

प्रीति तुला जर हवी खरी
विलीन हो दिव्यांत तरी !

या उदात्त तत्त्वाचें प्रणयन या गीतांत केलें आहे. 'प्रीति हवी तर' या गीतांतहि हीच भावना आली आहे. हीं दोन्हीं गीत उत्तम आहेत. 'प्रेमलेख' व 'काळाचे लेख' या बालकवींच्या दोन्ही कवितांतील कल्पना अगदीं नवीन व चमत्कृतिजनक आहेत. 'गा गा गा विहगा गीतें !' हें त्यांचें 'सृष्टीच्या गायकांस' उद्देशून गाइलेलें गाणें अप्रतिम आहे. 'अप्सरांचें गाणें' व 'तारकांचें गाणें' हीं दोन्हीं गाणीं अतिशय गोड आहेत; 'तारकांचें गाणें' या गाण्यांतील कल्पना विशेष मजेदार आहेत. 'आनंदी आनंद गडे' हें गीत बरें आहे.

आनंदी आनंद गडे
इकडे तिकडे चोंहिकडे !

हें या गीताचें अक्कडकडवें जितकें भुलवितें तितका पुढचा भाग भुलवीत नाहीं. या अक्कडकडव्यांतील भुलावणीनें महाराष्ट्ररसिकांचें लक्ष या बालकवींकडे प्रथम वेधलें. त्यामुळेंच बहुधा या गीताला उत्तमांत गणण्याचा प्रघात पडला असावा. 'आंवाळणी घालि भाई' हें करुणकवन किंचित् गूढ आहे. 'फुलपांखरूं-फुलवेल' हें गाणें अत्यंत रमणीय आहे; या गाण्यांतील कल्पना फूलपांखरासारख्या अगदीं बागडत्या आहेत. 'संध्यातारक' ही बालकवींची एक उत्कृष्ट कविता आहे. बालकवि आतिशय प्रेमळ होते; मातृप्रेमाचा जिव्हाळा त्यांनीं अगदीं असोशीनें अनुभविला होता. आईच्या प्रेमाची गोडी लहानपणीं सर्वांनाच सारखी वाटते; परंतु मोठेपणीं मनाला आळा घालावयाला आईचें पवित्र व भाबडें प्रेम अपुरें पडून दयितेच्या मोहन व चंचल प्रेमाची जरूर भासते ! जगाचा हा अनुभव आहे. आणि महाराष्ट्रांतील आधुनिक कविहि याच आपल्या अनुभवाचे घुटके स्वतः घेत आहेत व महाराष्ट्राला देत आहेत. जगाच्या या अनुभवाला ठोमऱ्यांचें चरित्र अपवादादाखल आहे. बालकवींचें मातृप्रेम अढळ व अपार होतें;

आयुष्यांतील कोणत्याहि स्थित्यंतरानें त्या प्रेमांत अंतर पडलें नाहीं. लहानपणीं पराधीन असतांना त्यांनीं जितकें आईवर प्रेम केलें तितकेंच मोठेपणीं स्वाधीन असतांनाहि केलें. हें त्यांचें उत्कट मातृप्रेम 'संध्यातारक' या गीतांत त्यांनीं ओतिलें आहे. या गीताला त्यांनीं प्रथम 'अंगाई गीत' असें नांव दिलें होतें; परंतु पुढें तें नांव त्यांनीं बदललें. संध्याकाळीं आकाशांत चमकणाऱ्या ताऱ्याला उद्देशून हें गाणें बालकवींनीं गाइलें आहे.

दिनरजनीच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें, फूलच पहिलें
कोमल किरणीं नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत !
लहरींच्या सुंदर आंदोलीं
लहानग्याची शय्या केली
रजनी ओव्या गाउं लागली
तूं लडिवाळा, निज निज बाळा मातेच्या हृदयांत !

असें म्हणून रजनीमातेनें आपल्या गुणिलाला गोड गीतें गाइलीं. परंतु कांहीं केल्या त्या ताऱ्याला—रजनीमातेच्या वेल्हाळाला झोंप येईना !

झोंप कशी ती परि अजुनीही
आज गडे तुज लागत नाहीं
सांग करूं तरि आतां काई
बघ ना बा रे ! विश्वच सारें निजलें प्रभुहृदयांत !
आंदोलीं तुज निज न येई
घेत्यें तर उचलुनि मी बाई !
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं
पदराखालें झोंपी गेलें बाळ कसें इतुक्यांत !

अशा रीतीनें अखेर रजनीमातेचा लडिवाळ झोंपी गेला—तारा मावळला ! रात्रीविषयीं—रजनीदेवीविषयीं ठोमऱ्यांची निरंतर मातृभावना होती. आईच्या प्रेमाइतकें दुसऱ्या कोणाचेंच प्रेम ठोमऱ्यांना अनंत आणि अगाध वाटलें नाहीं. पावित्र्यासह प्रेम फक्त मातेचेंच अशी त्यांची भावना होती; या भावनेमुळें त्यांना

जें जें पवित्र आणि प्रेममय वाटलें त्याला त्यांनीं मातृदेवतेचें स्थान दिलें. दिवसभर पोटापाण्याचा प्रश्न सोडवून शिणलेल्या विश्वाला रजनीमातेशिवाय विश्रांति कोण देणार ? म्हणून कवि रजनीमातेला ' आवाहन ' करीत आहे;—

पक्वपणाची पिवळी छाया ब्रह्मांडावर रांगे,
ब्रह्मांडाचीं शीण पावलीं, श्रमलीं दमलीं अंगें.
ये ये जगदेकमाउली ! ये रजनी, लवलाही
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं.
तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळूनि तुझा वरती फिरतां हात.
तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शांतिलताही होई
दिव्य दर्शनीं तुझ्याच जननी, फुलते सुंदरता ही.
आद्यदेवते, रजनी, ये ये, निजले श्रीभगवान,
ब्रह्मांडाचा भार माउली तुजविण वाहिल कोण ?
प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हां देईल ?
ग्रहगोलांना निजकक्षेंतुनि कोण पुन्हां नेईल ?

आणि जगतावर मायेची झूल घालणारी तूं जर आली नाहींस तर—

ये ये रजनी, ये फिरफिरुनी, येशील न तूं जेव्हां
प्रळयकाळ या ब्रह्मांडाचा सत्वर येइल तेव्हां.

या उत्कृष्ट गीतावर एक प्रकारच्या गोड करुणरसाची छाया पडली असल्यामुळें हें गीत अतीव हृदयंगम झालें आहे. सायंकाळ, रात्र व अरुणोदय यांचें बालकवींना अतोनात वेड होतें. पौर्णिमेची चांदणी रात्र म्हणजे त्यांना एक अपूर्व उत्सवच वाटत असे. ' संध्यारजनी ' ही त्यांची सुंदर कविता सायंकाळ आणि रात्र या दोन्ही वेळीं दिसणाऱ्या दृश्यांवर लिहिलेली आहे. सूर्यास्तापासून हळुहळू प्रकट होणाऱ्या गगनश्रीचें, उत्प्रेक्षांचें विशेष साहाय्य न घेतां, अगदीं साध्या सुंदरतेनें केलेलें सुसंगत वर्णन या रमणीय कवितेंत आढळतें;

काळ्या अंधारांत खेळतें विश्व-लपंडाव
ताऱ्यांवरती बसून बघती कौतुक हें देव.
दहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला

काला बागुल काळोखाचा एक उभा केला.
मंद मंद तेजांत शोधिते गगनश्री त्यांना
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना.
खेळ चालला एकसारखा हा खालींवरती,
पूर्वदिशा ही तोंच हांसली, सांपडली हातीं!

असल्या नवीन व मनोरम अशा एकाद्याच कल्पनेनें ही कविता, उत्प्रेक्षांचें जड-जवाहीर अंगावर नसल्यामुळें, फारच खुलते. हावरेपणानें लादलेलें उत्प्रेक्षांचें जड-जवाहिर जाचक झाल्यामुळें, कविता कित्येक वेळां अगदीं अर्धमेली झालेली दिसते. असा विपरीत प्रकार बालकवींच्या ‘संध्यारजनी’ अगर ‘अरुण’ या दोन्ही कवितांत आढळत नाहीं. चार दोन सुंदर उत्प्रेक्षा आणि एकादीच मनोहर व नवीन कल्पना यांच्या लेण्यांनीं वर्णनात्मक कविता जितकी खुलून दिसते तितकी ती निव्वळ उत्प्रेक्षांची अगर कल्पनांची कंथा पांघरल्यानें खुलणें शक्य नसतें. बालकवींची ‘अरुण’ ही कविताहि मधुर आहे. ‘अरुण’ हें नांव दिलेलें असलें तरी अरुणोदयापासून सूर्योदयापर्यंत क्षितिजावर उठणाऱ्या विविध सौंदर्यतरंगांचें बहारदार वर्णन या कवितेंत केलेलें आहे. अरुणोदयाच्या वेळीं किंवा संध्याकाळीं, टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें,—

रंग नभाचे कसे तरी

हीच सुंदरतेची लीला आकाशाच्या अफाट अंगणांत चाललेली दृष्टीस पडते. त्या लीलेचें या कवितेंत, बालकवींनीं आपल्या कुशल कलमानें रेखाटलेलें रम्य चित्र पाहून मन प्रसन्न होतें. ‘अरुण’ व ‘संध्यारजनी’ या दोन्ही कवितांपेक्षां ‘फुलराणी’ ही कविता अधिक रसमधुर आहे. फुलराणीच्या—एका कळीच्या विकासाचें काव्यमय वर्णन या कवितेंत केलें आहे.

हिरवे हिरवे गार गालिचे,
हरित-तृणाच्या मखमालीचे,
त्या सुंदर मखमालीवरती
फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत
अव्याज मनें होती डोलत;

प्रणयचंचला त्या भ्रूलीला
अवगत नव्हत्या कुमारिकेला !

वेलीच्या फांदीवर—आईच्या मांडीवर बसून

झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला
साध्या भोळया फुलराणीला !

अशा अस्फुट स्थितींत ती कलिका असतां विनोदी संध्यावात तेथें आला आणि त्या फुलराणीला चुंबून म्हणाला

छानी माझी सोनकुली ती !
कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून
हळुच पाहतें डोकावून ? ”
तो रविकर कां गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना ? ”
लाजलाजली या वचनांनीं,
साधी भोळी ती फुलराणी !

विनोदी संध्यावाताच्या या साखरबोलांनीं भुलविलेली ती संध्याराणी, त्या शांत रात्रीं सारें स्थिरचर निजलें असतां, जागीच होती. पहांटेच्या प्रहरीं ती प्रेमस्वप्नांत क्षणभर गुंगली असतां एकदम उजाडलें !

तेजोमय नव मंडप केला
लखख पांढरा दहा दिशांला;
जिकडे तिकडे उधळित मोतीं
दिव्य वऱ्हाडी गगनीं येती
आकाशीं चंडोल चालला
हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें ?
साध्या भोळया फुलराणीचें !

अशा रीतीनें हा वाङ्निश्चय ठरल्यावर फुलराणीच्या विवाहमंगलाला प्रारंभ झाला

गाउं लागले मंगलपाठ,
सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा
कोकिळ घे तानांवर ताना !
लग्न लागतें, सावध सारे !
सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला
भेटे रविकर फुलराणीला !

* * *

वधूवरांना दिव्य रवांनीं,
कुणीं गाइलीं मंगल गाणीं.
त्यांत कुणीधें गुंफित होतें
परस्परांचें प्रेम अहा ! तें !
आणिक तेथिल वनदेवीही
दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं
फुलराणीची गोड कहाणी

बालकवींची हीं एक अनुपमरम्य कविता आहे. 'काल आणि जीवित' हें बालकवींचें उत्कृष्ट चतुर्दशक आहे. चराचराला आपल्या प्रखर दृष्टिपातानें भाजणाऱ्या विश्वभक्षक काळानें जगांत उडविलेल्या अनर्थांचें भयानक वर्णन करून कवि म्हणतात —

काळाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्मांडांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,
चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं !

खरोखरीच बालकवींच्या चित्ताच्या नंदनांतील या कळ्या कालानलावर आपलें स्वामित्व निरंतर प्रकट करितील !

परंतु काळाच्या क्रूर दृष्टिक्षेपानें या कळ्या जरी कोमेजणें आतां शक्य नसलें तरी

स्वतः बालकवींनीं मात्र या आपल्या चित्ताच्या नंदनांतील कांहीं कळ्या चुरगळून सौंदर्यविनाशक कठोरपणांत काळावरहि मात केली आहे! बालकवींचा स्वभाव उतावळा आणि तापट होता. कविता लिहितांक्षणींच दुसऱ्याला दाखवून अभिप्राय ऐकण्याची त्यांना अगदीं उत्कट इच्छा होत असे; आणि अशा वेळीं त्या नवस्फूर्त कवितेचें जीवित या श्रोत्याच्या अभिप्रायावर अवलंबून राही. दुर्दैवानें हा अभिप्राय प्रतिकूल पडला तर बालकवि त्या कवितेची तावडतोब विल्हेवाट लावीत असत! किंवा कागद फाडून अगर जाळून विल्हेवाट नच लाविली, तर त्या कागदाची चुरगळून गोळी करून ते ठेवीत असत! या त्यांच्या विक्षिप्तपणामुळें त्यांच्या कांहीं कविता अजीबात नाहींशा झाल्या आहेत; व ते कविता प्रथम पेन्सिलीनें लिहीत असल्यामुळें त्यांच्या कांहीं कविता, कागदांची चुरगळून गोळी केल्याकारणानें, अस्पष्ट झालेल्या अशा सांपडल्या आहेत. बालकवींच्या आकस्मिक मृत्यूनंतर त्यांच्या बंधूंनीं संशोधन करून प्रयत्नानें संकलित केलेल्या बालकवींच्या अप्रसिद्ध कविता आपल्या जनकाच्या या निर्दय उपेक्षाबुद्धीची चांगली साक्ष देतात. या अप्रसिद्ध कवितांतील बहुतेक कविता अपूर्ण, छिन्नविच्छिन्न व गलिताक्षर अशा आहेत. या अप्रसिद्ध कवितांत ज्या चार-सहा पूर्ण कविता आहेत त्या केवळ उत्कृष्ट आहेत. यांपैकीं फक्त तीनचारांचेंच नामकरण त्यांच्या जनकानें केलें आहे! 'कवीचा विचार' ही या अप्रसिद्ध कवितांतील कविता फार सरस आहे. कवीचा विचार हा कांहीं सामान्य नसतो. दिक्कालांनीं अनवच्छिन्न असलेल्या भवितव्याच्या अनंत क्षितिजावर त्याची दृष्टि खेळत असते!

> विश्वात्मक देवाची वाणी
> विश्वात्मक दिव्यांची खाणी
> विश्वात्मा तूं येथें तेथें
> प्रगटविसी या अज्ञेयातें!
> मायाजालीं परि अवघडला
> आत्मराज तेजोमय पहिला
> एक सुराचें गीत तुझें तें
> कळुनि येइना तेणें त्यातें!

मायाजालीं गुंतलेलें माझें चित्त या जंजाळापलीकडे जात नाहीं; आणि म्हणून

माझ्या या उद्विग्न मनाला आनंद देण्याकरितां—

दिव्य कल्पनामय पक्षांहीं
दिव्य विचारा ये लवलाहीं !
स्वर्गीय तुझ्या आलापानें
गा कविहृदयीं मंजुळ गाणें !

ही कविता पूर्ण नसावी असें वाटतें. 'खेड्यांतील रात्र' ही कविता व एका पडक्या किल्ल्यावरील कवन हीं दोन्हीं चांगलीं कवनें आहेत. हींहि गाणीं अपूर्णच आहेत. नदीच्या कांठावर बसलेल्या एका वनमालेच्या व युवकाच्या संवादावरलें एक उत्तम गाणेंही असेंच अपुरें आहे. हें गाणें लावणीच्या धर्तीवर रचलेलें आहे. तो युवक त्या तरुणीला विचारितो—

" गर्द सभोंती रान साजणी तूं तर चांफेकळी
काय हरवलें सांग शोधिशी या यमुनेच्या जळीं "
ती वनमाळा ह्मणे, " नृपाळा, हें तर माझें घर
पाहत बसतें मी तर एथें जललहरी सुंदर !
हरिणी माझी—तिला आवडे फारच माझा गळा
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा !

हें तिचें साळेंभोळें उत्तर ऐकून तो ' नृपाळ ' तिला म्हणाला—

" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी, तुला
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला !
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी
तव नयनीं या प्रेमदेवता धार विखारी भरी !
क्रीडांगण जणुं चंचलतेचें भाल तुझें हें गडे,
भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे !
अर्धस्मित तव मंद मोहनें गालावरती भरी
भुललें तुजला हृदय साजणी ! ये चल माझ्या घरीं !

असें हें गाणें आहे. एका पांखराला उद्देशून गाइलेलें गाणें गोड आहे. 'पाऊस' हें गाणेंहि मनोहर आहे. हीं दोन्ही गाणीं अपुरीं आहेत. 'निःश्वास' हें एक खंडकाव्य बालकवि लिहीत होते. या खंडकाव्याचे कांहीं

विस्कळित खंड सांपडले आहेत; त्यावरून हें काव्य उत्कृष्ट झालें असतें असें वाटतें. परंतु हें वाटणें आतां व्यर्थ आहे ! या काव्यांतील वर्णनें व प्रसंगोपात्त रसाविर्भाव अगदीं उत्तम साधला आहे. 'दौलतरावांची मंजुळा' हेंहि एक असेंच अपूर्ण खंडकाव्य आहे. या काव्याचें कथानक अत्यंत हृदयद्रावक आहे. हे करुणकाव्य 'एका रफ कागदाच्या चिठोऱ्यावर' लिहिलेलें सांपडलें.

राजसबाला बाळ मंजुळा दौलतरावाची
पोर पोरकी एक राहिली थकल्या जीवाची.

दुर्दैवी दौलतरावाचे बरोबरीचे लाडके पुत्र एकामागून एक समरांगणावर पडून तो म्हातारा पुत्रशोकानें अगदीं पोळला होता; बापाच्या दुःखानें मंजुळेचेंहि मन उदास असे.

तीव्र विषारी शोक पोंखरी आंतुन वृक्षाला
बाळकळीला सहज त्यामुळें म्लानपणा आला.
दुःख रेखितें सान जिवावर जी करुणा कांहीं
काव्यलेखनीं, चित्रदर्शनीं ती दिसणें नाहीं.
भोळा हृदयीं भाव दाटला, वाही देवाला,
मूक रोदनीं अभागिनीचा नच लागे डोळा.

या करुणकथेचा अंत दुर्भाग्य दौलतरावाच्या अंतावरोबरच झाला आहे ! या काव्यांत बालकवींनीं मंजुळेच्या दुर्दैवाची कथा सांगावयाला प्रारंभ करितांना अश्रूंच्या महत्त्वाचें फार सुंदर वर्णन केलें आहे.

मिळेल वैभव, दिसातिल जगतीं रत्नांच्या राशी
अश्रुदयामय मर्त्य जगीं या मोल नसे त्यांसी
मिळतिल कवनें, मिळतील दुर्मिळ तत्त्वांचे बोल
दिव्य अश्रुंनो ! तुम्हांपुढें परि ते सगळे फोल !
परजीवास्तव जेथ आंतडें कळवळुनी येई
त्या हृदयाविण स्वर्ग दुजा या ब्रम्हांडीं नाहीं !

हें" अश्रूंचें माहिम्नस्तोत्र कोणाला पटणार नाहीं ? 'गवताचें गाणें' हें एक उत्तम व पूर्ण गाणें आहे.

परस्परां कंठीं हात—घालुनिया बसलों गात

ऐको, ना ऐको कोणी—हीं अमुचीं वेडीं गाणीं!
उच्छृंखल ओढा चाले—उच्छृंखल मारुत डोले
उच्छृंखल अभ्रें झालीं—उच्छृंखल अमुची बोली!
अर्थ तयाचा कुणा जरी—कळे न, परवा काय तरी
ज्ञान असो अज्ञानच हें—गोड अम्हां अमुचें आहे!

अशा भोळ्या भावानें हें गाणें गवतांनीं गाइलें आहे! स्वर्गातून त्यांची आई—बरसात आली आणि तिनें त्यांना मंजुरवानें बोलाविलें!

ती वदली, 'लाला लाला—या रे या नाचायाला!
वारा पाउस ऊन गडे—नाचनाचतीं स्वैर पुढें.
पंख पाचुचे तुम्हांहि ते—या उडवित येथें तेथें.'

ही आईची हांक ऐकून हर्षभरानें हीं बाळें नाचत वर आलीं आणि परस्परांच्या गळ्यांत हात घालून गाऊं लागलीं! स्वर्गांतून मरुद्गण आले आणि ते त्यांना झोंके देऊं लागले!

प्रेम वनुनि जीवेंभावें—प्रेमाला शोधित जावें!

हें या गवताच्या गाण्याचें रहस्य आहे. 'श्रावणमास' व 'ते डोंगर सुंदर दूरदूरचे बाई!' हीं दोन अपुरीं गाणींहि मनोरम आहेत. 'कविबाळें' ही ठोमऱ्यांची उत्कृष्ट कविता पूर्ण आहे. कवींचे आत्मे हे योगभ्रष्ट पुण्यवंतांचे आत्मे असतात; स्वर्गांत जीं सुखें त्यांनीं भोगिलीं त्या सुखांची—त्या जननांतरसौहृदांची आठवण होऊन हे आत्मे उद्वेगानें व विमनस्कतेनें जे विलाप करितात ते त्यांचे विलापरव हेंच जगताचें काव्य!

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति

या भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायांतील श्लोकार्धावरून बालकवींना ही अभिनव कल्पना सुचली. त्या कल्पनेचा आविष्कार त्यांनीं या गीतांत केला आहे.

स्वर्गाच्या तेजोगर्भीं बाळें तीं खेळत होतीं
वत्सलता प्रभुरायाची जोजवी तयां निजहातीं!

* * *

बैसुनी सूर्यकिरणांत सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल खुलवावें स्वर्गीय जादुनें त्यांनीं!

कधिं चंद्रकला सजवावी, ज्योत्स्नेचें जाल विणोनी !
शांतीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा
नक्षत्रलोक डुलवावा
सौंदर्यें उधळित होतीं, बाळें तीं खेळत होतीं !

अशा त्यांच्या दिव्य लीला चालल्या असतां त्यांचा पुण्यक्षय होऊन कोठूनसा एकाएकीं तीव्र विखारी वारा आला व तीं बाळें खालीं कोसळलीं ! जडतेचें बंधन त्यांना पुन्हा जडलें आणि अशरीरी असलेले आत्मे या मर्त्यलोकांत देही होऊन आले ! परंतु स्वर्गीय सुखांच्या अंधुक आठवणींचीं दृश्यें त्यांना अस्पष्ट दिसत असल्यामुळें ते तळमळून विलाप करितात;

परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाचीं गाणीं
निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोक हा मानी
संतप्त अश्रुमालेला गणतात कल्पनाश्रेणी
गौरवितें विश्व कवींना
जग सर्व डोलवी माना
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्यां काय बोचतें चित्तीं ? बाळें तीं खेळत होतीं.

येथें ही कविता संपते ! व तिच्याबरोबर बालकवींच्या अप्रसिद्ध, अपूर्ण आणि अनामक कवितांचें विवेचनहि संपतें.

'कविबाळें' हें बालकवींचें उत्कृष्ट कवन त्यांच्या काव्यकल्पनांचें केंद्र आहे. या काव्यकल्पनेमुळेंच त्यांचें आयुष्यहि एक उदात्तरम्य काव्य झालें आहे ! जगताला दिव्य ध्येय दाखविण्याकरितां कवि हा एक पृथ्वीतलावर अवतरलेला योगभ्रष्ट पुण्यात्मा आहे अशी त्यांची कल्पना होती. तें दिव्य ध्येय दाखवून या अवस्थेंतून सुटणें, जडतेचा बंध तोडणें म्हणजेच मरण ! हा जडतेचा बंध तुटला म्हणजे पुन्हा जेथून आलों तेथें जाऊन तेथील दिव्य आनंद मनमुराद लुटतां येईल अशी त्यांची भावना होती. हिंदुमनाला ही भावना अपरिचित नाहीं; परंतु बालकवींनीं ती इतक्या नवाईनें व नवलाईनें सांगितली आहे कीं, परिचित असूनसुद्धां ती अगदीं नवीन वाटते. या भावनेमुळेंच बालकवींना मरणाचें वेड—आपण

जेथून ढळलों त्या पुण्यपदाला परत जाण्याचें वेड लागलें होतें. ममतेमुळें जडते-चा हा बंध, हा देह झुगारून देववत नाहीं, मोहामुळें हा बंध तोडणें अशक्य आहे—सहज तुटेल तेव्हां तुटेल असें समजून ते जीविताविषयीं एकापरी उदास झाले होत. आणि त्यामुळें त्यांचें कोणतेंहि उत्कृष्ट गीत वाचतांना

आहे मनोहर तरी गमतें उदास !

—सरस्वतीकंठाभरण.

असाच अनुभव येतो ! ' निर्झर,' ' कवीची इच्छा,' ' कवीचा विचार ' व बालविहगावरलें अनामक परंतु पूर्ण गीत––या त्यांच्या सर्व उत्तम गीतांतून

जडतेला खिळुनी राही—हृदयबंध उकलत नाहीं !

हें त्यांच्या निर्विण्ण मनांत निरंतर घोळणारें एकच रडगाणें व वेडगाणें घुमत आहे. आधींच जीविताविषयीं ही अशी भावना आणि त्यांत पोरवयींच पाठीमागें लागलेला प्रपंचाचा ताप; त्यामुळें ते अगदीं वैतागल्यासारखे झाले होते. सृष्टीशीं समरस होऊन देहभान हरपलें कीं त्यांचें मन मोकळें होऊन हीं आपलीं दुःखें सृष्टीला सांगत असे ! त्यांच्या प्रत्येक कवितेवर यामुळें करुणरसाची उदास छाया पसरली आहे.

आनंदी आनंद गडे !

हा एक त्यांच्या हृदयसागरावरला एका सुखक्षणीं उठलेला तरंग आहे; आणि म्हणूनच त्या कवनांत गूढ आणि हृद्यंगम असें कांहींच आढळत नाहीं. या विचित्र वेडामुळेंच त्यांना जिकडे तिकडे

बोलवितात । विक्राळ यमाचे दूत !

असा भास होऊं लागला होता. कोणतेंहि भयाण दृश्य पाहिलें कीं त्यांना हा भास होत असे.

गिरिशिखरावर आ पसरोनी
काळ्या अंधारांत दडोनी
किंवा पडक्या बुरुजांवरुनी
शब्द येतात । ' चल, बसूं नको जगतांत ' !
क्षणभर सांपडतां एकांत
विचारलहरी उद्भवतात
विझते प्रेमांशाची ज्योत

पेट घेतात । हे असंख्य वणवे आंत !
पुस्तक वाचायाला घ्यावें
कवितेनें कीं मन रमवावें
सृष्टीचें सौंदर्य बघावें
हृदयीं तों तों । हा विकार दृढतर होतो !

त्यांनींच केलेलें हें त्यांच्या मनःस्थितीचें वर्णन त्यांच्या आयुष्याचें व कवितेचें गूढ रहस्य उकलून सांगतें. ज्या कारणामुळें बालकवींचें कवित्व आणि जीवित रहस्यमय झालें आहे तें कारण हेंच. परंपरेनें वाढत आलेलें आनुवंशिक वैराग्य बालकवींच्या ठिकाणीं कदाचित् पूर्णत्व पावलें असेल असें यावरून वाटतें. वैराग्याकडे त्यांचा असा स्वाभाविक ओढा होता व तो ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या दृढ व्यासंगामुळें कदाचित् वळावला असेल.

या व्यासंगामुळें व वैराग्यामुळें त्यांच्या भाषेचें व विचारांचें वळण जुनें राहिलें आहे. ज्ञानेश्वरी बालकवींना फार प्रिय होती. मन शांतीच्या लाभास्तव त्यांनीं आपल्या एका उन्मार्गगामी कविमित्राला ज्ञानेश्वरीचें पारायण करावयास सांगितलें होतें. ज्ञानेश्वरीइतकीच तुकोबांची अभंगवाणीहि त्यांना आवडत असे. इंग्रजीचा त्यांचा व्यासंग बेताचाच होता. संस्कृत व विशेषतः मराठी आणि त्यांतल्या त्यांतहि लावण्या-पोवाडे यांवर त्यांचा अधिक भर असे. या अध्ययनाच्या मऱ्हाठीपणामुळें त्यांची कविताहि साधारण मऱ्हाठी-स्वदेशीच राहिली आहे. बालकवींच्या बुद्धीला बाळपणींच प्रागल्भ्य आलें होतें. वयाच्या अकराव्या वर्षींच निबंधमाला त्यांनीं वाचिली होती. देशाभिमान निर्माण करणें हें निबंधमालेच्या व्यासंगाचें एक नैसर्गिक नियत कार्य आहे. निबंधमालेच्या वाचनानें त्यांच्या मनावर हा जो परिणाम झाला तो आमरण कायम टिकला. बालकवींच्या कवितेला ज्या काळांत व्यवस्थित बोलण्याची शक्ति आली तो काळ महाराष्ट्राच्या आयुष्यांत अत्यंत धामधुमीचा होता. १९०८ साल ! या सालाचा महाराष्ट्रांतील कोणत्या मनुष्याला विसर पडेल ? त्या सालीं महाराष्ट्रांत ज्या नवीन विचारांची लाट उचंबळली होती तेच विचार बालकवींची कविता आपल्या बोबडया वाणीनें प्रथम बोलूं लागली.

महामंगला पावना पुण्यभूमी

तिचे—राष्ट्रमाता तिचे बाळ आम्ही.
तिचें नांव या सार्थ लोकीं करावें
स्वयें उद्धरोनी जनां उद्धरावें.
बहू नेटका नीट संसार केला
परी शेवटीं काळ घेऊन गेला
अशा संसृतीची जनीं कोण गोडी ?
धरी रे मना राष्ट्रसेवा न सोडी !

असे बालकवींच्या भावनोत्कट मनाचे विचार त्या वेळीं होते ! समर्थांच्या खडखडीत वाणीचा हा केवळ प्रतिध्वनि आहे.

महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र ! हा निनाद अंबर भरी
महाराष्ट्रयश दिव्य-गाइलें अनंत लोकेश्वरीं !
थोर थोर नरवीर धैर्यधर संतसन्मणी गुणी
तुझ्याच चरणीं लीन जाहले, भाय विश्वपावनी !

असे उद्रेक त्या वेळीं त्यांच्या अंतःकरणांतुन उचंबळत होते ! राजकारणांत त्यांचे विचार फार पुढें गेलेले होते. हे विचार त्यांनीं आपल्या कवितांतून विशेष प्रगट केलेले नाहींत; महाराष्ट्राची हल्लींची हवा त्यांना मानवण्यासारखी नसल्यामुळें ते जेथें उपजले तेथेंच मेले ! दासांच्या मनोरथांचें भवितव्य याहून निराळें तें काय असणार ? महाराष्ट्रावर १९०७ सालानंतर जे प्रसंग ओढवले त्या प्रसंगांमुळें त्यांच्या स्वाभाविक वैराग्यविचारांनीं जी उचल खाल्ली ती उचल अखेर त्यांच्या मृत्यूनेंच शांबली ! त्यांचीं सामाजिक मतें अत्यंत उदार होतीं. ‘ धर्मवीर ’ या तेजस्वी कवनांत त्यांच्या या मतांचें उत्तम प्रतिबिंब पडलें आहे. आनुवंशिक संस्कारांनीं ते जात्याच धर्मप्रवण होते. त्यांचीं धार्मिक मतें ‘ संतांचा अनुवाद ’ या प्रेमळ अभंगांत व्यक्त झालीं आहेत. सांसारिक सुखांऐवजीं सांसारिक संकटांचाच त्यांना अधिक अनुभव आला आणि त्यांची विरक्ति वाढत गेली. वडिलांच्या मृत्यूनंतर लगेच म्हणजे तयाच्या सोळाव्या वर्षीं त्यांचें लग्न झालें ! बालकवींची नवपरिणीत पत्नी अगदीं निरक्षर होती. लग्नाच्या पूर्वीं हें माहीत असून सुद्धां वैधव्यानें पोळलेल्या मातेच्या इच्छेला मान देण्याकरितां ते बोहल्यावर चढले. या लग्नापायीं पुढें जे गृहकलह वाढले त्यांच्यामुळें

बालकवींचें मातृनिष्ठ मन कायमचें निराश झालें; वैवाहिक सुख तर त्यांस मुळींच लाभलें नाहीं. सर्वतोपरि सांसारिक संकटें साह्याय्यक झाल्यामुळें त्यांची प्रपंचावरली आसक्ति अजीबात उडाली. इतक्या आपत्ति आल्या तरी सन्मार्गापासून त्यांचें पाऊल कधींच ढळलें नाहीं. मनुष्य स्वभावतःच पतनोन्मुख आहे; परंतु अशा दुरतिक्रम स्वभावाचेंहि त्यांनीं, ऐन तारुण्यांत, आपल्या आत्मनिग्रहानें दमन केलें होतें. बालकवींची कोणतीहि उत्कृष्ट कविता वाचतांना मनाला अगदीं विशुद्ध आनंदाचा लाभ होतो. त्यांच्या पावित्र्याची व प्रेमळतेची उज्ज्वल प्रभा त्यांच्या कवित्वावर व जीवित्वावर पसरली आहे आणि त्याचमुळें त्यांचें जीवित हें एक उदात्तरम्य काव्य झालें आहे.

बालकवींच्या कवितेचें धोरण जुनें असलें तरी त्यांच्या काव्यांत नावीन्य भरपूर आहे. आधुनिक कवींचे कुलगुरु केशवसुत हेच त्यांना गुरुस्थानीं होते. तुतारीमंडळाचा त्यांना याच कारणामुळें विशेष अभिमान वाटत असे. परंतु केशवसुतांच्या कवितेची छाया बालकवींच्या कवितेवर बिलकूल पडलेली नाहीं. टिळकांचा व त्यांचा विशेष घरोबा होता. टिळकांच्या सान्निध्याचा परिणाम त्यांच्या कवितेवर बराच झाला आहे. काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या प्रारंभींच्या कविता टिळकांच्या सहवासाचा परिणाम स्पष्ट दाखवितात. बालकवींच्या कवितेला टिळकांनीं वळण लाविलें हेंच या कविता वाचून वाटतें; व त्यांत नवलहि नाहीं. दत्त, विनायक यांचीही कविता त्यांना आवडत असे; परंतु यांच्याहि कवितेची छाया त्यांच्या कवितेवर पडलेली नाहीं. प्रसंगीं टिळकांपासून ठोमऱ्यांना काव्यस्फूर्तिही होत असे. १८९८ सालच्या 'बालबोध मेवा' या मासिकाच्या चवथ्या अंकांत टिळकांची 'उन्ह-पाऊस' ही सुंदर कविता आली आहे; हीच कविता पुढें एक तपानंतर फक्त कांहीं चरण गाळून सुटसुटीत झालेली अशी 'खेळगडी' मासिकाच्या सहाव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत बालकवींच्या नांवावर आलेली आहे! ठोमरे व टिळक हे दोघेही त्या वेळीं नगरला होते; व संपादकांचें उभयतांना विनंतिपत्र जातांच टिळकांची 'हें बघ लालके' व ठोमऱ्यांची 'छोट्या बालकास' या दोन कविता एकदमच आल्या. 'उन्ह-पाऊस' या टिळकांच्या कवितेला फक्त नवें नांव ठेवून व सुटसुटीत करून ठोमऱ्यांनीं खेळगडी-करितां पाठविली होती. टिळक व ठोमरे यांचा संबंध जिव्हाळ्याचा होता. टिळ-

कांच्या घरांतल्या माणसांना ठोमरे कधींच परके वाटले नाहींत व ठोमऱ्यांनाही टिळकांचें घर सदैव आपलें वाटलें. टिळकांच्या सुगृहिणी लक्ष्मीबाई यांना ठोमरे मुलासारखे होते आणि टिळकांचे सुपुत्र देवदत्त यांना ते भावासारखे होते; टिळकांपेक्षांहि या त्यांच्या कुटुंबांतील दोन व्यक्तींवर बालकवींचा अतोनात लोभ होता. टिळकांच्या व ठोमऱ्यांच्या या घरोब्याचा परिणाम उभयतांच्याही धर्ममतांवर बिलकूल झाला नाहीं; आणि हें उभयतांना व विशेषतः टिळकांना फार भूषणावह आहे. टिळकांप्रमाणेंच ठोमरे व सोनाळकर यांचाही बराच स्नेह होता. गोविंदाग्रज व अनंततनय यांच्याशींहि त्यांचा स्नेहसंबंध असे. परंतु यांपैकीं एकाच्याही कवितेची छाया त्यांच्या कवितेवर पडलेली नाहीं. सुप्रसिद्ध कवि Bee यांची कविता त्यांना फार आवडत असे.

मऱ्हाठी शाहिरांच्या अध्ययनाचा प्रभाव ठोमऱ्यांच्या कवितेवर व विशेषतः ‘ निःश्वास ’ या खंडकाव्यावर बराच झालेला दिसतो. महाराष्ट्रमहिलांच्या मुखांत खेळणाऱ्या गाण्यांचा व ओंव्यांचा अभ्यास तर त्यांना बाळपणींच झाला होता. त्यांतील वेंचक शब्दांचा उपयोग ते खुबीनें करीत असत. ‘ फुलपांखरूं–फुलवेल ’ या गाण्यांतील—

माणिक हें । बाइ गडे झुलतें आहे !
हें तान्हें । सृष्टीचें गोजिरवाणें !

या ओळी वाचतांना—

तान्हया तान्हिका । माझ्या बाळा रे माणिका

या मुलींच्या ओवीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. ‘ संध्यातारक ’ ही कविता अशाच घरगुती गोड शब्दांनीं खचलेली आहे. ‘ संध्यातारक ’ ही कविता त्यांनीं प्रथम लिहिली तेव्हां तिला ‘ अंगाई गीत ’ हें नांव दिलें होतें. या कवितेचें पहिलें स्वरूप संस्कृतमय व त्यांनींच आपल्या एका पत्रांत म्हटल्याप्रमाणें ‘ बोजड ’ आहे. ही कविता त्यांनीं ज्या वेळीं लिहिली त्या वेळीं, बरेच दिवस कविता न केल्यामुळें,

अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां —चिपळूणकर.

अशी त्यांची स्थिति झाली होती. बोजडपणा हें याच अनभ्यासाचें फळ होतें. सुधारल्यावर ही कविता किती मधुर झाली याचा प्रत्यय,

गोजिरवाणी झुलतें गगनीं प्रेमरक्त हृदयांत

ही मूळ कवितेंतील ओळ व

कोमल किरणीं नभ फुलवोनी खेळ खेळतें त्यांत

ही सुधारलेल्या कवितेंतील ओळ, या दोन ओळी देतील. ‘ निर्झर ’ ही कविताही त्यांनी अशीच सुधारली होती; या कवितेच्या पहिल्या व दुसऱ्या रूपांत इतका फरक पडला होता कीं, त्यांचें त्यांनाच कोणता ‘ निर्झर ’ अधिक चांगला हें ठरवितां येईना! ‘ आव्हान ’ व ‘ कविबाळें ’ या कवितांचीही अशीच हकीकत आहे. बालकवि हे कवितेची रचना सुंदर व मधुर व्हावी याकरितां किती श्रम घेत असत हें यावरून सहज समजेल. विनायक व केशवसुत यांची रचना व्यवस्थित असते; पण नादाची जोड त्यांच्या-विशेषतः केशवसुतांच्या रचनेला नाहीं. गोविंदाग्रजांच्या कवितेंत नाद बराच असतो पण व्यवस्था नाही. मोगरे यांची रचना व नाद हीं दोन्हीं अंगें चांगलीं, परंतु त्यांच्या कवितेंत ध्वनि नाहीं. ठोमरे यांनीं नाद व रचना हीं दोन्हीं उत्तमत्वानें साधून आपल्या काव्यांत उत्कृष्ट ध्वनिहि ओतला आहे. बालकवींची कविता बहुतेक निर्दोष आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या कवितेंत एकच दोष-शब्दांची पुनरुक्ति हा फार आढळतो. एकंदर गुणसंनिपातांत हा दोष लोपून जातो; तरीहि त्याचा येथें थोडासा विचार केला पाहिजे. एका अर्थाचे अनेक शब्द योजणें हें कौशल्य तर खरेंच, परंतु तें कौशल्य काव्याला कितपत पोषक होईल हा प्रश्न आहे. कित्येक शब्द जात्याच काव्यमय असतात; पुनरुक्ति टाळण्याकरितां त्या शब्दांऐवजीं दुसरे रुक्ष शब्द योजणें अत्यंत रसापकर्षक असतें. पुनरुक्ति जी केली जाते ती बहुतेक ही रसापकर्षकता टाळण्याकरितां केली जाते; शब्दांची पुनरुक्ति पत्करेल पण रसहानि नको, असा यांत हेतु असतो. या दृष्टीनें बालकवींनीं केलेली शब्दांची पुनरुक्ति अक्षम्य आहे असें वाटत नाहीं. ‘ शब्दांची रसवत्ता ’ हा एक साहित्यशास्त्रांतील अतिशय महत्वाचा विषय आहे. कल्पनांची पुनरुक्ति बालकवि क्वचितच करितात. केशवसुतांप्रमाणें बालकवींनीं ‘ काळाचे लेख,’ ‘ प्रेमलेख ’ व ‘ काल आणि जीवित ’ हीं तीन उत्कृष्ट चतुर्दशकें लिहिलीं आहेत. बालकवींची वृत्तयोजनाहि फार समर्पक असते. एकंदरींत केशवसुत-गोविंदाग्रजांपेक्षां बालकवींचें पाऊल प्रगतीच्या मार्गांत बरेंच पुढें पडलें आहे यांत शंका नाहीं.

राष्ट्रीय कविता बालकवींनीं लिहिलीच नाहीं म्हटलें तरी चालेल. याचें कारण, त्यांच्या अंतःकरणांत जे विचार घोळत होते त्यांचा उच्चार करावयाला काळ अनु-

कूल नव्हता, हेंच होय ! 'निःश्वास' काव्यांतील कांहीं भागावरून त्यांना वीररसहि उत्तम साधत असे असें वाटतें. हें काव्य इतक्या विलक्षण रीतीनें छिन्नविच्छिन्न झालेलें आहे कीं, त्याच्या उर्वरित शकलांवरून त्याचें कथानक किंवा उद्देश कांहींच ध्यानांत येत नाहीं ! आणि त्यामुळें एखादा उतारा देणें सुद्धां अप्रस्तुत होऊन बसलें आहे. काल अनुकूल असता व त्यांच्या मनाला जर वैराग्यानें घेरिलें नसतें तर त्यांनीं ओजस्वी राष्ट्रीय व ऐतिहासिक कवनें लिहिलीं असतीं असें वाटतें. 'चौघडा' हें अतिशय जोरदार कवन त्यांनीं पर्वतीच्या चौघड्यावर लिहिलें होतें; परंतु दुर्दैवानें तें कवन हरवलें ! त्या कवनाचा उल्लेख गोविंदाग्रजांनी आपल्या बालकवींना उद्देशून गाइलेल्या हृदयस्पर्शी भूपाळींत केला आहे. राष्ट्रीय म्हणतां येतील अशीं आतां दोनच कवनें, बालकवींचीं उपलब्ध आहेत. 'धर्मवीर' हें समाजकारणावर आहे व 'संतांचा अनुवाद' हें धर्मकारणावर आहे. या दोन्ही कवनांत बालकवींचीं उदार मतें व उज्ज्वल देशाभिमान प्रकट झाला आहे. 'धर्मवीर' हें कवन विलक्षण ऊर्जस्वल आहे; केशवसुतांच्या तुतारीहूनहि हें कवन अधिक आवेशयुक्त आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. तुतारीनंतर तुतारीच्या धर्तीवर जीं अनेक क्षुद्र कवनें गेल्या वीस वर्षांत उत्पन्न झालीं तीं काळाच्या ओघांत वाहून गेल्यावर जीं थोडीं चांगलीं कवनें त्या आपातांतून तगून मागें रहातील त्या थोड्यांचा हा बालकवींचा 'धर्मवीर' निरंतर अग्रेसर गणिला जाईल. प्राचीन काळीं जें धर्माचें अकृत्रिम व अत्युज्वल स्वरूप होतें तें आज नष्ट होऊन रूढीचें प्रेत मात्र आजचे धार्मिक उराशीं घट्ट धरून आक्रोश करीत आहेत; त्यांना सत्यधर्माचें ज्ञान व्हावें म्हणून हा 'धर्मवीर' अवतरला असून ही 'गीति' गात आहे !—

आर्यऋषींनीं जी केली; तेजाची पूजा वहिली,
ती करणें ज्या ज्या लोकां ते सारे सावध ऐका.
गर्जू या हिंदिस्तान, ऐकुनि हें माझें गान
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानीं,
ते सारे सावध ऐका, सत्यधर्म कथितों लोकां !

* * *

धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानीं
स्वार्थाला देउनि लाथ, तेजाचा धरुनी हात
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर.
विश्वचिंतनीं रमणार, स्वयंपणें विश्वाकार;
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदिस्तानी,
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण !
सत्य बोल हे करा उठा ! धर्मवीर ! अद्वैत लुटा !

हा सत्यधर्म कसा आहे ?

सत्यधर्म निरहंकार, सर्वांचें समता सार,
सत्यधर्म जगतीं प्रेम, चोहिंकडे आत्माराम.
स्वार्थाचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्यधर्म जीवंत पण !

देहावर उदार व्हा आणि अशा ह्या सत्यधर्माची पताका हातीं घेऊन पुढें चला !

आद्यऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें
धर्मतत्व हें खरें खरें, आह्मांला कळलें सारें !
धर्मवीर भूमीवरती, धर्मतत्व अमुच्या हातीं
देवाचे आह्मी प्राण, आह्मांला भिवविल कोण ?
काळाचे आह्मी काळ, काळ-दिशा आमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें, नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा !
वाट करा आह्मांला रे, कां मरतां व्यर्थचि सारे ?
तेजाचे आह्मी दास, सत्याची धरली कांस,
देवाला फिरवूं मागें, दाखवितां कसलीं सोंगें ?
देवाची परवा नाहीं, नांवाची परवा नाहीं,
धर्मवीर भूमीवरती, त्या अमुची असली गीती !

असें हें धर्मवीराचें ओजस्वी आव्हान आहे. ही विश्वधर्माची कल्पना हिंदुस्थानांत नवीन नाहीं. जगताच्या या कर्मभूमीत विश्वधर्माचें–उदार विचारांचें पीक हिंद-

भूमीनेंच पिकविलें आहे. ज्यांच्या वाणीमागून अर्थ धांवत होता अशा आद्यऋषींनीं उपनिषत्कालीं, आडरानीं भरलेल्या जगाला पाहून ज्यांना कळवळा आला अशा संतकवींनीं प्राचीन काळीं, आणि लोपलेले पुराणे अर्थ उकलून सांगण्याकरितां ज्यांनीं शब्दांची आटी केली त्या राममोहन राय, रामकृष्ण परमहंस यांच्यासारख्या महाविभूतींनीं अर्वाचीन काळीं हा विश्वधर्माचा–सत्यधर्माचा डांगोरा या भारतभूमींत पिटिला आहे! त्याच सत्यधर्माचें प्रवचन ठोमऱ्यांनीं आपल्या तेजस्वी वाणीनें या कवनांत केलें आहे. बालकवींचीं राजकीय मतें प्रखर होतीं याची कल्पनाहि हें ' धर्मवीर ' कवन वाचून येते. ईश्वरविषयक उदात्त भावना ' संतांचा अनुवाद ' या अभंगांत आल्या आहेत.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ

—तुकाराम.

हेंच तत्व या अभंगांत आहे. ' भूतीं भगवद्भाव '—सर्व भूतमात्राच्या ठायीं भगवंताला पहावयाचा हा उपदेश संतकवींनीं आज शतकानुशतकें केला आहे. आधुनिक काळांतील संतांनीहि हतभागी हिंदुस्थानांतील तीस कोटी त्रस्त जीवांच्या ठिकाणीं, देवळांतल्या देवांना सोडून परमेश्वर पाहण्याचा तोच पवित्र उपदेश केला आहे.

देवळींचा देव मेला। विश्वीं विश्वरूप झाला
देव झाला शतखंड। तेणें कोंदलें ब्रह्मांड
क्रियाकर्मीं देव नाहीं। देव कीर्तनीं न राही
देव नाहीं ज्ञानामधीं। ती तों देवाची समाधी
सत्य देव विश्वांतरीं। हिंडतसे दारोदारीं

ही या अभंगांतील भावना आहे; भावना जुनीच आहे परंतु बालकवींनीं ती अगदीं जीवाभावानें सांगितली आहे.

माझे तीस कोटी देव। नको अद्वैताचें नांव
जळो माझी दोषदृष्टि। जीव तुटो तयांसाठीं
हातें घडो त्यांची सेवा। निदिध्यास लागो जीवा
ह्मणे रमाईचा बाळ। हेचि आस सर्व काळ

हिंदुस्तानाची दुर्दशा पाहून तळमळणारें आपलें अंतःकरण बालकवींनीं या अभंगांत ओतलें आहे. हे अभंग ह्मणजे खरोखरीच संतांचा अनुवाद आहेत.

हा अनुवाद अनेक कारणांमुळें बालकवींना आपल्या आचरणांत उतरितां आला नाहीं. देशसेवा करावयाला जो हरघडी नवा हुरूप लागतो तो त्यांच्या ठिकाणीं नव्हता. त्यामुळें मन तळमळत असूनसुद्धां त्यांना कांहीं करितां आलें नाहीं त्यांच्या मनाला नैराश्याची जी विलक्षण आधि जडली होती तिच्यामुळें त्यांची कर्तृत्वशक्ति अगदीं लुली होऊन गेली होती. त्यांचे वैराग्यविचार इतके उच्छृंखल होते कीं, अगदीं अतीवरम्य निसर्गदृश्य पहात असतांनासुद्धां ते त्यांना सोडीत नसत; उलट त्यांची भरती असह्य होऊन ते कवित्वरूपानें बाहेर पडत असत. संध्याकाळच्या सोनेरी आकाशांत बालविहगाला भिरभिरतांना पाहून सृष्टीच्या सुखमय सौंदर्यांत समरस होण्याऐवजीं त्यांना स्वःच्याच बद्धस्थितीची आठवण होऊन, त्यांनीं आपलें मन त्या विहगापाशीं मोकळें केलें आहे!

सांज खुले: सोन्याहुनि पिंवळें हें पडलें ऊन
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान.

संध्याकाळच्या सूर्याचे सुवर्णकिरण गिरिशिखरावर पसरले होते; सांध्यतेजानें न्हालेल्या आकाशांत त्या वेळीं मूर्तिमंत आनंद असा एक बालविहग झुलत होता!

क्षणभर येथें, क्षणभर तेथें भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची!
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी!
गिरिशिखराचें गोल फूल हें सांध्यतरंगांनीं
फिरुनि, त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं!

गगनमंडळांत चाललेला असा हा सुंदरतेचा जलसा पाहून अनंताच्या अफाट मैदानावर अविश्रांत धांवणारा काळसुद्धां क्षणभर स्तब्ध झाला! हा मूर्त आनंदोद्रेक गगनांत नाचतांना पाहून—

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें,
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें;
प्रीतिसारिका,-गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मन धुंद, रंगुनी काव्यसुधापानीं;
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे,

चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाला ! व्हावें !

परंतु हें घडावें कसें? आकाशांत तुला भिरभिरतांना पाहून अंतःकरणहि उड्डाण घेतें ! परंतु प्रपंचाच्या पिंजऱ्यांतून हा मायेचा हिरवा रावा सुटावा कसा?

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं
शांति मिळेना क्षणभर, जीवा विश्रांती नाहीं;
काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज
काळ लोटला हाय ! किती, मन वरितांहे लाज !
सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे.
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें;
जीव ओढितो वरवर जाया चैतन्यापाठीं
हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !

× × ×

तुजला बघतां, भरभर उडतां, कविता आठवली
कशी वशी ती स्वरप्रीतिस्तव या कवनीं लिहिली !

येथें ही पूर्ण परंतु अनामक व अप्रसिद्ध कविता संपते. बालकवींच्या तीव्र निराशेची करुणच्छाया या कवितेवर पडल्यामुळें ही कविता हृदयद्रावक झाली आहे. देहबंध तोडण्याकरितां धडपडणाऱ्या बालकवींच्या हृदयाच्या वाढत्या तळमळीनें हें गाणें अगदीं ओथंबलेलें आहे. बालविहगाप्रमाणें बालझऱ्याला पाहूनहि ते एकदां असेच वेडे झाले होते; 'हरपल्या श्रेयाची' साक्ष विजनवासांत पटते असा आपला अनुभव केशवसुतांनीं सांगितला आहे. या अनुभवाचा लाभ बालकवींनींहि घेतला होता; व अनुभव घेऊनच घेऊनच त्यांचें मरणाचें वेड वाढत गेलें ! बाल्याचा अनुभव बालकवींना या विजनवासांत पुन्हां लाधत असे. वागडत्या बालझऱ्याला किंवा भिरभिरत्या बालविहगाला पाहून

स्मरणाच्या थडग्यांतुनि या रे !
सुमनांनो भूवरती सारे !
खेळ करूं ते पुन्हा एकदां—पूर्वीं जे केले !
दिव्य माझिया नक्षत्रांनो !
बाल्यवनींच्या वनविहगांनो !

या चिमण्यांनो ! या छकुल्यांनो !—या या या आतां !
प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें
तुम्हांसंगतीं येइल येथें
मीही सोडुनि तारुण्यातें—होइन बाल पुन्हां

अशीं पूर्वस्मृतीचीं गीतें गात गात त्यांच्या चित्ताच्या नंदनांतलीं निराशेनें 'सुकलेलीं फुलें' उमलूं लागत ! त्यांच्या चित्ताच्या नंदनांतल्या कळ्याहि अशाच वेळीं फुलत असत. स्वतःच्या मनाला टोंचणारें कायमचें दुःख आणि निसर्गदृश्य पाहून मनाला झालेला आनंद या दोन परस्परविरोधी भावनांच्या करुणसुंदर संगमानें उद्भूत झालेल्या गोड तद्रूपतेच्या भरांत ते त्या निसर्गदृश्याला आपल्या गीतसुरांत गुंगवीत असत. दऱ्याखोऱ्यांना घुमवीत येणाऱ्या निर्झराला पाहून ते तन्मय होत आणि आनंदाच्या ओंव्या त्याला गाऊं लागत !—

गिरिशिखरें वनमालाही–दरी दरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या—खेळ लतावलयीं फुगड्या
घे लोळण खडकावरती–फिर गर गर अंगाभंवतीं,
जा हलुहलु वळसे घेत–लपत छपत हिरवाळींत
पाचूचीं हिरवीं रानें—झुळुव गडे झुलुझुलु गानें !
वसंतमंडप वनराई—आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ—नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिकलीं शेतें—सळसळतीं–गातीं गीतें
झोंप कोठुनी तुला तरी—हांस लाडक्या ! नाच करीं
बालझरा–तूं बालगुणी–बाल्याचि रे भरिसी भुवनीं !

तुझें हें गाणें ऐकून हे बालतरु तुला ताल देत आहेत. आकाशांतून जाणाऱ्या या मेघांच्या सुंदर पंक्ति; हें इंद्रधनुष्य आणि ही रमणीय संध्या; नीलारुण फलकावर लुकलुकणाऱ्या या तारका आणि हें चंद्राचें शुभ्र चांदणें;-

हीं दिव्यें येतीं तुजला—रात्रंदिन भेटायाला !
वेधुनि त्यांच्या तेजानें—विसरुनिया अवघीं भानें
धुंद हृदय तव परोपरी—मग उसळी लहरी लहरी
त्या लहरींमधुनी झरती—दिव्य तुझ्या संगीततती !

नवल न त्या आशायाला—स्वर्गहि जर भूवर आला !
गंधर्वा ! तव गायन रे—वेड लाविना कुणा बरें ?

तुझ्या या गीतनादानें हा पर्वत, ही दरी, या अरण्याचा हा सगळा परिसर अगदों भरून गेला आहे; किंबहुना तुझ्या या गाण्यानें वेडें होऊन सगळें ब्रह्मांडच गीतमय झालें आहे !

मुरलीच्या काढित ताना—वृंदावनिं खेळे कान्हाः
धुंद करुनि तो नादगुणें—जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी – तूंहि निर्झरा ! नवलपरी —
गाउनि हें झुळझुळ गान--विश्वाचें हरिसी भान !
गोपि तुझ्या हिरव्या वेली--रास खेळती भंवतालीं !
तुझ्या वेणुचा सूर तरी--चराचरावर राज्य करी !

* * *

काव्यदेविचा प्राण खरा–तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्यांच्या धुंदिगुणें–दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला–कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं–दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही–हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव–जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें–मग कुठुनी असलीं गीतें ?

तूंच खरा कविराज, सरस्वतीचा कंठमणि तूंच ! तुझीं हीं दिव्य गीतें मला शिकव! आणि मग माझ्याही अंतःकरणांत त्यांच्या दिव्य लहरी उसळून माझ्या ठिकाणीं उज्ज्वल काव्यस्फूर्तीचा उदय होईल !—

अद्वैताचें राज्य गडे !–अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशांतिसौंदर्यांहीं–वेडावुनि वसुधामाई—
मम हृदयीं गाइल गाणीं–रम्य तुझ्या झुळझुळवाणी !
आणि जसें सगळें रान–गातें तव मंजुळ गान
तेंवि सृष्टिची सतारही–गाइल मम गाणीं कांहीं !

बालकवींचें हें गाणें केवळ अप्रतिम आहे ! उत्कृष्ट नाद व उत्कृष्ट ध्वनि यांचा

इतका सुंदर मिलाफ दुसऱ्या कोणत्याही आधुनिक गीतांत झालेला आढळत नाहीं. केशवसुतांचा 'झपूर्झा' व गोविंदाग्रजांची 'मुरली' हीं दोन आधुनिक उत्तम गीतें आहेत. परंतु 'झपूर्झा' या गाण्यांत नाद कमी व 'मुरली' हें विस्तारानें विनाकारण वाढलेलें; त्यामुळें हीं दोन्ही गीतें 'निर्झर' या गीताच्या बरोबरीला येत नाहींत. झऱ्याच्या झुळझुळत्या लहरींचा नाद व त्याच्या नाचऱ्या गतीचें वर्णन हीं दोन्हीं उत्तम साधलीं आहेत. 'निर्झर' या कवितेंत जीविताविषयीं जी आपली कल्पना बालकवींनीं व्यक्त केली आहे, त्याच कल्पनेचें विस्तृत विवेचन 'कवीची इच्छा' या आपल्या मनोहर गाण्यांत त्यांनीं केलें आहे. जग हा एक भास आहे; जगांतील सुखदुःखांचे अनुभव हे सारखेच मिथ्या आहेत.

ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या

हा शांकरसिद्धांत ज्यांना उमजला त्यांना या सुखदुःखांचे विकार स्पर्श करणार नाहींत. जगाचें अस्तित्व हाच जेथें आभास आहे तेथें सुख तरी कोठलें आणि दुःख तरी कोठलें?—

फूलपांखरें परोपरी—निर्वेधपणें फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होतीं--मंद तरल गंधांवरती—
तेविं जगाच्या फुलांवरी—गंध दाटले परोपरी
अनुभवुनी हर्षित व्हावें--सुखदुःखें चुंबित गावें!

जग हें एक सत्याला पडलेलें सुंदर स्वप्न आहे!—

सत्याचीं स्वप्नें व्हावीं,—सत्याला स्वप्नें यावीं!
स्वप्नींहि स्वप्नें बघत—स्वप्नांतचि व्हावा अंत!
मरण्याचें स्वप्नहि गोड—जगण्याचें स्वप्नहि गोड!
येणेंपरि सर्वहि भास—अमृताचे व्हावे कोष!

जग हें एक सुंदर स्वप्न आहे हें सत्य पटल्यावर मग जगांत मरणाचें भय तरी कुठें राहिलें? आभासाला सत्य समजल्यामुळें भयाची भावना उत्पन्न झाली! जगणें आणि मरणें या दोन्ही अवस्था भासमय आहेत. मरण हीच नैसर्गिक स्थिति असून उलट जीवित मात्र केवळ सत्याला पडलेलें एक स्वप्न, एक चंचल अवस्था आहे! असल्या नैसर्गिक स्थितीला कां भ्यावयाचें? जग हा एक अज्ञेयावर उठलेला विकार आहे हें तत्व उमजलें ह्मणजे दुःखाचा भाव राहिलाच नाहीं.

होइल मग सर्वच गोड — मरण गोड जगणें गोड !
दुःखाश्रूंतिलही गोडी — हास्याहुनि नाहीं थोडी !
दोघेही गोडच भास — आवडती चुंबायास !
प्रेमानें भरलें गात्र — सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्ही जाऊं — स्वैरपणें जगतीं राहूं !
प्रेतहि माझें पाहून — प्रेमानें गुंगत गान —
यापरि जग हर्षित व्हावें -- हें इच्छीं जीवेंभावें !

बालकवींचें प्रेत पाहून कवींनीं गाणीं गाइलीं असलीं तरी तीं भग्नहृदय होऊन, हर्षित होऊन मात्र नव्हे !

केशवसुतांच्या सांप्रदायांतले बालकवि ठोमरे हे शेवटचे दिवंगत कवि. केशवसुतांच्या सांप्रदायांतील मृत कवींत बालकवि हे वयानें सर्वांहून लहान होते. सर्वांच्या मागाहून ते पुढें आले आणि सर्वांना मागें टाकून अखेर ते या मृत्युलोकांतूनही सर्वांच्या अगोदर पुढें गेले ! टिळक, Bee , माधवानुज गोविंदाग्रज या त्यांच्या समकालीन सत्कवींनीं त्यांच्या डोळयांदेखत त्यांच्या बालभाषिताचें कौतुक केलें आणि मुक्तकंठानें त्यांचीं यशोगीतें जाहलीं ! मृण्मय कुडीच्या पाशांतून आत्म्याला मुक्त करणारें मरण हें एक मनोहर स्वप्न आहे असें समजणाऱ्या या बालकवीला, दाट धुक्यानें दिशाभूल होऊन, रेल्वेच्या रुळावर आगगाडीचा अपघात झाला आणि जळगांवास जमलेल्या विद्वज्जनांची वैखरी खोटी होऊन भवितव्यतेचें भलतें भाकित मात्र खरें ठरलें ! बालकवींच्या आकस्मिक आणि अकालिक मृत्यूनें महाराष्ट्रशारदा जरी क्षणभर विव्हळ झाली असली तरी केवळ स्वार्थी दृष्टीनें या घडल्या गोष्टीबद्दल खेद करणें उचित होणार नाहीं. नाशवंत कायेच्या दृढ बंधनांतून सुटलेलें हें ' काव्यपाखरूं '

देवांचीं राज्यें बघुनी -- हें भुललें, गेलें उडुनी !

असें समजून, बालकवींना जो ध्यास आमरण लागला होता, तो त्यांच्या मरणानें पूर्ण झाल्याबद्दल आपण आतां आनंदच मानिला पाहिजे !

श्रावण शु॥ ३, १८४२.

समाप्त

REFBK-0001890